गोविंद वासुदेव कानिटकर

कृत

स्त्रियांची परवशता.

प्रकाशक:—

बाबाजी सखाराम आणि कंपनी,

मुंबई.



जॉन् स्टुअर्ट मिल.

स्त्रियांची परवशता.

जॉन स्टुअर्ट मिल् कृत

'सब्जेक्शन ऑफ् वुइमेन्'

या ग्रंथाचें मराठी भाषान्तर

गोविंद वासुदेव कानिटकर

बी. ए. एल्. एल्. बी. वकील,

[illegible] 'मॅक्समूलरकृत धर्मविषयक व्याख्यानें,' 'अकबर बादशहा,'

'नारायणराव पेशवे यांचा वध,' 'कृष्णाकुमारी,' 'संमोहलहरी'

वगैरे गद्यात्मक व पद्यात्मक ग्रंथांचे कर्ते

यांनी केलें

तें

बाबाजी सखाराम आणि कंपनी,

यांनी

मुंबईत

[illegible] छापखान्यांत छापून प्रसिद्ध केलें.

सन १८[illegible]

किंमत १॥ रुपया.



জন্ ষ্টুয়ার্ট মিল

स्त्रियांची परवशता.

जॉन् स्टुअर्ट मिल् कृत

' सब्‌जेक्‌शन् ऑफ् वुइमेन् '

या इंग्लिश ग्रंथाचें भाषान्तर

गोविंद वासुदेव कानिटकर

बी. ए. एल्. एल्. बी. सबजज्ज;

' वीरसेन,' ' मोक्षमूलरकृत धर्मविषयक व्याख्यानें,' ' अकबर बादशहा,'

' नारायणराव पेशवे यांचा वध,' ' कृष्णाकुमारी,' ' संमोहलहरी '

वगैरे गद्यात्मक व पद्यात्मक ग्रंथांचे कर्ते

यांनीं केलें

तें

बाबाजी सखाराम आणि **कंपनी,**

यांनीं

मुंबईत

" तत्त्वविवेचक " छापखान्यांत छापवून प्रसिद्ध केलें.

सन १९०२.

किंमत १॥ रुपया.

अर्पणपत्रिका.

अपत्ये यत्तादृग्दुरितमभवत्तेन महता
विषक्तस्तीव्रेण व्रणित हृदयेन व्यथयता ।
पटुर्धारावाही नव इव चिरेणापि हि न मे
निकृन्तन् मर्माणि क्रकच इव मन्युर्विरमति ॥

पूरोत्पीडे तडागस्य परीवाहः प्रतिक्रिया ।
शोकक्षोभे च हृदयं प्रलापैरेवधार्यते ॥

उत्तररामचरितम्.

जिच्या आत्यंतिक, अकालीन, दुर्वह दुःखापासून माझ्या मनास खऱ्या वैराग्याचा थोडासा बोध किंवा स्पर्श झाला असें वाटून माझें लक्ष अध्यात्मविषयाकडे पूर्वींपेक्षां कांहींसें अधिक लागलें;

जिची दिव्य, सौम्य, पवित्र, मंगलमय मूर्ति व जिचे अनेक रमणीय सद्गुण वारंवार स्मृतिपथावर उभे राहून, माझें हृदय दारुणदुःखसंवेगानें पीडित करितात;

जी बालपणापासून वाग्देवीची धात्री, काव्यप्रतिभेची प्रेरयित्री, उदात्त कल्पनांची जनयित्री, रसात्मकतेची पोषयित्री, व करुण रसाची प्रत्यक्ष मूर्ति अशी मला वाटत होती;

जिच्या योगानें मला हा नितांत दुःखमय व कष्टमय जीवलोक प्रसंगविशेषीं क्षणमात्र सुखमय व आनंदमय असा भासत असे;

जी आपल्या सदैवमधुरभाषणानें, व परमशुद्ध आचरणानें स्वकीयांप्रमाणेंच परकीयांसही अत्यन्त प्रिय झाली होती;

जी आपल्या पित्याच्या व श्वशुराच्या–उभय कुलांतील मनुष्यांस पूर्वसुकृतफलाप्रमाणें व गृहलक्ष्मीप्रमाणें आनंददात्री असे;

जिची निधनवार्ता ऐकून एका भगवद्भक्त महाशयानें 'ती पूर्वींची कोणी योगभ्रष्ट असून दैववशात् इहलोकीं अल्पकाल वास करण्याच्या उद्देशानें अवतरली होती; ती आपली लावण्यमयी छाया, सर्वंकषा कुशाग्रबुद्धि व भक्तिश्रद्धामय प्रेमल अंतःकरण त्या चिद्रूप अमिताभ कोटिसूर्यसमप्रभ पुराणपुरुषाच्या चरणकमळीं अर्पण करून भृंगायमान झाली व निर्वाणपद पावली' अशा आशयाचा उद्गार काढून मला आश्वासन दिलें व माझें समाधान केलें;

त्या माझ्या परम प्रिय ज्येष्ठ कन्येस—

कै. सौभाग्यवती कृष्णाबाईस—

एका विख्यात आँग्लभौम महाशय स्त्रीजनवत्सल ग्रंथकाराच्या सुंदर ग्रंथाचें यथाशक्ति मराठींत उतरलेलें हें प्रतिबिंब, माझ्या दुःखित अंतःकरणास अत्यल्प समाधान समजून व तिच्या अनेक स्मारकां पैकीं एक अल्पसें स्मारक ह्मणून, मी सप्रेम अर्पण केलें आहे.

विषयोपन्यास.

क्व तावानानंदो निरतिशयविश्रंभबहुलः ?
क्व तेऽन्योन्यं यत्नाः क्व च नु गहनाः कौतुकरसाः ?
सुखे वा दुःखे वा क्व नु खलु तदैक्यं हृदययोः ?

* * * * *

उत्तररामचरितम्.

उतघा नेमो अस्तुत पुमाँ इति ब्रुवे पणिः

ऋग्वेद मं ५ सू, ६१.

जायापत्योर्मिलित्वैककार्यकर्तृत्वादेक एव पदार्थः अर्धशरीरस्य भार्येत्यादि स्मृतेः

ऋक्संहिताभाष्ये सायणाचार्याः.

" We are told that at the very beginning of creative work, when humanity was to be produced, the creator divided himself into two halves. One half male, and the other famale. This division of the Divine into two, marks, as it were, the basis of our theory. Both sexes are equally divine, each is one half of God, both sexes have their parts to play in human evolution, and in the evolution of the world as a whole." *Annie Besant on Womanhood* in "*Ancient Ideals*".

'There are thousands now
Such women, but convention beats them down :
It is but bringing up ; no more than that :
You men have done it : how I hate you all !
Ah, were I something great ! I wish I were
Some mighty poetess, I would shame you then,
That love to keep us children !'

From the Prologue to Tennyson's Princess.

'Dear, but let us type them now
In our lives, and this proud watchword rest
Of equal; seeing either sex alone
Is half itself, and in true Marriage lies
Nor equal, nor unequal: each fulfils
Defect in each, and always thought in thought,
Purpose in purpose, will in will, they grow,
The single pure and perfect animal,
The two-cell'd heart beating, with one full stroke,
Life.'

*
* *

'O we will walk this world
Yoked in all exercise of noble end,
And so thro' those dark gates across the wild
That no man knows.

From Tennyson's Princess.

स्त्रियांची परवशता.

प्रस्तावना.

प्रस्तुतचा ग्रंथ **इंग्लंडांत जॉन् स्टुअर्ट मिल्** या नांवाचा जो एक प्रसिद्ध तत्ववेत्ता व ग्रंथकार कांहीं वर्षांपूर्वीं होऊन गेला त्याच्या Subjection of Women नांवाच्या ग्रंथाचें भाषान्तर होय. या ग्रंथाच्या योग्यतेसंबंधानें एक दोन नामांकित विद्वानांचे अभिप्राय व इतर कांहीं उपयुक्त उतारे ग्रंथाचे शेवटीं पूरणिकेंत दिले आहेत. ते वाचनीय आहेत.

मिल् साहेबांची पत्नी (**मिसेस् टेलर्**) या बाई फार विद्वान होत्या, ही गोष्ट बरीच प्रसिद्ध आहे. **मिल्** साहेबांनीं आपलें चरित्र लिहिलें आहे. त्यावरून (पृष्ठें २४४,२६५ व २६६ पहा) त्या बाईची योग्यता केवढी मोठी होती हें कळून येतें.

डा० बेन या नांवाचे एक प्रसिद्ध ग्रंथकार व **मि. मिल्** यांचे परममित्र हे आपल्या "J. S. Mill: A Criticism" या नांवाच्या ग्रंथांत ह्मणतात:—"असें सांगतात कीं, Subjection of Women (स्त्रियांची परवशता) हा ग्रंथ **मि० मिल्** व त्यांची पत्नी या उभयतांमध्यें स्त्रियांच्या स्थितिविषयीं बरीच वर्षें जो ऊहापोह होत होता त्याचें फल होय. या ग्रंथरचनेच्या कामांत त्यांची मुलगी (**मिस् हेलन् टेलर**) ही मदत करीत असे. या ग्रंथाचा विषय त्यांच्या पत्नीच्या विशेष आवडीचा

होता, यांत संशय नाहीं. त्या बाईनीं जर एकाद्या विषयाच्या संबंधानें, प्रथम **मि० मिल्** यांच्या विचारावर व त्यांच्या द्वारें सर्व जगाच्या विचारावर आपल्या मतांचा कांहीं विशेष परिणाम घडवून आणिला असेल तर तो खचित याच विषयाच्या संबंधानें होय. स्त्रीपुरुषांची समता, याविषयाबद्दल **मि० मिल्** यांची जीं मूळचीं मतें होतीं, तीं **मिसेस् टेलर** या बाईचा व त्यांचा जो अपूर्व योग घडून आला तो आला नसता तर कदाचित् तशींच कायम राहतीं. परंतु त्या मतांचें मोठ्या उत्साहपूर्वक समर्थन करण्यांत आपल्या आयुष्याचा त्यांनीं जितका व्यय केला तितका केला नसता."

'न स्त्रीस्वातंत्र्यमर्हति' 'न स्वातंत्र्यंक्वचित् स्त्रियाः' हा सिद्धांत, किंवा हें शास्त्र आमचे देशांत सर्वविश्रुत आहे. **मि० मिल्** यांनीं या मताचा उत्तर पक्ष धरून सन १८६१ सालीं आपल्या पत्नीच्या सहानुभूतीनें एक लहानसा उत्कृष्ट ग्रंथ लिहिला व त्याचें नांव त्यांनीं Subjection of Women (स्त्रियांची परवशता अथवा स्त्रीदास्य) असें ठेविलें. तो प्रथम त्यांनींच सन १८६९ सालीं प्रसिद्ध केला. पुढें सुमारें ४ वर्षांनीं त्यांचे देहावसान झालें.

मूळ ग्रंथाची भाषा मार्मिक, रसाळ व अर्थप्रचुर आहे. जो पक्ष त्यांनीं स्वीकारला त्याचें समर्थन त्यांनीं फार उत्तम प्रकारें केलें आहे. यांत 'अधिकाराचा दुरुपयोग' या विषयावर इतिहासांतील व व्यवहारांतील उदाहरणें देऊन बरीच चर्चा केली आहे. याशिवाय जे मुख्य मुख्य सिद्धांत स्थापित केले आहेत ते

असेः—व्यावहारिक, राजकीय, सामाजिक, व गृहकार्यविषयक अशा सर्व संबंधांत स्त्रिया व पुरुष यांची समता मानिली पाहिजे. ह्मणजे, उभयांस हक्क सारखे ठेवून हल्लींचा त्यांचा सेव्यसेवक संबंध मोडून नवा समानाधिकारयुक्त असा संबंध स्थापिला पाहिजे. अत्यन्त उपयुक्ततेच्या दृष्टीनें हें समतेचें तत्व मान्य करणें आवश्यक आहे. पुराव्याचा बोजा नास्तिकपक्षावर, ह्मणजे अशी समता मान्य करणें योग्य नाहीं असें प्रतिपादन करणाऱ्यांवरच, नेहमीं राहिला पाहिजे. समाजांतील सर्व व्यक्ति न्यायदृष्टीला सारख्या मानिल्या पाहिजेत. त्यांत वैषम्य मानणें योग्य होणार नाहीं. इतिहासावरून असें दिसतें कीं, ज्या मानानें 'बळी तो कान पिळी' हा पूर्वींचा न्याय किंवा स्वामिसेवकभाव कमी होत गेला, व समतेचें तत्व अधिक अमलांत येत गेलें त्या मानानें मनुष्यांची व राष्ट्रांची उन्नत्ति अधिकाधिक होत गेली. ह्मणजे, निव्वळ जुलुमाचा प्रकार जसजसा नष्ट होत गेला, तसतसा मनुष्यस्वभावांत सत्वगुणाचा अंश अधिकाधिक व्यक्त होत गेला.

'बळी तो कान पिळी' या तत्वाचा परित्याग **इंग्लंड** देशांत इतर सर्व बाबतींत किंवा संबंधांत ज्या अर्थीं करण्यांत आला आहे त्या अर्थीं तें तत्व स्त्रीपुरुषांच्यासंबंधापुरतें तेवढेंच कायम ठेवणें योग्य होणार नाहीं.*

या सिद्धांतांचें किंवा मतांचें खंडन बऱ्याच पंडितांनीं व टीकाकारांनीं केलें आहे, हें येथें सांगणें अवश्य आहे. विशेषतः

* See J. S. Mill, by W. P. Courtney. (Great Writers) p. 162.

सर **फिटझ् जेम्स स्टीफन्** या नांवाच्या पंडितांनीं Liberty, Equality, Fraternity (स्वातंत्र्य, समता, बंधुत्व) या नांवाच्या ग्रंथांत **मि० मिल्** यांच्या " स्वातंत्र्य " नांवाच्या ग्रंथावर व प्रस्तुत ग्रंथावर एक टीकात्मक ग्रंथ लिहिला. त्यांत मिलसाहेबांच्या या दोन्ही ग्रंथांतील मुख्य सिद्धांतांचें खंडन जोरदार भाषेनें करण्याचा प्रयत्न केला आहे. प्रस्तुतस्थळीं माझे विद्वान् मित्र **रा० रा० नारायण लक्ष्मण फडके बी. ए.** यांनीं मिलसाहेबांच्या '**लिबर्टी**' (स्वातंत्र्य) नामक ग्रंथाचें केलेलें भाषान्तर १८९२ सालीं प्रसिद्ध झालें, त्याचा उल्लेख केल्याशिवाय माझ्या-च्यानें राहावत नाहीं. **रा० फडके** यांचा इंग्लिश ग्रंथांचीं भाषान्तरें करण्याचा व्यासंग अखंडित असून त्यांनीं **मिल्**, व **स्पेन्सर** ह्या दोन अत्यन्त प्रसिद्ध अशा पाश्चात्यग्रंथकारांचे महत्वाचे लेख प्रति-बिंबरूपानें स्वभाषेंत आणून महाराष्ट्र वाङ्मयांत भर पाडून जन्मभाषेचें व जन्मभूमीचें बरेंच ऋण फेडिलें, असें ह्मणणें अतिशयोक्तीचें होईल असें मला वाटत नाहीं. महाराष्ट्र भाषेचा उर्जित काल पुढें येवो वा न येवो. 'कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन' ही भगवदुक्ति ध्यानांत ठेऊन विद्वान् लोकांनीं जन्मभाषेच्या संबंधाचें आपलें पवित्र कर्तव्यकर्म उत्साहपूर्वक करणें हीच मुख्य गोष्ट आहे. करितां **रा० फडके** यांच्या स्तुत्य उद्योगाचें मनःपूर्वक, प्रेमपूर्वक व विनयपूर्वक मी प्रस्तुतस्थळीं अभिनंदन करितों. हा अभिनंदन करण्याचा योग किंवा संधि मला केव्हां तरी साधावयाचा होता. तो आजपर्यंत साधला नाहीं. ह्मणून प्रस्तुत

प्रसंगीं तो साधून घेतला. त्याबद्दल **रा० फडके** हे मला क्षमा करितील अशी आशा आहे. 'कधींच न करण्यापेक्षां उशिरा केलेलें बरें' अशा आशयाची इंग्रेजी भाषेंत एक ह्मण आहे. 'स्वातंत्र्य' ह्या ग्रंथांत **रा० फडके** यांनीं **मिल्**साहेबांचे बारीक टाइपाचें ३६ पृष्ठांचें 'संक्षिप्त' चरित्र, साहेब मजकूर यांनीं स्वतां लिहिलेल्या 'आत्मचरित्र' Autobiography नामक ग्रंथाच्या आधारें लिहिलें आहे. तेंही चांगलें आहे. तें या ग्रंथाच्या वाचकांनीं मुद्दाम वाचावें. त्यांत विशेषेंकरून **मिसेस् टेलर** बाई वीस वर्षांच्या स्नेहानंतर **मिल्** साहेबांची धर्मपत्नी कशी झाली; विलक्षण बुद्धि, परिपक्क विचार, मानवी स्वभावाचें तिचें पूर्णज्ञान; व्यावहारिक गोष्टींत तिचें शहाणपण, तिची न्यायप्रीति, वगैरे त्या बाईचे अंगीं असलेल्या अनेक गुणांमुळें **मिल्**साहेबांचे ग्रंथ किंवा लेख यांत त्या पतिपत्नींच्या दोन विचारौघांचा कसा संगम होऊन राहिला, वगैरे वृत्तान्त फार बोधप्रद व मनोरंजक आहे. 'स्त्रियांची परवशता' या ग्रंथाची रचना १८६१ सालीं झाली ह्मणून वर सांगितलेंच आहे. पुढें तो ग्रंथ तसाच ठेवून वेळोवेळीं सुधारून अतिशय उपयोग होईल अशावेळीं तो प्रसिद्ध करावा असा **मिल्** साहेबांचा प्रथम हेतु होता. तथापि वर सांगितल्याप्रमाणें सुमारें आठ वर्षांनंतर, ह्मणजे १८६९ सालांतच तो त्यांनीं छापून प्रसिद्ध केला. या ग्रंथांत जें जें कांहीं फार खोल व चित्तवेधक आहे तें तें ह्यांच्या बायकोचेंच आहे. **मिल्** साहेब आपल्या चरित्रांत ह्मणतात:—

"जेव्हां दोन माणसांचे विचार व कल्पनातरंग सर्वांशीं एक

होतात; जेव्हां बौद्धिक किंवा नैतिक, अशा संबंधाचे विषय घेऊन त्यांचा दररोज होईल तितका खल तीं करीत असतात; जेव्हां एकाच तत्वाचा आधार घेऊन त्याजवर विचार करून एकच प्रकारचे सिद्धांत तीं ठरवितात; तेव्हां विशेष कल्पना प्रथम दोघां-पैकीं कोणाच्या डोक्यांतून निघाली ह्या प्रश्नाचा निकाल, ती कोणाच्या लेखणींतून खालीं आली, ह्यावरून फारसा करितां येत नाहीं. अशा वेळीं असा संभव असतो कीं, त्या कल्पनांना लेखनरूपी शृंखलेनें बद्ध करण्यांत त्या दोघांपैकीं ज्या माणसाचें साहाय्य अगदीं कमी असेल, त्याचें कल्पना काढण्याच्या कामीं अतिशय असेल. अशा स्थितींत अमुक भाग अमक्याचा व अमुक दुसऱ्याचा असा बरोबर विभाग करणें सरासरी अशक्य होय. या दृष्टीनें पहातां माझा व तिचा प्रथम अत्यंत स्नेहसंबंध व पुढें शरीरसंबंध झाला असतां जे जे ग्रंथ मी छापून प्रसिद्ध केले त्यांत जितका माझा संबंध तितकाच तिचाही होता."

मिल् साहेबांनीं आपल्या पत्नीविषयीं आपली पूज्य बुद्धि व कृतज्ञताबुद्धि अनेक प्रसंगीं प्रदर्शित केली आहे. "माझ्या ग्रंथांत जें जें कांहीं चांगलें व उदात्त असें आढळेल त्याचा उगम ती होय." "सद्गुणाची जी तिची उन्नत कल्पना तीच माझी मुख्य प्रेरणा होय. तिची पसंती हेंच माझें उत्तमोत्तम बक्षिस!" याप्रमाणें **मिल्** साहेबांनीं आपल्या पत्नीसंबंधानें अनेक स्थळीं प्रेमळ उद्गार काढिले आहेत. विस्तार भयास्तव येथें अधिक देतां येत नाहींत.

मि० फ्रेडरिक् ह्यारिसन् यांनीं थोड्या वर्षांपूर्वीं '**नाइन्टीन्थ सेंचरी**' नांवाच्या प्रसिद्ध सर्वमान्य मासिकांत **मि० मिल्** यांच्या चरित्रास व ग्रंथांस उद्देशून एक फार सुंदर निबंध लिहिला आहे. त्यांतही **मिल्** साहेबांच्या कांहीं मतांचें खंडन करण्याचा प्रयत्न त्यांनीं केला आहे. तो निबंधही ज्यांस वाचावयास मिळेल त्यांनीं अवश्य समग्र वाचावा.

आमचे इकडे बरेच दिवसांपासून प्रहसनकारांनीं, नाटिकाकर्त्यांनीं, व कांहीं कांहीं वर्तमानपत्र कर्त्यांनीं 'स्त्रियांची परवशता' या विषयाची अगदीं फजिती उडवून टाकण्याचा जणुं विडाच उचलला होता व आहे, ही गोष्ट भाषान्तरकाराच्या ध्यानांत नाहीं असें नाहीं. तथापि, या विषयाचें महत्व लक्षांत आणून त्याचें प्रतिपादन शांत व गंभीर रीतीनेंच होणें इष्ट आहे, असें त्याचें मत असल्यामुळें यापूर्वींच प्रसिद्ध झालेल्या व पुढें प्रसिद्ध होणाऱ्या टीकात्मक लेखांची भीति न बाळगतां **मिल्**साहेबांच्या मूळग्रंथाचें हें प्रतिबिंब मराठी वाचकांचेंपुढें मांडण्याचें त्यानें एक प्रकारें धार्ष्टर्यच केलें आहे. हें भाषान्तर कांहीं वर्षांपूर्वीं पुणें येथें प्रसिद्ध होत असलेल्या '**मनोरंजन आणि निबंधचंद्रिका**' या नांवाच्या लोकप्रिय मासिकांत थोडथोडें छापवून प्रसिद्ध केलें होतें. त्यास बरीच वर्षे झालीं. त्यांत बरीच सुधारणा करून हल्लीं तें स्वतंत्र पुस्तकरूपानें प्रसिद्ध केलें आहे.

'स्त्रियांची परवशता' हा विषय उपहास करण्यासारखा नाहीं. 'अर्धं भार्या मनुष्यस्य भार्या श्रेष्ठतमः सखा। भार्या मूलं त्रिवर्गस्य' अशासारख्या **श्रीव्यासा**दिकांच्या उक्ति आहेत. 'नारियोंकूं निंदो

नही, नारी नरकी खान। जिस खानींसे पैदा हुवे **भीष्म राम हनुमान्**' असे **कबीरा**सारख्या भगवद्भक्तांनीं स्त्रीजातीबद्दल उद्गार काढिलेले आहेत. **सीता, द्रौपदी, वाचक्नवी, याज्ञवल्क्य** यांची **मैत्रेयी, जनक**राजाशीं संवाद करणारी **सुलभा** इत्यादि पवित्र व थोर स्त्रियांची नांवें इतिहास मानिलेल्या आमच्या पवित्र ग्रंथांतून आढळत आहेत. तेव्हां स्त्रियांची परवशता योग्य आहे, न्याय्य, आहे, हितावह आहे, असें मानणाऱ्या व प्रतिपादन करणाऱ्या लोकांचा जसा एक पक्ष तसाच उलट बाजू प्रतिपादन करणाराही दुसरा पक्ष असावा यांत नवल काय ? **स्त्रियांची परवशता** सर्वथा अन्याय्य, अहितकर व अनिष्ट आहे असें जरी सिद्ध झालें तरी तो शास्त्रार्थ किंवा सिद्धांत घेऊन आज आमच्या एकंदर स्त्रिया पुरुषांविरुद्ध बंड करितील, किंवा एकदम सर्वजणी उठून 'आमचें स्वराज्य, आमचें स्वातंत्र्य आह्मांस द्या. नाहीं तर आह्मी सर्व स्त्रिया एक जुटीनें पुरुषांचें राज्य झुगारून देऊं!' ह्मणून पुरुषांस दटावतील, किंवा आपलें ह्मणणें अमलांत आणतील, अशी भीति प्रतिपक्षास बाळगण्याची मुळींच गरज नाहीं. ज्या रूढीची व समजुतीचीं पाळेंमुळें समाजरूप भूमींत फार खोल गेलीं आहेत, त्यांचें उन्मूलन किंवा उत्पाटन केवळ शास्त्रार्थानें किंवा वादविवादानें क्षणमात्रांत होणार, अशांतली गोष्ट नाहीं. **बृहस्पतीनें** ह्मटलें आहेः 'केवलं शास्त्रमाश्रित्य न कर्तव्यो हि निर्णयः । युक्तिहीने विचारे तु धर्महानिः प्रजायते.'

सर्व व्यवहारशास्त्राचा पाया रूढ आचारावर रचलेला असतो.

कालवशात् किंवा परिस्थितिवशात् रूढि बदलत जातात. ह्मणजे शास्त्रही बदलत जातें. धर्महानि, ह्मणजे अर्थात् सुखहानि होण्याचें कारण 'युक्तिहीन विचार'. कै. परमपूज्य महर्षि न्यायमूर्ति **माधवराव रानडे** यांच्या व्याख्यानांतून व खासगी भाषणांतून अशा आशयाचा नेहेमी उद्गार निघे कीं, आह्मी इतके 'कॉन्झर्व्हेटिव्ह्' ह्मणजे मागून चालत आलेल्या गोष्टींचे अभिमानी व नव्याचे द्वेष्टे आहों कीं, आह्मांस कोणी एखादा आकाशांत भराऱ्या मारणारा सुधारक आपल्या नव्या विचारांनीं एकदम फरपटींत ओढून नेऊन एखाद्या नवीन मार्गास लावील अशी भीतिच नको! आमचा समाज ह्मणजे शिशासारख्या एखाद्या जड धातूचा एक प्रचण्ड गाडा! त्याला दोन पावलें तरी आपल्या मूळच्या जागेवरून पुढें ढकलणें, या कामास लागणारी वाफ किंवा शक्ति आह्मांजवळ इतकी थोडी व अपुरती आहे कीं, तिचा जोर एकाएकीं वाढेल व ती, ज्याचा हांकणारा नाहींसा झाला आहे अशा एखाद्या राक्षसी इंजिनाप्रमाणें हा गाडा रुळावरून भलतीकडेच ओढून नेऊन तो एखाद्या भयंकर खड्ड्यांत घालील, अशी भीति बाळगण्याचें अगदींच कारण नाहीं!*

* माधवरावजींनी प्रस्तुत भाषान्तरकारास सन १८९० सालीं फेब्रुवारी ता० २ चें एक पत्र पाठविलें होतें त्यांत त्यानीं आमच्या सामाजिक स्थितीस उद्देशून ह्मटलें आहेः—

"Authority is supreme in settling the smallest details of our life in all departments. In such a state of society, the expectation that each individual will possess sufficient independence to work out his destiny by the higher law within us is of course anticipating events by decades. In the mean while the fringe of society may be able to help itself, but it is after all a fringe and the mass is inert and spell-bound."

केवळ इतिहासदृष्ट्या व बुद्धिवादानें प्रस्तुत ग्रंथांतील विषयाचा विचार केला असतां, अमुक सिद्धांत निघतात किंवा अमुक गोष्टी लक्षांत येतात, हें जगापुढें मांडावें अशा उद्देशानें हा ग्रंथ मूळग्रंथकारानें लिहिला. त्याचें भाषान्तर करून लोकांपुढें ठेविलें आहे. जुन्या समजुतीच्या लोकांनीं मूळच्या ग्रंथकारावर किंवा भाषान्तरकारावर रोष करूं नये, किंवा टीकाकारांनीं केवळ विकारवश होऊन अथवा उपहास करण्याची बुद्धि धरून टीकात्मक लेख लिहून तुटून पडूं नये! तर त्यांनीं कृपादृष्टीकरून स्वस्थ चित्तानें व दुराग्रहाचा त्याग करून ग्रंथकाराचें ह्मणणें काय आहे तें ऐकावें एवढीच त्यांस विनंति आहे. **मिल्** साहेबांच्या शांत वृत्तीचा असा एक चमत्कार सांगतात कीं, त्यांस कोणच्याही वादांत उलट पक्षापेक्षां आपल्या स्वतांच्याच पक्षांतील दोष अधिक ठळक दिसत व ते **शंकराचार्यां**प्रमाणें पूर्वपक्षाचें ह्मणणें त्यास उत्तर देण्याचे अगोदर चांगल्या रीतीनें समजून घेत. माझ्या मतानें **मिल्**साहेबांनीं स्त्रियांच्या पक्षाचें समर्थन जितक्या उत्तम शब्दांनीं व युक्तींनीं करणें शक्य आहे असें त्यांस वाटलें तितकें केलें आहे. सुमारें ४०—५० वर्षांपूर्वीं **इंग्लंडांतील** स्त्रियांची स्थिति कशी होती हें या ग्रंथावरून बरेंच चांगलें लक्षांत येण्यासारखे आहे. **इंग्लंडांतील** स्त्रियांच्या त्या स्थितींत व हल्लींच्या स्थितींत अर्थात् पुष्कळच अंतर पडलें आहे. हें अंतर पडण्यास ज्या अनेक गोष्टी कारणीभूत झाल्या, त्यांपैकीं प्रस्तुत ग्रंथ हा एक कारण होय. **मि० फ्रेडरिक् हॉरिसन्** हे

आपल्या **मिल्**वरील निबंधांत ह्मणतात:—"स्त्रियांची परवशता" या ग्रंथाचा कायद्यांवर, लोकाचारावर व लोकमतावर फार महत्वाचा परिणाम घडून आला. पुष्कळ बाबतींत स्त्रियांच्या संबंधाचा कायदा बदलला. लोकांचा केवळ दुराग्रह, अथवा औदासिन्य, किंवा निवळ हलगर्जीपणा यांच्या योगानें स्त्रियांच्या वाजवी हक्कांची जी एकसारखी पायमल्ली होत होती, सार्वजनिक कामें करण्याविषयीं त्यांस जो प्रतिबंध करण्यांत येत असे, किंवा त्या अनधिकारी आहेत असें मानीत असत, तो बराच प्रकार मोडला. महत्पदाभिलाषी-स्त्रियांच्या मार्गांत एक दोन बाबी शिवाय करून कायद्याच्या दृष्टीनें किंवा नीतिदृष्टीनें कोणत्याही प्रकारें सांप्रत आडकाठी राहिली नाहीं. वाङ्मय, कला, वैद्यक, शास्त्र, व्यवहार, विश्वविद्यालयें, शारीरिक खेळ, राजकीय चळवळ, लोकसेवा (public service) इत्यादि व्यवसायांचे मार्ग त्यांस खुले झाले आहेत. **पार्लमे-न्टचे** सभासद होण्याचा व निवडण्याचा अधिकार, बॉरिस्टरचे किंवा वकिलाचे काम करण्याचा अधिकार, हे अधिकार अद्याप त्यांस निषिद्ध आहेत. परंतु हेही अधिकार त्यांस प्राप्त व्हावे अशाविषयीं यत्न चालूच आहेत व **इंग्लिश** स्त्रियांच्या बहुसंख्येनें जर हे अधिकार प्राप्त करून घ्यावे असें मनांत आणलें तर त्या प्रश्नाचा निकाल स्त्रियांस आपल्या तर्फे तेव्हांच करून घेतां येईल."

या ग्रंथास लहानशी प्रस्तावना लिहावी अशा विचारांत असतां प्रसिद्ध विदुषी ब्रह्मवादिनी श्रीमती **ॲनी बेसन्ट** बाई यांचीं Ancient Ideals (प्राचीन संस्था) या विषयावरील व्याख्यानें

पहाण्यांत आलीं; त्यांत Womanhood (स्त्रीजन किंवा स्त्रीवर्ग) या विषयावर एक सुंदर व्याख्यान आढळलें.

आपणांस जुन्या आचारा विचारांचे अभिमानी, सनातन धर्माचे कैवारी, व सुधारणाद्वेष्टे ह्मणविणाऱ्या आमच्यांत बऱ्याच व्यक्ति आहेत व त्यांस **ॲनी बेसन्ट** बाईचे लेख, व्याख्यानें व मतें, त्या बाई थिआसोफिस्ट पंथांत आल्यापासून मान्य होऊं लागलीं आहेत. अशा लोकांस व इतरांस अर्वाचीन स्त्रियांच्या स्थितीबद्दल त्या बाई काय ह्मणतात, हें कळावें ह्मणून त्या व्याख्यानांच्या आरंभीं प्रस्तावने दाखल लिहिलेला भाग महत्वाचा समजून खालीं देतों.

" माझ्या बंधूनों:—

अशी एक ह्मण आहे कीं, कोणत्याही देशांतल्या स्त्रियांच्या स्थितीवरून त्या देशाच्या एकंदर सुधारणेची किंवा उन्नतीची कल्पना करितां येते. ही ह्मण जर खरी असेल तर हा प्राचीन **आर्यावर्त** फार उन्नत अवस्थेला पोहोंचला होता याबद्दल संशयच रहात नाहीं. त्या काळीं स्त्रियांची स्थिति कशी होती, व त्या काळीं या भूमींत कशा योग्यतेच्या स्त्रिया निपजत होत्या या गोष्टीचें मनन करा. जगाचा इतिहास वाटेल तितका धुंडाळा. जगाच्या वाङ्मयाची पृष्ठें वाटतील तितकीं उलथी पालथी करा. परंतु तुह्मांस **आर्यावर्ता**तील प्राचीन ग्रंथसंग्रहांत किंवा वाङ्मयांत उपलब्ध होणाऱ्या स्त्रियांहून अधिक सुंदर, अधिक तेजस्वी व अधिक हृदयंगम स्त्रिया कोठेंही आढळणार नाहींत. मला असें वाटतें कीं, प्रत्येक उत्तम सद्गुण व हरएक जातीचें सौंदर्य एकत्र गोळा

करून, मनुष्यरूपी मुशींत ओतून तयार केलेल्या त्या पुतळ्या जणुं काय मुद्दाम उंच जागीं ठेवून दिल्या आहेत. हेतु इतकाच कीं, सर्व जगानें त्यांजकडे पहातच रहावें!

"त्या थोर स्त्रियांपैकीं कांहींची नांवें पूर्वात्यांस व पाश्चिमात्यांस घरगुती नावांप्रमाणें प्रिय व परिचित झालीं आहेत.

"प्राचीन **आर्यावर्तां**तील स्त्रियांची चित्रें अत्यंत रमणीय आहेत, व स्त्रीजातीचे उत्कृष्ट नमुने **आर्यावर्ता**च्या प्राचीन वाङ्मयांतच दृष्टीस पडतात. जगांत अन्यत्र कोठेंही त्यांहून चांगले नमुने दृष्टीस पडत नाहींत. ही गोष्ट पाश्चिमात्य ग्रंथकार, पंडित व तत्त्ववेत्ते यानीं कबूल केली आहे. पाश्चिमात्य ग्रंथकारांच्या ग्रंथांतून पृष्ठेंच्या पृष्ठें अशीं दाखवितां येतील कीं, ज्यांवरून, त्यांच्या मनांत स्त्रीजातीच्या उत्कृष्ट नमुन्यांचीं चित्रें कशीं बिंबून गेलीं आहेत हें सहज कळून येईल. या व्याख्यानाच्या आरंभीं मला ही गोष्ट तुमच्या ध्यानांत चांगली आणून दिली पाहिजे.

"इतर विषयांप्रमाणें या विषयांतही आधुनिक **आर्यावर्तानें** कोणकोणत्या बाबतींत आपल्या वर्तनक्रमांत बदल केला पाहिजे, हें समजण्याकरितां प्राचीन **आर्यावर्तां**त आढळणारे उत्कृष्ट नमुने आपल्या ध्यानांत आणले पाहिजेत. ज्यामानानें भूतकालाची महती आपल्या लक्षांत येईल, ज्यामानानें वर्तमान कालाची अवनति व दरिद्रावस्था आपल्या मनांत चांगली बिंबेल, त्या मानानें, आणि ज्या मार्गानें गेलें पाहिजे तो मार्ग आपणांस स्पष्ट

दिसेल. पण हें सर्व त्या प्राचीन काळांतील वैभव पुनः आपणांस परत मिळावें अशी आपली इच्छा असेल तर! कारण, या व्याख्यानाच्या आरंभीं मी आपणांस सांगितलेंच आहे कीं, समाज सुधारणेसंबधानें जे महत्वाचे प्रश्न आहेत त्या प्रश्नांचा विचार करितां असें दिसून येतें कीं, प्रत्येक गोष्टींत बदल व्हावा अशी इच्छा करणारा एक पक्ष आहे, व कशांतच फरक होऊंनये अशी इच्छा करणारा दुसरा एक पक्ष आहे. या दोन अप्रयोजक व्यवहारानभिज्ञ पक्षांमध्यें आर्यावर्ताची भावी स्थिति लोंबत राहिली आहे! आपणांस प्राचीन नमुन्यांचें ज्ञान झाल्या शिवाय, किंवा जो इष्ट हेतु आपणांस साधावयाचा आहे तो हेतु, अथवा ज्या स्थानीं आपणांस जावयाचें आहे त्या स्थानाप्रत नेणारा मार्ग, कोणचा हें कळल्याशिवाय, कोणच्या सुधारणा घ्याव्या, व कोणच्या टाकाव्या हें कसें कळणार? या प्राचीन नमुन्यांच्या अनुरोधानें किंवा प्रेरणेनेंच चाललें असतां आपल्या आचारांत केलेले फरक किंवा सुधारणा शहाणपणाच्या होणार आहेत, व त्या नेटानें अमलांत येणार आहेत. ज्यामानानें प्राचीन नमुन्यांचें सौंदर्य पाहून आपलीं अंतःकरणें त्यांजकडे ओढलीं जातील त्यामानानें आपली जन्मदात्री जी आर्यभूमि तिला जगांतील इतर राष्ट्रांत योग्य अशा उन्नत दशेला पोहोंचविण्याविषयीं आपण समर्थ होऊं ”

मिसेस् अनी बेझंट बाईनीं ‘ इंडियन् लेडीझ् म्यागाझीन् ’ नांवाच्या मासिकांत स्त्रीशिक्षणावर थोडक्यांत आपला अभिप्राय

प्रसिद्ध केला आहे. तो **थिऑसॉफिस्टचे** जान्युआरी १९०२ चें अंकांतून संग्राह्य समजून घेतला आहे:—

" अज्ञान हें कोणत्याही राष्ट्राच्या उन्नतीला विघातक व देश-हिताला धोका बसविणारें आहे व स्त्रिया हें राष्ट्राचें अर्धें अंग आहे. ह्या दोन गोष्टी इतक्या उघड आहेत कीं, स्त्रियांना शिक्षण द्यावें किंवा नाहीं, याबद्दल ऊहापोह करण्याची कधींच जरूर पडूं नये. व्यक्तिविषयक सुख एका बाजूला ठेविलें व राष्ट्राच्या हिताकडेच जरी आपण पाहिलें, तरी असें स्पष्ट दिसतें कीं, त्या राष्ट्रांतील माताच जर अज्ञानपंकनिमग्न असल्या तर अर्थातच त्यांची प्रजा, हीनबुद्धि निपजणार. आणि ज्याअर्थीं ती प्रजा ह्मणजे त्या राष्ट्राचे भावी अवयव किंवा स्तंभ, त्या अर्थीं त्या राष्ट्राच्या उन्नतीला उतरती कळा लागणारच. एका अर्थीं स्त्रियांच्या शिक्षणाला पुरुषांच्याही शिक्षणापेक्षां जास्ती राष्ट्रीय महत्व आहे. कारण, भावी पुरुषांना वळण लावण्याचें काम स्त्रियांचे हातांत असतें. आणि त्यांनीं दिलेल्या शिक्षणाचा परिणाम कधींही नाहींसा होत नाहीं. 'थोर पुरुषांच्या आयाही थोरच होत्या' हीएक **इंग्लंडांत** ह्मणच होऊन बसली आहे. शुद्धाचरणी, भक्तिमान, सदृढ व शहाण्या आईच्या आचरणाचा परिणाम मुलावर किती होईल याबद्दल पूर्ण कल्पनाच करितां येणार नाहीं. अज्ञान आईस, आपल्या मुलाची प्रकृति कशी सदृढ ठेवावी हें माहित नसतें; ती त्याच्या मनोविकारांस भलत्याच रीतीचें वळण देते; त्याच्या बुद्धीस कोतेपणा आणिते; आणि त्याचें मन अप्रसन्न

करिते; ह्मणजे, अध्यात्मविषयासंबंधानें ती त्यास पूर्ण अज्ञानांत ठेविते. कारण, ती अज्ञान असल्यानें तिला आरोग्याचे नियम माहित नसतात; ज्याच्या योगानें त्याची बुद्धि विकास पावेल असें शिक्षण त्यास तिला देतां येत नाहीं; ती प्रेमास स्वार्थपरायणतेनें दूषित करिते व धर्मभोळेपणा ह्मणजेच धर्म असें त्यास वाटावयास लाविते.

"स्त्रियांनां शिक्षण द्यावें असें मानिलें, तरी कोणती शिक्षणपद्धति स्वीकारावी हा प्रश्न रहातोच. व हाच प्रश्न **हिंदुस्थानांत** प्रस्तुत फार महत्वाचा आहे. कारण, स्त्रियांनां शिक्षण देण्याची आवश्यकता दिवसानुदिवस फार वाढत आहे. देशाच्या प्रस्तुत स्थितीला अयोग्य असें शिक्षण जर देण्यांत आलें तर फार धोका बसण्याचा संभव आहे. कांहीं अशीं असा प्रकार हल्लीं या देशांत चालूही आहे. इंग्लंडमध्यें उच्च प्रतीचें शिक्षण या नांवाखालीं जें शिक्षण देतात, त्यांत व **हिंदुस्थानांत** जें शिक्षण दिलें जात आहे, त्यांत कांहींच फरक दिसत नाहीं.

"मला ह्या मासिक पुस्तकाची जागा फार अडविणें बरोबर वाटत नसल्या कारणानें, असल्या तऱ्हेचें शिक्षण **इंग्लंडांतील** लोकांस किती फायद्याचें किंवा तोट्याचें आहे, याबद्दल फार लिहितां येणार नाहीं. थोडक्यांत मला इतकेंच सुचवितां येईल कीं, जीवनार्थ कलहांत पुरुषांची बरोबरी करितां यावी म्हणून आपण आपल्याच श्रमांवर निर्वाह करण्याऱ्या स्त्रियांनां असल्या शिक्षणाची अवश्यकता होती आणि म्हणूनच त्याचा प्रचार **इंग्लंडांत** सुरू झाला.

पोटासाठीं श्रमाचा विक्रय करण्याचा प्रसंग आला असतां, उत्तम प्रकारचें शिक्षण मिळून जीवनार्थ कलहास तयार झालेल्या पुरुषांची बरोबरी अर्धवट शिकलेल्या स्त्रियांनां कारितां येईना. यामुळें त्यांस वेतन कमी मिळूं लागे. पोटाकरितां पुरुषांचींच कामें करून पुरुषांशीं चढाओढ करावी लागल्यामुळें तेथील बायकांनीं पुरुषांस मिळत असलेलें शिक्षण मिळविण्याचा निश्चय केला; व म्हणून पुरुषांचें जें उच्च शिक्षण, तेंच स्त्रियांचेंही उच्च शिक्षण बनलें, व पुरुषांप्रमाणेंच त्यांच्याही शिक्षणाचीं मुख्य चिन्हें 'डिग्र्या' व 'डिप्लोमे' हीं बनलीं.

"**हिंदुस्थानांतील** व्यावहारिक व सामाजिक स्थिति, व **इंग्लंडां**तील व्यावहारिक व सामाजिक स्थिति, यांमध्यें जर साम्य असतें, व तिकडच्या प्रमाणें अविवाहित स्त्रियांचे थवेच्या थवे जर इकडे पोटास मिळविण्या साठीं धडपड कारितांना आढळले असते, तर **इंग्लंडांत** ज्या शिक्षणाची गरज आहे असें शिक्षण इकडेही द्यावें, हें म्हणणें कांहीं तरी शोभलें असतें; पण **हिंदुस्थानां**त अशी स्थिति नाहीं, हें प्रत्येकाला ठाऊक आहे. अगोदरच एकमेकांवर वरचढ करण्याच्या इच्छेमुळें, श्रमाची किंमत कमी होऊन चांगल्या सुशिक्षित पुरुषांनाही अगदीं भिकार रोजमुरा मिळतो. या सुशिक्षित पोट भरणाऱ्या पुरुषांच्या संख्येंत लाखो स्त्रियांची भर पडून त्यांची अहमहमिका किंवा जीवनार्थकलह वाढण्याचा इकडे मुळींच संभव नाहीं. पोटासाठीं भाकरी मिळविण्याचें काम (जें करण्याचा प्रसंग इकडील स्त्रियांवर नाहीं)

करावयाची योग्यता देणारी **इंग्लंडां**तील शिक्षणपद्धति इकडे कां आणावी किंवा चालू करावी? ज्या शिक्षणपद्धतीनें त्या उत्तम गृहिणी व माता होतील—आणखी हीच गोष्ट त्यांस अधिक श्रेयस्कर आहे—असें शिक्षण त्यांनां कां न मिळावें? आर्यवृत्तीला व शीलाला अनुसरून असेल व जें परिणामीं **हिंदुस्थानास** हितकर होईल, असें शिक्षण द्यावें, येवढेंच माझें ह्मणणें आहे.

"या शिक्षणपद्धतीची दिशा मी थोडक्यांत सुचवितें ती अशी:— प्रत्येक स्त्रीला आपल्या जन्मभाषेचें पूर्ण ज्ञान असलें पाहिजे; मग ती जन्मभाषा **हिंदी, बंगाली, तेलंगी, तामीळ** कोणचीका असेना? त्याच प्रमाणें, तिला त्या भाषेंत लेखही लिहितां आले पाहिजेत. उदात्त व प्राचीन असें **संस्कृत** वाङ्मय, **संस्कृत** काव्यें आणि पुराणें सहज रीतीनें व जेणें करून तिला आनंद होईल अशा रीतीनें वाचतां येण्यासारखें संस्कृताचें ज्ञान तिला असावें. त्याच प्रमाणें शक्य असल्यास **इंग्लिश** भाषेचेंही ज्ञान तिनें संपादन करावें. त्याचा हेतु इतकाच कीं, त्या भाषेच्या ज्ञानामुळें इंग्रेजी शिकलेल्या आपल्या पतीविषयीं व मुलांविषयीं तिच्या ठायीं सहानुभूति उत्पन्न व्हावी. इंग्रेजी भाषेच्या ज्ञानानें ज्यापासून आनंद व बोध प्राप्त होणारा आहे अशा विचारांच्या प्रदेशांत तिला प्रवेश करितां येणार आहे. शिवाय, **हिंदुस्थानांतील** हल्लींच्या सुधारणेच्या कारणांपैकीं एका बलवत्तर कारणाशीं तिचा प्रत्यक्ष परिचय होणार आहे. रहाण्याची जागा, स्वतःच्या संवयी व घरांतील इतर व्यवस्था वगैरे संबंधाचे जे नियम, जे पाळिले असतां आरोग्याची वृद्धि करितात, त्या

नियमांचें यथार्थ ज्ञान तिला असावें. दुखणेकऱ्याची नीटपणें शुश्रूषा करितां यावी व पडशाखोकल्यासारख्या लहान सहान दुखण्यांत आपल्या मुलांस औषधपाणी देतां यावें, इतक्या पुरतें शारिरशास्त्र व वैद्यक यांचेंही ज्ञान असावें. त्याचप्रमाणें कोणच्या तरी एका कलेचें ज्ञान, मुख्यत्वेंकरून संगीताचें, चित्रकलेचें, आणि शिवणकामाचें ज्ञान—झाल्यानें गृहिणीला आपलें घर साध्या व आल्हाददायक वस्तूंनीं आकर्षक करितां येईल; व तें निर्दोष व सुखपूर्ण अशा वस्तूंचें स्थान होईल. मी नम्रपणानें असें सुचवितें कीं, असल्या तऱ्हेच्या शिक्षणानें **हिंदुस्थानां**तील स्त्रियांच्या मोहकतेला व शीलाला धक्का न बसतां त्यांच्या बुद्धीचा विकास होईल. असें केल्यानें त्यांचें अंतःकरण शुद्ध होईल, त्यांची ग्रहणशक्ति वृद्धिंगत होईल, त्यांच्या मनांत भक्तिभाव उत्पन्न होईल आणि त्यांच्या आत्म्यांना आपलें सत्स्वरूप ओळखून घेण्याची जिज्ञासा तृप्त करून घेतां येईल. **हिंदुस्थानांतील** स्त्रीची अध्यात्मपरता कधींही नाहींशी होणार नाहीं. परंतु तिच्या **भक्ति-मत्तें**त **ज्ञाना**चीहि भर पडली पाहिजे. ह्मणजे, तिच्यांत साधुत्वाप्रमाणें ज्ञानीपणाही उत्पन्न होईल, व तिला आपला जो उदात्त असा प्राचीन धर्म त्याकडे आपल्या ज्ञानाचा व भक्तीचा अशा दोहींचाही उपयोग करून घेतां येईल. आणि, वितंडवाद व नास्तिक्य यांच्या वाईट परिणामापासून तिला आपल्या पतीचें व पुत्रांचें रक्षण करितां येईल. हिंदुधर्माच्या योगानें ती अजूनपर्यंत शुद्ध राहिली आहे. त्याच धर्माच्या योगानें तिला पूर्वीच्या स्त्रियांप्रमाणें पुनः ज्ञानी झालें पाहिजे."

सांप्रतच्या आमच्या एकंदर शोचनीय, उदासीनतेच्या, दौर्मनस्याच्या, व अनुदारविचाराच्या काळांत, आमच्या लोकांच्या मनावर प्रस्तुत ग्रंथाच्या वाचनानें कांहीं विशेष परिणाम जरी घडला नाहीं, तरी, एका महत्वाच्या सामाजिक विषयावर **इंग्लंडां**तील एका महापंडिताचे विचार कसे होते ते आमच्या लोकांपुढें मांडून ठेवल्यापासून देखील त्यांस बराच फायदा होईल, अशी आशा धरून हा भाषान्तराचा प्रयत्न केला आहे.

मूळग्रंथांत निरनिराळ्या पारिग्राफांस (वाक्यविच्छेदांस) आंकडे दिलेले नाहींत. परंतु भाषान्तरांत सोईकरितां कलमवार आंकडे घातले आहेत. भाषान्तर होतां होईल तितकें मुळास धरून केलें आहे. योग्य वाटल्या तेथें त्या त्या पृष्ठाखालीं स्पष्टीकरणार्थ टीपा दिल्या आहेत. त्यांचा वाचकांस बराच उपयोग होईल अशी आशा आहे. मूळग्रंथकाराच्या आशयाचें हुबेहुब प्रतिबिंब उठलें आहे किंवा नाहीं, याचा निर्णय अर्थात वाचक करितील. परंतु ज्या टीपा दिल्या आहेत त्यांचे संबंधानें माझे विद्वान् मित्र **रा. फडके** यांनीं आपल्या 'स्वातंत्र्य' ग्रंथाचे उपोद्घाताचे शेवटीं ह्मटल्याप्रमाणें मी ही आपल्या वाचकांस त्यांच्याच सुंदर विनयदर्शक शब्दांनीं ह्मणतों कीं, या 'टीपांतून जीं उदाहरणें वगैरे दिलीं आहेत तीं, कित्येक ठिकाणीं असावीं तितकीं योग्य नाहींत; यास कारण सामर्थ्याभाव हें होय, हें सांगावयास नकोच. पण त्यांच्या संबंधानें सुज्ञ वाचकांनीं मेहेरबानीनें एवढें लक्षांत ठेवावें कीं, कोणत्याही पक्षावर, संस्थेवर किंवा

व्यक्तीवर कुबुद्धीनें टीका करण्याच्या उद्देशानें तीं दिलीं नाहींत. केवळ विषयाच्या समजुतीसाठीं दिलीं आहेत. त्यांत मानवी स्वभावाच्या स्खलनशीलतेमुळें प्रसंगोपात्त अधिक उणा शब्द कोणास लागण्यासारखा पडला असेल, तर त्याबद्दल त्यांनीं क्षमा करावी, अशी सविनय विज्ञप्ति आहे.'

या ग्रंथास पुणें येथील 'डेक्कन् व्हरन्याक्युलर ट्रान्स्लेशन् सोसायटी' नावांच्या मंडळीनें बक्षिस दिलें व ग्रंथप्रकाशनार्थ उत्तेजन दिलें व अवकाश दिला त्या बद्दल भाषान्तरकार सदर्हु मंडळीचा फार आभारी आहे.

हें पुस्तक छापण्याचें काम बरेंच घाईनें झालें असल्यामुळें व भाषान्तरकारास ग्रंथमुद्रणाचें काम सुरुझाल्यापासून, अनेक कारणांनीं असावें तितकें चित्तस्वास्थ्य किंवा मनाची शांतता अनुकूळ नसल्यामुळें पुष्कळ ठिकाणीं भाषेचीं, लेखनपद्धतीचीं व इतर अशुद्धें राहिलीं आहेत. त्यांजकडे वाचकांनीं कृपादृष्टी करावी एवढी विनंति आहे.

हें भाषान्तर करीत असतां माझे जुने, प्रेमळ व रसिक मित्र **रा. रा. गंगाधर अनंत ठाकूर,** यांनीं लिहिण्याचे वगैरे कामीं मला बरीच मदत केली त्याबद्दल प्रस्तुतस्थळीं त्यांचे मी मनःपूर्वक आभार मानितों. त्याचप्रमाणें हा ग्रंथ छापून काढण्याचे कामीं माझे पुण्यांतील लोकप्रिय, प्रेमळ व विद्वान् मित्र **रा. रा. हरी भाऊ** ऊर्फ **हरी नारायण आपटे** यांनीं हा ग्रंथ स्वतंत्र

पुस्तकरूपानें जगापुढें ठेवण्याच्या कामीं जें मला उत्साहपूर्वक साहाय्य केलें त्याजबद्दल मी त्यांचा फार ऋणी आहे.

शेवटीं, स्त्रियांची खरी उन्नति व्हावी एतदर्थ मनापासून झटणाऱ्या माझ्या सर्व देशबांधवांस व भगिनींस मी फार दिवसांपासून मनांत आणलेली ही माझी अल्प सेवा मान्य होवो अशी मी परमेश्वरापाशीं प्रार्थना करून ही प्रस्तावना संपवितों.

ॐ तत् सत् ब्रह्मार्पणमस्तु.

मालेगांव, मार्च १९०२.

गो. बा. कानिटकर.

स्त्रियांची परवशता.

भाग १ ला.



१. हा निबंध लिहिण्याचा हेतु काय? असा प्रश्न वाचकांच्या मनांत प्रथमारंभींच उत्पन्न होण्यासारखा आहे, ह्मणून त्या प्रश्नाचें उत्तर मी देतों. माझ्या अगदीं लहानपणापासून—ह्मणजे, जेव्हांपासून सामाजिक गोष्टी व राजकीय गोष्टी यांच्यासंबंधानें माझीं अमुक ह्मणून कांहीं मतें ठरलीं, तेव्हांपासूनच एका महत्वाच्या विषयाबद्दल माझें दृढ असें एक मत होऊन गेलें आहे. हा महत्वाचा विषय कोणचा ह्मणाल तर अर्थात प्रस्तुत निबंधाचा. ह्मणजे **स्त्रियांची परवशता** हा होय. या विषयाच्या संबंधानें जें माझें एक पक्कें मत होऊन गेलेलें आहे, त्याचीं कारणें जितक्या स्पष्ट रीतीनें मला लोकांस सांगतां येतील तितक्या स्पष्ट रीतीनें सांगावीं, एवढाच प्रस्तुत निबंध लिहिण्यांत माझा उद्देश आहे. तेव्हांपासून आजपर्यंत जो काळ लोटला, तेवढ्या काळांत तें माझें मत दुर्बळ झालें नाहीं, किंवा त्यांत कांहीं फेरबदलही झाला नाहीं. उलट जों जों या संसारांतलि माझा अनुभव वाढत गेला व जों जों माझी विचारशक्ति वाढत गेली, तों तों तें माझें मत बळावत जाऊन अधिक दृढ होत गेलें. हें मत कोणचें तें सांगतों. प्रस्तुतकाळीं स्त्रीपुरुषांमधील परस्परव्यवहार जे आपण पहातों, त्यांत नियामक असें एक मुख्य तत्व आपल्या दृष्टीस पडतें. एका

वर्गाला (स्त्रीजातीला) दुसऱ्या वर्गाची (पुरुषजातीची) कायदेशीर रीतीची गुलामगिरी करण्यास लावणें, हें तत्व माझ्या समजुतीप्रमाणें वस्तुतः अगदीं चुकीचें असून एकंदर मानवजातीच्या सुधारणेस व उन्नतीस बाधक अशीं जीं कित्येक कारणें आजकाल आहेत, त्यांपैकीं हें एक मुख्य कारण आहे. हें तत्व आपणांस टाकून दिलें पाहिजे, व त्याच्या ऐवजीं पूर्ण समतेचें तत्व अमलांत आणिलें पाहिजे. ह्मणजे, संसारांत स्त्री व पुरुष सारखे अधिकारी आहेत, एकाला अधिकार किंवा हक्क जास्ती, व दुसऱ्याला कमी, असा कांहीं प्रकार नाहीं, असें समजलें पाहिजे.

२. लोकांना जी गोष्ट समजून देण्याचें मी योजिलें आहे ती सांगण्याला योग्य असे शब्द सुचणेंही इतकें कठिण आहे कीं, त्यावरून मी हातीं घेतलेलें काम कडेस जाण्याला किती प्रयास पडतील हें सहज समजेल. परंतु एवढ्यावरून माझ्या मताच्या पुष्टीकरणार्थ जीं कारणें मी दाखविणार आहें, तीं सबळ नाहींत किंवा स्पष्ट नाहींत; आणि म्हणूनच प्रस्तुत विषयाचें प्रतिपादन करणें मला कठिण जाणार आहे, असा मात्र माझ्या म्हणण्याचा आशय कोणी समजूं नये. इतर सामाजिक व राजकीय विषयांच्या संबंधानें लोकांत रूढ झालेले फार दिवसांचे ग्रह बदलून टाकणें जसें कठिण जातें, त्याचप्रमाणें प्रस्तुत विषयाच्या संबंधाचीही गोष्ट आहे. जोंपर्यंत कोणत्याही मताचें मूळ लोकांच्या मनोवृत्तींत खोल गेलेलें असतें, तोंपर्यंत त्या मताच्या विरुद्ध जों जों अधिक कारणें दाखवावीं व जों जों अधिक पुरावा करावा तों तों त्या मताला उलट अधिक जोर येत जातो.* ही एक मोठी

* मराठींत 'हालवून बळकट करणें' अशी एक म्हण आहे. तिचें तात्पर्य हेंच. इलबर्ट बिल, संमति कायद्याचें बिल, चहा प्रकरण, अशासारख्या आमच्या अगदीं आधुनिक इतिहासांत घडलेल्या गोष्टींचा जरी विचार केला तरी, बहुजनसमाजाच्या मनावर विचारापेक्षां बहुत दिवसांचा झालेला जो ग्रह त्याचा पगडा किती जबरदस्त असतो, हें वाचकांच्या ध्यानांत आल्याशिवाय राहणार नाहीं. भा० क०

चमत्कारिक गोष्ट आहे. कारण, त्यांचें जें कांहींएक ठाम मत बनलेलें असतें, तें जर कांहीं आधारावरून किंवा पुराव्यावरून झालें असेल, तर त्याचें खंडन केलें असतां तें मत लटपटूं लागावें व लोकांचा खरोखर त्यावरील भरंवसा कमी व्हावा. परंतु, बहुधा असें घडत नाहीं. लोकांच्या केवळ वाटण्यावरच, म्हणजे मनाच्या ग्रहावरच जेव्हां एखाद्या मताचा पाया रचलेला असतो, तेव्हां त्या विषयावर वादविवाद होऊन जों जों तें मत निराधार आहे असें ठरतें, तों तों त्या मताच्या पुरस्कर्त्यांस वाटूं लागतें: 'अहो, ज्या अर्थीं बुद्धिवादानें आमचें हें मत बदलत नाहीं त्या अर्थीं आमच्या या मताला, किंवा आमच्या या मनाच्या ग्रहाला दुसरा कांहीं तरी बळकट आधार असावा!' ही लोकांची समजूत जोंपर्यंत कायम राहते, तोंपर्यंत, त्या मतावर प्रतिपक्षांनीं केलेल्या प्रहारांमुळें वारंवार नव्या कल्पना, अथवा नवे तर्क काढून, त्या मताचे जे भाग ढांसळून जातात त्यांची डागडुजी करण्याचा ते यत्न करितात. जुने आचार, जुन्या संस्था व जुन्या रूढि, यांच्या मंडनार्थ व संरक्षणार्थ लोकांचे ग्रह पाहारेकऱ्यांप्रमाणें सदैव तत्पर असतात. विशेषेंकरून प्रस्तुत विषयाच्या संबंधानें लोकांचा जो ग्रह आहे तो फार बलवत्तर असून त्याचीं पाळेंमुळें फारच खोल गेलेलीं आहेत. असें असण्याचीं कारणें पाहूं जातां तीं इतकीं पुष्कळ आहेत कीं, आलीकडे समाजाच्या एकंदर आध्यात्मिक व व्यावहारिक स्थितींत जरी फार मोठा फेरबदल झाला आहे व सुधारणा झाली आहे, तरी त्यांतूनही प्रस्तुत विषयाच्या संबंधानें लोकांच्या जुन्या समजुती अद्यापि जशाच्या तशाच कायम राहिल्या आहेत. त्या जितक्या ढिल्या होऊन जाव्या तितक्या अद्यापि झाल्या नाहींत. या गोष्टीचें आपणांस विशेष आश्चर्य मानण्याचें कारण नाहीं. कांहीं रानटी आचारांस मनुष्यें पुष्कळ दिवस चिकटून राहतात, एवढ्याच कारणानें, त्यांचा रानटीपणा, जे रानटी आचार

मनुष्यें लौकर सोडून देतात त्यांच्यापेक्षां कांहीं कमी असतो, असें म्हणतां येत नाहीं.*

३. कोणत्याहि सार्वजनिक मताचें खंडन करण्यास उद्युक्त होणाऱ्या मनुष्यांच्या शिरावर सर्व प्रकारें मोठा बोजा असतो. अगोदर त्यांचें ह्मणणें कोणी ऐकतच नाहीं. जर लोकांनीं त्यांचें ह्मणणें ऐकून घेतलेंच तर ते मोठे भाग्यशाली व अलौकिक सामर्थ्याचे असले पाहिजेत. न्यायासनासमोर जाणाऱ्या पक्षकारांस फैसला मिळण्यास जितकी अडचण पडते, त्या पेक्षांही अधिक अडचण अशा माणसांस नुसत्या चौकशीच्या कामीं पडते. मोठ्या मुष्किलीनें चौकशीचा प्रसंग घडवून आणलाच तर इतर लोकांची जी वादाची प्रमाण-पद्धति, तिच्याहून अगदीं भिन्न अशा प्रमाण-पद्धतीच्या कचाट्यांत लोक त्यांस धरितात. इतर सर्व कामांत पुराव्याचा भार अस्तिपक्षावर घालणें योग्य समजतात. एखाद्या मनुष्यावर खुनाचा आरोप करून जे त्यास दोषी ठरवूं पहातात तो मनुष्य दोषी आहे असें शाबीद करण्याचा बोजा त्यांच्यावरच असतो. मी निरपराधी आहें, असें त्या आरोपीस प्रथमच सिद्ध करावें लागत नाहीं. ज्या कामांत साधारण लोकांना विशेष अगत्य वाटत नाहीं, अशा एखाद्या ऐतिहासिक गोष्टीविषयीं, ह्मणजे तिच्या

---

* मद्यमांससेवन; स्त्रीपुरुषांचा वैवाहिकसंबंधाशिवाय अन्यप्रकारें होणारा संबंध (लग्नाच्या चालीचा अभाव); स्त्रिया जबरदस्तीनें चोरून नेऊन त्यांशीं विवाह लावणें; कोणत्याही प्रकारें झालेली संतति कायदेशीर समजणें; एका स्त्रीनें पांच पती करणें; एका पुरुषानें अनेक बायका करणें; इत्यादि आचार जर रानटी मानिले, तर ते पवित्र मानिलेल्या आपल्या सत्ययुगांतील पूर्वजांत जोरीनें चालू होते, असें वैदिक काळाचा व पौराणिक काळाचा इतिहास पाहिला असतां उघड दिसतें. यापैकीं बरेच आचार शुक्राचार्यांसारख्या आचार्यांनीं स्वानुभवावरून पुढें निषिद्ध ठरविले ! तेव्हां आपण कलियुगांतील माणसें अधिक पवित्र, कीं सत्ययुगांतील आपले पूर्वज अधिक पवित्र, हा एक प्रश्न विचार करण्यासारिखा आहे ! भा० क०

खरेपणाविषयीं (उदाहरण—भारतीयुद्ध किंवा रामायणांत सांगितलेल्या गोष्टी—या घडल्या किंवा नाहीं एतद्विषयीं) जर मतभेद पडला तर जे कोणी अमुक एक गोष्ट घडली असें प्रतिपादीत असतील, त्यांनीं आपला पुरावा अगोदर पुढें करावा; व मग प्रतिपक्षानें ती गोष्ट घडली नाहीं, अशा विषयीं जीं कांहीं प्रमाणें त्यांच्याजवळ असतील, तीं त्यांणीं पुढें आणावीं, हीच पद्धत योग्य आहे असें लोक समजतात. शिवाय, प्रतिपक्षाला स्वतःच्या बाजूचा पुरावा करणें झालें तरी दुसऱ्यांनीं (पूर्वपक्ष करणारांनीं) पुढें आणलेल्या पुराव्यांत कांहीं अर्थ नाहीं इतकें दाखविण्यापेक्षां त्यांस अधिक कांहीं सिद्ध करावें लागत नाहीं. तसेंच, साधारण व्यवहारांत जे कोणी मनुष्याच्या स्वातंत्र्याच्या विरुद्ध असतील, किंवा कांहीं माणसांच्या अथवा वर्गांच्या स्वैरकृतीस प्रतिबंध असावा असें प्रतिपादन करतील, त्यांनींच विशिष्ट वर्गास स्वातंत्र्य कां नसावें, किंवा विशिष्ट मनुष्यें विशिष्ट अधिकारास अपात्र कां तें सिद्ध केलें पाहिजे, असें लोक समजतात. सर्वांस स्वतंत्रता असावी, कोणा एका विशिष्ट वर्गाविषयीं पक्षपात नसावा, याच गोष्टी कोणी झाला तरी प्रथमदर्शनीं गृहीत धरून चालणार. त्याच प्रमाणें, समजा, मी अशी तक्रार केली कीं, जो अधिकार अथवा जें स्वातंत्र्य पुरुषांस देणें योग्य आहे, तो अधिकार अथवा तें स्वातंत्र्य स्त्रियांस देणें योग्य नाहीं, असें जे लोक प्रतिपादन करितात त्यांनींच आपलें ह्मणणें भरपूर पुराव्यानें स्थापित केलें पाहिजे. कारण, एक तर ते स्त्रीस्वातंत्र्याच्या विरुद्ध असून पुरुषाचा पक्षपात करावा असें ह्मणणारे आहेत; तेव्हां पुराव्याचा सर्व बोजा त्यांजवरच आहे. त्यांनीं आपलें ह्मणणें निर्विवाद रीतीनें सिद्ध करून दाखविलें नाहीं, तर या प्रकरणाचा निर्णय उघड त्यांच्या विरुद्ध झाला पाहिजे. परंतु, ही माझी तक्रार मानतो कोण? एखाद्या सामान्य खटल्यांत या तक्रारी किंवा अटी योग्य आहेत, असें

लोक मानतील. परंतु प्रस्तुत प्रकरणीं या तक्रारी योग्य आहेत असें ते कधींही ह्मणणार नाहींत. मी ज्या पक्षाचें मंडन करण्याचें योजिलें आहे, त्यापासून लोकांच्या मनावर कांहीं ठसा उमटल्याची आशा बाळगण्यापूर्वीं मी कोणकोणच्या गोष्टी केल्याच पाहिजेत असें लोक ह्मणतील, त्या सांगतों.—एक तर त्यांचें असें ह्मणणें पडणार कीं, या प्रश्नाची दुसरी बाजू घेणारांनीं तिच्या मंडनार्थ आजपर्यंत जें जें ह्मणून प्रतिपादन केलें आहे, त्या सगळ्याचें खंडन मी केलें पाहिजे; एवढेंच नव्हे, तर आणखी जें जें कांहीं त्यांना ह्मणतां आलें असतें परंतु ह्मटलें नाहीं, जीं जीं विरुद्ध कारणें त्यांना दाखवितां आलीं असतीं परंतु तीं त्यांनीं दाखविलीं नाहींत, त्यांचीही कल्पना करून त्यांचेंही निरसन मी केलें पाहिजे. एवढ्यानेंच संपलें नाहीं. तर अस्तिपक्षाच्या समर्थनार्थ ज्या ज्या गोष्टी दाखविण्यांत येतील, त्या सगळ्यांचें खंडन करून टाकलें तरी नास्तिपक्ष सिद्ध करण्याकरितां ज्यांचें खंडन करितां येणारच नाहीं, अशीं जबरदस्त प्रमाणें मला दाखविलीं पाहिजेत, असेंही लोक ह्मणणार. आणखी समजा, इतकेंही सर्व जरी मला करितां आलें,—माझ्या पक्षाच्या तर्फेनें मी ज्या गोष्टी, जीं कारणें किंवा जीं प्रमाणें पुढें आणीन त्यांच्यापैकीं पुष्कळांचीं समर्पक उत्तरें माझ्या प्रतिपक्षाला देतां आलीं नाहींत व त्यांच्या बाजूकडील तर एकही गोष्ट मी खंडन केल्याशिवाय ठेविली नाहीं, इतकें जरी मी केलें, तरीही मी कांहींच केलें नाहीं, असें जें लोकांना वाटावयाचें तें वाटणारच! कारण उघड आहे. एक तर त्यांच्या पक्षाला सार्वत्रिक रूढीचा जबरदस्त पाठिंबा! आणखी दुसरीकडून पहावें तर त्या पक्षाला लोकांचा ग्रह अत्यंत अनुकूल. बुद्धिवादानें उत्पन्न होणारा जो संस्कार (ह्मणजे खात्री किंवा तत्व-बोध) तो अत्यंत बुद्धिमान अशाच मनुष्यांच्या मनावर घडणारा आहे. यामुळें, प्रस्तुत रूढीच सर्वथा योग्य व न्याय्य

आहे, अशी जी लोकांची दृढ भावना तिचेंच प्राबल्य बुद्धिवादजनित संस्कारापेक्षां अधिक होणार.

४. माझ्या मार्गांत येणाऱ्या या अनेक अडचणींचा उल्लेख जो मी करितों, तो उगीच कांहीं तरी रडगाणें गावें अशा हेतूनें करीत नाहीं. कारण, या अडचणींबद्दल रडगाणें गाइलें असतां तें व्यर्थ होणार, हें मी पक्कें समजतों. लोकांचे फार दिवसांचे ग्रह, त्यांच्या मनाच्या झालेल्या भावना, नित्याच्या व्यवहारामुळें बनलेल्या त्यांच्या प्रवृत्ति, या माझ्या विरुद्ध असल्या कारणानें लोकमताचा व माझ्या मताचा हा विरोध निवळ बुद्धिवादानें नाहींसा करण्याच्या कामांत या वर सांगितलेल्या अडचणी येणारच, व त्या सर्वथा अपरिहार्य आहेत, हें मी जाणतों. आणखी, खरोखरच नित्यव्यवहाराच्या संसर्गानें बनून राहिलेलीं जीं तत्वें व ज्या त्यांच्या समजुती, ज्यांत ते लहानाचे मोठे झाले, व जगांत हल्लीं चालू असलेल्या वर्तनक्रमाची रचना मूळ ज्यांच्यावर केलेली आहे, तीं व्यवहारतत्वें किंवा त्या समजुती साधक बाधक प्रमाणांचा विचार करून केवळ बुद्धिवादानें नष्ट होतील, व त्यांजवर तर्कशास्त्राचा पहिला आघात झाल्याबरोबर त्या लयाला पावतील, असें होणें प्रस्तुतच्या लोकस्थितीच्या मानानें पहातां अशक्य आहे. तसें होण्यास मनुष्याच्या बुद्धीचा किंवा विचारशक्तीचा जितका विकास आजपर्यंत झाला आहे, त्यापेक्षां फार अधिक झाला पाहिजे. माझा जो लोकांशीं तंटा आहे, तो तर्कशास्त्रावर किंवा बुद्धिवादावर त्यांचा भरंवसा थोडा आहे, ह्मणून नव्हे. तर रूढि व मनाचा ग्रह, किंवा मनाची एक प्रकारची झालेली समजूत, यांजवर त्यांचा जो वाजवीपेक्षां फाजील विश्वास आहे तो बरोबर नाहीं, इतकेंच माझें ह्मणणें आहे.

अठराव्या शतकांतील लोकांची जी समजूत होती, तिच्या अगदीं उलट समजूत एकोणिसाव्या शतकांतील लोकांची कशी झाली ती

पहा! अठराव्या शतकांतील लोक, मनुष्य स्वभावांतील समंजस तत्वास, ह्मणजे अर्थात विचारशक्तीस, जें महत्व देत असत, तेंच महत्व आपण एकोणिसाव्या शतकांतील लोक असमंजस तत्वास, ह्मणजे केवळ मनाच्या वृत्तीस किंवा भावनेस, देतों. तर्कऋषींचा अवतार संपला, असें समजून त्या स्थानीं उपजतबुद्धिरूप देवतेची स्थापना करितों, व आपल्या स्वभावांत आपणास जें जें आढळतें, व ज्याची उपपत्ति आपणास बरोबर करितां येत नाहीं, त्या सर्वांस 'उपजतबुद्धि' अथवा 'स्वभाव' असें ह्मणून मोकळे होतों! बुद्धीच्या किंवा विचार-शक्तीच्या योगानें कोणतीही गोष्ट योग्य आहे किंवा अयोग्य आहे, हें ठरविण्याचा मार्ग सोडून देऊन केवळ नैसर्गिक प्रवृत्तीवर अथवा मनाच्या भावनेवर अवलंबून राहणें हें अत्यंत अहितकारक व घातक नीचत्व आणणारें आहे. आजकालच्या बहुतेक व अप्रबुद्ध समजुतींचें बीज हेंच होय. कोणत्याही गोष्टीची उपपत्ति करितांना 'सृष्टीचा हेतु' 'सृष्टीचा क्रम' किंवा 'ईश्वरी नियम' असें कांहीं तरी नांव पुढें आणून त्या गोष्टीची उपपत्ति करणें हा प्रकार योग्य नव्हे, व तो फार दिवस टिकेल असेंही नाहीं. मानसशास्त्राचें ज्ञान जों जों वाढत जाईल, व जों जों लोकांस सर्व गोष्टींचें खरें तत्व कळत जाईल, तों तों हा प्रकार मोडत जाईल हें उघड आहे.

ज्यांत एकंदर समाजाचें हित नाहीं, अशी कोणतीही गोष्ट कोण-त्याही व्यक्तीच्या स्वातंत्र्यास प्रतिबंधक नसावी, असा ठराव सर्वमान्य आहे. कायद्याच्या दृष्टीनें सर्व माणसें सारखीं असावीं; न्यायाच्या व्यवस्थेकरितां किंवा राजकारणाकरितां ज्या ठिकाणीं भिन्नभाव ठेवणें अवश्यच आहे, तेथें मात्र असावा; अन्यत्र नसावा. परंतु, पुरावा करण्याचे जे हे नियम, त्यांचा फायदा ज्या मताचा अंगीकार मी केला आहे त्याचे प्रतिपादक असतील त्यांस मात्र मिळणार नाहीं. समजा,

मीं जर कदाचित् असें म्हटलें कीं "बाबानों ! पुरुषांनीं हुकूम करावा व स्त्रियांनीं त्यांचे आज्ञाधारक दास होऊन रहावें. पुरुषांनीं राज्य करावें. राज्य करण्यास पुरुष मात्र योग्य आहेत. स्त्रिया अयोग्य आहेत, असें जें तुमचें म्हणणें आहे, त्यास तुम्ही प्रमाणें दाखवा. कारण, तुमचा अस्तिपक्ष आहे. प्रमाणें न दाखवाल तर तुम्ही आपला पक्ष सोडून द्या !" तर हें माझें म्हणणें ऐकतो कोण ?

माझें म्हणणें असें आहे कीं, रूढि व लोकांची सर्वसाधारण समजूत या गोष्टींवर लोकांचा वाजवीपेक्षां अधिक भरंवसा आहे, हें बरोबर नाहीं. अठराव्या शतकांतील लोक समंजस तत्वांस किंवा बुद्धिवादास जी अमोघता देत असत, ती एकोणिसाव्या शतकांतील लोक मनुष्यस्वभावांतील असमंजसपणाच्या तत्वांस देतात, हें आश्चर्य आहे ! **बुद्धिदेवतेला** तिच्या योग्य स्थानापासून पदच्युत करून तिचा अधिकार हल्लीं आपण केवळ 'नैसर्गिक प्रवृत्ती'ला दिला आहे. आपल्या ठिकाणीं जें जें कांहीं आपणांस आढळतें व ज्याची उपपत्ति आपणांस बरोबर समजत नाहीं, त्या सर्वांस आपण 'नैसर्गिक प्रवृत्ति' म्हणतों. बुद्धीच्या योगानें खरें खोटें समजून घेण्याचा उघड मार्ग असतां, केवळ मनोधर्माचें अथवा नैसर्गिक प्रवृत्तीचें अवलंबन करणें, हें अत्यंत अपायकारक व नीचत्व आणणारें आहे. आणि आजकालचे ठरीव व अप्रबुद्ध विचार यांचें तरी आदिकारण हेंच होय. हा प्रकार, मानसशास्त्राचे शोध जों जों वाढत जातील, तों तों कमी होत जाईल. तसेंच कोणत्याही गोष्टीची उपपत्ति करतांना 'सृष्टीचा हेतु', 'सृष्टिक्रम', किंवा 'ईश्वरी नियम', अशीं कांहीं तरी कारणें दाखवून त्या गोष्टीची उपपत्ति करणें हाही प्रकार मोडत जाईल. प्रस्तुत विषयासंबंधानें विचार करितां लोकांचा जो बलवत्तर ग्रह, व त्याच्यामुळें उत्पन्न होणाऱ्या ज्या अडचणी, त्या मी घेऊन चालतों. जनरूढि व लोकांचा समज या गोष्टी मजविरुद्ध

आहेत, हें मी कबूल करतों. परंतु, ही रूढि, व हा समज, शेंकडो वर्षें अबाधित चालत असल्याचीं खरीं कारणें पाहतां, तीं निराळींच आहेत. ही रूढि व हा समज यांची उत्पत्ति मनुष्यस्वभावाच्या चांगुलपणापासून नाहीं, तर वाईटपणापासून आहे, असें जर मीं सिद्ध केलें नाहीं, तर लोकांनीं प्रस्तुत वादाचा निर्णय खुशाल माझ्याविरुद्ध करावा. आणि ही गोष्ट सिद्ध करणें हें बरेंच सोपें आहे.

५. कोणतीही रूढि सर्वसाधारण असेल तर, ती एका काळीं लोकांच्या हिताची होती, अथवा तिचे हेतु स्तुत्य होते, असें अनुमान करणें कांहीं कांहीं गोष्टींत वाजवी आहे. अमुक रीतीनें अमुक हेतु सफल होतो, असा अनुभव घेऊन कोणतीही रूढि पसंत करणें, व ती पुढें चालविणें हें योग्यच आहे. पुरुषांची सत्ता स्त्रियांवर असावी ही रूढि जेव्हां प्रथम प्रचारांत आणिली, तेव्हां सामाजिक व्यवस्था राखण्याचे जितके भिन्न भिन्न मार्ग सुचतील, त्या सर्वांची बुद्ध्या तुलना करून जर ती प्रचारांत आणिली असती; लोकसमाजाच्या नियमनार्थ केलेल्या अनेक प्रकारच्या व्यवस्थांचा पूर्ण अनुभव घेऊन स्त्रियांस परवशताच योग्य आहे असें ठरविलें असतें; किंवा, कांहीं दिवस स्त्रियांची सत्ता पुरुषांवर ठेऊन पाहिली, कांहीं दिवस स्त्रीपुरुषांचे सारखे हक्क ठेवून पाहिले; याप्रमाणें ज्या ज्या कल्पना सुचतील त्या त्या अमलांत आणून तदनुसार सामाजिक स्थिति सुधारण्याच्या हेतूनेंच अनुभव घेऊन स्त्रिया सर्वथा पुरुषांच्या अधीन ठेवाव्या, त्या स्वातंत्र्यास योग्य नाहींत, सार्वजनिक कामामध्यें त्यांस मुळींच हात घालूं देऊं नये, एखाद्या स्त्रीनें आपलें सर्वस्व ज्या पुरुषाच्या स्वाधीन केलें त्या पुरुषाची कायदेशीर रीतीची तिनें गुलामगिरी पतकरावी हाच मार्ग खरा व योग्य आहे, हीच व्यवस्था उभयतांच्या अत्यंत कल्याणाची व सुखाची आहे, असें जर ठरविलें असतें; तर या प्रकारच्या

रूढीचें सार्वत्रिक अवलंबन, ती रूढि प्रथम ज्या काळीं प्रचारांत आणिली, त्या काळीं तरी योग्य व उत्तम होती, असें ह्मणणें सप्रमाण झालें असतें. येवढ्यानेंच झालें नाहीं. कदाचित् त्या काळीं ती चाल पाडण्याचीं कारणें भिन्न असतील. तीं प्रस्तुत काळास लागू पडत नाहींत, असें ह्मणण्यास मार्ग राहतो. परंतु, प्रस्तुत विषयाच्या संबंधानें असा कांहीं एक प्रकार झाला नाहीं. एवढेंच नव्हे, तर त्याच्या अगदीं उलट प्रकार झाला, असें दिसून येईल. एक तर हल्लींची रूढि, ह्मणजे अबलांनीं प्रबल पुरुषांच्या अधीन राहणें, या रूढीला हल्लीं अनुकूल असें जें मत आहे तें अगदीं निराधार आहे. कारण, दुसऱ्या कोणत्याही व्यवस्थेचा अनुभव लोकांनीं जर घेऊन पाहिलाच नाहीं, तर स्त्रियांची प्रस्तुतची व्यवस्था अनुभवाअंतीं ठरविलेली आहे, असें मुळींच ह्मणतां येत नाहीं. दुसरें असें कीं, ही विषम व्यवस्था दूरदृष्टीनें, विचारपूर्वक व समाजहितार्थ केली आहे, असें मुळींच नाहीं. फार तर काय, ही वहिवाट पाडण्याच्या अगोदर एकंदर मानवजातीच्या कल्याणाची किंवा समाजव्यवस्थेची कल्पना कोणाच्या स्वप्नांत देखील आलेली नव्हती. फार प्राचीन काळापासून—ह्मणजे मनुष्य जातीच्या सुधारणेस ज्या काळीं आरंभ झाला तेव्हांपासून—स्त्रीजातीचा पुरुषांस बराच उपयोग असल्यामुळें व पुरुष स्त्रियांपेक्षां विशेष धट्टेकट्टे असल्यामुळें, प्रत्येक स्त्री नेहमीं कोणच्या तरी एका पुरुषाच्या अंकित होऊन राहिलेली आढळते. कायदे व व्यवहारपद्धति यांची धरती पाहिली तर असें दिसून येतें कीं, त्यांची उत्पत्ति बहुधा माणसांचे जे परस्पर संबंध व्यवहारांत आढळतात, त्यांवरूनच होत असते. ज्या गोष्टी व्यवहारशास्त्रकर्त्यांस लोकांत आढळतात, त्यांजवर ते शास्त्राची इमारत रचतात. यामुळें त्यांस समाजाची मान्यता मिळते. शास्त्रानें ठरविलेले अधिकार किंवा हक्क ते सर्वांस कळवितात; व शास्त्रानें

सांगितलेला जो न्याय तो प्राप्त करून घेण्याचे उघड व सुलभ मार्ग किंवा साधनें हीं उत्पन्न करितात. असें झालें ह्मणजे केवळ शरीरसामर्थ्यामुळें होणारी जी बंडाळी, किंवा जी अव्यवस्था, तिचा लय होतो. अशा रीतीनें कांहीं कांहीं गोष्टी प्रचारांत येतात. त्या व्यक्तिमात्रास मान्य कराव्या लागतात; व त्यांचें एक प्रकारचें कायदेशीर बंधन निर्माण होतें. गुलामगिरीची तरी गोष्ट अशीच होती. 'बळी तो कान पिळी' या न्यायानें जो निर्बळ तो प्रबळाचा केवळ जुलुमामुळें गुलाम झाला. असें होतां होतां त्या गुलामांचे धन्यांनीं आपसांत विचार करून, एकमेकांच्या वित्ताचें संरक्षण व्हावें या हेतूनें, सर्वांचें सामर्थ्य एकवट करून, आपले गुलाम व आपली खासगी मिळकत यांचा अपहार टाळण्या करितां कांहीं व्यवस्था किंवा ठराव केले. प्राचीन काळीं पुरुषजातींपैकीं बहुतेक व्यक्तींस व एकंदर स्त्रीजातीस याचप्रकारानें गुलामगिरी पतकरावी लागली. असा क्रम ज्या काळीं चालू होता, त्या काळीं उच्च प्रतीचें शिक्षण लोकांस मिळून लोक ज्ञानसंपन्न होते. अशींही युगांची युगें निघून गेलीं. तरीही या सांगितलेल्या दोन्ही प्रकारच्या दास्यांची आवश्यकता किंवा यथार्थता काय आहे ह्मणून प्रश्न करण्याचें धाडस कोणास झालें नाहीं. तथापि, शेवटीं अशा प्रकारचे विचारकर्त्ते लोक हळु हळु उत्पन्न झाले. आणि एकंदर लोकांची सुधारणा होतां होतां पुरुषजातीची गुलामगिरी निदान यूरोपखंडांतील सर्व खिस्ती राष्ट्रांत सरतेशेवटीं अजीबात बंद झाली. स्त्रीजातीच्या गुलामगिरीचेंही रूपांतर होऊन त्यास नुसत्या पराधीनतेचें सौम्य स्वरूप प्राप्त झालें! परंतु, हा सौम्य पराधीनपणाचा प्रकार शुद्ध न्याय, बुद्धि, व लोकोपयुक्तता यांच्या कारणानें उत्पन्न झाला नसून, गुलामगिरीची जी पूर्वस्थिती तिच्या पासूनच उत्पन्न झाला आहे. इतकेंच कीं, एकंदर लोकांच्या रीतिभातींत ज्या कारणानें चांगल्या प्रकारचा बदल

झाला व माणसांचे परस्पर संबंध ज्या कारणांनीं न्याय व भूतदया यांस अनुसरून बदलले, त्याच कारणांनीं स्त्रियांच्या मूळ गुलामगिरीच्या स्थितींतही कालवशेंकरून हळु हळु फरक होत गेले. तथापि, आद्य-कालीं पशुसदृश असा जो त्याचा आरंभ, त्याचा संसर्ग **अजून आहेच.** यावरून या रूढीपासून **स्त्रियांच्या परवशते**ला अनुकूल असें प्रथमदर्शनीं कांहींच अनुमान काढितां येत नाहीं. कदाचित् असें ह्मणतां येईल कीं, मूळ दूषित उगमापासून दुसऱ्या ज्या अनेक दुष्ट रूढि आजपर्यंत चालत आल्या, त्या सर्वांचा लय झाला असतां येवढीच रूढि ज्या अर्थीं अद्यापपर्यंत कायम राहिली, त्या अर्थीं हा प्रकार त्या रूढीस अनुकूल दिसतो, व याचमुळें साधारण लोकांना स्त्रीपुरुषांचे हक्क समसमान नाहींत या गोष्टीचें कारण ‘ बळी तो कान पिळी ’ हा न्याय आहे, असें सांगितलें ह्मणजे आश्चर्य वाटतें.

६. लोकांस या गोष्टीचें आश्चर्य वाटतें, ही गोष्टही एका अर्थीं अभिनंदनीय आहे. आणि ह्मणूनच सुधारणेचें पाऊल दिवसानुदिवस पुढें पडत असून, एकंदर मानवनीति सुधारत आहे असें मानिलें पाहिजे. जगांतील अत्यंत सुधारलेल्या अशा एक दोन राष्ट्रांची प्रस्तुत अशी स्थिति आहे कीं, त्यांनीं आपल्या एकंदर व्यवहारांत ‘ बळी तो कान पिळी ’ हा न्याय सोडून दिला आहे. तो कोणासच मान्य नसून मनुष्यांचे परस्परसंबंध या तत्वाच्या जोरावर चालविण्याची व्यक्तिमा-त्रास सक्त मनाई आहे. असें असून ज्या प्रसंगीं ‘बळी तो कान पिळी’ या न्यायास अनुसरून एखादी गोष्ट करण्यास कोणी प्रवृत्त होतो, तेव्हां त्यांत कांहीं तरी लोकहिताचा संबंध आहे, असा बहाणा करणें त्यास भाग पडतें. वस्तुस्थिति अशी असतां, लोक आपल्या मनाची अशी गोड समजूत करून घेतात कीं, ते जबरदस्तीचे दिवस आतां निघून गेले; व ‘ बळी तो कान पिळी ’ हा न्याय प्रस्तुतकाळीं

ज्या ज्या गोष्टी घडत आहेत त्यांत मुळींच राहिला नाहीं! त्यांना असें वाटतें कीं, आपल्या हल्लींच्या रीतिभातींस प्रथमतः आरंभ कसाही झालेला असो, पण आजकाल जो सुधारलेला काळ, त्यांतही ज्या अर्थीं या रूढि चालू आहेत, त्या अर्थीं त्या मनुष्यस्वभावास उचित व लोकसमाजाच्या हितास कारणीभूत अशा आहेत, ह्मणूनच चालू राहिल्या आहेत! ज्या रूढींनीं बलाढ्य पक्षाला सर्व अधिकार दिला आहे, अशा रूढींची दृढता व सजीवता किती असते; त्यांस लोक कसे चिकटून राहतात; ज्यांच्या हातामध्यें अधिकार आहे त्यांचे दुर्विचार व त्यांच्या दुष्ट मनोवृत्ति ते अधिकार आपल्या हातांत ठेवण्याविषयीं त्यांस कशा प्रवृत्त करितात; इतकें असूनही या दुष्ट रूढी कालेंकरून एकामागून एक कशा नाश पावत जातात; शरीरबळ असल्यामुळें ज्यांनीं कायद्याचें बलही आपल्या पक्षास अनुकूल करून घेतलें आहे, अशा लोकांची सत्ता, त्यांच्या प्रतिपक्षास शरीरबळ प्राप्त होईपर्यंत कशी नष्ट होत नाहीं, वगैरे गोष्टी त्यांस कळतच नाहींत. अशा प्रकारचें शरीरबळ स्त्रियांच्या पक्षास आजपर्यंत कधींच प्राप्त झालें नाहीं, ही गोष्ट व इतर पुष्कळ गोष्टी त्यांची स्थिति कायम ठेवण्यास कारणीभूत झाल्या. 'बळी तो कान पिळी' या न्यायाचा पूर्ण अंमल झाला नाहीं, ही गोष्ट जरी खरी आहे, तरी स्त्रियांच्या संबंधानें हा न्याय वर सांगितल्याप्रमाणें सर्वथा बंद होणें, स्त्रीजातीच्या नैसर्गिक दुर्बलतेमुळें प्रथमपासूनच अशक्य होतें. दुसऱ्या रीतिभाती, न्यायास अनुसरून लोकांनीं जशा बदलल्या, तसा केवळ बलावर अवलंबून असलेला हा संबंध बदलला नाहीं, ही गोष्टही अगदीं सहज आहे. लोकांचे कायदे व रीतिभाती यांच्या एकंदर प्रकारांत एवढीच गोष्ट अपवादक राहिली. आणि जोंपर्यंत तिचा खरा उगम लोकांस कळला नाहीं व तिचें खरें स्वरूप वादविवादानें लोकांच्या स्पष्ट दृष्टोत्पत्तीस आलें

नाहीं, तोंपर्यंत लोकांस ती गोष्ट प्रस्तुतच्या सुधारलेल्या स्थितीशीं विलग दिसणारच नाहीं. प्राचीन **ग्रीक** लोक आपलें राष्ट्र स्वतंत्र असें मानीत, व व्यक्तिमात्राच्या स्वतंत्रतेविषयीं मोठा अभिमान बाळगीत. तथापि, त्या लोकांत देखील गुलामांचा व्यापार चालू होताच.

७. वास्तविक स्थिति अशी आहे कीं, गेल्या दोन तीन पिढ्यांतील लोक व हल्लींच्या काळचे लोक, यांस मानवी जातीची पूर्व स्थिति काय होती, व तिचे, पुढल्या काळच्या लोकांवर कसे परिणाम घडून आले, याचें मुळींच भान राहिलें नाहीं. यामुळें, ज्या थोड्या लोकांस इतिहासाचें यथार्थ ज्ञान असतें तें, अथवा जे फार प्राचीन काळच्या माणसांच्या नमुन्याचीं माणसें ज्या देशांत अद्यापि जिवंत आहेत, अशा देशांत प्रवास करून, व तेथलि रीतिभाती पाहून आले आहेत, ते लोक मात्र पुरातन काळीं लोकसमाजाची स्थिति कशी होती, तिची मनांत कल्पना करूं शकतात. प्राचीन काळीं 'बळी तो कान पिळी' हा न्याय सर्वत्र कसा चालत असे, व तो न्याय त्या वेळचे लोक उघड रीतीनें व राजरोस कसा प्रकट करीत, हें हल्लींच्या लोकांच्या ध्यानांतच येत नाहीं. या न्यायांत कांहीं वैलक्षण्य आहे, किंवा लज्जा मानण्यासारखा कांहीं एक भाग आहे, असें त्या वेळच्या लोकांस वाटत नसे, हें उघड आहे. कारण, त्या काळीं स्त्रियांच्या दुःस्थितीची किंवा दासत्वाची कल्पना क्वचित् एखादा साधु किंवा तत्वज्ञानी याच्याशिवाय दुसऱ्या कोणाच्याही मनांत येण्याचा संभवच नव्हता. मनुष्यस्वभावाचा फार वाईट अनुभव इतिहासांतीं येतो. इतिहासावरून असें आढळतें कीं, कोणत्याही लोकांचे जीव किंवा वित्त, अथवा त्यांचें संपूर्ण ऐहिक सुख, हीं सर्व, त्यांच्या पराक्रमावर व शरीरबलावर अवलंबून असतात. ज्यांच्या हातांत शस्त्रें असतात अशा अधिकाऱ्यांनीं कितीही जुलूम केला, तरी लोकांस त्या अधिकाऱ्यांशीं विरोध करण्याचें

महत् संकट वाटतें. कारण, एक तर बलाचा कायदा त्यांस प्रतिकूळ असतो एवढेंच नव्हे; तर, इतर सर्व कायदे व लोकसमाजाचें एकंदर मतही सर्वथा त्यांच्या विरुद्ध असतें. यास्तव ज्यांच्याशीं ते विरोध करीत, त्यांच्या दृष्टीनें ते विरोध करणारे अपराधी ठरत. अपराधी ठरत एवढेंच नव्हे, तर अत्यंत घोर पातक केल्याचा दोष त्यांजवर ठेवून, मानवीप्राण्याच्या हातून जितकी ह्मणून कडक शिक्षा देववेल तितकी कडक शिक्षा ते त्यांस देत. वरिष्ठ प्रतीच्या लोकांस कनिष्ठ प्रतीच्या लोकांचा एखादा हक्क मान्य करण्याचा प्रसंग आलाच, व अशा संबंधानें आपल्या कर्तव्याची कांहींशी कल्पना त्यांच्या मनांत आलीच, तर ती, केवळ आपल्या सोईकरितां व कनिष्ठ प्रतीच्या लोकांस कांहींएक अभिवचन देण्याचें भाग पडलें अशा संबंधानें येत असे. हीं अभिवचनें, आणाशपथा घेऊन दिलेलीं असलीं तरी, अत्यंत क्षुल्लक कारणावरून, किंवा एखाद्या अल्प लाभाच्या आशेनें, वरिष्ठ प्रतीच्या लोकांनीं निःशंक मोडून टाकावीं, असाही प्रकार बहुत कालपर्यंत चालला. तथापि, अशा प्रसंगीं अत्यंत नीच प्रकारच्या मनुष्याखेरीज इतर माणसांच्या सदसद्‍बुद्धीला धक्का बसल्याशिवाय तीं अभिवचनें मोडलीं जात, असें क्वचितच होई. प्राचीनकाळचीं लोकसत्ताक राज्यें पूर्वींपासूनच एका प्रकारच्या परस्पर करारावर रचलेलीं असत; किंवा समानबल अशा कांहीं व्यक्तींची एक जूट होऊन तीं झालेलीं असत. 'बळी तो कान पिळी,' या न्यायाखेरीज दुसरा कांहीं संबंध, किंवा दुसरें कांहीं बंधन ज्यांस आहे, अशा लोकांचें इतिहासांत हें पहिलेंच उदाहरण आढळतें. आणि, यद्यपि 'बळी तो कान पिळी' हा पूर्वींचा न्याय, त्या राज्यांतील सत्ताधीश लोक व त्यांचे गुलाम, यांच्या परस्परसंबंधांत पूर्णपणें होता; तसेंच, मोठमोठीं लोकसत्ताक राज्यें, व त्यांची प्रजा, अथवा त्यांच्या ताब्यांतील इतर

लहान लहान लोकसत्ताक राज्यें, यांचा परस्परसंबंधही तशाच प्रकारचा होता; तथापि, मूळचा जबरदस्तीचा व निव्वळ जुलुमाचा न्याय, अशा स्थितींत तेवढ्याच प्रदेशापुरता स्थानभ्रष्ट झाल्यामुळें, तेव्हांपासून मनुष्यस्वभावाच्या वास्तविक उन्नतीस आरंभ झाला, असें मानिलें पाहिजे. त्याचप्रमाणें मनुष्यांच्या मनोवृत्तींत असा कांहींएक पालट पडला कीं, तो एकंदर लोकसमाजास अत्यंत हितावह असा झाला. तेव्हांपासून त्या उदात्त मनोवृत्तींचा प्रादुर्भाव होऊन पुढें हळुहळू त्यांचा विस्तार व त्यांची अभिवृद्धि होत गेली. दास अथवा गुलाम, हे जरी लोकसत्ताक राज्याचे अंशभूत नव्हते, तरी जीं राज्यें स्वतंत्र असत, त्यांतच प्रथमतः गुलाम हे मनुष्यप्राणी आहेत, व त्यांस मानवी प्राण्याचे हक्क आहेत, असें लोकांस वाटूं लागलें. गुलामांस चांगल्या रीतीनें वागविणें हें आपलें कर्तव्यकर्म आहे, या नीतितत्वाचा समावेश **यहुदी** लोकांच्या धर्मशास्त्रांत यद्यपि होऊन गेला होता तथापि हें तत्व प्रथमच ज्यांनीं लोकांना प्रसिद्धपणें शिकविलें ते **स्टोईक*** पंथाचे लोक होते, अशी माझी समजूत आहे. **ख्रिस्ती** धर्माचा बराच उत्कर्ष झाल्यानंतर, ही नीति किंवा हें मत बहुतेक सर्वमान्य झाल्यासारखें झालें होतें. आणि, **कॅथलिक** धर्माचा उदय झाल्यावरसुद्धां या मताचे पुरस्कर्त्ते, किंवा त्याचा अभिमान धरणारे, कोणत्या एका कालीं नव्हते, असें कधींच घडलें नाहीं. वस्तुतः अशी स्थिति असतां, गुलामगिरी नीतिविरुद्ध आहे, किंवा गुलामांस त्यांच्या धन्यांनीं ममतेनें व नीतीनें वागविलें पाहिजे, हें मत अमलांत आण-

---

* स्टोइक या नांवाचा ग्रीक लोकांमध्यें एक तत्ववेत्त्यांचा पंथ होता. या पंथाचीं नीतिविषयक कांहीं ठरींव मतें असत. त्यांचें मुख्य मत असें होतें कीं, मनुष्यानें आत्मसंयमन करून आपले मनोविकार मारून टाकावे व इंद्रियदमन करावें. हें जग देवानें उत्पन्न केलें तें चांगलेंच केलें आहे व प्राणिमात्रांस सुखप्राप्ति व्हावी अशीच त्यांत योजना केली आहे, असें त्यांचें मत असे.

ण्यास **ख्रिस्ती** धर्मास मोठा भगीरथ प्रयत्न करावा लागला! **ख्रिस्ती** धर्म हें मत अमलांत आणण्याची खटपट करीत असतां, १००० वर्षांहून अधिक काळ लोटला. तरीही त्या खटपटींत त्यास ह्मणण्यासारखें यश आलें नाहीं. असें होण्याचें कारण लोकांच्या मनावर त्या धर्माचें वजन कमी होतें असें नाहीं. धर्माचें वजन तर विलक्षण होतें. **ख्रिस्ती** धर्माचा प्रभाव असा होता कीं, मोठमोठे राजे व संस्थानिक आपली अपार संपत्ति त्याच्या भरीस घालण्यास मुकाट्यानें राजी होत! आपल्या आत्म्यास मुक्ति मिळावी, या हेतूनें आपल्या भरज्वानींत, सर्व ऐहिक सुखांवर पाणी सोडून, दारिद्र्य व उपासमार सोसून, जपजाप्यादि कर्मे करण्याकरितां, **ख्रिस्ती** धर्मानें हजारों लोकांस जोग घेण्यास लाऊन त्यांस मठांत कोंडून टाकिलें! त्या धर्माचें सामर्थ्य असें अलौकिक होतें कीं, त्यानें **पालेस्टाईन** येथील पुण्यभूमींत असलेली जी पुण्यपुरुषाची समाध किंवा कबर, ती बंधमुक्त करावी व परकीयांच्या हातांतून सोडवावी, अशा उद्देशानें **यूरोपखंड** व **एशियाखंड** यांतील अफाट समुद्रांतून व जमिनींतून कोट्यावधि लोकांस पर्यटन करायास लाविलें, व आपल्या जीवांचे बळी अर्पण करण्यास प्रवृत्त केलें! त्या धर्माचें सामर्थ्य असें अनिवार्य होतें कीं, अत्यंत प्रीतिपात्र अशा आपल्या धर्मपत्न्या मोठमोठ्या सार्वभौम राजांस ही मुकाट्यानें सोडून द्याव्या लागल्या! कारण त्या सातव्या पिढीच्या आंतील संबंधाच्या ह्मणून धर्माध्यक्षांनीं त्यांच्याशीं झालेला विवाहसंबंध अशास्त्र व निषिद्ध ठरविला.

यद्यपि **ख्रिस्ती**धर्माचा असा विलक्षण प्रभाव होता, तथापि परस्परांशीं कलह करण्याची व युद्ध करण्याची जी लोकांची प्रवृत्ति तिचा प्रतिबंध त्या धर्माच्यानें करवला नाहीं. अथवा, लोकांची आपल्या गुलामांशीं जी जुलुमाची व निर्दयपणाची वर्तणूक होती, तीही त्या धर्मास बंद करितां आली नाहीं. फौजफांट्याच्या जोरावर दुर्बल

व कमजोर राष्ट्रांस जिंकून त्यांस दास करणें, किंवा आपल्याच प्रजेस अन्यायानें व जुलमानें वागविणें, या दोन्ही गोष्टींचा प्रतिबंध त्याच्यानें झाला नाहीं ! असा हा प्रकार जोंपर्यंत त्यांच्याही सत्तेपेक्षां बलाढ्य अशा सत्तेचा अंमल झाला नाहीं, तोंपर्यंत सुरू होता. राजे लोकांचें सामर्थ्य वाढत गेल्यामुळें, लोकांची परस्परयुद्ध करण्याची प्रवृत्ति बंद झाली ; व फक्त राजांराजांमधील, किंवा राज्यपदाविषयीं स्पर्धा करणारे यांजमधील परस्परकलह मात्र चालू राहिले. ज्या शहराभोंवतालीं तटबंदी असे, अशा शहरांतील लोक धनसंपन्न व शौर्यशाली झाल्यामुळें, समरांगणीं कनिष्ठ प्रतीचे पायदळ शिपाई, हे युद्धकलेमध्यें अडाणी अशा सरदारांपेक्षां अधिक सामर्थ्यवान् ठरले. त्यामुळें, शेतकरी व सामान्य लोक यांजवर वरिष्ठ प्रतीच्या लोकांकडून, ह्मणजे सरदार व अमीर उमराव यांजकडून होत असलेला दुःसह जुलूम कांहीं अंशानें कमी झाला. तोही जुलूम पुढें कांहीं कालपर्यंत सुरू असून, पुढें जुलमानें त्रस्त झालेल्या लोकांस जेव्हां कांहीं अधिकार किंवा सामर्थ्य प्राप्त झालें तेव्हां, आपणावर जुलूम करणाऱ्या लोकांचा ते उघड रीतीनें सूड घेऊं लागले. हा जुलमाचा प्रकार **फ्रान्स** देशांतील प्रसिद्ध बंडाच्या काळापर्यंत बहुतेक **यूरोपखंड**भर चालूच होता. **इंग्लंड** देशांत मात्र लोकसत्ताक राज्याचा पाया लौकर स्थापिला गेल्यामुळें, हा प्रकार **यूरोपखंडां**तील इतर राष्ट्रांपेक्षां लौकर बंद झाला. या कारणानें व्यक्तिस्वातंत्र्य, कायदे, न्याय वगैरे गोष्टींमध्यें योग्य सुधारणा होत गेली.

८. मनुष्यजातीच्या उत्पत्तीपासून बहुत काळपर्यंत लोकांच्या साधारण व्यवहारांत बलात्काराचा कायदा, किंवा 'बळी तो कान पिळी' हाच न्याय बेधडक अमलांत आला. याहून अन्य प्रकारचा न्याय किंवा कायदा कांहीं प्रसंगविशेषीं, किंवा विशेष प्रकारच्या संबं-

धांत मात्र दिसून येई. एकंदर समाजाच्या घडामोडी कांहीं तरी नीतितत्वास अनुसरून चालविण्याचा बहाणा लोक करूं लागून, किती अल्पकाळ गेला आहे, वगैरे गोष्टींची माहिती लोकांस मुळींच नाहीं असें दिसतें. त्याचप्रमाणें, ज्या रूढि, विचारी व शहाण्या मनुष्यांनीं प्रथमारंभीं मुळीं स्थापूंच दिल्या नसत्या, किंवा प्रचारांत आणल्याच नसत्या, व ज्यांमध्यें बलात्काराच्या तत्वाखेरीज दुसरें कोणतेंच तत्व दिसत नाहीं, अशा रूढीही युगानुयुगें व पिढयानुपिढ्या तशाच चालू राहून लोकमान्य होतात, ही गोष्टही लोक अगदींच विसरून जातात. फार कशाला? ४० वर्षांपूर्वी आमच्या या इंग्लंड देशांतच मानवी-प्राणी आपले गुलाम आहेत, असें कायदेशीर रीतीनें समजून, इतर मिळकतीप्रमाणें त्यांचा क्रयविक्रय करण्याचाही अधिकार लोकांस असे! चालू शतकांत प्रत्यक्ष मानवीप्राणी चोरून नेऊन व त्यांस दूर देशीं पळवून नेऊन त्यांच्याकडून मरेमरेपर्यंत काम करून घेण्याची मुभाही सरकारानें ठेविली आहे.*

बलात्काराच्या कायद्याचें हें अत्यंत उग्र स्वरूप ध्यानांत आणून वाचकांस मोठें नवल वाटेल. हें वर सांगितलेलें उदाहरण इतर सर्व उदाहरणांहून अत्यंत निंद्य असून निःपक्षपातबुद्धीनें जे त्याचा विचार करतील, त्यांच्या अंगावर शहारे उठल्यावांचून खास राहणार नाहींत! कांहीं लोक असे आढळतात कीं, एक व्यक्तिस्वातंत्र्याखेरीज पूर्ण व अनियंत्रित सत्तेचे इतर सर्व प्रकार ज्यांस मान्य असतात, अशा लोकांसही वर सांगितलेलें उदाहरण भयंकर वाटेल. तथापि, ही वर निर्दिष्ट केलेली स्थिति थोड्याच दिवसांपूर्वी आमच्या

---

* विलायतेमध्यें पलटणीच्या किंवा आरमाराच्या नौकरीस जीं माणसें लागत, त्यांस जुलमानें धरून परदेशांत नेण्याची चाल होती. त्यांस 'इम्प्रेसमेंट' असें ह्मणत. आपल्या देशांत देखील 'वेठ' ह्मणून जो एक जुलमाचा प्रकार होता व अजूनही जो बराच चालू आहे, तोही आमच्या वाचकांस माहीत असेलच.

सुधारलेल्या व **ख्रिस्ती** धर्माभिमानी **इंग्लंडांत** जारीनें सुरू होती; व ती कायद्यानें मंजूर केलेली होती, अशाविषयीं साक्ष देणारीं माणसें आजकालही जिवंत आहेत! इंग्रज लोकांनीं वसाहत केलेल्या **अमेरिके**च्या अर्ध्या भागापेक्षां अधिक भागांत ३।४ वर्षांपूर्वीं* गुलामगिरी होती एवढेंच नव्हे; तर त्या राष्ट्रांत गुलामांचा व्यापार उघड रीतीनें चालत असे व व्यापाराच्या उद्देशानें गुलामांची वाढ करण्याचा एक मोठा कारखानाच चालू होता! अशी गोष्ट असतां, गुलामांच्या व्यापाराविरुद्ध पुष्कळ लोकांचें मत होतें. **इंग्लंड** देशांत तर, 'बळी तो कान पिळी,' या न्यायास अनुसरून इतर जे अनेक प्रकार होते, त्यांत हा गुलामगिरीचा प्रकार बहुमतानें निंद्य असा मानिला होता. कारण, गुलामांच्या व्यापाराचा उघड उघड हेतु द्रव्यप्राप्ति हा असल्यामुळें, त्यापासून ज्यांचा फायदा होई, अशा लोकांची संख्या देशांतील एकंदर लोकांच्या मानानें फारच थोडी होती. यामुळें, त्या गोष्टीशीं ज्यांचा अर्थाअर्थीं संबंध नव्हता, ते सर्व गुलामगिरीचा अत्यंत द्वेष करणारे होते. याहून मनावर अधिक स्पष्ट ठसा उत्पन्न करणारें दुसरें एखादें उदाहरण देण्याची गरज राहिली आहे, असें मला वाटत नाहीं; तथापि, दुसरें उदाहरण पाहिजेच असेल तर एकसत्तात्मक किंवा एकछत्री राज्याचें उदाहरण घ्या; तेंही विचार करण्यासारखें आहे. हल्लीं **इंग्लंडां**त असें ठरींव मत होऊन गेलें आहे कीं, केवळ फौजफांट्याच्या जोरावर एकानेंच राज्य करणें ह्मणजे, एका मनुष्यानें देशांतील इतर सर्व माणसें आपल्या कबजांत ठेवण्यासारखें होय. एकसत्तात्मक राज्य हें 'बळी तो कान पिळी,' या न्यायाचेंच उदाहरण आहे, यापेक्षां दुसरी कांहींएक कल्पना करवत नाहीं. असें असून **इंग्लंडा**शिवाय

---

* मूळचा ग्रंथ इ. स. १८६९ सालीं प्रसिद्ध झाला ही गोष्ट वाचकांनीं लक्षांत ठेवणें जरूर आहे.

यूरोपांतील इतर सर्व मोठमोठ्या राष्ट्रांत एकसत्तात्मक राज्याची रूढि अद्यापि चालू आहे ! ती कांहीं ठिकाणीं बंद झाली असल्यास, बंद होऊन फार दिवस झाले नाहींत. प्रस्तुत काळीं सर्व प्रतीच्या लोकांत, एकसत्तात्मक राज्याला अनुकूल असे पुष्कळ लोक सांपडतात. सारांश, एकदां ठरलेली रूढि जरी सार्वत्रिक नसली, तरी तिचें सामर्थ्य वर निर्दिष्ट केल्याप्रमाणें असतें. इतिहासांत ठिकठिकाणीं त्या रूढीच्या विरुद्ध रूढीचीं, ह्मणजे इतर राज्यपद्धतीचीं, उदाहरणें आढळतात. परंतु, तीं बहुधा अत्यंत पराक्रमी व भरभराटीस आलेल्या लोकांमध्येंच विशेषेंकरून आढळतात.

एकसत्तात्मक राज्याची गोष्ट कशी असते ती पहा. ज्याच्या हातीं अनियंत्रित सत्ता असते, अशी एकच व्यक्ति असते. ही व्यक्ति राजा होय. त्या सत्तेस वश असणारे, व ज्यांचें बरें वाईट त्या एका व्यक्तीवर अवलंबून असतें, अशीं बाकीचीं एकंदर माणसें असतात. त्यांस प्रजा अशी संज्ञा आहे. जो गादीवर बसलेला असतो, व पुढें ज्यास राज्यपद प्राप्त होण्याची आशा असते, त्यांच्याशिवाय बाकीच्या सर्व माणसांस ही संज्ञा, किंवा ही सत्तावशता, अर्थात् कमीपणा आणणारी असते. हीं वर सांगितलेलीं उदाहरणें, स्त्रियांवर पुरुषांची जी सत्ता असते, तिच्याहून किती भिन्न आहेत हें वाचकांच्या सहज लक्षांत येण्याजोगें आहे. यावरून, स्त्रियांच्या परवशतेच्या योग्यायोग्यतेविषयीं प्रथमच मी निर्णय करून टाकीत आहें, असें कोणीं समजूं नये. तर, प्रस्तुत स्थळीं मी इतकेंच सिद्ध करून दाखविण्याचा यत्न करीत आहें कीं, ही पराधीनता, किंवा परवशता, जरी योग्य नसली, तरी स्वभावतःच ती बहुत दिवस टिकण्यासारखी असल्यामुळें, परवशतेचे वर सांगितलेले दुसरे अनेक प्रकार अल्पकालभंगुर, किंवा बहुत दिवस न टिकण्यासारखे असूनही, ते आजकालपर्यंत चालत आले

आहेत. याहून अधिक माझें कांहीं ह्मणणें नाहीं, किंवा याहून अधिक मीं कांहीं सिद्ध केलें नाहीं.

आपल्या हातामध्यें सत्ता असणें, अथवा दुसऱ्यांवर आपल्याला अधिकार चालवितां येणें, या गोष्टीचा अभिमान जात्याच मनुष्यास वाटत असतो. अधिकाराचा लोभ व अधिकाराची हौस जात्याच व्यक्तिमात्रास असते. हा नियम सर्वसाधारण झाला. प्रस्तुत अधिकाराची हाव एका जातीस किंवा एका वर्गास असते असेंही नाहीं, तर ही हाव एकंदर पुरुषजातीस असते. **पार्लमेंटा**चे किंवा **म्युनिसिपालिटी**चे सभासद होऊं इच्छिणाऱ्या उमदेवारांचें कधीं कधीं असें ह्मणणें असतें कीं, जी सत्ता, किंवा जो अधिकार, मिळविण्याचा यत्न आह्मी करितों आहों, तो आमच्या स्वतःच्या हिताकरितां आह्मांस पाहिजे असें नाहीं; तर, केवळ राज्यकारणाकरितां, किंवा एकंदर समाजाच्या कल्याणाकरितां आह्मी हा अधिकार मिळविण्याचा यत्न करित आहों, ह्मणून लोकांनीं तो आह्मांस दिला पाहिजे. परंतु प्रस्तुत अधिकाराचे पुरस्कर्ते, ह्मणजे स्त्रियांवर सत्ता चालविणारे जे पुरुष त्यांची अशी गोष्ट नसते. प्रत्येक कुटुंबांत जो कर्ता असतो, किंवा पुढें केव्हां तरी कर्ता होण्याची ज्याला आशा असते, अशा प्रत्येक पुरुषाला हा अधिकार आपल्याला असावा असें वाटतें. एखादा भिकार लंगोट्या असो किंवा मोठा सरदार असो; राव असो किंवा रंक असो; फकीर असो किंवा अमीर असो; एवढी सत्ता आपली त्याच्या हातांत असावयाचीच! आणि ही सत्ता अशी कांहीं चमत्कारिक आहे कीं, ती अमलांत आणण्याची इच्छा फारच प्रबळ असते. कारण, प्रत्येक मनुष्यास आपल्या हातांत सत्ता असावी असें तर वाटतेंच. तथापि, ही सत्ता विशेषेंकरून कोणावर चालवावयाची? तर ज्याशीं आपला अति निकट संबंध; ज्याच्या सहवासांत आपलें सर्व

आयुष्य जाणार; ज्या माणसाशीं आपल्या संसारांतील बहुतेक व्यवहार किंवा व्यवसाय आपण समाईकपणानें करणार; व जें माणूस आपल्या अधिकारास न जुमानून स्वतंत्रतेनें वागलें असतां, आपल्या एकट्याच्या खुषीप्रमाणें व मर्जीप्रमाणें कांहींएक होणार नाहीं आणि आपल्या जिवाला सुख लागणार नाहीं; अशा माणसावरच आपली सत्ता जारीनें चालवावी, असें बहुतेकांस वाटत असतें. सत्तेचे जे अनेक प्रकार वर सांगितले, त्यांत, ह्मणजे 'बळी तो कान पिळी,' या न्यायाचीं जीं अनेक उदाहरणें आह्मी वर दिलीं त्यांत, निव्वळ जुलुमाचाच भाग जास्त होता. याशिवाय त्यांच्या स्थिरतेला दुसरीं कांहीं कारणें नव्हतीं. तरीही त्या सत्ता व तो जुलमाचा प्रकार नष्ट होण्यास दीर्घ काल लागला व मोठमोठ्या अडचणी आल्या! मग पुरुषांची स्त्रियांवरील सत्ता नष्ट होण्याच्या कामांत अधिक अडचणी याव्या, यांत नवल तें काय?

दुसरा असा एक विचार केला पाहिजे कीं, प्रस्तुत प्रकरणांत ज्यांचे हातीं अधिकार आहे, त्यांस इतर गोष्टींपेक्षां विशेष साधनें अनुकूल असल्यामुळें त्यांच्याशीं विरोध करणें हें फार दुष्कर झालें आहे. जीं माणसें परवश असतात, त्यांतील प्रत्येक व्यक्ति स्वामिवर्गापैकीं प्रत्येकाच्या नजरेखालीं असते; किंबहुना सर्वस्वीं त्याच्या हस्तगत झालेली असते. आणि आपल्या स्वजातीपेक्षां धन्याशींच तिचा अधिक निकट संबंध असतो. यामुळें, त्याच्याशीं बंडाळी करण्याचीं साधनें मुळींच तिला अनुकूल नसतात. किंवा आपल्या धन्यावर कांहीं एक प्रकारचा पगडा बसविण्याचें सामर्थ्यही तिला नसतें. उलट आपल्या धन्याची मर्जी संपादन करणें व त्याचा रोष टाळणें, हीच गोष्ट तिला जरूर साधावी लागते. राजकीय हक्क प्राप्त करून घेण्याच्या खटपटींत, पुढारी माणसें लांचाच्या योगानें, किंवा धमकावणीनें कशीं वळविलीं जातात, हें प्रत्येकास ठाऊकच आहे. स्त्रियांच्या संबंधानें पाहिलें तर,

या परवश जनांपैकीं प्रत्येक व्यक्ति लांच व भीति या दोन्ही गोष्टींच्या तडाक्यांत निरंतर सांपडून गेलेली असते. आपल्या स्वामीच्या विरुद्ध वंड करणें असेल तर, त्या कामांतल्या पुढाऱ्यांपैकीं बहुतेक व्यक्तींनीं (आणि विशेषतः ज्या पुढाऱ्यास अनुसरतील, त्यांनीं) आपल्या स्वतःच्या हिताहिताचें व सुखदुःखाचें भान सर्वथा विसरलें पाहिजे. कधींकाळीं सत्ताधीश लोकांनीं जुलुमानें वश करून टाकिलेल्या लोकांच्या मानेवर जबरदस्त जूं ठेवलें असल्याचें उदाहरण इतिहासांत जर कोठें असेल तर, अगदीं तसाच प्रकार प्रस्तुत उदाहरणांत आहे. स्त्रियांच्या पराधीनतेचा हा प्रकार अत्यंत अन्यायाचा आहे, हें मीं अजून सिद्ध केलें नाहीं. तथापि, या विषयावर विचार करण्यापुरता ज्यांचा अधिकार असेल, अशा प्रत्येक पुरुषाच्या ध्यानांत ही गोष्ट येऊन चुकलीच असेल कीं, प्रस्तुत सत्तेचा प्रकार निव्वळ अन्यायाचा व जबरदस्तीचा आहे, अशी कल्पना क्षणभर केली तर, अन्यायाच्या अधिकाराचे जे इतर प्रकार वर सांगितले, त्यापेक्षां हा प्रकार स्वभावेंकरूनच फार दिवस टिकण्यासारखा आहे. आणि ज्या अर्थीं, वर सांगितलेल्या प्रकारांपैकीं जे अतिनिंद्य प्रकार तेही पुष्कळ सुधारलेल्या देशांतून अजून चालूच आहेत. व कांहीं कांहीं देशांत ते नुकतेच बंद पडले आहेत, त्या अर्थीं, ज्या प्रकाराचें मूळ फार खोल गेलें आहे, व जो स्वभावतः फार दिवस टिकणारा असा आहे, त्याचा ह्मणण्यासारखा उच्छेद जर कोठें झाला असेल, तर ही एक आश्चर्य मानण्यासारखी गोष्ट समजावयाची! एवढी मात्र गोष्ट खरी कीं, मोठमोठ्या विद्वान् व वजनदार लोकांनीं आपले अभिप्राय या प्रकाराविरुद्ध दिले आहेत, हेंच आश्चर्य आहे!

९. कांहीं लोक असा आक्षेप घेतील कीं, मीं उदाहरणाकरितां ह्मणून जे वर अन्यायाचें प्रकार सांगितलें त्यांत, व पुरुषांची स्त्रियांवर अस-

णारी सत्ता, यांत तुलना करितां येत नाहीं. कारण, ते प्रकार निव्वळ जुलुमाचे परिणाम होते. आणि पुरुषांच्या सत्तेचा प्रकार हा तसा नसून तो अत्यंत स्वाभाविक आहे. परंतु असा विचार करा कीं, ज्यांच्या हातामध्यें स्वामित्व आहे, त्यांस तें स्वाभाविक वाटलें नाहीं, अशी गोष्ट कधींकाळीं तरी घडली आहे काय? असा एक काळ होता कीं, त्या वेळेस लोकांनीं माणसांचे दोन वर्ग केले होते. एक लहानसा वर्ग होता तो धन्यांचा; व दुसरा मोठा एक वर्ग गुलामांचा! मनुष्यजातीचें हें वर्गीकरण अत्यंत विचारसंपन्न माणसांसही स्वाभाविक वाटे! ज्यानें विद्याभांडारास भर घातली, ज्याची गणना मोठ्या पंडितांत व कुशाग्रबुद्धि पुरुषांमध्यें करितात, असा जो **आरिस्टॉटल्** त्यानें सुद्धां वर सांगितलेलें मनुष्यजातीचें वर्गीकरण निःशंक मान्य केलें! आणि त्या वर्गीकरणाचीं कारणें पाहिलीं तर, पुरुषांची सत्ता स्त्रियांवर असावी, अशा पक्षाचें समर्थन करणारी मंडळी जीं कारणें दाखवितात, तींच कारणें **आरिस्टॉटल्**ही दाखवी. त्याचें ह्मणणें असें होतें कीं, मानवजातींत भिन्न भिन्न प्रकृति आहेत; कांहीं प्रकृति स्वतंत्र आहेत व कांहीं परतंत्र आहेत. **ग्रीक**लोक हे स्वतंत्रप्रकृतिपैकीं असून, **थ्रेस** व **आशियाखंड** यांतील रानटी लोक, परतंत्रप्रकृतीचे आहेत; ह्मणजे ते गुलाम होण्यासच पात्र आहेत. परंतु, **आरिस्टॉटल्**पर्यंत जाण्याची जरूरच नाहीं. **दक्षिण अमेरिकें-तील** गुलामांचे मालक केवळ स्वतःच्या हितावर लक्ष देऊन, व आपल्या मनोविकारांस वश होऊन, आपलें कृत्य न्याय्य आहे, असें दाखविण्या-करितां, अशाच प्रकारचें प्रतिपादन करीत असत कीं नाहीं? काळ्या-मनुष्यांवर गोऱ्या मनुष्यानें स्वामित्व करणें हेंच स्वाभाविक आहे. काळ्या जातीचे लोक स्वभावतःच स्वतंत्रतेविषयीं अपात्र आहेत. त्यांनीं गोऱ्या माणसांचें गुलाम होऊन रहाणें, हेंच त्यांस सर्वथा योग्य व हित-कर आहे; वगैरे गोष्टींची संपादणी करण्याकरितां, त्यांनीं आकाशपाताळ

एक केलें नाहीं काय ?* फार कशाला ? त्यांच्यापैकीं कांहीं कांहीं तर असें ह्मणणारे होते कीं शारीरिक श्रम करणाऱ्या मजूर वगैरे लोकांस स्वातंत्र्य असणें ही गोष्ट, जगाच्या कोणत्याही भागांत असली तरी, ती सृष्टीविरुद्ध होय !

याचप्रमाणें एकछत्री किंवा एकसत्तात्मक राज्याचा पक्ष घेऊन भांडणाऱ्या लोकांची स्थिति आहे. ते ह्मणतातः—"राज्यपद्धतीचा प्रकार काय तो एवढाच. तो फार प्राचीन काळापासून आला असून, समाजव्यवस्थेला अत्यंत उपयुक्त व आवश्यक आहे. कुटुंबास जसा बाप, तसा प्रजेस राजा. एकाच्याच हातांत सर्व अधिकार असणें, हीच स्थिति स्वभावसिद्ध आहे." असो, सारांश काय कीं, ज्यास लोकांवर कसा तरी, पण आपला पगडा बसविण्याची व आपली सत्ता चालविण्याची हौस वाटते, त्यास दुसरी एखादी योग्य सबब सांगतां आली नाहीं, ह्मणजे 'बळी तो कान पिळी' हाच न्याय खरा व अत्यंत स्वाभाविक आहे, असें वाटूं लागतें. ज्यांनीं दुसऱ्यास बाहुबलानें ह्मणा, अथवा कपटबलानें किंवा फितुरानें ह्मणा, कोणत्या तरी बलानें जिंकिलें आहे; तेही लोक असाच उपदेश करितात व असेंच शास्त्र सांगत असतात कीं 'अहो ! जिंकिलेल्या लोकांनीं जिंकणाऱ्या लोकांचे नम्र सेवक व आज्ञाधारक गुलाम होऊन राहणें हेंच न्यायाचें आहे ! ह्मणजे अर्थात् दुर्बळ, नामर्द, व कमकुवत, अशा लोकांनीं परतंत्र राहिलें पाहिजे, हीच गोष्ट नीतीची आहे !'

---

* प्रस्तुत स्थळीं आमच्या वाचकांस '**इल्बर्ट**' बिलाच्या वेळीं, '**ब्रान्स**नादि'कांनीं व '**ऑंग्लोइंडियन्**' मंडळींनीं अशाच प्रकारचें प्रतिपादन करून जें अकांडतांडव केलें व जी मोठी गर्दी उडवून दिली, त्या प्रसंगाचें स्मरण झाल्याखेरीज राहणार नाहीं ! यापेक्षां आह्मी प्रस्तुतस्थळीं अधिक कांहीं सांगत नाहीं, व अधिक सांगण्याचें प्रयोजनही दिसत नाहीं.

जो काल ' मिड्ल एजेस् ' किंवा ' मध्ययुग ' अशा नांवानें इतिहासांत* प्रसिद्ध आहे, त्या काळांतील मनुष्यस्वभावाचें यत्किंचित् परिज्ञान ज्यास असेल, त्यास, उंच प्रतीच्या लोकांनीं नीच प्रतीच्या लोकांवर स्वामित्व करावें, ही गोष्ट त्या लोकांस किती स्वाभाविक वाटत असे, व नीच प्रतींतील एखादा मनुष्य उंच प्रतीच्या लोकांची बरोबरी करण्याची किंवा त्याजवर अधिकार चालविण्याची इच्छा करूं लागला तर, हें त्याचें करणें किती विलक्षण व सृष्टिविरुद्ध वाटे, हें चांगलें कळेल. जे लोक उंच प्रतीच्या लोकांच्या आधीन असत, त्यांसही तसेंच वाटे. नीच मानिलेल्या जातींतील पुष्कळ लोकांनीं खटपटीअंतीं व कालेंकरून जरी बरेच हक्क मिळविले, तरी बरोबरीच्या अधिकाराचे विभागी होण्याविषयीं त्यांनीं कधींच मनांत आणिलें नाहीं. त्यांचा यत्न एवढ्याविषयींच होता कीं, आपणावर उंच प्रतीच्या लोकांनीं जुलूम करूं नये, व त्यांच्या अधिकाराची कांहींएक मर्यादा ठरावी. तात्पर्य, ' सृष्टिविरुद्ध ' किंवा ' स्वभावविरुद्ध ' या शब्दाचा अर्थ बहुधा केवळ ' रूढिविरुद्ध ' एवढाच असतो. जें जें एकदां पडलेल्या रूढीस, किंवा प्रचारास, अथवा चालू वहिवाटीस, अनुसरून असतें, तें तें माणसांस स्वाभाविक असें वाटतें. ह्मणजे, सृष्टिविरुद्ध असें भासत नाहीं. स्त्रियांनीं पुरुषांचे कह्यांत राहण्याची चाल सर्वसाधारण असल्यामुळें, त्या चालीविरुद्ध एखादी गोष्ट करूं ह्मटल्यास लोकांस सहजच ती सृष्टिविरुद्ध वाटते. परंतु, प्रस्तुत विषयाचे संबंधाची समजूत केवळ रूढीवर किती अवलंबून आहे, या गोष्टीचा आपणास पुष्कळ अनुभव येतो. पृथ्वीवरील दूरदूरचे भागावरील लोक,

* मिल्ल साहेबांचा हा निबंध चांगला समजण्यास वाचकानें जगाच्या इतिहासाचें ज्ञान बरेंच करून घेतलें पाहिजे, ही गोष्ट प्रस्तुत निबंधांत ठिकठिकाणीं भिन्न भिन्न काळच्या इतिहासास उद्देशून जो उल्लेख केला आहे, त्यावरून उघड दिसेल.

प्रथमच जेव्हां **इंग्लंड** देशाची माहिती करून घेऊं लागतात, तेव्हां जर त्यांस कळलें, किंवा त्यांस कोणी सांगितलें कीं, **इंग्लंड** देशांत राणीचें राज्य आहे, ह्मणजे, हें राज्य स्त्रीसत्ताक आहे, तर त्यांस फारच आश्चर्य वाटतें; किंबहुना ती गोष्ट त्यांस इतकी चमत्कारिक व सृष्टिविरुद्ध वाटते कीं, तिजवर त्यांचा सहसा भरंवसाच बसत नाहीं! असें असतां प्रत्यक्ष इंग्रज लोकांस त्यांत कांहींच चमत्कारिक किंवा सृष्टिविरुद्ध वाटत नाहीं. याचें कारण इतकेंच कीं, ती गोष्ट त्यांच्या सहवासांतली पडली. परंतु, त्याच इंग्रज लोकांस स्त्रियांनीं पलटणींत शिपाई होऊन रहाणें, किंवा पार्लमेंट सभेचे सभासद होण्याचा यत्न करणें, हें सृष्टिविरुद्ध वाटतें. याचेंही कारण एवढेंच कीं, त्या गोष्टीची त्यांस संवय नाहीं. पुरातन काळची स्थिति याच्या अगदीं उलट होती. त्यावेळीं युद्धकला व राजकारस्थान या गोष्टींत स्त्रियांचा संबंध असणें, हें लोकांस सृष्टिविरुद्ध वाटत नसे. कारण, एकतर तो प्रचार त्या वेळेस सर्वमान्य असे, व उंच प्रतीच्या लोकांच्या स्त्रियांनीं,—आपले वडील व आपले पति, यांची बरोबरी शरीरसामर्थ्या-खेरीज इतर सर्व कामांतही करावी, अशी त्या वेळच्या लोकांची समजूत असे. **ग्रीक** लोकांच्या पुरातन दंतकथांमध्यें **आमेझॉन्** नांवाच्या युद्धकुशल स्त्रिया प्रसिद्ध असत. यामुळें व विशेषेंकरून **स्पार्टन्** लोकांच्या स्त्रियांचें प्रत्यक्ष उदाहरण त्यांच्या समोर असल्यामुळें स्त्रियांचें स्वातंत्र्य त्यांस विस्मयकारक, किंवा अलौकिक, असें वाटत नसे.*

---

* प्रस्तुत विषयाला उद्देशून आमचे इकडील जी माहिती आह्मांस मिळाली आहे, तिचाही आह्मी या स्थळीं संग्रह करितों.

" **गार्गी**, **सुलभा**, व **मैत्रेयी** या विद्वत्तेविषयीं प्राचीन इतिहासांत प्रसिद्ध आहेत. **वालीची** बायको **तारा** ही राज्यकारभारांत मोठी कुशळ होती. **वाली** मरणोन्मुख झाला असतां, त्यानें आपला भाऊ **सुग्रीव** यास सांगितलें कीं, 'तूं आपला राज्यकारभार **तारेच्या** अनुमोदनानें कर.' **कल्याणदेवी** ह्मणून एक प्रसिद्ध ग्रंथकर्त्री होती. **कुन्ती**,

त्याच कालच्या इतर राष्ट्रांची समजूत या पेक्षां कांहीं निराळी होती. **स्पार्टा** या संस्थानांतील स्त्रिया इतर **ग्रीक** संस्थानांपेक्षां कायद्याच्या दृष्टीनें परवश कमी होत्या, असें नाहीं. परंतु व्यवहार दृष्टीनें मात्र त्या तितक्या परवश नव्हत्या. आणि शारीरिक व्यायामानें, किंवा कसरतीनें, पुरुषांचीं शरीरें जशीं कसलेलीं असत, तशींच स्त्रियांचींही असल्यामुळें त्या शारीरिक पराक्रमाच्या कामीं पुरुषापेक्षां कमी नव्हत्या. ही गोष्ट त्या काळीं प्रत्यक्ष प्रमाणानें सिद्ध होती. **ग्रीक** लोकांमधील प्रसिद्ध पंडित जो **प्लेटो** त्याच्या इतर मतांपैकीं, व्यवहार व राज्यकारस्थान, या दोन संबंधांत, स्त्रीपुरुषांची बरोबरी आहे, असें जें मत होतें तें, एक **स्पार्टा** देशाच्या अनुभवावरून झालें असेल, यांत शंका नाहीं.

१०. आतां कोणी असें ह्मणेल कीं, पुरुषांची स्त्रियांवर जी सत्ता असते, ती इतर सत्तांहून निराळी असते. स्त्रियांवरील सत्ता ही जुल-

---

द्रौपदी, व **गांधारी** या स्त्रिया नीतिकुशल होत्या; व राज्यकारभारांतही मोठ्या प्रवीण होत्या. त्या वेळचे पुरुष अशा स्त्रियांची हरएक कामांत सल्लामसलत घेत असत, हें प्राचीन आर्यावर्ताच्या इतिहासावरून उघड दिसतें. **सीता** या नांवाची स्त्री **भोजराजाच्या** सभेंत कवयीत्री होती. **सुलभा** ही नेहमीं धर्मविषयावर राजा **जनक** याशीं संभाषण करीत असे, व तिनें **जनकाला** पुष्कळ धर्मविषयक गोष्टीही शिकविल्या. **चित्ररेखा** ही चित्रकामांत मोठी कुशल होती. **मनसा** या नांवाची एक स्त्री वैद्यशास्त्र, व शिल्पशास्त्र, या दोन शास्त्रांत निष्णात होती, असें ह्मणतात. **दशरथाची** पत्नि **कैकयी** ही सारथ्यांत निपुण असून, एका युद्धाचे प्रसंगीं सारथ्य करीत असतां, राजा **दशरथाचा** जीव मोठ्या शर्थीनें तिनें वांचविला. **कृष्णाची** बायको **सत्यभामा** ही युद्धकलेंत निपुण होती. तिनें **नरकासुर** या नांवाच्या बलाढ्य शूरास मारिलें. हीं उदाहरणें प्राचीन इतिहासांतलीं झालीं. अर्वाचीन इतिहासांत प्रसिद्ध **अहिल्याबाई** होळकरीण, **बायजाबाई** शिंदे, व **लक्ष्मीबाई, (झांशीची राणी)** हीं उदाहरणें ताजीं असल्याकारणानें वाचकांच्या लक्षांत असतीलच."

ही माहिती आह्मी मद्रास येथील प्रसिद्ध विद्वान गृहस्थ मि **पी. चेन्सलराव** यांनीं **विजयानगरच्या** मुलींच्या शाळेंतील बक्षिस समारंभाचे वेळीं जें भाषण केलें, त्यांतून घेतली आहे. सदरहू भाषण १८८४ सालच्या **प्रोग्रेस** नांवाच्या मासिक पुस्तकांत दिलें आहे.

माची नसून त्यांनीं ती स्वसंतोषानें व स्वेच्छेनें पत्करलेली असते. या सत्तेबद्दल प्रत्यक्ष स्त्रियांची कांहीं एक कुरकुर असते, असें नसून, ती त्यांस कबूल असल्या सारखी असते. यावर माझें उत्तर असें आहे कीं एक तर, पुष्कळ स्त्रियांस पुरुषांची ही सत्ता मान्य नाहीं; कारण आपल्या लेखांच्या द्वारानें आपले विचार प्रसिद्ध करणाऱ्या स्त्रिया निपजूं लागल्यापासून आपल्या व्यावहारिक स्थितीविषयीं आपला असंतोष प्रगट करणाऱ्या स्त्रियांची संख्या दिवसानुदिवस अधिकाधिक वाढत जात आहे. आणि आलीकडे तर लोकविख्यात व बुद्धिमान् अशा कांहीं स्त्रियांस पुढारी करून शें[illegible]डों स्त्रियांनीं पार्लमेंट सभेस 'आपल्या समाजाचे सभासद होण्याचा हक्क आह्मांस द्यावा,' ह्मणून अर्ज केला आहे. त्याचप्रमाणें पुरुषांस जितकी विद्या देतात, व शाळांतून त्यांस जे जे विषय शिकवितात तितकी विद्या व ते ते विषय आह्मांस शिकवावे, असेंही स्त्रियांचें ह्मणणें फार दिवसांपासून चालू आहे. या दोन्ही कामांत त्यांस बरेंच यशही आलें आहे. आजपर्यंत जे उद्योगधंदे करण्यास आह्मांस प्रतिबंध आहे, ते करण्याविषयीं आह्मांस मोकळीक असावी, असेंही पुष्कळ स्त्रियांचें ह्मणणें असून, त्यांचाही पक्ष दिवसानुदिवस प्रबळ होत चालला आहे. **अमेरिका** खंडांतील **युनाइटेड्स्टेट्**समध्यें ज्याप्रमाणें स्त्रियांच्या नियतकालिक सभा भरतात, व स्त्रियांच्या हक्काविषयीं निरंतर खटपट चालविण्याकरितां एक मंडळी स्थापित झाली आहे; तसा प्रकार आमच्या या **इंग्लंड** देशामध्यें जरी नाहीं, तथापि स्त्रियांची ह्मणून एक मोठी सभा आमचे देशांत (**इंग्लंडांत**) स्थापित झाली असून, तिचा हेतु राज्यकारभारांत स्त्रियांस वांटा असावा असा आहे. **अमेरिका** व **इंग्लंड** या देशांतच स्त्रियांची परवशता दूर करण्याची खटपट स्त्रियांनीं एक जुटीनें चालविली आहे असें नाहीं. तर, **फ्रान्स** [illegible]**ली**, **स्वित्सर्लंड**, या देशांतही अशा प्रकारचीं उदाहरणें आढळ-

ध्यानांत

तात. शिवाय प्रसिद्धपणें कांहींएक खटपट न करितां, मनांतले मनांतच आपली महत्वाकांक्षा ज्यांनी दावून ठेविली आहे, अशा स्त्रिया किती असतील, ही गोष्ट समजणें सर्वथा अशक्य आहे. परंतु, ही महत्वाकांक्षा स्त्रीजातीस अयोग्य आहे, असा दृढ ठसा स्त्रियांचे मनावर ठसविण्याचा भगीरथ प्रयत्न पुरुष न करते तर, पुष्कळ स्त्रियांनीं महत्वाकांक्षा, किंवा उदात्त विचार, मनांत आणिले असते, असें मानण्यास पुष्कळ प्रमाणें आढळतात.

दुसरी अशी एक गोष्ट ध्यानांत ठेविली पाहिजे कीं, परवश झालेल्या अशा कोणत्याही लोकांनीं पूर्ण स्वातंत्र्य एकदम मिळविण्याचा यत्न केला, असें मुळींच घडत नाहीं. आणि अशा प्रकारचें उदाहरण इतिहासांतही कोठें आढळत नाहीं. जेव्हां **सायमन् डी मॉंट्फर्ड्*** यानें पार्लमेंट सभेचे सभासद होण्यास सामान्य प्रतीच्या लोकांचे प्रतिनिधि

---

* **सायमन्. डी मॉंट्फर्ड्** हा, **जॉन्** राजाचा मुलगा **तिसरा हेन्री** याचे वेळीं होऊन गेला. **तिसरा हेन्री** हा राजा थोडाबहुत आमचे बडोद्याचे माजी राजे **मल्हारराव** यांचे सारखाच होता. भोळ्या व मूर्ख राजाजवळ बहुतकरून खुशामती लोक असतात, ही गोष्ट सर्व विश्रुतच आहे. या राजाचे वेळेस त्याचे भोंवतीं लोभी, गर्विष्ठ, व दांडग्या, अशा लोकांचा परिवार जमा होऊन रयतेची पायमल्ली होऊं लागली; राजाचे उधळेपणाविषयीं लोक अतिशय कुरकुर करूं लागले; व त्याचेविषयीं लोकांचा द्वेष फारच वाढला. शेवटीं त्या अशक्त राजापासून राज्य सोडवावें अशा हेतूनें **सायमन् डी मांट्फर्ड्** यानें राज्य रीतींत फेरफार करावयाचा उद्योग आरंभिला. त्यास प्रजा अनुकूलच होती. खुद्द राजाची बहीण ही त्यास दिली होती. स्वतः तो मोठा पराक्रमी व सुशील होता. पुष्कळ गोष्टी आपणास अनुकूळ करून घेऊन, शेवटीं, त्यानें मोठें बंड करण्याचा विचार केला. परंतु तो विचार प्रथम पार्लमेंट सभेंत फुटला! तेथील सर्व सभासद युद्धार्थ सज्ज होऊन युद्धाच्या तयारीनें तेथें गेले होते. राजा तेथें गेला तेव्हां, त्यानें लोकांस विचारिलें कीं, तुमचे मनांत आहे तरी काय' तेव्हां त्या लोकांनीं नम्रपणानें उत्तर दिलें कीं, 'आह्मी जीं दुःखें भोगीत आहों तीं आपण दूर करावीं; आणि मग आपण सुखानें राज्यकारभार चालवावा, असें आमचे मनांत आहे.' राजाचा स्वभाव असा होता कीं, जें कोणी कांहीं मागेल तें देण्यास त्यानें 'होय' ह्मणावें. या स्वभावास अनुसरून राजा ह्मणाला कांहीं [illegible]

बोलाविले, त्या वेळेस लोकांनीं निवडलेल्या प्रतिनिधींच्या सभेनें राज्यांतील मोठमोठे कारभारी नेमावे व ते पाहिजे तेव्हां काढून टाकावे; राज्यकारभार चालवीत असतां राजावरही हुकमत चालवावी, अशा प्रकारचे हक्क मागण्याचें त्यांच्यापैकीं कोणाच्या तरी स्वप्नीं आलें असेल काय? त्यांच्यापैकीं ज्याच्या आशेची उडी फारच मोठी असेल, त्याच्याही स्वप्नीं अशी गोष्ट आली नसेल. सरदार मंडळीच्या उडया तर फारच मोठमोठया होत्या. परंतु साधारण लोकांचें ह्मणणें इतकेंच होतें कीं, राजास पाहिजे तसा व पाहिजे तितका कर बसविण्याचा हक्क नसावा, आणि राजाच्या ताबेदारींतल्या लोकांचा व सरकारी कामदारांचा प्रजेवर जो विलक्षण जुलूम होत असे तो बंद व्हावा. राज्यनीतीच्या संबंधानें सृष्टींत असा एक नियम दृष्टीस पडतो कीं, जे लोक पूर्वापार चालत आलेल्या सत्तेच्या अधीन झालेले असतात, ते प्रत्यक्ष त्या सत्तेबद्दल प्रथम कुरकुर करीत नाहींत. तर फक्त त्या सत्तेचा दुरुपयोग किंवा जुलमी अंमल होऊं नये, एवढेंच त्यांचें ह्मणणें असतें. याच नियमास अनुसरून आपले पति आपणास वाईट रीतीनें वागवितात—तसें त्यांनीं वागवूं नये—असें ह्मणणाऱ्या स्त्रियाही पुष्कळ आढळतात. जर स्त्रियांच्या या ह्मणण्यानें, किंवा कुरकुरीनें पुरुष अधिक खवळून जाऊन व हट्टास पेटून त्यांचा अधिक छळ न करते तर, आपलें दुःख प्रत्यक्षपणें बोलून दाखविणाऱ्या स्त्रियांची संख्या, आहे यापेक्षां खचित बरीच अधिक दृष्टीस पडली असती. अधिक कुरकुरीचा परिणाम बहुधा अधिक वाईट रीतीनें वागविणें, असाच होत असतो! यामुळें, नेहमीं असा चमत्कार घडतो कीं, स्त्रियांवरील पुरु-

---

नाहीं, ज्या रीतीनें तुमचें कल्याण होईल त्या रीतीनें मी वागेन. येणे प्रमाणें पार्लमेंटाच्या इतिहासाचा आरंभ आहे. हा आरंभ १३ वे शतकांत झाला. ह्मणजे, प्रस्तुत आपण पार्लमेंट सभेचें जें स्वरूप पहातों त्यांत व मूळच्यांत ७०० वर्षांजवळ अंतर आहे, हे वाचकांचे ध्यानांत येईलच.

षांची सत्ता कायम ठेवून केवळ त्या सत्तेचा दुरुपयोग पुरुषांनीं न करावा, एतदर्थ केलेले सर्व यत्न निष्फळ होतात, व स्त्रियांचें संरक्षण होत नाहीं. अगदीं लहान मुलें खेरीज करून इतर सर्वत्र व्यवहार असा आढळतो कीं, न्यायासनापुढें एका दुष्ट अपराध्यानें एखाद्या मनुष्यप्राण्यास दुखापत केली आहे असें एकदां सिद्ध झालें, ह्मणजे तो मनुष्यप्राणी त्याच दुष्टाच्या ताब्यांत पुनः देणें, ही गोष्ट सहसा घडत नाहीं. परंतु, स्त्रियांच्या संबंधांत मात्र ही गोष्ट नेहमीं घडते ! पुरुषानें आपल्या बायकोचे कितीही हाल केले, व तिला कशाही दीर्घ यातना सोसावयास लाविलें, तरी ती बिचारी आपल्या संरक्षणार्थ केलेल्या कायद्याचा उपयोग करून घेण्यास बहुधा धजत नाहीं ! अनिवार अशा रागाच्या भरांत ह्मणा, किंवा शेजाऱ्या पाजाऱ्याच्या सल्लामसलतीनें ह्मणा, जरी तिनें न्यायाची कचेरी पाहिली, तरी शेवटीं आपली खरी हकीगत न्यायाधिकाऱ्यापासून जितकी छपवितां येईल तितकी ती छपविते व आपल्या नवऱ्याच्या अपराधांवर जितकें पांघरूण घालितां येईल तितकें घालण्याचा ती यत्न करिते ! फार काय, कधीं कधीं असा चमत्कार घडतो कीं, आपल्या छलकर्त्यास योग्य शिक्षेपासून मुक्त करण्याकरितां ती न्यायाधिकाऱ्याच्या विनवण्याही करिते ! *

---

* प्रस्तुत प्रसंगीं तारीख १८ माहे आगष्ट सन १८८४ इसवीच्या इंदुप्रकाश पत्रांत प्रसिद्ध झालेली एक गोष्ट आह्मांस आठवत आहे, तिचा उतारा आह्मी येथें देतों:—

"असें ऐकतों कीं, सात आठ दिवसांपूर्वीं येथील एक विद्वान् ब्राह्मण वेश्येच्या नादीं लागून, आपल्या तेरा चौदा वर्षांच्या अल्पवयी निरपराधी बायकोस स्मशानभूमींतील एका खाड्यांत गळ्यापर्यंत पुरून आपण वर कांटे घालून निघून गेला ! दुसऱ्या दिवशीं लोकांनीं तशीच तिला काढून पोलिसच्या हस्तगत केली. परंतु, जबानींत त्या साध्वी बाईनें सांगितलें कीं, 'मी नवऱ्यासमागमें स्मशानीं गेलें खरी, परंतु तेथें नवऱ्याची माझी चुकामुक होऊन, मी एका खाड्यांत गळ्यापर्यंत पडलें. मला पुरिलें नाहीं.' तेव्हां त्या विद्वान् नवऱ्याचा जामीन घेऊन त्यास सोडून दिलें होतें. त्यास सांप्रत आजिबात खुलें करण्यांत आलें."

११. स्त्रिया पुरुषांविषयीं एका जुटीनें गिल्ला करीत नाहींत याचीं कांहीं स्वाभाविक व कांहीं लौकिक अशीं अनेक कारणें आहेत. तीं अशीं:—ज्यांस परवशता प्राप्त झाली आहे अशा मनुष्यांच्या स्थितींत व स्त्रियांच्या स्थितींत फार अंतर आहे. स्त्रियांच्या मालकांस, स्त्रियांपासून सेवा करून घ्यावी, व त्यांनीं आपल्या पूर्ण आज्ञेंत असावें इतकेंच पुरें होत नाहीं; तर, त्यांचे मनोधर्मही आपल्या स्वाधीन असावे असें त्यांस वाटतें. जो पुरुष केवळ पशुतुल्य असेल त्याची गोष्ट सोडून द्या. परंतु, बाकीच्या बहुतेक पुरुषांस आपल्याशीं जिचा अति निकट संबंध आहे अशी आपली स्त्री, केवळ निरुपायामुळें किंवा बलात्कारास्तव झालेली दासी असावी, अशी कल्पना रुचतच नाहीं. 'महाराज! मी स्वेच्छेनें, व आपखुषीनें आपली अगदीं मर्जीतली दासी झालें आहे'—असें तिनें ह्मटलें पाहिजे! आणि तरच या बोवांस सोळा आणे संतोष होत असतो!

अशा हेतूनें स्त्रिया जितक्या अज्ञान व असंस्कृत ठेवितां येतील, तितक्या ठेवण्याचा यत्न आजपर्यंत पुरुषांनीं केला. गुलामांनीं आपल्या आज्ञेंत रहावें ह्मणून, इतर गुलामांचे मालक, मुख्यत्वेंकरून भीतीचा उपयोग करितात. ही भीती एक खुद्द मालकाची, किंवा धर्माची. स्त्रियांच्या मालकांस केवळ आज्ञाधारकता एवढाच गुण बस्स न होऊन आपला हेतु सिद्ध करण्याकरितां, स्त्रियांच्या एकंदर शिक्षणाचा ओघच त्यांनीं वळवून टाकिला! स्त्रियांची वागणूक ह्मणजे, पुरुषांच्या वागणुकीहून अगदीं भिन्न असली पाहिजे, अशी समजूत अगदीं बाळपणापासूनच सर्व स्त्रियांची ते करून देतात.—स्वेच्छाचारित्व व आत्मसंयमन किंवा स्वावलंबन, हा गुण बायकांच्या जातीस शोभत नाहीं; बायकांच्या जातीस निरंतर परतंत्रता व दुसरा सांगेल तसें वागणें, हीच गोष्ट शोभते—असें स्त्रियांच्या मनांत पक्कें बिंबविण्याचा

यत्न पुरुष करितात. धर्मशास्त्रें, लोकव्यवहार, लोकविचार, इत्यादि-कही स्त्रियांस असाच उपदेश करीत असतात. तो असा कीं, बायकांचा जन्म दुसऱ्यांकरितां आहे, स्त्रीच्या जातीनें नेहमी पुरुषांच्या अधीन असावें, व पुरुषांच्या आज्ञेंत राहावें.*

या संबंधानें विशेष गोष्टी ध्यानांत आणण्यासारख्या आहेत. त्या ह्याः—पहिली, स्त्रिया व पुरुष यांमधील स्वाभाविक अन्योन्याकर्षण. दुसरी, आपल्या पतीवर स्त्रिया सर्वस्वी अवलंबून असतात. ह्मणजे, तिचा मानापमान किंवा तिचें सुखदुःख तिच्या पतीच्या इच्छेवर अवलंबून असतें. तिसरी, तिच्या जन्माचें साफल्य होणें, संसारांत तिची मानमान्यता वाढणें, व जगांत लौकिक संपादन करणें या गोष्टींचीं जीं साधनें असतात, तीं सर्व तिला प्रायः नवऱ्याच्याच योगानें प्राप्त होण्यासारखीं असतात. अन्यद्वारानें होण्यासारखीं नसतात. या तीन गोष्टींचा योग्य विचार केला असतां स्त्रियांच्या एकंदर शिक्षणाचा व वागणुकीचा मुख्य हेतु–पुरुषांनीं आपणास चांगलें ह्मणावें, 'येन केन प्रकारेण' पुरुषांची मर्जी आपणावर सुप्रसन्न रहावी–येवढाच होऊन बसला, या गोष्टीचें आपणास मुळींच आश्चर्य वाटणार नाहीं.

वर सांगितल्याप्रमाणें पुरुषांनीं स्त्रियांच्या मनांवर एक प्रकारचा ठसा वठविण्याचें किंवा पगडा बसविण्याचें बलवत्तर साधन प्राप्त करून

---

* आमच्या धर्मशास्त्रांतही 'रक्षेत् कन्यां पिता विन्नां पतिः पुत्रास्तु वार्धके। अभावे ज्ञातयस्तेषां न स्वातन्त्र्यं क्वचित् स्त्रियः' असें याज्ञवल्क्यांचें एक प्रसिद्ध वचन आहे. त्याचा भावार्थ असाः–'स्त्रीनें लहान असतां बापाच्या स्वाधीन असावें, मोठी होऊन लग्न झाल्यावर नवऱ्याच्या स्वाधीन रहावें; नवरा मेला तर पुत्राच्या स्वाधीन; सारांश, स्त्रीजातीला स्वातंत्र्य कधींच योग्य नाहीं!' स्त्रियांचे मनोविकार (विशेषें करून कामेच्छा) फार तीव्र असतात; अशा अभिप्रायाचीं 'स्त्रीयन्त्रं केन सृष्टं' इत्यादि विधानें व वचनें हीं भारुड ग्रंथांतून बहुत आढळतातः आणि आजकालसुद्धां पुष्कळ पुरुषांची समजूत तशीच असावी, ही शोचनीय गोष्ट आमच्या वाचकांस माहीत नसेल असें नाहीं!

'जे स्वामीचिये सत्ता। वीण असों नेणे पतिव्रता' असा ज्ञानेश्वरांनीं 'अमृतानुभवां'त दृष्टांत दिला आहे. (प्र. १. ओ. २०)

घेतल्यामुळें, त्यांच्या या स्वार्थपरायणतेचा किंवा अप्पलपोटेपणाचा असा परिणाम झाला कीं, ज्या व्यवस्थेनें स्त्रिया सर्वथा पुरुषांच्या अधीन राहतील, ती व्यवस्था पाहिजे तें करून त्यांनीं अखेरीस अमलांत आणिली. नम्रता, परवशता व पातिव्रत्य, इत्यादि गुण स्त्रियांत असावे; सर्वथा पतीच्या इच्छेप्रमाणें वागणें हाच स्त्रियांचा मुख्य धर्म व हेंच स्त्रियांचें भूषण होय; अशा प्रकारचा उपदेश शास्त्रकर्त्यांनींही केला.* वर निर्दिष्ट केलेले दास्याचे जे इतर प्रकार बंद झाले, ते लोकांच्या प्रयत्नांनीं झाले. ज्या साधनांच्या योगानें पुरुषांनीं स्त्रियांस पारतंत्र्यांत ठेविलें तींच साधनें जर वर निर्दिष्ट केलेल्या दास्याच्या प्रकारास अनुकूल असतीं व त्या साधनांचा उपयोग तितक्याच प्रयत्नानें करण्यांत आला असता, तर ते प्रकारही आजतागायत तसेच चालू राहिले असते. आपल्या स्वामीची मर्जी संपादन करणें, हेंच आपल्या जीविताचें मुख्य कर्तव्यकर्म आहे, असें जर प्रत्येक तरुण **प्लेबियन्**† वर्गांतील मनुष्याला शिकवून ठेविलें असतें; आपल्या धन्यानें आपणांस आपल्या कुटुंबापैकीं समजावें, आपल्या स्वामीच्या पूर्ण प्रीतींतले होऊन राहावें, हेंच उत्तम बक्षीस सर्व तरुण **प्लेबियनांस** प्राप्त होईल व विशेषेंकरून त्यांत जे अत्यन्त बुद्धिमान असतील व महत्वाकांक्षी असतील त्यांसच हें मोठें बक्षिस मिळेल अशीं

---

* प्रस्तुतस्थळीं **सावित्रीचें** आख्यान ध्यानांत आणण्यासारिखें आहे.

† रोमशहराच्या प्राचीन इतिहासांत **प्याट्रिशियन्** (महाजन) आणि **प्लेबियन्** (सामान्यजन) असे दोन प्रकारचे लोक होते. या दोन जातींमध्यें नेहमीं द्वंद्वभाव असे. या नांवावरून दुसऱ्या कोणत्याही देशांतील वरिष्ठ व कनिष्ठ प्रतीच्या लोकांस तींच विशेषणें देतात. '**शेक्सपियरच्या कोरिओलेनस्**' नांवाच्या ऐतिहासिक नाटकांत वरील दोन प्रकारच्या लोकांचें चित्र चांगलें काढिलें आहे. इंग्लंडच्या जुन्या इतिहासांत **लॉर्ड** किंवा **सियोर** व **सर्फ**, वैदिक कालांत **आर्य** व **अनार्य**, किंवा त्याच्या पुढच्या काळीं **ब्राह्मण** व **शूद्र**, किंवा आजकाल **गौरकाय** व **कृष्णकाय**, ऊर्फ **यूरोपियन** व **नेटीव**, अशा प्रकारचा हा भेद पूर्वापार चालत आलेला आहे.

अभिवचनें देण्यांत आलीं असतीं; आणि असें जें बक्षिस तें त्या **प्लेबियनांस** प्राप्त झाल्यावर आपल्या धन्याच्या इच्छा, आपल्या धन्याचा स्वार्थ व त्याच्या समजुती यांच्या बाहेर एक पाऊल देखिल टाकावयाचें नाहीं, असा प्रतिबंध त्यांस असता तर पुरुष व स्त्रिया यांजमध्यें जो स्थूळ भेद आजकाल आपल्या दृष्टीस पडतो त्याचप्रमाणें **प्लेबियन्** व **प्याट्रिशियन्**, **सर्फ** व **सिंयोर**, यांतही दृष्टीस पडला असता. आणि अत्यंत विचारी अशा एखाद्या मनुष्याशिवाय बहुतेक लोकांस हा भेद मानवी गोष्टींत अत्यंत स्वाभाविक व अपरिहार्य असा खचीतच वाटला असता.

१२. या वर सांगितलेल्या गोष्टींवरून इतकें स्पष्ट दिसून येईल कीं, कोणताही सार्वत्रिक प्रचार किंवा कोणतीही सर्वमान्य रूढि, कितीही सार्वत्रिक किंवा सर्वमान्य असली तरी, तेवढ्यावरून सामाजिक व राजकीय संबंधानें स्त्रियांनीं पुरुषांच्या अधीन असावें, अशी जी व्यवस्था, ती अवश्य व उपयुक्त आहे, असें सिद्ध होत नाहीं. इतकेंच नव्हे तर, मी याच्याही पुढें जाऊन असें प्रतिपादन करितों कीं, इतिहासक्रम व मानवजातीची दिवसानुदिवस पुढें पाऊल टाकण्याची जी प्रवृत्ति दिसते, यांचा विचार केला असतां, स्त्रिया व पुरुष यांच्या संबंधानें अधिकारवैषम्याची जी पद्धति आपण पहात आहों, तिला अनुकूल असें त्यांत कांहींच आढळत नाहीं. आजपर्यंत मनुष्यजातीचा क्रम पाहिला असतां व अर्वाचीन लोकांच्या विचारांचा ओघ ध्यानांत आणिला असतां, असें स्पष्ट अनुमान निघतें कीं, स्त्रियांच्या परवशतेचें हें अवशिष्ट राहिलेलें खूळ, इतर जुनीं खुळें जशीं एकामागून एक लयास गेलीं, तसें लयास गेलें पाहिजे. कारण, दिवसानुदिवस येणारा जो काल त्या कालास तें अगदीं विशोभित व विसंगत दिसूं लागलें आहे.

१३. असें पहा कीं, पूर्वीच्या व प्रस्तुतच्या कालांत मोठा भेद तो कोणता ?—ह्मणजे, जो काल निघून गेला त्या कालांतील रूढि, लोकव्यवस्था, व जीवनक्रम यांत व प्रस्तुत कालांतील रूढि, लोकव्यवस्था, व जीवनक्रम यांमध्यें मुख्य भेद कोणता ? माझ्या मतानें मुख्य भेद असा आहे कीं, मानवीप्राणी ज्या स्थितींत जन्म पावतात, त्या स्थितींतच शेवटपर्यंत त्यांनीं राहिलें पाहिजे, असा प्रकार आजकाल राहिला नाहीं. तर, ज्या कामांत ज्याची बुद्धि चांगली चालेल, त्यानें तें काम निःसंशय करावें. आणि, त्यास जीं जीं साधनें अनुकूल असतील, त्या त्या साधनांचा उपयोग करून घेऊन, आपल्या मर्जीप्रमाणें आपल्या स्थितींत पाहिजे ती सुधारणा करण्यास आजकाल जो तो पूर्ण मालक आहे. प्राचीन काळीं लोकसमाजाची स्थिति याहून कांहीं निराळ्याच पद्धतीची होती. ह्मणजे, त्यांतील तत्व कांहीं निराळेंच होतें. एकंदर मानवप्राणी समाजांत कांहीं ठरीव स्थितींत रहात. ह्मणजे, ज्या जातींत व ज्या कुलांत ते जन्म पावत, त्याच जातींत व त्याच कुळांत अथवा त्याच स्थितींत रहाणें त्यांस भाग पडे. जर कोणी आपली स्थिति सुधारण्याचा किंवा आपली मूळची जागा सोडण्याचा यत्न केला, तर तसें करण्यास त्यास शास्त्राचा निषेध असे व रूढि प्रतिबंध करी. आपली स्थिति सुधारण्याचीं साधनें त्यास दुर्लभ असत. माणसांत जशीं कांहीं माणसें गोरीं निपजतात व कांहीं माणसें काळीं निपजतात, त्याचप्रमाणें तेव्हांच्या लोकांचीही समजूतच अशी असे कीं, कांहीं प्राण्यांस गुलामांचा किंवा दासांचा जन्म प्राप्त होतो व कांहींस नागरिकांचा, ह्मणजे स्वतंत्रतेनें वागणाऱ्या माणसांचा, जन्म प्राप्त होतो. कांहीं **प्याट्रिशियन्*** (श्रेष्ठ वर्णांतील) जातीच्या जन्मास येतात. कांहीं

* आमच्या देशांत पूर्वींपासून आजपर्यंत बहुतेक असाच प्रकार चालू आहे असें ह्मटलें तरी चालेल. **ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र,** ही वर्णव्यवस्था फार प्राचीनकाळीं, ह्मणजे **ऋग्वेदाचे** कालीं, नव्हती असें दिसतें. होती असें ह्मणण्यास **ऋग्वेदां-**

प्लेबियन्‌च्या (कनिष्ठ किंवा नीच वर्णांतील) जन्मास येतात; व कांहीं महाजनाच्या जन्मास येतात व कांहीं सामान्य जनाच्या जन्मास येतात. जो दासकुलांत किंवा गुलामाच्या जन्मास आला असेल, त्यास स्वातंत्र्य प्राप्त करून घेतां येत नसे. निदान आपल्या धन्याच्या मर्जीखेरीज त्यास स्वतंत्रता प्राप्त होत नसे. आणि ही स्थिति **युरोपांतील** बहुतेक देशांत मध्ययुगाच्या (मिडल् एजेस्) अखेरपर्यंत, कायमच होती. पुढें राजसत्तेच्या अभिवृद्धीमुळें, सामान्य जनांस किंवा कनिष्ठ प्रतीच्या लोकांस श्रेष्ठपद, किंवा सरदाराची स्थिति, प्राप्त होत गेली. बहुत कालपर्यंत सरदारांत किंवा श्रेष्ठ प्रतीच्या लोकांत अशी एक चाल असे कीं, वडिलोपार्जित सर्व मिळकतीचा वारस वडील मुलगाच होत

तील मंत्रांपैकीं **पुरुषसूक्त** म्हणून जो मंत्र आहे, त्याचाच मुख्य आधार दाखवितात. याशिवाय इतर मंत्रांत फारसा आधार सांपडत नाहीं. त्याकाळीं **प्याट्रिशियन** व **प्लेबियन्** याच सारखीं दोन प्रकारचीं माणसें होतीं. **आर्य** व **अनार्य,** अर्थात् उच्च वर्णांतील व नीच वर्णांतील, किंवा श्रेष्ठ जातींतील व कनिष्ठ जातींतील. सुर व असुर या शब्दांसही अशाच प्रकारचा अर्थ पुढें प्राप्त झाला. आर्य लोक एशियाच्या मध्यभागांतून येऊन नवीन प्रांत काबीज करून उत्तरहिंदुस्थानांत ठिकठिकाणीं त्यांनीं वसाहती केल्या. त्यावेळेस जे प्रांत त्यांनीं जिंकिले, त्यांतील लोक त्यांनीं आपले दास करून सोडिले. हा प्रकार, **वुल्लियम् दि कांकरर** हा जसा इंग्लंडामध्यें येऊन त्यानें काबीज केलेल्या प्रांतांमधील लोकांस दास केलें, तशाच सारखा झाला. बहुतेक सर्व हक्क ‘ आर्यांस ’ असून ‘ अनार्य ’ किंवा ‘ काळे ’ म्हणून मानिलेल्या लोकांस फारच थोडे हक्क असत. तात्पर्य, हा प्रकार बहुतेक सुधारलेल्या राष्ट्रांच्या प्राचीन इतिहासांतून आढळतो. तथापि, या संबंधानें आमच्या देशाच्या इतिहासास उद्देशून येथें एक गोष्ट अपवादक अशी सांगण्यासारखी आहे. ती ही कीं, नीच वर्णाच्या मनुष्यासही आपल्या बुद्धिसामर्थ्यानें व स्वपराक्रमानें किंवा भक्तिबलानें उच्च वर्णांत येतां येत असे. **वाल्मीकि** ऋषि हा **वाल्या** या नांवाचा कोळी होता; प्रसिद्ध पुराणकर्त्ता **व्यास** याची ही आई कोळीण होती. **विदुर** हा दासीपुत्र होता; अशीं उदाहरणें पुराणांतून, म्हणजे प्राचीन इतिहासांतून आणखी बरींच आढळतील. अर्वाचीन काळाचा विचार करितां **तुकाराम** बोवा हे जातीचे शूद्रच होते; **नामदेव** शिंपी होता; **रोहिदास** चांभार होता; **कबीर** हा तर यवन होता. अशीं पुष्कळ उदाहरणें देतां येतील.

असे. आपला वडील मुलगा आपला वारस नाहीं, असें ठरविण्याचा व आपल्या मर्जीप्रमाणें आपल्या मिळकतीची व्यवस्था करण्याचा हक्क बापास प्राप्त होण्यास फार कालावधि लागला.

हुन्नर करणारे व धंदे करणारे लोकांत **गिल्ड*** ह्मणून एक प्रकार असे, त्यांत जे जन्म पावतील, किंवा त्यांतील लोक ज्यांस आपल्यांत

---

*आमच्या इकडे पूर्वी वर्णाश्रमधर्म म्हणून जे सांगितले आहेत, त्यांतलाच गिल्ड हा प्रकार होता. असें वाटतें. ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य आणि शूद्र, अशा चार वर्णांत उत्पन्न झालेल्या माणसांनींच तीं तीं कामें करावीं, असा धर्मशास्त्रकर्त्यांनीं, म्हणजे त्या वेळच्या कायदे करणाऱ्यांनीं, निर्बंध करून टाकिला होता. ब्राह्मणांनीं लिहिण्याचें, वेदपठणाचें, किंवा विचाराचें काम करावें, हुन्नर करूं नये; क्षत्रियांनीं शस्त्रधारणाचें काम करावें; वैश्यांनीं उदीम (व्यापार) करावा; व शूद्रांनीं कृषिकर्म करावें. अशा प्रकारची ही व्यवस्था अगदीं ठरलेली होती. ब्राह्मणांनीं वैश्यांचें काम करूं नये, किंवा वैश्यांनीं शूद्राचें काम करूं नये अशी समजूत होती. वेदकालचा इतिहास पहातां, त्या काळीं, लोहार, सुतार, रथकार, सोनार, नावाडी कोळी परीट वगैरे अनेक धंदे करणारे लोक होते, असें दिसतें. तथापि चार वर्णाची ही व्यवस्था पुढल्या काळीं ठरली असावी, असें वाटतें. राज्यक्रांतीस अनुसरून व व्यवहाराच्या सोईकडे लक्ष देऊन लोक अनेक धंदे करूं लागले, कालमान फिरल्यामुळें पहिलें सगळेंच मान फिरलें हें जरी खरें आहे, तथापि अजूनही आमच्या लोकांची अशी समजूत आहे कीं जो मनुष्य ज्या धंद्याच्या लोकांत किंवा कुटुंबांत जन्म पावला असेल त्यानें तोच धंदा केला पाहिजे. दुसरा करितां कामा नये. आमच्याइकडे वहिवाट किंवा लोकरूढि ह्मणजे कायदा अशी स्थिति असल्याकारणानें पूर्वीची वर्णाश्रमधर्माची व्यवस्था किंवा धंद्याची व्यवस्था बऱ्याच अंशानें अजून कायमच आहे, असें ह्मटलें तरी चालेल.

शनिवार ता० ३१ माहे आगष्ट रोजीं सायंकाळीं बडोदें येथील राजवाड्यांत श्रीमंत सरकार महाराज साहेब यांचे समक्ष संकेश्वर मठाचे श्रीमज्जगद्गुरूचे आश्रित वे. शा. सं. रा. रा. एकसंबेकर शास्त्री यांनीं 'वेदान्त' या विषयावर सुश्राव्य भाषण केलें. तें ता० ७ सपटेंबर १९०१ चे 'सयाजीविजय' पत्रांत दिलें आहे. त्यापैकीं कांहीं भाग जातिभेद या विषयासंबंधाचा असून संग्रहणीय वाटल्यावरून खालीं दिला आहे. वेदाध्ययनाच्या अधिकाराविषयीं बोलत असतां शास्त्रीबोवा ह्मणालेः—ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व "शूद्र हे चार वर्ण वेदांत कोठें आढळण्यांत येत नाहींत, असें कांहीं लोकांचें ह्मणणें आहे.—त्यांस–'ब्राह्मणोऽस्य

घेतील त्यां शिवाय त्यांच्या स्थलसीमेंत दुसऱ्या कोणास तो धंदा किंवा हुन्नर करितां येत नसे. कोणताही एखादा महत्वाचा हुन्नर चालविणें झाल्यास, कायदे करणारांनीं किंवा अधिकाऱ्यांनीं ठरविलेल्या पद्धतीनीं किंवा रीतीनींच करावा लागत असे. आपला धंदा चालविण्याच्या कामांत किंवा पद्धतींत सुधारणा केल्याबद्दल, किंवा एखादी नवी युक्ति काढल्याबद्दल, कित्येक कारखानदार कारागृहांत पडले, अशींही पुष्कळ उदाहरणें त्या काळच्या इतिहासांत सांपडतात. अशी ज्या ठिकाणीं स्थिति होती, त्याच **यूरोपखंडांत** अलीकडे, विशेषेंकरून ज्या देशांच्या यांत्रिक सुधारणांनीं फायदा झाला आहे, त्या देशांत वर सांगितलेल्या

मुखमासीत् बाहूराजन्यः कृतः ऊरूतदस्य यद्वैश्यः पद्भ्यां शूद्रोऽभजायत '—इत्यादि श्रुतींत वर्णिलें आहे, असें उत्तर आहे. पण त्यावर पुनः जर कोणी अशी शंका घेईल कीं, वेदांत तीन भाग आहेत. त्यांतील प्रथम भाग, **संहिता**, व पुढचे दोन भाग **ब्राह्मण** व **आरण्यक**. त्यांपैकीं **आरण्यक**, ह्मणजे **उपनिषद्** ग्रंथांपैकीं **छंदोग्य** उपनिषद् यांत **जाबाल** ऋषीची कथा आहे. तींत असें आहे कीं, **जाबाल** हा कोणी एका बाईचा मुलगा होता. तो ब्रह्मवेत्ते ऋषि यांचेकडे आपणांस वेद शिकण्याचा अधिकार मिळावा, ह्मणजे आपलें उपनयन व्हावें, अशी प्रार्थना करण्यास गेला. तेव्हां, ऋषींनीं त्यास उत्तर दिलें कीं, 'तुझें गोत्र कोणतें आहे तें तुझे आईबापांस विचारून ये. ह्मणजे तुझें उपनयन करूं' मुलगा परत गेला. त्यानें आपल्या आईस विचारिलें कीं, 'ऋषी महाराज ह्मणतात कीं तुझें गोत्र सांग. ह्मणजे उपनयन करूं. करितां माझे बापाचे बापाचें नांव काय तें मला सांग!' आई ह्मणाली; 'मी फार दिवस परिचारिणी होत्यें. माझे तारुण्यांत तूं मला झालास. यामुळें तूं अमक्यापासूनच मला झालास असें निश्चयपूर्वक सांगतां येणें मला शक्य नाहीं. माझें नांव जबाला आहे. करितां ऋषींना तूं तेंच सांग' त्याप्रमाणें त्यानें केलें. त्यावरून ऋषी ह्मणाले, 'सत्य हकीकत सांगणारा यास ब्राह्मणच ह्मणावें, करितां तुझें उपनयन करण्यास हरकत नाहीं,' असें ह्मणून त्यांनीं त्यास उपनीत केलें. करितां हल्लीं ज्याप्रमाणें प्रचारांत जाती आहेत तशा त्या वेळीं असत्या तर पाहिजे त्याचें उपनयन करून त्यास वेदाध्ययन सांगतां आलें असतें. यावरून 'ब्राह्मण' ह्मणजे ब्रह्मज्ञानी, 'क्षत्रिय' ह्मणजे आपले बाहुबलानें जो सर्वांचें रक्षण करितो तो, 'वैश्य' ह्मणजे पुष्कळ द्रव्य असून क्रयविक्रय करून व्यवहार करितो तो, व ह्या तिन्ही वर्णांजवळ केवळ परिचर्यारूप नोकरी करून असणारा तो 'शूद्र'

मतांच्या अगदीं विरुद्ध प्रकारचीं मतें आजकाल आढळतात! कलाकौशल्याचें काम कोणी करावें, व तें कोणत्या पद्धतीनें करावें, कोणत्या पद्धति चांगल्या व कोणत्या पद्धति वाईट, वगैरे गोष्टी पूर्वींच ठरवून टाकण्याच्या भानगडींत, आजकाल कायदा व सरकार मुळींच पडत नाहींत. तर, या गोष्टी प्रत्येक व्यक्तीच्या स्वतंत्र विचारावर व आवडीनिवडीवर सोंपवितात. आमच्या या देशांत (इंग्लंडांत) हुन्नरकाम करणाऱ्या लोकांनीं, प्रथम एखाद्या प्रसिद्ध कारागिराजवळ कांहीं दिवस तरी उमेदवारी केलीच पाहिजे, असा जो एक कायदा होता, तोही बऱ्याच दिवसांपूर्वीं रद्द करण्यांत आला. त्याचें कारण एवढेंच

होय. यावरून ब्रह्मवेत्ता हा मुख्य असल्यामुळें त्यास मुखस्थानत्व दिलें. बाहुबलवान हा ब्रह्मवेत्त्यापेक्षां किंचित कमी प्रतीचा समजून त्यास बाहुस्थानत्व दिलें. त्याहीपेक्षां खालच्या प्रतीचा क्रयविक्रय करणारा वैश्य हा असल्यामुळें त्यास ऊरुस्थानत्व दिलें. आणि चवथा जो शूद्र तो सर्वांचे खालीं राहणारा म्हणून त्यांस चरणस्थानत्व दिलें, असें मानणें भाग येईल. अशी शंका घेतल्यास त्यास उत्तरः—असें जरी मानिलें, तरी हल्लीं प्रचारांत असलेला वर्ण-विभाग तो श्रुतीचे कालापासून झाला आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. कारण, स्मृतीचे पूर्वीं ऋषी महाज्ञानी असल्यामुळें त्यांची योग्यता फारच मोठी होती व तशा मोठ्यांचे कुलाचा विचार करूं नये. परंतु पुढें लोक अज्ञानी झाल्यामुळें प्रस्तुत चालत असलेला वर्ण विभाग असणें योग्य दिसल्यानें मन्वादि स्मृतींत तो विभाग आढळून येतो. व 'यन्मनुरवदत तद्भेषजं' अशा वचनावरून त्यास प्रामाण्य तर आहेच. करितां हल्लीं प्रचारांत असलेले जे ब्राम्हण, क्षत्रिय व वैश्य या वर्णांस तर वेदाधिकार निर्विवाद आहे. आतां शूद्रांना मात्र वेदाचा अधिकार नाहीं असें स्मृत्यादि ग्रंथांवरून दिसतें. व सर्व मनुष्य मात्र ब्रम्हज्ञानाचे अधिकारी आहेत असें ऐतरेयादि श्रुतींवरून सूचित होतें. कारण, ऐतरेयोपनिषदांत पुरुषशब्दोपलक्षित जी मनुष्य योनि ती निर्माण केल्यानें आपण कृतार्थ झालों, असें परमेश्वरानें मानिलें आहे, याचें कारण निर्माण कर्त्याचें स्वरूप जाणणारी ती योनि असल्यामुळें त्यास ती निर्माण केल्यानें कृत्यकृत्यता वाटली. हल्लींचे रूढींत असलेल्या नियमाप्रमाणें जरी शूद्रास वेद म्हणण्याचा अधिकार नाकबूल केला तरी वेदाचें तात्पर्य समजून ब्रम्हज्ञान मिळवून कृतकृत्य होण्याचा अधिकार त्या शूद्रासहि आहे हें उघड होत आहे; व त्यामुळेंच शूद्रांतही कांहीं ब्रम्हज्ञानी होऊन गेले."

कीं, कोणतीही कला, किंवा कोणताही धंदा शिकण्याकरितां एखाद्या हुशार कारागिराजवळ राहून, कांहीं दिवस उमेदवारी करणें अवश्यच असेल तर, ही आवश्यकताच त्यास तसें करण्यास भाग पाडील. गुरुमुखाखेरीज व गुरुशिक्षेशिवाय एखाद्या विद्यार्थ्यास एखादी विद्या येण्यासारखी खरोखर नसेल तर, विद्यार्थी आपण होऊनच गुरुजवळ राहील, व त्याच्या घरीं राहून उमेदवारी करील, हें उघड आहे. त्याबद्दल कायदा करण्याची जरूर नाहीं. हें प्रमेय अलीकडील लोकांच्या चांगलें ध्यानांत येऊन गेलें आहे. जुनी समजूत अशी होती कीं, व्यक्तिमात्राच्या आवडीनिवडीवर फारच थोड्या गोष्टी सोंपविण्यासारख्या आहेत. या समजुतीमुळें ज्या गोष्टी लोकांच्या हिताच्या आहेत व ज्या त्यांनीं अमूक रीतीनेंच केल्या पाहिजेत, असें त्यांस वाटे, त्या, आपण त्यांहून ज्ञानानें श्रेष्ठ आहों व शहाणे आहों असें समजून, त्यांच्या हिताकरितां ह्मणून सत्ताधीश ठरवून टाकीत. त्यांस असें वाटे कीं, ज्याचा तो स्वतंत्र असला तर, तो आपल्या कामांत खचित चूक करणार! परंतु ही समजूत अलीकडे बदलून गेली आहे. अलीकडल्या लोकांची अशी पक्की समजूत होऊन गेली आहे कीं, ज्या कामांत व्यक्तिमात्राचें स्वतःचें हिताहित आहे, त्या कामांत जो तो आपापला मुखत्यार असावा, व असें असलें तरच, गोष्टी व्हावयाच्या तशा व्यवस्थित होतात. ही समंजस कल्पना एक हजार वर्षांच्या अनुभवाचें फल होय, हें लक्षांत ठेविलें पाहिजे! ही कल्पना लोकांच्या ध्यानांत येण्यास बराच काल लागला, ही गोष्ट खरी. त्याचप्रमाणें, या कल्पनेविरुद्ध जितक्या ह्मणून दुसऱ्या कल्पना सुचल्या तितक्या सर्वांचा लोकांनीं अनुभव घेऊन पाहिला. त्यांचा परिणाम हितावह झाला नाहीं. तेव्हां, मग ही कल्पना कायम झाली! हल्लीं सुधारलेल्या व ज्ञानसंपन्न राष्ट्रांत निदान कारागिरीच्या कामांत तरी,

वर सांगितलेला सिद्धांत किंवा नियम चांगल्या प्रकारें ठरून गेल्यासारखा आहे. यामुळें, ज्याला जो धंदा करावासा वाटेल त्याला तो करण्यास हल्लीं कोणीही प्रतिबंध करीत नाहीं. काम करण्याच्या ह्मणून जितक्या पद्धति आहेत, तितक्या चांगल्याच असतात; अथवा प्रत्येक कामांत सर्व माणसें सारखींच शहाणीं असतात, असें कोणीही समंजस मनुष्य ह्मणणार नाहीं. तरी, सांप्रत बहुतेक लोकांची अशी पक्की समजूत होऊन गेलेली आहे कीं, या गोष्टी ज्याच्या त्याच्या खुषीवर सोंपविल्या असतां, ह्मणजे, ज्यास जो धंदा आवडेल त्यास तो करूं दिला असतां, काम करण्याच्या उत्तमोत्तम व नव्यानव्या पद्धति निघून, ज्या लोकांस जीं कामें उत्कृष्ट करितां येतील, त्यांच्याच हातांत तीं कामें जातील. उदाहरण, ज्याचे बाहु सशक्त आहेत, अशाच मनुष्यानें घिसाड्याचें काम करावें, दुसऱ्या मनुष्यानें करूं नये, असें कायद्यानें ठरविण्याची जरूर आहे काय? धंदा निवडण्याची मुभा ठेविल्यानें, शरीरानें बळकट व बाहूंनीं सशक्त असे जे लोक नसतात, ते, लोहाराचें काम न पत्करितां, जें काम त्यांस योग्य असेल व जें काम त्यांस चांगलें करितां येईल, तेंच काम पत्करितील हें उघड आहे. याच मताला अनुसरून अलीकडच्या लोकांस असेंही वाटूं लागलें आहे कीं, अमुक लोकांनीं अमुकच कामें करावीं व अमुक कामें करण्यास अमुक लोक अयोग्य आहेत, असें पूर्वींच ठरवून टाकणें, हें, राज्यकर्त्यांच्या अधिकाराची जी योग्य मर्यादा आहे, तिचें उल्लंघन करण्यासारखें आहे. ह्मणजे, हें काम सरकारचें नाहीं. अशा कामांत सरकारानें हात घालणें, ह्मणजे ‘ अव्यापारेषु व्यापारः ’ असा प्रकार होतो! अमुक माणसें अमुक गोष्टी करण्यास अयोग्य आहेत, असें मानण्यास जरी कांहीं योग्य कारणें असलीं, तरी तीं सर्वत्र सारखींच लागू पडतील असें नाहीं. कांहीं गोष्टींमध्यें तीं चांगलीं लागू पडतील. आणि

कांहीं गोष्टींमध्यें मुळींच लागू पडणार नाहींत. यासाठीं, ज्या ठिकाणीं तीं मुळींच लागू पडणार नाहींत, त्या ठिकाणीं निवळ अन्याय केल्यासारखें होईल. आपल्या स्वतःच्या फायद्याकरितां, मनुष्यांनीं आपापल्या बुद्धीचा उपयोग अनियंत्रितपणें करून घेण्यास प्रतिबंध केला असतां, त्यांत, व्यक्तिमात्राचें व एकंदर समाजाचें पुष्कळ नुकसान होणार आहे. ज्या कामास मनुष्यें खरोखर अयोग्य असतील, त्या कामांत त्यांनीं पडूं नये, ही गोष्ट बहुधा आपोआपच होत असते. मनुष्याच्या वर्तनाचे जे सामान्य नियम असतात त्या नियमांनींच, आपला इष्ट हेतु सिद्ध होतो. कारण, असें पहा कीं, ज्या कामास जो मनुष्य अयोग्य आहे, तें काम करण्याचा जरी त्यानें यत्न केला, तथापि त्यांत आपणास यश येत नाहीं असें पाहून, तो आपण होऊनच तें काम सोडून देईल. असें आहे तर, योग्यायोग्यतेचा विचार करण्याची सरकारास मुळींच अपेक्षा रहात नाहीं, हा सर्वसाधारण नियम मोठ्या महत्वाचा असून तो नेहेमीं लक्षांत ठेवण्यासारखा आहे.

१४. अर्थशास्त्राचें आणि व्यवहारशास्त्राचें हें साधारण तत्त्व जर खरें नसेल; आपले इष्टमित्र व आप्त यांची सल्लामसलत घेऊन, आपल्या विचारास योग्य वाटेल तो धंदा पतकरण्याचें काम, कायदा व सरकार यांचेपेक्षां ज्याचें त्यास चांगलें कळत नसेल, तर हें वर सांगितलेलें तत्व जितकें लौकर सोडून देतां येईल तितकें हितावह नव्हे काय? म्हणजे, हरएक कामांत सरकारांनीं नियम करून टाकावयाची व अमुक कामास अमुक मनुष्यें योग्य आहेत, किंवा अयोग्य आहेत, हें ठरविण्याची, जी जुनी पद्धति होती, तिचेंच पुनः अवलंबन करावें, हेंच बरें! परंतु, असें नसून वर निर्दिष्ट केलेलें मत जर खरें असेल, तर तें खरें आहे असें मानूनच आपणास वर्तन केलें पाहिजे. वरिष्ठ प्रतीच्या घराण्यांत जन्मास न येतां एखाद्या गरीबाच्या कुळांत जन्मास येणें, हें केवळ

त्याच्या दुर्दैवावर लादून, त्यानें अमुक अमुकच हलकीं सलकीं कामें करावीं असा ठराव करणें जितकें अन्यायाचें होणार आहे, तितकेंच, कोणताही प्राणी पुरुषजन्माला न येतां मुलीच्या जन्माला आला असतां, त्याच्याविषयीं असा विलक्षण कायदा करणें, अन्यायाचें होणार आहे. त्याचप्रमाणें, अब्रूची किंवा प्रतिष्ठेचीं बहुतेक कामें, तिला फक्त ती मुलगी आहे ह्मणून करण्याची मनाई करणें, हेंही तितकेंच अप्रयोजक व जुलमाचें होणार आहे. हल्लीं पुरुषांच्याकरितां राखून ठेविलेले म्हणून जे हुद्दे किंवा जीं कामें आहेत, तीं करण्याविषयीं स्त्रियांपेक्षां पुरुषच अधिक योग्य आहेत, अशा संबंधाची जी पोकळ बडबड ऐकूं येते, तितकी जरी सर्व कबूल केली तरी, हल्लीं पार्लमेंट सभेचे सभासद होण्याच्या संबंधाचा जो कायदा ठरविला आहे, तो जसा अन्यायाचा व मूर्खपणाचा, तशीच हीही गोष्ट अन्यायाची आहे. या स्थानिक स्वराज्याचे सभासद निवडण्याचा कायदा जर मूर्खपणाचा असला, तर त्याचा कसा परिणाम होतो तो पहा. समजा कीं, सभासद होण्याला सर्वथा योग्य असा एकच मनुष्य बारा वर्षांतून एकदां जरी निवडला गेला नाहीं, तरी देखील, असें होण्यानें जगाचें अत्यंत नुकसान होण्याचा संभव असतो. बरें, अयोग्य किंवा नालायक अशीं हजारों माणसें जरी निवडलीं गेलीं नाहींत तरी, त्यांत विशेष फायदाही नाहीं. कारण, अशी कल्पना करा कीं, निवडणारी किंवा मत देणारी जी मंडळी असते तिची स्वाभाविक रचना किंवा प्रकृतिच अशी कीं, नालायक म्हणून जितकीं माणसें असतील, तितकींच पसंत करावयाचीं ! अशीं माणसें पैशापासरी देखील मिळतील ! पण महत्वाचीं व कठीण कामें करण्यास योग्य अशीं माणसें थोडींच मिळत असतात. मग ज्यांतून निवड व्हावयाची, त्यांची संख्या, किंवा त्यांचें क्षेत्र, कितीही मोठें असलें व निवडणुकीच्या संबंधाच्या अटीही जितक्या

होतील तितक्या कमी ठेविल्या, तरी आपणास पाहिजे तशीं माणसें मिळण्याचा संभव नसतो. तेव्हां निवडणुकीचें क्षेत्रच जर आपण आकुंचित * किंवा मर्यादित केल्या—ह्मणजे, ज्या माणसांतून निवडणूक करावयाची, त्यांच्या संबंधानें अशा अधिकाधिक निरर्थक अटी आपण घातल्या—तर त्याचा परिणाम असा होतो कीं, हुशार व योग्य असें माणूस प्रसंगीं निवडलें जात नाहीं. आणि तें निवडलें गेलें नाहीं म्हणजे, अशा माणसाचे हातून समाजाचें कल्याण होण्याचा जो संभव, जो सुसंधि, त्याला मात्र समाज मुकतो. बरें, इतकें होऊन नालायक किंवा अयोग्य माणसें समाजाचे गळयांत जीं पडावयाचीं तीं शेवटीं पडतातच !

१५. बहुतेक सुधारलेल्या राष्ट्रांमधून जे कायदेकानू आहेत, त्यांवरून पहातां, मनुष्य जन्मास आल्यावर त्यानें अमुक काम करूं नये, किंवा अमुक अमुक हुद्दा करण्याला तो नालायक आहे, अशा तऱ्हेचा

---

* हें प्रमेय आमच्या इकडील एक व्यावहारिक उदाहरण दिलें असतां अधिक स्पष्ट होईल. ब्राह्मणांमध्यें कोंकणस्थ, देशस्थ, कऱ्हाडे, असे जे स्थलपरत्वें भेद झाले आहेत, व बेटीव्यवहार करावयाचा नाहीं, अशी जी चाल पडली आहे, तिच्यामुळें योग्य किंवा मनासारखें स्थळ मिळण्याला केवढी पंचाईत पडते, याचा बहुतकरून सर्वांस अनुभव असेलच. बहुधा असें आढळण्यांत येतें कीं, ज्या मानानें जाती लहान, त्या मानानें अडचणी अधिक येतात व पाहिजे तसें मनासारखें स्थळ मिळत नाहीं. याचें मुख्य कारण निवडणुकीच्या क्षेत्राचा आकुंचितपणा होय. ही असमंजस चाल बंद केली असतां या संबंधाच्या अनेक अडचणी दूर होतील, असें असतांही, आह्मांमध्यें त्याबद्दल विशेष कोणी विचार करीत नाहीं, ही शोचनीय गोष्ट आहे. देशस्थ, कोंकणस्थ व कऱ्हाडे हा जो भेद आहे, तो नाहींसा करणें सर्वथा इष्ट असून, तसें करणें अशास्त्र होत नाहीं. अशाविषयीं श्रीमत् शंकराचार्य यांणीं ही आपला अभिप्राय दिला आहे. हें आमच्या वाचकांस विदित असेलच. असो. तात्पर्य काय कीं, ज्या क्षेत्रांतून कोणतींही माणसें निवडून काढावयाचीं, तें क्षेत्र आपण आपल्या मूर्खपणामुळें कांहीं कृत्रिम अडचणी उत्पन्न करून संकुचित केलें, तर त्यापासून आपलें नेहमीं नुकसानच होणार असें समजावें. प्रस्तुत स्थळीं हेंच तत्व वाचकांच्या मनांवर ठसविण्याचा निबंधकार यांचा हेतु आहे.

कायदा कोणत्याच देशांत नाहीं. या गोष्टीला फक्त दोन अपवाद आहेत. एक **स्त्रियांचा** व दुसरा **राजाचा.** राजपदाच्या संबंधानें अजून अशीच चाल आहे कीं, राजपद प्राप्त होण्यास राजकुळांत जन्म घ्यावा लागतो. राजघराण्याखेरीज कोणत्याही मनुष्याला गादीवर बसण्याचा मुळींच हक्क नाहीं. आणि राजघराण्यांतील जरी एखादें मनुष्य असलें, तरी त्यास वंशपरंपरेच्या व वारसाच्या हक्कानें राजपद प्राप्त होतें, दुसऱ्या कोणत्याही साधनानें होत नाहीं. एक राजपदाखेरीज इतर सर्व प्रतिष्ठेचीं व मानमान्यतेचीं कामें, पुरुषजातीपैकीं प्रत्येक व्यक्तीला करण्याची मुभा असते. यांपैकीं पुष्कळ अधिकार केवळ द्रव्याच्याच योगानें प्राप्त होण्यासारखे असतात, हें खरें. तथापि, द्रव्य संपादन करण्याचा यत्न पाहिजे त्यास करण्याची मुभा असते. आणि त्याप्रमाणें अगदीं गरिबापासून निवळ मेहनतीनें द्रव्य संपादन करूनच श्रीमंत झाल्याचीं पुष्कळ उदाहरणें आढळतात. आतां, अशी स्थिती प्राप्त होण्यास दैवाच्या प्रतिकूलतेमुळें पुष्कळ अनिवार्य अशा अडचणी येतात, ही गोष्ट खरी आहे. तथापि, अमुक प्रतिष्ठेचीं कामें अमुक पुरुषांनीं करूं नये, अशा प्रकारचा कायद्याचा प्रतिबंध, पुरुषजातीपैकीं कोणत्याही व्यक्तीला कोठेंही नाहीं. म्हणजे, कायदा किंवा लोकमत हें, स्वाभाविक अडचणींत कृत्रिम किंवा बुद्ध्या करून ठेविलेल्या अडचणींची भर घालीत नाहीं.*

---

* एखाद्या तरुण मुलीचा पति, तिच्या दुर्दैवानें एखाद्या रोगानें किंवा अपघातानें मृत होणें, ही तिच्या सुखाला स्वाभाविक अडचण झाली. म्हणजे, त्या गोष्टीस माणसांचा इलाज नसून, 'देवाची मर्जी' असें म्हणतात. परंतु, तिला कुरूप करणें, उत्साहाचे वगैरे वेळीं तिला मिरवण्यास प्रतिबंध करणें, तिला उद्देशून मर्मभेदक भाषण करणें, वगैरे लोकमतसंबंधाच्या किंवा कायद्याच्या ह्या कृत्रिम अडचणी, असें समजावें. निबंधकाराचा हेतु एवढाच आहे कीं, दैविक किंवा अमानुष गोष्टींमध्यें मनुष्यकृत गोष्टींची भर पडून मनुष्यप्राण्यांच्या सुखाचा व्याघात होतो. तो टाळवेल तितका टाळावा.

मीं वर सांगितलें आहे कीं, सदरील नियमास राज्याधिकार हा एक अपवाद आहे. पण हा अपवाद आहे, ही गोष्ट प्रत्येकजण बोलून चालून कबूल करितो. या आधुनिक जगामध्यें ज्या रीतीभाती, किंवा जे व्यवहार चालू आहेत, जीं तत्वें सर्वमान्य आहेत, त्यांहून भिन्न अथवा त्यांस विरोधी अशी राज्याधिकाराची एकच गोष्ट आहे. परंतु ही व्यवस्था कांहीं विशेष कारणांकरितां सर्वांनीं जाणूनबुजून पसंत केल्यासारखी आहे. त्या व्यवस्थेच्या आवश्यकतेविषयीं भिन्नभिन्न व्यक्तींचा व भिन्नभिन्न राष्ट्रांचा अभिप्राय निरनिराळा पडतो हें खरें. तथापि, राज्यतंत्रें चालविण्याचा जो थोर अधिकार, तो, कांहीं विशेष कारणांकरितां, समाजानें पाहिजे त्या माणसास मिळण्यासारखा ठेवला नसून, जन्मतः जो राजकुलांत उत्पन्न झाला असेल, त्यालाच देतात. ही गोष्ट साधारण नियमास उघड उघड अपवादक आहे, अशी त्यांची पक्की समजूत असते. आणि, असें आहे तरी, आलीकडील सर्व स्वतंत्र राष्ट्रें अनेक युक्तिप्रयुक्ति करून हा अपवाद नाममात्रावशिष्ट करून ठेवितात. ह्मणजे, राजाच्या अधिकाराचें अनेक अटींनीं असें चमत्कारिक बंधन करून टाकतात कीं, तेणेंकरून राजाकडे तो अधिकार फक्त नांवाला असून त्याच्या हातांत खरोखर कांहींच सत्ता रहात नाहीं. तो अधिकार खरोखर कारभाऱ्याकडे असतो. त्याच्याच हातांत खरी सत्ता असते.* यामुळें, कारभाऱ्याचा किंवा प्रधानाचा

* प्रस्तुत संबंधानें प्रत्यक्ष इंग्लंडचेंच उदाहरण मनांत ठसण्यासारखें आहे. इंग्लंडचीं राज्यतंत्रें नांवाला इंग्लंडची राणी व्हिक्टोरिया हिच्या हातांत होतीं, किंवा तिचा मुलगा एडवर्ड याचे हातांत आहेत. परंतु, वास्तविक राज्याचा सर्व कारभार प्रजेचे प्रतिनिधि, ज्यांस 'हौस् ऑफ् कामन्स्' असें ह्मणतात, त्यांचेच हातांत होता व आहे. त्या प्रतिनिधींचा अग्रणी असा एक पुरुष असतो. उदाहरण, पामर्स्टन्, डिस्रायली, ग्ल्याड्स्टन्, साल्सबरी, इत्यादि. आतां, यद्यपि इंग्लंडचा राजा होण्याचा अधिकार प्रजेपैकीं पाहिजे त्या मनुष्यास नसला, तथापि प्रजेच्या संबंधानें पाहिलें असतां, या गोष्टीचें महत्व फारसें नाहीं. कारण

हुद्दा पुरुषजातीच्या व पूर्ण वयांत आलेल्या एकंदर प्रजेपैकीं पाहिजे त्यास मिळण्यासारखा असतो. निदान कायद्याचा तरी मुळींच प्रतिबंध नसतो. तेव्हां, मोठे अधिकार मिळविण्याविषयीं जन्मापासूनच नालायक ठरविलेलीं अशीं माणसें ह्मटलीं ह्मणजे, एक फक्त स्त्रिया मात्र रहातात. अशा प्रकारचें हें उदाहरण, आलीकडल्या मन्वंतरास अगदींच विसंगत दिसतें. या उदाहरणाखेरीज दुसरें चमत्कारिक उदाहरण कोठेंही दृष्टीस पडत नाहीं. कारण, असें पहा कीं, एकंदर मानव जातीपैकीं निम्या माणसांस या अन्यायाचे परिणाम भोगण्यास लावणें, व समाजाचीं मोठमोठीं कामें करण्याचा अधिकार चालविण्याविषयीं जन्मादारभ्यच त्यांस अपात्र ठरवून टाकणें, ही किती वाईट व दुःखाची गोष्ट आहे बरें? त्यानें कितीही मेहनत केली, अथवा संपत्ति मिळविली, कितीही विद्या संपादित केली, व तो कसाही

खरोखर बहुतेक सत्ता कारभाऱ्याचेच हातांत असते. हा कारभार पुरुषप्रजेपैकीं अगदीं गरीब स्थितींतल्या मनुष्यासही आपल्या शहाणपणानें प्राप्त करून घेतां येतो. राजाचे ठिकाणीं कारभारी नेमण्याचा प्रकार आज बरेच दिवस फ्रान्स व अमेरिका यांजमध्यें चालू आहे. या दोन देशांत राजा म्हणून कोणी नसून, ज्याला प्रेसिडेंट (कारभारी) असें म्हणतात, तोच बहुधा राजासारखा असतो. अमेरिकेंत जॉर्ज वॉशिंग्टनापासून आजपर्यंत वेळोवेळीं राज्यकारभार वाहणारे जे जे प्रेसिडेंट किंवा राज्यधुरंधर होऊन गेले, ते बहुतेक अगदीं गरीब स्थितींतलेच होते, व ते केवळ आपल्याच बुद्धिसामर्थ्यानें वाढले होते. पृथ्वीच्या पाठीवर ज्ञानसंपन्न व सुधारलेलीं अशीं जीं राष्ट्रें आजकाल आहेत, त्यांच्यामध्यें एक मुख्य सर्वसाधारण तत्व सर्वसामान्य होऊन राहिलें आहे. तें हें कीं, पुरुषजातीपैकीं कोणीही असो, केवळ जातीवरून किंवा कुळावरून, देशांतील मोठमोठे अधिकार चालविण्याविषयीं कोणताही पुरुष नालायक किंवा अपात्र असें मानित नाहींत. तेव्हां मि० मिल्ल साहेबांचें ह्मणणें इतकेंच कीं, या योग्य व हितकर अशा नियमास स्त्रियांची अपात्रता अपवादक आहे, हें चांगलें नाहीं, योग्य नाहीं व न्याय्यही नाहीं. त्यांच्या म्हणण्याचें तात्पर्य एवढेंच कीं, लिंगभेद मनांत न आणितां 'गुणाः पूजास्थानं गुणिषु न च लिङ्गं न च वयः' याच न्यायाचें अवलंबन सर्वांनीं करावें व हीच गोष्ट सर्वांस अत्यन्त श्रेयस्कर आहे.

बुद्धिसामर्थ्याचा असला तरी, दुर्दैवानें त्यास स्त्रीजन्म प्राप्त झाल्यामुळें त्या मनुष्यप्राण्याचा कांहींच इलाज चालूं नये, असा निर्बंध समाजानें करून ठेवणें, केवढें भयंकर व अन्यायाचें आहे! थोड्या दिवसांपूर्वी धर्मसंबंधानें चिकटणारी अपात्रता पुष्कळांच्या आड येई व अजूनही बऱ्याच ठिकाणीं येते, असें आढळतें. पण तीही बहुतेक सुधारलेल्या देशांत नाहींशी करण्याचें साधन असतें. तें हें कीं, धर्मांतर करणें. ज्या ठिकाणीं मोठा अधिकार मिळण्यास त्या मनुष्याचा धर्म त्याच्या आड येत असेल, तेथें त्या मनुष्यानें धर्मांतर केलें ह्मणजे, त्यास तो अधिकार मिळण्यास प्रत्यवाय रहात नाहीं. इंग्लंडांत व यूरोपांत मात्र धर्मसंबंधामुळें येणारी अपात्रता ही बहुतेक नष्ट झाल्यासारखीच आहे.

१६. तेव्हां, आलीकडील लोकव्यवस्थेमध्यें स्त्रियांची परवशता, किंवा स्त्रीजातीचें व्यावहारिक पारतंत्र्य, केवळ अपवादासारखें होऊन राहिलें आहे. सर्वसाधारण जें कांहीं तत्व, किंवा जो कांहींएक सामान्य नियम, त्या नियमाचें धडधडीत उल्लंघन होत असल्याचेंही हें एकच उदाहरण आहे. जुने आचारविचार इतर सर्व बाबतींत लयास गेले असतां, त्यांतलें अवशिष्ट हें एवढेंच शुक्लकाष्ठासारखें मागें राहिलें आहे. दिवसेंदिवस सुधारणेचें पाऊल पुढें आहे, असा आपण जो मोठा डौल मिरवितों, त्याचा क्षणभर विचार केला, व स्त्रियांची परवशता जी दृष्टीस पडते तिचाही विचार केला तर, या दोन गोष्टींची विसंगतता पाहून, जो कोणी खऱ्या कळवळ्याचा असेल, ज्याला मनुष्याच्या स्वभावाची प्रवृत्ति खरोखर कळत असेल, त्याला फारच नवल वाटेल. या विसंगततेपासून अनुकूल असें प्रथमदर्शनीं एकच अनुमान निघतें. आणि तें अनुमान चालू असलेला जो प्रचार, किंवा जी रूढि, तिला खचीत घातक आहे. यामुळें, राजसत्तात्मक व प्रजासत्तात्मक या दोन प्रकारच्या राज्यपद्धतींपैकीं चांगली कोणती, असा

प्रश्न निघाला असतां, त्या प्रसंगीं जो परिणाम होत असतो, तसाच परिणाम प्रस्तुतसंबंधानेंही झाला पाहिजे.

१७. निदान येवढी तरी गोष्ट लोकांनीं कबूल केली पाहिजे. ती ही कीं, चालू असलेला व्यवहार व लोकांचें ठरीव मत, येणेंकरून आपल्या मनास कलुषित न करितां, या गोष्टीचा निर्णय गुणदोषविवेचनपूर्वक वादविवाद करून व न्यायाला आणि नीतीला अनुसरून करावा. मानवजातीच्या इतर सामाजिक व्यवस्थांमध्यें जसा विचार होतो, ह्मणजे, एकंदर मानवजातीला अत्यंत हितावह असे प्रचार किंवा अशा रूढि कोणत्या, या गोष्टींवर जसा तो निर्णय अवलंबून असतो, त्याचप्रमाणें प्रस्तुत संबंधानेंही, लिंगभेद मनांत न आणितां एकंदर मानवजातीच्या हिताहिताचा विचार केला पाहिजे. वाद करणें तो खरेपणानें केला पाहिजे. तो करीत असतांना या विषयाच्या मूळ पायाजवळ गेलें पाहिजे. केवळ कांहीं तरी डळमळीत व पोकळ गोष्टी सांगून तो होतां कामाचा नाहीं. उदाहरण, उगीच आपला सर्वसाधारण एक सिद्धांत ठोकून दिला कीं, प्रस्तुत चालू असलेल्या प्रचाराच्या तर्फेनें मानवजातीचा अनुभवच साक्ष देत आहे. ह्मणजे, स्त्रीजातीची परतंत्रता लोकांनीं अनुभवपूर्वक व विचारपूर्वक ठरविलेली आहे. हें पोकळ ह्मणणें मुळींच उपयोगाचें नाहीं. लोकांनीं जोंपर्यंत एकाच मार्गाचा अनुभव घेतला आहे, तोंपर्यंत दोन मार्गांपैकीं कोणता मार्ग चांगला, या गोष्टीचा निर्णय लोकांनीं अनुभव घेऊन ठरविला, असें ह्मणतांच येणार नाहीं. स्त्रीपुरुषांची समानता प्रतिपादन करणारें मत, केवळ कल्पनेच्याच आधारावर आहे, असें जर कोणी ह्मणेल तर त्यानें, विरुद्ध मताचा पायाही केवळ कल्पनेवरच रचला आहे, ही गोष्टही लक्षांत ठेविली पाहिजे. प्रत्यक्ष अनुभवानें येवढीमात्र एक गोष्ट सिद्ध झाली आहे कीं, स्त्रियांस पारतंत्र्यांत ठेवून माणसें अजून

जगलीं आहेत! फारफार तर आणखी असेंही ह्मणतां येईल कीं, हल्लीं आपणांस दृष्टिगोचर होत असलेल्या उत्कर्षाच्या स्थितीप्रत तीं पोंचलीं आहेत! परंतु हा उत्कर्ष किंवा ही सुधारणा, स्त्रिया स्वातंत्र्यांत असत्या तर झाली नसती, व पारतंत्र्यांत आहेत ह्मणूनच झाली आहे, अशा प्रकारचा अनुभव लोकांनीं घेतला आहे काय? नाहीं. अनुभव आहे तो उलट असा आहे कीं, सुधारणेचें पाऊल जसजसें पुढें सरकत जातें, तसतशी स्त्रियांची सामाजिक स्थितिही सुधरत जाते. आणि, यावरूनच इतिहासकार व तत्ववेत्ते यांनीं निर्विवाद असा सिद्धांत ठरवून टाकला आहे कीं, कोणत्याही देशाची उन्नति किंवा अवनति, त्या देशांतील स्त्रियांच्या उन्नत किंवा निकृष्ट स्थितीवर अवलंबून असते. मानवी प्राण्यांचा पहिल्यापासूनच इतिहास पाहिला, तर दिवसानुदिवस स्त्रियांची स्थिति सुधारतां सुधारतां ती पुरुषांच्या बरोबरीला येऊं पहात आहे. येवढ्यावरून त्या, पुरुषांची बरोबरी करतीलच, असें जरी आजला ह्मणतां आलें नाहीं, तरी बरोबरी करण्याकडे त्यांचा रोंख आहे, एवढें अनुमान खास निघतें.

१८. आतां कोणी असें ह्मणतील कीं, प्रस्तुत पुरुष व स्त्रिया जे धंदे किंवा उद्योग करीत आहेत, ते त्यांस योग्य आहेत, व प्रस्तुतची जी त्यांची स्थिति आहे, ती त्यांच्या स्वभावापासूनच उत्पन्न झालेली आहे. परंतु हें ह्मणणें निरर्थक आहे. मनुष्याच्या बुद्धीचा विचार केला, व साधारण तारतम्यभाव लक्षांत ठेविला, तर स्त्रीपुरुषांचा प्रस्तुत जो परस्परसंबंध आहे तो जोंपर्यंत कायम राहील तोंपर्यंत स्त्रीपुरुषांच्या स्वभावाचें यथार्थ ज्ञान होण्याचा मुळींच संभव नाहीं. अशी कल्पना करा कीं, ज्या समाजांत स्त्रिया नाहींत, पुरुषमात्र आहेत; किंवा स्त्रिया आहेत, पुरुष नाहींत; अथवा, ज्यांत स्त्रीपुरुष दोघेही आहेत, परंतु स्त्रिया पुरुषांच्या अधीन नाहींत. अशा प्रकारचे जर निरनिराळे

समाज आपले पहाण्यांत आले, तर मात्र प्रत्येकाच्या स्वभावांत मानसिक किंवा नीतीविषयक भेद असल्याची खातरीलायक माहिती मिळेल. हल्लीं ज्यास 'बायकांचा स्वभाव' म्हणून म्हणतात, तो केवळ कृत्रिम परिणाम होय. म्हणजे, कांहीं बाबतींत त्यांची यदृच्छेची प्रवृत्ति बलात्कारानें प्रतिबंधांत ठेविलेली, व कांहीं गोष्टींत ती वाजवीपेक्षां फाजील रीतीनें उत्तेजित केलेली, अशासारखा प्रकार झाला आहे. स्त्रियांच्या शिवाय इतर प्रकारचीं कोणतींही ताबेदार किंवा परवश मनुष्यें घ्या. त्या ताबेदारांचा आपल्या धन्यांशीं जो संबंध असतो, त्या संबंधाच्या योगानें, त्यांचा मूलस्वभाव सर्वांशीं बदलून जाऊन त्याला अगदीं भिन्न प्रकारचें स्वरूप प्राप्त झालें आहे, असें आढळणार नाहीं. परवश झालेलीं आणि दास बनून राहिलेलीं अशीं जीं माणसें इतिहासांत वर्णिलेलीं आढळतात, त्यांजवर स्त्रियांपेक्षांही अधिक जुलूम होत असे, असें मानिलें तरी, त्यांच्या मूलस्वभावापैकीं जितक्या भागावर जुलुमाचा किंवा बलात्काराचा परिणाम झाला नाहीं, तेवढाच भाग पुढें यदृच्छेनें वृद्धिंगत होत जाऊन, पदार्थ वृद्धिंगत होण्याचे जे नियम आहेत, त्या नियमांस अनुसरून, तोही परिपक्व दशेप्रत पावला, असें आढळेल. परंतु, स्त्रियांच्या बाबतींत पाहतां असें दिसतें कीं, त्यांचे धनी, ह्मणजे पुरुष, त्यांच्या सुखाकरितां व हिताकरितां, त्यांच्या (स्त्रियांच्या) मूलस्वभावास जाणून बुजून भिन्न प्रकारचें वळण दिलेलें आढळतें. जसा एखाद्या झाडाचा कांहीं भाग जोरानें वाढावा, किंवा एकाच बाजूनें त्यांच्या फांद्यांचा मोठा विस्तार व्हावा ह्मणून, मुद्दाम कांहींतरी युक्ति करावी, ह्मणजे तेवढ्या अंगालाच अधिक उष्णता द्यावी व अधिक पाणी घालावें; त्याचप्रमाणें, त्या झाडांच्या कांहीं फांद्या अगदीं थंडगार हवेंत सोडून देऊन, त्यांच्या मुळावर मुद्दाम चोहोंकडून बर्फ रचून ठेवावें, आणि त्यांच्या फांद्या अगदीं जाळून भाजून नाहींतशा कराव्या,

अशा व्यवस्थेनें त्या झाडाची जी स्थिति होईल, तशीच स्थिती पुरुषांनीं स्त्रियांची केली आहे. असें उघड नजरेस येतें. पुरुष आपल्या कृत्यांचा परिणाम आपणच विसरतात व वेडगळपणानें आपली अशी गोड समजूत करून घेतात कीं, स्त्रीरूप वृक्ष यदृच्छेनें वाढावा तसाच वाढत आहे; येवढेंच नव्हे, तर, त्याचा अर्धा भाग जर बर्फानें आच्छादून टाकिला नाहीं व अर्धा भाग जर कढत वाफेनें भरलेल्या हौदांत बुडवून ठेविला नाहीं, तर तें झाड तावडतोब मरेल ! या शहाणपणास ह्मणावें तरी काय?

१९. हा संसार व एकंदर सामाजिक व्यवस्था यांत खरी सुधारणा व्हावी असें असेल तर, व तद्विषयक खरीं मतें व खरे विचार यांची उन्नति व्हावी, व त्यांचा प्रसार व्हावा, हें इष्ट असेल तर, या कामांत ज्या अनेक अडचणी आहेत, त्यां पैकीं एक मोठी जबरदस्त आहे, ती दूर झाली पाहिजे. ती अडचण, मनुष्याच्या वर्तनावर जे अनेक परिणाम घडतात, व मनुष्याच्या स्वभावघटनेचीं जीं अनेक कारणें असतात, किंवा ज्या अनेक बाह्य उपाधि त्या घटनेस कारणीभूत होतात, त्यांविषयीं मनुष्यांचें अनिर्वाच्य अज्ञान असणें व त्याजकडे दुर्लक्ष करणें ही होय. कोणत्याही माणसांची एका विवक्षितकाळीं जी स्थिति असेल, तीच स्थिति स्वाभाविक व नित्याची आहे, अशी लोकांची समजूत असते. परंतु ही मोठी चूक आहे. त्यांच्या परिस्थितीचें साधारण जरी ज्ञान आपणास झालें, तरी देखील ती स्थिति त्या माणसांस कां प्राप्त झाली, याचें कारण आपणास स्पष्ट कळतें. कर्जाच्या बोजानें शेतकरी हताश, अनुत्साह व निरुद्योगी झाले, असें पाहून 'ऐर्लंडांतील शेतकरी स्वभावतःच आळशी आहेत,' असें बेधडक लोक अनुमान करितात ! जेव्हां अधिकारारूढ झालेली मंडळी आपलीं हत्यारें लोकांवरच उचलितात, व ज्या प्रजेनें त्यांस अधिकार दिला, त्या

प्रजेसच पीडा देऊं लागतात; तेव्हां सहजच राज्याचा बिघाड होतो. एवढ्यावरून **फ्रेंच** लोक स्वतंत्र व प्रजासत्ताक अशा राज्यास अयोग्य आहेत, असें ह्मणणारे हरीचे लाल आहेतच! **ग्रीक** लोकांनीं **तुर्क** लोकांस फसविलें, आणि **तुर्क** लोकांनीं **ग्रीक** लोकांस नुस्तें लुटलें, येवढ्यावरून **तुर्क** लोक स्वभावतःच सत्यप्रिय आहेत, असें अनुमान कांहीं लोक तेव्हांच करितात! त्याचप्रमाणें, स्त्रिया राज्यकारभारांत मुळींच मन घालीत नाहींत, व नट्टापट्टा करण्यांत, किंवा आपलीं शरीरें शृंगारण्यांतच अधिक मन घालितात, येवढ्याच गोष्टीवरून पुरुषांच्या पेक्षां स्त्रियांचें लक्ष सार्वजनिक व लोककल्याणाच्या कामांत कमी असतें, व अशा कामांस स्त्रिया जात्याच अयोग्य आहेत, असा साहसाचा सिद्धांत ठोकून देण्यास तेच तर्कशास्त्री बिलकूल मागेंपुढें पहात नाहींत! पूर्वींपेक्षां हल्लीं लोकांस इतिहासाचें ज्ञान अधिक झालें आहे. तेव्हां इतिहासाचा अनुभव पहातां तो कांहीं निराळाच आहे. बाह्य कारणांचा परिणाम मनुष्याच्या स्वभावावर कांहीं विलक्षण होत असतो. आणि, त्या स्वभावाचे प्रकार सर्वत्र एकसारखेच व एकाच स्वभावाचे असतात, अशी जी समजूत आहे, तशी गोष्ट नसून त्या मनुष्यस्वभावास फारच विचित्र व भिन्न भिन्न स्वरूपें प्राप्त होतात, ही गोष्ट मनुष्यें सर्वथा विसरतात. इतिहासवाचनापासून लोकांस जो खरोखर उपदेश व्हावा तो हाच. परंतु, हा उपदेश माणसांच्या मनावर ठसणें कठिण आहे, असें दिसतें. कारण, ज्याप्रमाणें प्रवासांत माणसांच्या मनावर ज्या गोष्टींचे ठसे पूर्वीं उमटले असतील, त्याच गोष्टी त्यांस दिसतात, त्याचप्रमाणें इतिहासाध्ययनाचीही गोष्ट आहे. ह्मणजे, इतिहास वाचणाऱ्यांच्या मनावरही पूर्वीं एकदां जे ठसे वठलेले असतात, तेच कायम रहातात. यामुळें, इतिहासाच्या वाचनापासून जो मुख्य फायदा व्हावयाचा तो मुळींच होत नाहीं.

२०. यास्तव, स्त्रीपुरुषांमध्यें स्वाभाविक भेद कोणते आहेत, हा जो अत्यंत कठिण प्रश्न व ज्या संबंधाची पूर्ण व यथार्थ माहिती मिळणें लोकांच्या प्रस्तुत स्थितींत सर्वथा अशक्य होय, अशा या महत्वाच्या विषयावर प्रत्येकजण हवें तसें मत ठोकून देतो. यामुळें असें होतें कीं, या विषयाचें वास्तविक अंतशः होणारें जें ज्ञान, त्या ज्ञानाच्या साधनाकडे बहुतेक सर्वजण दुर्लक्ष करितात, व तें तुच्छ मानितात. हें साधन कोणतें ह्मणाल तर, मानसशास्त्राच्या एका अत्यंत महत्वाच्या शाखेचा दृढ अभ्यास करणें. या शाखेमध्यें मुख्यत्वें याच विषयाचें प्रतिपादन केलेलें असतें. त्यांतील विषय, किंवा त्यांत ज्या प्रश्नाचा विचार केलेला असतो, तो हा कीं, मनुष्य ज्या परिस्थितींत असतो, त्या परिस्थितीचा परिणाम त्या मनुष्याच्या एकंदर वागणुकीवर, किंवा वर्तनक्रमावर कसा घडतो ? कारण, स्त्रीपुरुषांमधील नीतिसंबंधाचे व बुद्धिसंबंधाचे भेद कितीही मोठे व अपरिहार्य दिसले, तरी ते भेद स्वाभाविक आहेत, अशी कल्पना करण्यास प्रमाण ह्मणून कायतें अभावेंकरूनच मिळावयाचें. ह्मणजे, हे भेद शोधून काढण्यास अन्वयव्यतिरेकन्यायाचाच उपयोग केला पाहिजे. जे भेद कृत्रिम असूं शकणारच नाहींत, तेवढे भेद स्वाभाविक आहेत, असें अनुमान करणें योग्य होईल. पूर्वी मिळालेलें शिक्षण, किंवा बाह्यस्थिति, यांच्या योगानें उत्पन्न होण्यासारखा जो जो गुण दोहोंपैकीं प्रत्येकाच्या अंगीं आलेला असेल, तो तो सोडून दिला पाहिजे. आणि शेवटीं अवशिष्ट ह्मणून जेवढे गुण रहातील, तेवढेच स्वभावसिद्ध, किंवा सृष्टिदत्त आहेत, असें मानितां येईल. मनुष्याचा वर्तनक्रम ज्या ज्या नियमांवर अवलंबून असतो, त्या त्या नियमांचें संपूर्ण ज्ञान प्राप्त करून घेतल्याशिवाय, स्त्रीपुरुषांमध्यें मुळीं कांहीं भेद आहे किंवा नाहीं, हें सांगण्याचा अधिकारच कोणास पोंचत नाहीं. मग ‘ तो भेद अमुकच आहे ’ असें ह्मणण्याचा अधिकार

तर दूरच राहिला ! आणि ज्या अर्थी या विषयाचें ज्ञान अद्यापि एकासही नाहीं, (कारण, हा विषय इतका महत्वाचा असून, त्याचा अभ्यास कोणीच करीत नाहीं) त्या अर्थी या विषयावर खात्रीपूर्वक अभिप्राय देण्यास कोणासही अधिकार नाहीं. हल्लीं केवळ तर्कमात्र हवेतसे चालवितात. हे तर्क, मानसिकशास्त्राचे नियम कमीजास्त प्रमाणानें जसे ज्यास कळत असतील, त्या मानानें खरे किंवा खोटे ठरण्याचा संभव असतो.

२१. प्रस्तुत कालीं स्त्रीपुरुषांमधील भेद काय आहेत, या गोष्टीची माहिती देखील फारच वेडीवांकडी व अपुरती आहे. मग ते भेद कशाचे योगानें उत्पन्न झाले आहेत, या विषयींची माहिती तर दूरच राहिली. वैद्यकाचा धंदा करणाऱ्या लोकांनीं व शरीरशास्त्रवेत्त्यांनीं स्त्रीपुरुषांमधील शरीरसंबंधाचे भेद अंशतः शोधून काढिले आहेत. शरीरविज्ञान मानसशास्त्रवेत्त्यांस फारच महत्वाचें आहे. परंतु, आमच्या दुर्दैवानें वैद्यकाचा धंदा करणारांपैकीं मानसशास्त्र जाणणारा असा फारच क्वचित् आढळतो. यामुळें, स्त्रियांच्या मनोधर्माचें ज्ञान साधारण मनुष्यास जें असतें, त्यापेक्षां त्यांस कांहीं विशेष असतें, असें नाहीं. हा विषय असा आहे कीं, त्या संबंधाचें निश्चयात्मक ज्ञान होणें बहुतेक अशक्यच आहे. कारण, त्या विषयाचें वास्तवीक ज्ञान ज्यांस असावयाचें, अशा ज्या स्त्रिया त्यांनीं आपण होऊन जगापुढें कांहींच गोष्टी आणिल्या नाहींत. आणि जो थोडासा मजकूर त्यांच्या मुखानें कोठें कोठें सांगण्यांत येतो, तो बहुतेक शिकविलेल्या साक्षीदाराच्या मजकुरासारखा असतो ! यामुळें तो विश्वसनीय नाहीं. कारण, मूर्खपणा हा बहुतेक सर्वत्र सारखाच असतो. मूर्ख मनुष्याच्या कल्पना अथवा त्याचे विचार, नेहमीं त्याच्या सभोंवती असणारी जी मंडळी असते, तिचे जसे विचार असतील त्याप्रमाणें बहुधा असतात. परंतु, ज्यांचे

विचार व ज्यांचीं मतें, हीं स्वतः सिद्ध व स्वयंभू अशीं असतात, त्यांची गोष्ट कांहीं निराळीच आहे. आपल्या कुटुंबांतील स्त्रियांच्या स्वभावाचें किंवा मनोधर्माचें ज्ञान ज्यास आहे, असा क्वचित् एखाददुसरा पुरुष आढळेल. स्त्रियांच्या बुद्धीची धांव, किंवा त्यांची कर्तृत्वशक्ति, हिला उद्देशून माझें हें ह्मणणें आहे, असें नाहीं. कारण, प्रत्यक्ष स्त्रियांसही प्रसंगाशिवाय आपली कर्तृत्त्वशक्ति किती आहे, हें कळत नाहीं. मग पुरुषांस ती कोठून कळेल? माझें ह्मणणें इतकेंच कीं,—स्त्रियांच्या मनांत जे खरोखर विचार येतात, किंवा त्यांस जें कांहीं वाटत असतें, याची माहिती ज्यांस आहे, असे पुरुष दुर्मिळ. ब-याच स्त्रियांशीं आपला शरीरसंबंध झाला आहे, एवढ्याच गोष्टीवरून पुष्कळ पुरुषांस असें वाटतें कीं, आपणास स्त्रियांची पूर्ण माहिती आहे. अशा पुरुषांपैकीं जर कदाचित् एखादा सूक्ष्मदर्शी असला, व त्याच्या अनुभवास आलेल्या स्त्रियांपैकीं कांहीं बुद्धिमान्, सुशील अशा असल्या, तर, त्यांच्या स्वभावाचा कांहींएक अल्पस्वल्प भाग कदाचित् त्यास कळेल. परंतु, बाकीचा सर्व भाग त्यास कळण्याचा संभवच नसतो. कारण, अशा स्त्रियांचा ज्या पुरुषाशीं शरीरसंबंध होतो, त्यांजपासून त्या आपल्या अंतःस्वरूपाचा किंवा आपल्या स्वभावाचा बराच भाग छपवून ठेवितात. एक प्रत्यक्ष नवऱ्यास मात्र आपल्या स्त्रीचा स्वभाव कळण्याचा संभव असतो. कारण, त्यास स्वस्त्रीच्या स्वभावाचें ज्ञान प्राप्त करून घेण्यास प्रसंग पुष्कळ असतात. परस्परांविषयीं खरें प्रेम असल्यास परस्परांचे स्वभाव किंवा परस्परांचीं अंतरंगें परस्परांस ओळखतां येण्याला बरेंच साधन असतें. आणि, खरोखर प्रस्तुत विषयाच्या संबंधानें जी कांहीं उपयुक्त माहिती जगापुढें आली आहे, तिचा मुख्य उगम पहातां असाच आहे. परंतु, बहुतेक पुरुषांस अशा प्रकारची माहिती मिळविण्याचें साधन कायतें एवढेंच असतें. ह्मणजे, ज्याच्या त्याच्यापुढें आपल्या बायको-

चेंच कायतें एक उदाहरण असतें. यामुळें, एखाद्या बायकोचा स्वभाव कसा आहे, याचें अनुमान करणें असेल तर, एकंदर स्त्रियांविषयीं त्या मनुष्याचे जे विचार, किंवा जीं मतें असतील, त्यांवरून तें सहज होण्यासारखें असतें ! शिवाय, हें एकच जें उदाहरण त्याजपुढें असतें, त्या संबंधानेंही प्रतिकूळ अशा पुष्कळ गोष्टी असतात. एकतर, कदाचित् त्या पुरुषाची स्त्री मोठी शहाणी किंवा धूर्त अशी नसेल. दुसरी अडचण अशी असते कीं, तो पुरुष नुसता मोठा तर्कज्ञ, किंवा नुसता सत्यप्रिय असून उपयोगी नाहीं. तर, जिच्या स्वभावाची माहिती त्यास मिळवावयाची असेल, तिचीं सुखदुःखें त्यास कळत असून, तिच्यावर त्याचें खरें प्रेम असलें पाहिजे, कीं– जेणेंकरून तो नुसता तिचे मनांत काय चाललें आहे हें ताडील. आणि सर्वांत अत्यंत महत्वाची एक गोष्ट आहे ती ही कीं, त्याच्यांत– जेणेंकरून त्याची स्त्री आपलीं मतें किंवा आपले विचार त्याजपासून चोरून ठेवील–असा एखादा दोष नसला पाहिजे. तेव्हां, अशा प्रकारच्या स्त्रीपुरुषांचा संयोग, ह्मणजे कपिलाषष्ठीचाच योग ह्मणावयाचा कीं नाहीं ?* संसारांतील किंवा व्यवहारांतील ज्या एकंदर गोष्टींची व्यवस्था व्हावयाची, ती पुष्कळ ठिकाणीं दोघांच्या पूर्ण ऐक्यानें, ह्मणजे, एकमेकांच्या संमतीनें व दोघांचें हिताहित पाहून होत असते. परंतु, दोघांच्या अंतर्यामाच्या गोष्टी, किंवा त्यांचे अंतरंगविचार, यांविषयीं ह्मणाल तर, एकाचा प्रवेश दुसऱ्याच्या हृदयांत होत नसतो, असें आढळतें. इतकेंच नाहीं, तर, या संबंधानें इतर लोकांच्या तोंडओळखीसारखीच या दोघांचीही तोंडओळख असते ! ज्या स्त्रीपुरु-

---

* प्रस्तुतस्थळीं **उत्तररामचरितांत रामचंद्रानें जानकीचे** प्रेमाबद्दल 'अद्वैतं सुखदुःखयोरनुगुणं' इत्यादि वर्णन करून शेवटचे चरणांत 'भद्रं प्रेम सुमानुषस्य कथमप्येकं हि तत्प्राप्यते' हा जो उदगार काढिला आहे, त्याचें स्मरण रसिक व मार्मिक वाचकांस झाल्याशिवाय रहाणार नाहीं.

घांमध्यें खरी प्रीति असते, त्या ठिकाणीं देखील या गोष्टीचा अभावच असतो. कारण, पतीच्या मनांत—मी हिच्याहून श्रेष्ठ आहें, हिजवर माझा अधिकार आहे असा भाव रहातो. इकडे स्त्रीला वाटतें कीं, मी याची बोलूनचालून दासी आहें. यामुळेंच एकमेकांवर एकमेकांचा पूर्ण भरंवसा बसत नाहीं. आपले विचार किंवा आपलीं मतें, तीं जीं चोरून ठेवीत असतात, तीं तसें बुद्ध्याच करितात, असें माझें ह्मणणें नाहीं. माझें ह्मणणें इतकेंच कीं, आपण होऊन दाखविण्याचा किंवा सांगण्याचा जो भाग असतो, तो बऱ्याच अंशानें छपविला जातो. ज्या ठिकाणीं श्रेष्ठकनिष्ठत्वभाव असतो, अशा पितापुत्रांच्या नात्यामध्येंही अशीच गोष्ट पुष्कळांच्या पहाण्यांत आली असेल. एकमेकांचें एकमेकांवर पुष्कळ प्रेम आहे, अशा ठिकाणींही मुलाच्या स्वभावाची खरी ओळख बापास झाली आहे, अशीं किती बरें उदाहरणें आढळतील? त्या मुलाचे जे स्नेही किंवा बरोबरीचे असतात, त्यांस याच्याविषयीं खडान्खडा माहीत असतो, ही गोष्ट पुष्कळांच्या अनुभवांतली आहे. तेव्हां, या गोष्टींतलें इंगित इतकेंच कीं, श्रेष्ठपणाच्या नात्यामुळें, खरेपणानें व मन मोकळें करून बोलण्यास पुष्कळ अडचणी किंवा प्रतिकूळ गोष्टी असतात. आपल्याविषयीं आपल्या वडिलांचें जें ठरीव मत झालेलें असतें, किंवा आपलेविषयीं त्यांस जी ममता असते, ती कधींही कमी होऊं नये याकरितां जरी तो मुलगा सत्यप्रिय असला, तरी आपले विचार चांगले असतील तितकेच तो बापास कळवितो. किंवा चांगले असूनही बापास जर ते आवडण्यासारखे असतील, तर मात्र तो ते बापास कळवितो. आणि वास्तविक पहातां, सर्वसाधारणसिद्धांत असाच आहे कीं, जिवलग स्नेही असूनही जर ते त्याच्या बरोबरीचे असतील, तरच त्यांस तो आपले खरे विचार व खरीं मतें कळवील. स्त्रियांची गोष्ट तर याहून फारच निराळी. त्या दुसऱ्याच्या ताबेदार असतात. इतकेंच नाहीं,

तर पतीला जेणेंकरून सुख व समाधान होईल अशाच गोष्टी करण्याकरितां आपण जन्मास आलों आहों, अशी त्यांची पहिल्यापासून समजूत करून दिलेली असते. पतीची मर्जी जात राहील अशी कोणतीही गोष्ट करूं नये हेंच आपलें कर्तव्य. असा पाढा तिला जन्मभर पढविलेला असतो. असो. तेव्हां, जिच्या स्वभावाची, जिच्या विचाराची, किंवा मताची पूर्ण ओळख करून घेण्यास पुष्कळ वेळ व पुष्कळ प्रसंग असतात, अशा आपल्या स्वतःच्या स्त्रीविषयीं जरी ह्मटलें, तरी देखील वर निर्दिष्ट केल्याप्रमाणें अनेक प्रकारच्या अडचणी येतात. इतकेंही करून जी काय थोडीशी माहिती मिळविण्यांत येईल, तेवढ्यावरून जर दुसरा कोणी ह्मणूं लागेल कीं, मी इतर स्त्रियांचेही स्वभाव ओळखीन, तर तसें कदापि होऊं शकणार नाहीं. एखाद्यानें एकाच स्थितींतल्या किंवा सारख्याच स्थितींतल्या पुष्कळ स्त्रियांची माहिती प्राप्त करून घेतली, किंवा देशांतल्या साऱ्या स्त्रियांच्या स्वभावांची माहिती मिळविली, अशी कल्पना केली, तरीदेखील तेवढ्यावरून साऱ्या स्थितींतल्या किंवा साऱ्या देशांतल्या स्त्रियांची माहिती त्यास झाली आहे, असें ह्मणतां येणार नाहीं. आणि इतकेंही करून तो जी माहिती मिळविणार, ती इतिहासांतल्या एखाद्याच काळाविषयीं असणार, हेंही उघड आहे. यावरून, आह्मांस इतकें ह्मणण्यास कांहीं एक हरकत दिसत नाहीं कीं, पुरुष हे स्त्रियांच्या संबंधाचें जें ज्ञान प्राप्त करूं शकतील, तें, भविष्य काळची त्यांची स्थिति मनांत न आणितां, केवळ भूतकाळास व वर्तमानकाळास उद्देशूनच असणार. आणि तेंही फारच अपुरतें व वरवरचें असें असणार. आणि ही स्थिति, जोंपर्यंत स्त्रिया स्वतः, त्यांस जें कांहीं बोलून दाखवावयाचें असेल, तें बोलून दाखविण्यास समर्थ झाल्या नाहींत, तोंपर्यंत अशीच कायम रहाणार.

२२. अशा प्रकारची वेळ अजून आली नाहीं. आणि यावयाची असेल तर तीही एकदम न येतां, हळुहळूच येणार. स्त्रियांस शिक्षण मिळूं लागून, समाजाला काय सांगावयाचें तें त्यांनीं निर्धास्त-पणें सांगावें, अशा प्रकारची त्यांना मुभा मिळून, नुकतेच कांहीं दिवस लोटले आहेत. तेव्हां, त्यांच्यापैकीं थोड्याजणीच आपलें गाऱ्हाणें जगास सांगण्यास पुढें सरसावतात. तशांतूनही स्त्रियांचें सर्व शिक्षण पुरुषांवर अवलंबून असल्यामुळें, पुरुष त्यांचें गाऱ्हाणें ऐकण्यास बहुधा नाखुषच असतात. ही स्त्रियांची गोष्ट तर राहोच. पण एखाद्या ग्रंथकर्त्यानें रूढीविरुद्ध, किंवा संप्रदायाविरुद्ध आणि कांहीं अंशीं नवीनच, असे आपले विचार प्रकट केल्यास, परवांपरवांपर्यंत ते लोकांस आवडत नव्हते. किंवा अजूनही ते लोकांस आवडतील असें नाहीं. रूढि व लोकमत यांस अनुसरून चालणें, हेंच आपलें कर्तव्य होय, अशी स्त्रियांच्या मनाची समजूत घालून दिल्यामुळें, ग्रंथद्वारा आपले स्वतंत्र विचार प्रदर्शित करण्याचा यत्न जी स्त्री करील, तिच्या मार्गांत किती अडचणी येतात, याची साधारण कल्पना वाचकांच्या ध्यानांत येणार आहे.

म्याडम् स्टाल् या नांवाची एक प्रसिद्ध ग्रंथकर्त्री **फ्रान्स** देशांत होऊन गेली. या थोर स्त्रीनें जे ग्रंथ लिहून ठेविले, त्यांच्या योगानें तिनें आपल्या देशांतील ग्रंथकर्त्यांच्या मालिकेंत आपणास उत्तमोत्तम स्थान प्राप्त करून घेतलें. या बाईचा **डेल्फिन्** नांवाचा जो ग्रंथ आहे, त्या ग्रंथाच्या मुखपृष्ठावर जो शिरोलेख, किंवा जें एक सांकेतिक वाक्य दिलें आहे, तें खालीं लिहिलेल्या अर्थाचें आहे:—

" लोकमताला गुंडाळून एकीकडे ठेवण्याचें धाष्ट्र्य पुरुषांच्या हातून होतें. पण तशी गोष्ट स्त्रीच्या हातून घडत नाहीं. तिला लोकमत शिरसा मान्य करावेंच लागतें. " प्रस्तुतकाळीं स्त्रियांच्या संबंधानें स्त्रिया जें कांहीं

लिहितात, तें बहुतेक पुरुषांना प्रिय होईल अशा प्रकारचें असून त्यांत पुरुषांची खुशामत केलेली उघड दिसते. ग्रंथ लिहिणाऱ्या स्त्रियांपैकीं जर कांहीं अविवाहित असल्या, तर त्यांच्या लिहिण्याचा उद्देश बहुधा इतकाच असतो कीं, आपलें लिहिणें पुरुषांस पसंत पडावें, व आपणास पति चांगला मिळावा ! * अविवाहित असोत किंवा विवाहित असोत, पुष्कळ स्त्रिया आपल्या लेखांनीं पुरुषांची इतकी खुशामत करितात कीं, त्या लेखांत प्रतिप्रादन केलेलें स्त्रियांच्या दास्याचें मंडन अत्यंत नीच व अडाणी अशा पुरुषांखेरीज कोणत्याही पुरुषास आवडत नाहीं किंवा इष्ट वाटत नाहीं. परंतु, हा प्रकार पूर्वीं जितका होता, तितका हल्लीं नसून बराच कमी झाला आहे. दिवसानुदिवस ग्रंथ लिहिणाऱ्या स्त्रिया अधिकाधिक स्पष्टवक्त्या होत चालल्या आहेत, व आपले खरे विचार आणि खरीं मतें प्रदर्शित करण्याविषयीं अधिकाधिक उत्सुक दिसत आहेत. दुर्दैवानें या **इंग्लंड** देशांत ग्रंथ लिहिणाऱ्या स्त्रियांची स्थिति अशी नसून, त्यांच्या विचारांत स्वानुभवाचा व स्वावलोकनाचा भाग अल्प असून बहुतेक दुसऱ्यापासून प्राप्त झालेल्या किंवा पोपटपंची ज्ञानाचा भाग अधिक असतो. असा हा प्रकार हळूहळू कमी होत जाईल. परंतु पुरुषांप्रमाणेंच स्त्रियांमध्यें जें ईश्वरदत्त अपूर्व कल्पनासामर्थ्य असतें, त्याची वाढ न खुंटवितां, जेणेंकरून त्याची अभिवृद्धि होईल, अशाच समाजसंस्था असल्या पाहिजेत. तशा त्या जोंपर्यंत नाहींत तोंपर्यंत आजपर्यंत चालत आलेली स्थिति कायम राहील. स्त्रियांची बुद्धि जेव्हां पूर्ण विकास पावेल, त्यांचे खरे व स्वतःसिद्ध

*ग्रंथ लिहिणाऱ्या स्त्रियांनीं आपणांस पति चांगला मिळावा या उद्देशानें लेख लिहिणें. हा प्रकार ज्या देशांत स्त्रिया अविवाहित स्थितींत पुष्कळ काळपर्यंत राहातात, त्या देशांतच संभवतो. आमच्याइकडे त्याचें नांवच नको ! कारण ही गोष्ट सर्वथा असंभवच ! पुढेंमागें विधवाविवाह सर्वमान्य होऊन तरुणगतभर्तृका लेख लिहिणाऱ्या जर आमच्याइकडे पुष्कळशा निपजूं लागल्या तर मात्र कदाचित् ही गोष्ट प्रत्ययास आली तर येईल.

विचार त्या जेव्हां मोकळेपणानें प्रसिद्ध करतील, तेव्हांच स्त्रीस्वभावाचें यथार्थज्ञान आपणास होईल व तदनुसार इतर गोष्टींचीही व्यवस्था करण्यांत येईल.

२३. येथवर स्त्रियांचा खरा खरा स्वभाव समजण्यास काय काय अडचणी येतात, या गोष्टींचें निरूपण आह्मीं केलें. कारण, या विषयावर आणि याच्यासारख्या इतर विषयांवर जीं लोकमतें एकदां ठरून गेलीं आहेत, त्यांस खरोखर आधार कांहींच नसतो. एकदा लोकांच्या मनावर जो कांहीं ग्रह होऊन जातो तो कायमचाच होतो. यामुळें, प्रस्तुत विषयावर योग्य विचार किंवा ऊहापोह होण्याचा फारच थोडा संभव आहे. आणि ही स्थिति, जोंपर्यंत या विषयाची माहिती बहुतेकांस मुळींच नसून त्या विषयाचें ज्ञान आपणांस उत्तम प्रकारचें आहे, असें पुरुषवर्गास वाटेल, तोंपर्यंत कायमच रहाणार. त्यांतूनही हा विषय सामान्य आहे असें नाहीं. *स्त्रिया कोणतीं कामें

*प्रस्तुत संबंधानें आपण नेटिव्ह लोक व आपले राज्यकर्ते, यांचें उदाहरण ध्यानांत आणण्यासारखें आहे. आमचे राज्यकर्ते जर असें ह्मणतील कीं, नेटिवांस अमुक कामें करितां येणार नाहींत, सबब तीं करण्यास इंग्रेजच पाहिजेत, तर त्यांस उघडच आपण असें विचारूं कीं, आम्हांस अमुक कामें करितां येतात किंवा येत नाहींत, हें तुह्मांस अनुभव घेतल्याखेरीज कसें सांगतां येईल? मोठमोठीं जबाबदारीचीं कामें आह्मांस तुह्मी देऊन पहा व तीं आह्मांस खरोखर करितां आलीं नाहींत तर मात्र आह्मांस नालायक ठरवा. आमचे राज्यकर्ते कधीं कधीं असेंही ह्मणतात कीं, अमुक गोष्टी तुमच्या सुखाच्या आहेत, अमुक गोष्टींत तुह्मांस सुख नाहीं. तर आपण त्यांस सहजच असें विचारूं कीं 'महाराज! आमच्या सुखाच्या गोष्टी कोणत्या त्या आमच्या आह्मांस चांगल्या कळतात. तुह्मांस त्या मुळींच कळणार नाहींत. ज्याचें पोट दुखतें त्यासच तें कळतें. दुसऱ्यास कसें कळेल? रोग्याचें पोट दुखत असून जर वैद्य त्यास ह्मणेल, छे, वेड्या, तुझें पोट दुखतच नाहीं, तूं तर चैनींत आहेस, हल्लीं तुझी जी स्थिति आहे ती सुखाची व आनंदाची आहे. तूं हें जें वेडेवांकडें तोंड करून आचेपिचे देत आहेस तें सर्व तुझ्या हिताचें आहे! तर त्याचें तें ह्मणणें कोणी ऐकेल काय?' आतां ही गोष्ट उघडच आहे कीं, ज्या ठिकाणीं निव्वळ जबरदस्तीचा न्याय आहे, तेथें सशक्त अशक्ताला जें शास्त्र सांगेल तेंच त्यास शिरसावंद्य करणें प्राप्त आहे!

करण्यास योग्य आहेत, व कोणतीं कामें करण्यास योग्य नाहींत, त्यांस व्यवहारांत किती व कोणत्या प्रकारचे हक्क असावे, असा हा अत्यंत महत्वाचा व परमगहन विषय आहे. तेव्हां अशा या विषयाचें आपणास पूर्ण ज्ञान आहे असें समजून, पुरुषांनीं स्त्रियांस नियम घालून देणें, किती कठिण व उपहासाचें आहे बरें? सुदैवानें संसार व गृहप्रपंच यांच्या संबंधानें स्त्रियांची स्थिति कशी आहे, या विषयींच्या ज्ञानाची व्यवहाररीत्या आवश्यकता नाहीं. ही एक आनंदाचीच गोष्ट ह्मणावयाची. कारण, अर्वाचीन समाजतत्त्वांच्या अनुसंधानानें पाहिलें असतां, या प्रश्नाचा उलगडा प्रत्यक्ष स्त्रियांनींच केला पाहिजे. आणि, तो त्यांनीं आपल्या अनुभवाप्रमाणें व बुद्धिसामर्थ्यानुसार केला पाहिजे. कोणा एका व्यक्तीला किंवा अनेक व्यक्तींना अमुक काम करितां येईल किंवा नाहीं, हें कळण्यास मार्ग किंवा साधन ह्मटलें ह्मणजे, यत्न करून पहाणें. या शिवाय दुसरें साधनच नाहीं. त्याचप्रमाणें, अमुक गोष्टी केल्यापासून सुख होईल व अमुक गोष्टी केल्यापासून सुख होणार नाहीं, हें एकाकरितां दुसऱ्यानें ठरवावें ह्मटलें, तर तसें करण्यासही साधन नाहीं.

२४. स्त्रियांविषयीं एक गोष्ट मात्र आपणास खातरीनें सांगतां येईल. ती ही कीं, त्यांस केवळ मोकळीक किंवा स्वातंत्र्य दिलें ह्मणून तेवढ्यानेंच त्यांच्या स्वभावास अगदीं विरुद्ध असें एखादें कृत्य त्यांच्या हातून घडेल असें कधींही होणार नाहीं. तसेंच, सृष्टीच्या किंवा निसर्गाच्या तर्फेनें माणसांनीं मध्यस्थी करण्याची खरोखर मुळींच गरज नाहीं. सृष्टीचे हेतु निष्फळ होतील, सृष्टीला आपले मनोरथ आपल्या हातून पार पाडितां येणार नाहींत, अशी भीति बाळगण्याचें मुळींच प्रयोजन नाहीं. कारण ही भीति व्यर्थ आहे. ज्या गोष्टी करण्यास स्त्रिया जात्याच असमर्थ आहेत, त्या त्यांनीं करूं नयेत, अशाबद्दल यत्न करणें निरर्थक आहे. ज्या गोष्टी त्या करूं शक-

तील, परंतु ज्यांच्याशीं त्यांस साम्ना किंवा बरोबरी करावयाची आहे असे जे पुरुष त्यांच्या इतक्या चांगल्या करितां येणार नाहींत अशा असतील, त्या गोष्टींत पुरुषांशीं साम्ना करणें कठीण आहे असें समजून स्त्रिया आपणच होऊन त्या सोडून देतील. कारण, स्त्रियांवर कृपादृष्टी करून किंवा त्यांस प्रोत्साहन मिळावें ह्मणून, अमुक गोष्ट करा, असें ह्मणणेंच नाहीं. तर ह्मणणें एवढेंच कीं, एकट्या पुरुषांच्याच हिताकरितां ह्मणून कांहीं गोष्टी आहेत, त्या नसाव्या. कांहीं गोष्टींमध्यें पुरुषांपेक्षां स्त्रियांची बुद्धि विशेष चालते, ही गोष्ट जर खरी असेल तर, अमुकच गोष्टी स्त्रियांनीं कराव्या व अमुक करूं नये, असा सक्तीचा कायदा असण्याची जरूर नाहीं. किंवा समाजानें बुद्धिपुरस्सर त्यांस प्रतिबंध करण्याची अवश्यकता नाहीं. ज्यास पाहिजे तो धंदा त्यानें करावा, अशी मुभा ठेविली असतां जो अधिक बुद्धिमान् व अधिक योग्य, अधिक समर्थ किंवा हुशार असेल, तोच त्या कामास लायक ठरेल. या तत्वास अनुसरून जीं जीं कामें स्त्रियांस उत्तमप्रकारें करितां येतील तीं तींच कामें त्या करतील, दुसरीं करणार नाहींत. जीं कामें स्त्रियांपेक्षां पुरुषांस उत्तमप्रकारें करितां येतील, त्या कामांत स्त्रिया हातच घालणार नाहींत, हेंही उघड आहे. तेव्हां, याप्रमाणें यदृच्छेची निवडणूक झाली असतां, व यदृच्छेनें श्रमविभाग झाला असतां स्त्रीपुरुषांपैकीं उभयतांचेंही बुद्धिसामर्थ्य व संघशक्ति एकवट होऊन, एकंदर समाजाच्या सुखाची अभिवृद्धि होणार आहे. आणि ही अशी व्यवस्था एकंदरींत अत्यंत कल्याणप्रद व हितकारक अशी होणारी आहे.

२५. पुरुषांचें साधारण मत असें दिसतें कीं स्त्रियांस सृष्टीनें लावून दिलेलीं कामें ह्मणजे दोन. बायको होणें व आई होणें. ‘दिसतें’ असें ह्मणण्याचें कारण, प्रस्तुत समाजाची जी रचना आहे,

तिचा सूक्ष्म विचार केला असतां लोकांचा खरोखर अभिप्राय उलटा असावा, असें वाटतें. कारण, ' सृष्टीनें लावून दिलेलीं कामें ' ह्मणून ज्या कामांची योजना स्त्रियांच्याकरितां पुरुषांनीं केली आहे, तीं स्वतां स्त्रियांस नापसंत असून तीं त्यांच्या स्वभावाविरुद्ध आहेत, असें पुरुषांस वाटलें असावें. वर निर्दिष्ट केलेल्या दोन कामांशिवाय जर इतर कामें करण्याची त्यांना मुभा ठेविली व निर्वाह करण्याचीं साधनें त्यांच्या हातांत दिलीं, त्यांस इष्ट असतील अशाच कामांत आपला काळ व आपलें बुद्धिसामर्थ्य यांचा विनियोग त्यांस करूं दिला तर ' सृष्टीनें लावून दिलेलें काम ' ह्मणून त्यांच्यावर लादलें असतां तें त्या करण्यास राजी होणार नाहींत, अशी पक्की समजूत पुरुषांची झाली असावी. खरोखर, एकंदर पुरुषजातीची जर अशीच समजूत असेल तर ती त्यांनीं उघड बोलून दाखवावी हीच गोष्ट चांगली. कोणी एखाद्या पंडितानें खालीं लिहिलेलें मत उघड उघड प्रतिपादन करावें (या विषयावर आजपर्यंत जे लेख आलेआहेत त्यांचा रोंखही असाच आहे):—"स्त्रियांनीं लग्न करून प्रजा उत्पन्न करणें हें समाजास अवश्य आहे. त्यांजवर जुलूम केल्याखेरीज ही गोष्ट त्या कबूल करणार नाहींत. तस्मात्, त्यांजवर जुलूम करणें जरूर आहे !" असा एक सिद्धांत जगापुढें मांडला गेला, ह्मणजे त्याच्या गुणदोषांचें विवेचन करण्यास ठीक पडेल. **अमेरिकें**तली गुलामगिरी योग्य आहे व अवश्य आहे ह्मणून अस्तिपक्षाच्या तर्फेनें जे भांडत होते, त्यांचेंही ह्मणणें अशाच प्रकारचें होतें. ते ह्मणतः—"कापूस आणि साखर यांची लागवड करणें जरूर आहे. गोऱ्या लोकांस लागवड करितां येत नाहीं. सिद्दी किंवा काळे लोक यांस कितीही वेतन किंवा रोजमुरा दिला तरी लागवडीचें काम ते करणार नाहींत. तस्मात्, त्यांजवर जुलूम केलाच पाहिजे !" याहीपेक्षां जवळचें असें दुसरें एक उदाहरण ह्मटलें ह्मणजे जुलूमानें खलाशी करावयाचें. तें असें:—"देशाचें संरक्षण करण्याकरितां लढाऊ

तारवें असून त्यांवर खलाशी तर अवश्य पाहिजेत. ते आपल्या खुशीनें खलाशाची नौकरी पतकरीत नाहींत असें वारंवार घडतें. तस्मात् त्यांस जुलुमानें खलाशी करण्याचा अधिकार कोणाला तरी दिलाच पाहिजे!" आहे कीं नाहीं पांडित्य? आणि अशाच पांडित्याचा प्रकाश पाडून तेंच तर्कशास्त्र पुष्कळ प्रसंगीं लोकांनीं लढविलें आहे. पण या 'तर्कशास्त्रांत' जर एक मोठी गोम नसती, तर आजकालसुद्धां लोकांनीं निःसंशय तेंच तर्कशास्त्र दडपून दिलें असतें. पण त्यांत एक गोम आहे ती पहाः—वरच्या प्रतिपादनाचें खंडन अशा रीतीनें करतां येईल कीं, 'अहो, प्रथम खलाशी लोकांस त्यांच्या मेहनतीबद्दल योग्य किंमत, किंवा योग्य मुशाहिरा द्या. आणि दुसऱ्या धन्याची चाकरी करण्यांत जितका फायदा त्यास होईल तितकाच फायदा तुमची चाकरी करण्यापासून त्यांस होईल, अशी तजवीज तुह्मी करा, ह्मणजे इतरांप्रमाणें तुमची नौकरी करण्यास ते कबूल होतील व तुह्मांसही चाकर मिळण्यास पंचाईत पडणार नाहीं.' या आमच्या बोलण्यावर तुमचें बोलणें ह्मणजे "असें करण्याची आमची खुषी नाहीं!" एवढेंच असणार कीं नाहीं? प्रस्तुतकालीं लोकांस गरीब बिचाऱ्या मजुरांचा मुशाहिरा चोरण्याची लाज वाटते, एवढेंच नाहीं, तर तसें करण्यास आजकाल लोक इच्छितही नाहींत. यामुळें आरमारांत लोकांनीं यावें, ह्मणून त्यांजवर सक्ती करण्याची जी पूर्वीं पद्धत होती ती योग्य होती, असें ह्मणून आजकाल कोणीही तिचा कैवार घेऊन भांडत नाहीं. स्त्रियांनीं विवाहित स्थितींत शिरलेंच पाहिजे ह्मणून बाकीच्या सर्व धंद्यांत शिरण्याची मनाई करून, बायकांकडून सक्तीनें लग्न करविण्याचा जे कोणी यत्न करितात, त्यांसही उत्तर तेंच दिलें पाहिजे. ते जें ह्मणतात, त्यांत कांहीं अर्थ असेल, तर त्यांचा अभिप्राय असें ह्मणण्याचा उघड असा दिसतो कीं, विवाहित

स्थिति स्त्रियांस इष्ट होण्यासारखी पुरुष करीत नाहींत. ह्मणजे, विवाहितस्थितीचा विचार स्त्रिया आपण होऊन खुषीनें करतील, असा तिच्यांत मूळचा कांहीं चांगूलपणाच नाहीं. एखाद्यानें एखाद्यास कांहीं देणगी दिली, व ती अशी कीं, 'घेशील तर हीच घे. नाहीं तर कांहींच मिळणार नाहीं!' असा जेव्हां प्रकार होतो, तेव्हां ती देणगी देणाऱ्यास त्या दानविषयक पदार्थांत अत्यन्त आकर्षक धर्म आहे असें वाटत असल्याचें हें लक्षण नव्हे. आणखी, मला असें वाटतें कीं, स्त्रियांस आपल्या बरोबरीचें स्वातंत्र्य देण्याचे कामांत जे लोक खरोखर विरुद्ध असतात, त्यांच्या अंतःकरणांत हीच गोष्ट असते. माझी अशी समजूत आहे कीं, स्त्रिया लग्न करण्यास नाखुष असतील अशी आशंका किंवा भीति पुरुषांच्या मनांत कधींच येत नाहीं. तर, लग्न व्हावयाचें तें बरोबरीच्या नात्यानें व्हावें, अशाविषयीं त्या आग्रह धरतील, हीच भीति पुरुषांस वाटते आणि लग्न करणें याचा अर्थ ज्यापेक्षां आपणास धनी करून घेणें एवढाच नव्हे, तर, आपली जी सर्व मालमत्ता तीही त्या धन्याला अर्पण करणें असा आहे, त्यापेक्षां खरोखर बुद्धिमान् व पाणीदार अशा सर्व स्त्रिया, त्यांच्या दृष्टीनें कमीपणा ज्यांत नाहीं असा दुसरा पाहिजे तो धंदा त्या पतकरतील, पण लग्न करणार नाहींत, अशीही भीति पुरुषांच्या मनांत असते! आणखी, लग्नाचा परिणाम आपण दुसऱ्याचा दास होऊन राहणें व आपल्या मालमत्तेवरील आपला सर्व हक्क गमावणें, असाच जर होत असेल तर, मला वाटतें कीं, पुरुषांच्या मनांत ही जी शंका येते, तिला बराच आधार आहे असें ह्मटलें पाहिजे. मला खास असें वाटतें कीं, संसारामध्यें प्रतिष्ठेचीं व मानमान्यतेचीं कामें करण्याची मोकळीक जर स्त्रियांस असेल, तर एखाद्या विलक्षण मोहनीअस्त्राच्या किंवा मोहजालाच्या तडाक्यांत सांपडून त्यांचें देहभान व विचारशक्ति सर्वथा नष्ट झाल्याशिवाय, दुसरा एखादा

व्यवसाय करण्याचें ज्यांना सामर्थ्य आहे, अशा स्त्रियांपैकीं थोड्याच स्त्रिया अशी स्थिति पतकरतील! विवाहाचा कायदा ह्मणजे जुलुमाचा प्रकार असलाच पाहिजे, असें एकदां पुरुषांनीं ठरवून टाकिलें, ह्मणजे स्त्रियांना बायको होण्याचाच धंदा पत्करिला पाहिजे, हें ह्मणणें केवळ युक्तीच्या दृष्टीनें बरोबर आहे. परंतु असें असेल तर स्त्रियांच्या मनावरील अज्ञानाचें पटल दूर करण्याविषयीं शिक्षणदानादि वगैरे जे अर्वाचीन प्रयत्न करण्यांत येत आहेत, ते चुकीचे होत. स्त्रियांस उदार किंवा उच्चप्रतीचें शिक्षण देणें अगोदरच योग्य नव्हतें. प्रस्तुतच्या लोकव्यवहाराच्या स्थितींत वाचावयास शिकलेल्या व विशेषतः लिहिण्यास शिकलेल्या स्त्रिया ह्या प्रस्तुत कालाशीं विसंगत असून, लोकसमाजाच्या शांततेचा क्षोभ करणाऱ्या आहेत. एवढेंच नव्हे, तर घरकाम करणारी एखादी मोलकरी दासी, किंवा तुर्कस्थानांतील **सुलतानाच्या** गोषांत रहाणारी एखादी बटिक, हिला अवश्य लागणारे जे गुण किंवा जें शिक्षण त्याशिवाय अन्यप्रकारचें शिक्षण स्त्रियांस देण्यांत आलें ही भयंकर चूक घडली!

भाग २.

१. येथपर्यंत प्रस्तुत विषयाचा साधारण विचार झाला. आतां आपल्या विषयाचा एक विवक्षित भाग घेऊन त्याचा विचार करूं. या देशांत व इतर सर्व देशांत विवाहसंबंधाच्या कायद्यानें काय काय निर्बंध किंवा नियम करून ठेविले आहेत ते पाहूं. लोक-समाजानें स्त्रियांची वृत्ति व त्यांच्या आयुष्याचें मुख्य कर्तव्य ह्मटलें ह्मणजे 'विवाह करून घेणें' हेंच होय असें ठरवून टाकिलें. लग्न करणें हाच कायतो परमार्थ व तो प्राप्त करून घेण्यास सर्व स्त्रियांनीं झटावें; त्याखेरीज त्यांस अन्य गतीच नाहीं, असें धर्मशास्त्रानें ठरवून टाकिलें.* अर्थात आमचे देशांत (इंग्लंडांत) ज्या स्त्रिया कुरूप असतात व त्यामुळें त्यांस कोणी पसंत करीत नाहीं, त्यांची गोष्ट मात्र निराळी. आतां कोणास असें वाटेल कीं, याप्रमाणें योग्य रीतीची विवाहव्यवस्था ठरल्यावर स्त्रियांची तक्रार नसावी. कारण न्याय्य गोष्ट तीच कायद्यांत सांगितली आहे.

---

* या प्रश्नाचे संबंधानें आमचे प्राचीन आर्यग्रंथ पाहिले असतां बरीच महत्वाची, मनोरंजक व बोधप्रद माहिती मिळण्यासारखी आहे. श्रीमद् विद्यारण्यांनीं जीवन्मुक्ति विवेक नामक ग्रंथांत 'स्त्रीणामपि प्राग्विवाहाद्वा वैधव्यादूर्ध्वं संन्यासेऽधिकारोऽस्तीति दर्शितम्' ह्मणजे स्त्रियांना विवाहापूर्वीं अथवा वैधव्या नंतर संन्यास घेण्याचा अधिकार आहे असें ह्मटलें आहे. या ग्रंथांत व अन्य ग्रंथांतून उपलब्ध होणाऱ्या मैत्रेयी, सुलभा' वाचक्नवी, शार्ङ्गीं, शांडिली या ज्ञाननिष्ठ तपस्विनींचीं परमपूज्य व परम पवित्र नांवें आह्मी आर्य ह्मणविणाऱ्यांनीं स्मरणांत ठेवण्यासारखीं आहेत.

ज्या स्त्रियांस जे पुरुष पसंत पडतील त्यांच्याशींच त्यांचीं लग्नें लागतात. आणि विवाह तर दोघांसही इष्ट असून स्वाभाविक आहे. तेव्हां स्त्रियांस विवाहाशिवाय गत्यंतर नाहीं असें जें ठरविलें आहे, त्यांत स्त्रियांवर कोणत्याही प्रकारचा जुलूम होत नसून त्यांस कुरकूर करण्यास जागा नाहीं. यावर माझें असें ह्मणणें आहे कीं, वस्तुस्थिति याहून फार निराळी आहे. पूर्वींपासून लोकसमाजानें विवाहाच्या या कामांत आपला हेतु सिद्ध करून घेण्याचा योग्य व सरळ मार्ग सोडून देऊन अयोग्य व अन्यायाचा मार्ग धरिला आहे. विशेषेंकरून स्त्रियांस लग्नाच्या विधीनें दास करून ठेवण्याच्या कामांत समाजाचा दुराग्रह आजपर्यंत जशाचा तसाच कायम आहे. अगदीं प्रथमारंभीं पुरुष स्त्रियांस जुलुमानें आपल्या स्वाधीन करून घेत, किंवा त्यांच्या बापापासून बाजारांत इतर जिनसा जशा विकत घ्यावयाच्या त्याप्रमाणें खरोखरीच चकचकित मोल देऊन विकत घेत.*

आपल्या या युरोपखंडाचा इतिहास पाहतां असें दिसून येतें कीं फार थोड्या काळापूर्वीं खुषीस येईल त्या पुरुषास आपली मुलगी लग्नांत देण्याचा पूर्ण अधिकार बापास असे.† मुलीचा अभिप्राय किंवा विचार

---

* या आर्यावर्तांत एकाकाळीं चालू असलेल्या विवाहाच्या आठ प्रकारांपैकीं पैशाच, आसुर, राक्षस हे तीन प्रकार प्राचीन कालीं प्रचारांत होते त्यांचा इतिहास वाचकांनीं लक्षांत आणावा. रोमन् लोकांमध्येंही बापापासून नवऱ्यानें मुलगी लग्नाकरितां विकत घेण्याचा विधि होता.

† मनूच्या व याज्ञवल्क्याच्या काळीं स्त्रियांचीं कर्तव्यें या संबंधाचे कांहीं नियम येणें प्रमाणें आहेतः–" स्त्रीनें बालपणीं आपल्या बापाच्या ताब्यांत राहावें. यौवन दशेंत नवऱ्याच्या. तिचा पति जर मरण पावला तर तिनें आपल्या मुलांच्या हुकुमांत असावें. स्त्रीला कधींही स्वतंत्रता योग्य नाहीं. आपला पिता, पति किंवा पुत्र यांजपासून निराळें राहण्याचा तिनें कधींही यत्न करूं नये. त्यांना जर तिनें सोडिलें तर आपल्या पतीच्या, त्याचप्रमाणें पित्याच्या–उभयतांच्याही कुळास तिनें कलंक लावल्यासारखें होईल. तिनें निरंतर आनंदित राहिलें पाहिजे, गृहकृत्यें करण्यांत दक्षता

घेण्याची मुळींच गरज नसे. ही नीति, किंवा हा प्रकार ख्रिस्ती धर्माला अंमळ विरुद्ध होता. कारण ख्रिस्ती धर्माप्रमाणें नवरीची संमति अवश्य असल्यामुळें विवाहाच्यावेळीं 'तूं या पुरुषाशीं लग्न करण्यास खुषी आहेस काय'? असा प्रश्न करून 'होय' हीं अक्षरें नवरीच्या मुखानें वदवून घेण्याचा विधि उपाध्येबोवाला करून घ्यावा लागे. पण हें उघडच आहे कीं हें 'होय' स्वेच्छेचें नसून तो केवळ जुलुमाचा रामराम असे. कारण बापानें हट्ट घेतलाच तर 'नाहीं' ह्मणण्याची खरोखर त्या मुलीची प्राज्ञा नव्हती. तिच्या मनांत नसलेंच तर तिला एकच मार्ग मोकळा असे. तो हा कीं, तिनें आपलें आयुष्य धर्माचरण व तपश्चरण यांत घालविण्याचा निश्चय करून गोंसावीण व्हावें.* आणि असें तिनें केलें ह्मणजे मग बरीक बापाचा इलाज खुंटे. कारण,

---

ठेविली पाहिजे, तिनें आपलीं भांडीं स्वच्छ घासून पुसून ठेवण्याची काळजी घेतली पाहिजे. व खर्चांत काटकसर केली पाहिजे. तिचा पिता किंवा पित्याच्या आज्ञेनें तिचा बंधु ज्याला देईल त्याच्या आज्ञेंत तिनें यावज्जीव राहिलें पाहिजे. आणखी, तो मृत झाल्यावर त्याची तिनें निंदा करूं नये. तो यद्यपि सदाचारविहीन असला, चैनबाजी करणारा असला, त्याच्या अंगीं मुळींच सद्गुण नसले, तथापि पतिव्रता स्त्रीनें प्रत्यक्ष देवाप्रमाणें पतीला मान दिला पाहिजे. "पतीला सोडून स्त्रीनें व्रतवैकल्यें, दानधर्म, उपास वगैरे कांहीं एक करूं नये. जर पत्नी आपल्या पतीच्या आज्ञेंत राहील तर तेवढ्याच कारणानें तिला स्वर्गप्राप्ति होईल."

(पहा मनुस्मृति. अ. ५. श्लोक १४८–१५१ व १५४, १५५.)

सनातन वैदिक धर्माचे कट्टे अभिमानी वे. शा. स. रा. रा. बाळ गंगाधर टिळक बी. ए. एल् एल् बी. यांनीं आपल्या केसरी पत्राचे एका अंकांत (३१ मार्च १८९६) येणें प्रमाणें लिहिलें होतें:–

"मुलीवर बापाची पूर्ण सत्ता आहे व तिच्या संमतिखेरीज तिचें दानही जर त्यास करितां येतें तर वाङ्निश्चय करण्यास कोणती हरकत येते हें आह्मांस समजत नाहीं."

* (पृष्ठ ७३ पानांत) दिलेली टीप पहा.

त्याकाळीं धर्माचार्यांची सत्ताच अशी बलवत्तर असे. पण एकदां विवाह झाला ह्मणजे मग आपल्या स्त्रीस पाहिजे त्या रीतीनें वागविण्याचा व तिचें हवें तें करण्याचा पूर्ण अधिकार पुरुषास असे. नवऱ्याविरुद्ध तिला कांहींएक करितां येत नसे. कायद्याच्या दृष्टीनें लग्नानंतर तिला स्वतंत्र अस्तित्वच नव्हतें. तिचें सर्वस्व काय तो नवरा. तो मारील किंवा तारील. आपल्या बायकोस पाहिजे तेव्हां सोडून देण्याचाही अधिकार पुष्कळ दिवस पर्यंत नवऱ्यास असे. परंतु, अशा प्रकारचा उलट अधिकार नवऱ्याच्या संबंधानें तिला नसे. ही स्थिति ख्रिस्ती धर्माचा प्रसार होण्यापूर्वींची होती. इंग्लंडाच्या जुन्या कायद्यांत नवऱ्याला बायकोचा ' धनी ' किंवा ' मालक ' ह्मणत. फार काय, नवरा ह्मणजे बायकोचा ' राजा ' असें समजत. पतिद्रोहाला किंवा पतिहत्येला जेवढी कडक शिक्षा असे, तेवढी कडक शिक्षा राजद्रोहाला किंवा राजहत्येलाही नसे. बायकोनें नवऱ्याचा वध केला तर त्या गुन्ह्याला ' राजद्रोह ' असें ह्मणत. आणि अशा अपराध्याला जिवंत जाळून टाकण्याची शिक्षा ठरविली होती.

हे अनेक दुष्टपणाचे प्रकार आतां बंद झाले. ह्मणून पुरुष समजतात कीं, विवाहसंबंधाचा प्रकार प्रस्तुतकाळास उचित व जसा असावा तसा आहे, त्यांत कमजास्त करण्यास जागाच नाहीं. आणि लोक वारंवार असें ह्मणून दाखवितात कीं, सुधारणा व ख्रिस्ती धर्म यांच्या प्रतापानें, स्त्रियांचे योग्य हक्क, त्यांस प्राप्त झाले आहेत. वास्तविक गोष्ट पहातां अशी आहे कीं, स्त्री आपल्या पतीची खरोखर गुलाम असून, हल्लीं चालू असलेल्या कायद्याच्या दृष्टीनेंही गुलामांपेक्षां स्त्रियांची स्थिति चांगली नाहीं. तिला नवऱ्याच्या आज्ञेंत जन्मभर रहाण्याची जी प्रतिज्ञा विवाहप्रसंगीं करावी लागते, ती प्रतिज्ञा खरी करविण्याची सक्ती कायद्याला करितां येते. कांहीं लोक ह्मणतील कीं, स्त्रियांच्या

आज्ञाधारकपणाला कांहीं मर्यादा ठेविली आहे. ती ही कीं, कांहीं फौजदारी गुन्हा किंवा अपराध करीत असतां, नवरा स्त्रीला ह्मणेल कीं, 'तूं मला या कामीं मदत कर,' तर तिनें बेलाशक 'नाहीं' असें ह्मणावें. हें कदाचित् असें असेल, पण बाकीच्या सर्व गोष्टींत नवरा सांगेल तें तिला ऐकिलेंच पाहिजे, असा त्याचा अधिकार तिजवर ठेविला आहे. तिला त्याच्या परवानगी वांचून कांहींएक करण्याचा अधिकार नाहीं. तिनें कांहीं मिळकत मिळविली तर, त्या मिळकतीवर नवऱ्याचें स्वामित्व असतें. ती मिळकत ज्या क्षणीं तिची होते, त्याच क्षणीं त्या मिळकतीवर नवऱ्याचा हक्क उत्पन्न होतो—मग ती तिला वारस या नात्यानें कां मिळेना—तिजवर तिचा मुळींच हक्कसंबंध रहात नाहीं! या बाबतींत **इंग्लंडां**तील स्त्रियांची स्थिति इतर देशांतील गुलामांपेक्षांही वाईट होय. उदाहरणार्थ, **रोमन्** लोकांचा इतिहास पाहिला तर **रोमन्** लोकांच्या कायद्याप्रमाणें प्रत्येक दासाला 'दासधन' या नांवानें मिळालेलें जें धन किंवा जी मिळकत असे, तिजवर त्या दासाची बहुतेक पूर्ण सत्ता असे, व दुसऱ्याचा कांहींएक हक्क त्याच्या त्या वित्तावर चालत नसे. या देशांत (**इंग्लंडांत**) उंच प्रतीच्या लोकांनीं कायदा एकीकडे ठेवून, खाजगी खर्चाकरितां ह्मणून व विशेष कराराच्या योगानें, आपल्या स्त्रियांस **रोमन्** लोकांप्रमाणेंच कांहींएक प्रकारचा हक्क दिला आहे. पोरीच्या बापाचें प्रेम आपल्या जांवयापेक्षां आपल्या पोरीवर सहजच विशेष असतें. कारण, एक असतो पोटचा गोळा, व दुसरा असतो अगदीं परका मनुष्य. यामुळें, बहुतेक श्रीमान् लोक आपल्या पोरीच्या विवाहसमयीं पोरीला वारसाच्या हक्कानें जाणारी जी मिळकत, ती सर्व, किंवा तिचा कांहीं भाग तरी, नवऱ्याच्या हातांत राहूं नये, अशी व्यवस्था करितात. ह्मणून त्या मिळकतीवर त्या स्त्रीच्या नवऱ्याचा

कांहींएक अधिकार चालत नाहीं.* तथापि, या व्यवस्थेनें त्या मिळकतीवर सर्वस्वी तिची मालकी चालते, असें होतच नाहीं. फार झालें तर, इतकेंच होतें कीं, नवऱ्याला ती मिळकत उधळून टाकण्यास प्रतिबंध होतो. परंतु, त्या मिळकतीच्या योग्य मालकाला मिळकतीचा उपभोग करितां येत नाहीं. कारण, ती मिळकत दोघांच्याही ताब्यांत नसते. त्या मिळकतीचें उत्पन्न ह्मटलें तर, त्या स्त्रीच्या हितासाठीं उत्तमोत्तम व्यवस्था जरी केलेली असली, तरी त्या व्यवस्थेनें इतकेंच होतें कीं, तिच्या मिळकतीचें उत्पन्न नवऱ्याच्या हातांत जात नाहीं. तें उत्पन्न तिच्याच हातांत गेलें पाहिजे, असा निर्बंध असतो. परंतु, तें तिच्या हातांत आल्याबरोबर त्यानें जर तें तिच्यापासून जुलुमानें हिस-

---

* आमच्या या देशांत गुजराथी लोकांत स्त्रियांची ज्या वित्तावर पूर्ण मालकी राहील अशा प्रकारची कांहीं व्यवस्था करितात. हिंदुधर्मशास्त्रांत 'स्त्रीधन' ह्मणून एक प्रकार मान्य करून शास्त्रकर्त्यांनीं त्याचे निराळे नियम सांगितले आहेत. त्याचप्रमाणें, मुलींला वारस या नात्यानें जी मिळकत मिळेल, तिजवर तिची पूर्ण सत्ता मानिली आहे. मिल साहेबांनीं वर ज्या कायद्यास उद्देशून लिहिलें आहे, तो कायदा त्यांच्या वेळचा होता; हें वाचकांनीं लक्षांत ठेविलें पाहिजे. प्रस्तुत निबंध प्रसिद्ध झाल्यापासून इंग्लंडांतील पुष्कळ विचारी पुरुष व स्त्रिया यांच्या मनांवर व विचारांवर निबंधांत केलेल्या प्रतिपादनाचा परिणाम घडून, स्त्रियांच्या संबंधाच्या कायद्यांत योग्य फेरफार करण्याविषयीं खटपट सुरू झाली. त्या खटपटीचा शेवट असा झाला कीं, 'Women's Property Act' 'स्त्रियांच्या मिळकतीच्या संबंधाचा कायदा' पास झाला. त्यांतील मुख्य तत्त्व असें आहे कीं, स्त्रीनें लग्नापूर्वी मिळविलेली मिळकत असो, किंवा लग्न झाल्यानंतर मिळविलेली मिळकत असो—नवऱ्याचा आपल्या बायकोच्या मिळकतीवर कांहींएक हक्क नाहीं. दोघेही आपापल्या मिळकतीचे पूर्ण व स्वतंत्र मालक आहेत, असें कायद्यानें ठरलें आहे. हा कायदा होऊन फारच थोडीं वर्षे झालीं. या संबंधानें आमचे इकडे इ० स० १८६५ सालीं पास झालेला "इंडियन् सक्सेशन् आक्ट" या नांवाच्या कायद्यांतील ४३।४४ हीं कलमें, त्याचप्रमाणें, इ० स० १८७४ चा ३ रा "मॅरिड उमन्सप्रॉपर्टी आक्ट" ह्मणजे "विवाहित स्त्रियांचे मिळकतीच्या संबंधाचा कायदा" याचें कलम ४ व ७ पहा. परंतु, या कायद्याचा फायदा बापुड्या हिंदू स्त्रियांना मिळण्याचा नाहीं. कारण त्यांच्या मिळकतीची व्यवस्था हिंदुधर्मशास्त्रानेंच लागावयाची!

कावून घेतलें, तर त्याजबद्दल त्याला कांहींएक शिक्षा ठेविलेली नाहीं. कायद्याच्या दृष्टीनें बायको व तिचा नवरा एकच व्यक्ति, अशी कल्पना आहे. याचा हेतु एवढाच दिसतो कीं, जें कांहीं तिचें, तें त्याचें. याच्या उलट मात्र अनुमान करीत नाहींत कीं, जें त्याचें, तें तिचें! कायद्याच्या दृष्टीनें 'एक व्यक्ति' हें ह्मणणें पुरुषाच्या विरुद्ध मात्र लावीत नाहींत. तिऱ्हाईत माणसाच्या संबंधानें जीं बायकोचीं कृत्यें त्या कृत्याबद्दलची जबाबदारी जेव्हां नवऱ्यावर आणणें असेल, ह्मणजे, आपल्या जनावराच्या किंवा दासाच्या कृत्याबद्दल जसा धनी जबाबदार धरितात, तसा जेव्हां त्यास तिच्या कृत्याबद्दल जबाबदार धरावयाचें असेल तेव्हां मात्र या ह्मणीचा उपयोग करितात. यावरून बहुतेक पुरुष दासापेक्षां अधिक चांगल्या रीतीनें स्त्रियांस वागवीत नाहींत, असें माझें ह्मणणें नाहीं. पण पुरुषाच्या संबंधानें पहातां स्त्री ज्या अर्थानें व जितक्या प्रकारांनीं पुरुषाची दासी असते, त्या अर्थानें व तितक्या प्रकारांनीं दासाचा दासपणा कोठेंच दृष्टीस पडत नाहीं. खुद्द धन्याच्या अथवा यजमानाच्या निरंतर तैनातींत असणाऱ्या दासाशिवाय, दुसरा कोणताही दास, स्त्रीप्रमाणें प्रत्येक घटकेस, अथवा प्रतिक्षणीं, दास बनलेला नसेल! खरोखरच, जो दास असतो, त्यानें शिपायाप्रमाणें आपली नेमिलेली नोकरी बजावली असतां, किंवा त्याचा पहारा संपला ह्मणजे, तो राहिलेल्या वेळेचा पूर्ण मालक असतो. याशिवाय, त्याला आपल्या कुटुंबाचें ह्मणून जें कांहीं सौख्य असतें, तेंही मिळतें. त्यामध्यें धन्याची आडकाठी क्वचितच येते. पृथ्वीवर ज्या ज्या देशांत गुलामगिरी अद्यापि कायम आहे, त्या त्या देशांत व विशेषेंकरून खिस्ती धर्म जेथें चालू आहे, तेथें, दासींना अथ[illegible] स्त्रीजातीच्या गुलामांना, एकप्रकारचा सर्व-मान्य हक्क असतो. ति[illegible] तिच्या पातिव्रत्याचा भंग करण्याचें मनांत आणिलें, तर [illegible] ह्मणावें. परंतु बायकोची गोष्ट अशी नाहीं!

IPP

दुर्दैवानें कसाही दुर्वृत्त, केवळ पशुतुल्य नवरा जरी तिला मिळाला, आपला हा द्वेष करितो, हें जरी तिला पक्कें ठाऊक असलें, तिचा केवळ नित्य छळ करण्यांतच ज्याला आनंद वाटतो, असा जरी तो मनुष्य असला, फार काय—अशा माणसाचा तिटकारा न येणें हें अगदीं अशक्य आहे असें जरी तिला वाटलें, तरीही मनुष्यप्राण्याची ज्यांत अत्यंत मानखंडना होते अशी गोष्ट करण्याचा, ह्मणजे तिच्या मर्जीविरूद्ध तिजपासून रतिसुख प्राप्त करून घेण्याचा त्यास पूर्ण अधिकार कायद्यानें दिलेला असतो! तिच्या शरीराच्या संबंधानें याप्रमाणें हा गुलामगिरीचा अत्यंत नीच प्रकार झाला! आतां तिचें व तिच्या धन्याचें. अशा उभयतांचें समान प्रेम ज्यांवर असतें, अशा तिच्या मुलांशीं कायद्यानें कोणत्या प्रकारचा संबंध ठेविला आहे पहा. मुलें कायद्याप्रमाणें एकट्या बापाची, त्यांजवर सर्व सत्ता, सर्व मालकी त्याची. आईला मुलांच्या संबंधानें कोणतीही गोष्ट त्यांच्या बापाच्या संमतीखेरीज व त्यानें ती मंजूर केल्याशिवाय करितांच येत नाहीं, तो मेल्यावरही ती त्याची कायदेशीर पालनकर्त्री नाहीं. त्यानें आपल्यामृत्युपत्रांतच जर लिहून ठेविलें असेल, तर मात्र तिला पालन करण्याचा अधिकार मिळतो. त्याला पाहिजे तर तीं मुलें त्यानें आपल्या बायकोपासून दूर नेऊन ठेवावीं, किंवा त्या मुलांस तिला कधींही भेटतां येणार नाहीं, किंवा त्यांशीं तिला पत्रव्यवहारही ठेवितां येणार नाहीं, अशी व्यवस्था त्याच्या इच्छेस आल्यास त्यानें करावी. तिला हूं कां चूं करण्याचा अधिकार नाहीं! अशी स्थिति तर कायद्यानें स्त्रियांची केली आहे. आणि अशा स्थितीपासून मुक्त होण्याचें साधनही तिच्या हातांत कांहींएक ठेविलें नाहीं. तिनें आपला नवरा जर सोडला तर आपलीं मुलें तिला आपल्याबरोबर नेतां येत नाहींत, एवढेंच नव्हे; तर, जें कायदेशीर रीतीनें तिचें आहे, तें सुद्धां तिला मिळत नाहीं!

त्याच्या मनांत येण्याचा अवकाश, कीं कायद्याच्या मदतीनें किंवा बळ-जोरीनें, एकाद्या पळून गेलेल्या ढोराप्रमाणें त्यास तिला बेलाशक परत आणितां येतें* ! तिनें मोलमजूरी करून व कष्ट करून जें मिळविलें असेल, किंवा तिच्या इष्टमित्रांनीं दया करून तिला जें कांहीं दिलें असेल, तें देखील त्यानें खुशाल बुचाडून घ्यावें. कायद्याची बिलकूल ना नाहीं. कैदी सुटून गेल्यामुळें संतापलेल्या ' तुरुंगाधिपती ' प्रमाणें खिजलेल्या नवऱ्याच्या कबजांत तिला पुनः जाणें नसेल, व आपण स्वकष्टानें संपादन केलेला पैसाआडका आपल्या उपयोगीं पडावा असें तिला वाटत असेल, तर तिनें कोर्टांत दावा केला पाहिजे व हुकुमनामा मिळविला पाहिजे. तेव्हांच तिला नवऱ्यापासून निराळें रहातां येतें. आणि असें न करितां जर ती निराळी राहील तर वीस वर्षांनंतर देखील तिचा नवरा पटकन् येऊन तिजवर झडप घालून तिच्या जवळ असेल नसेल तें सर्व बुचाडून घेऊन पळून गेला तरी तिचें कांहींएक चालत नाहीं. कोर्टाच्या मदतीनें मात्र विवाहसंबंध तोडितां येतो.

---

* प्रस्तुत स्थळीं दादाजी विरुद्ध रखमाबाई या खटल्याची आठवण आमचे वाचकांस झाल्याखेरीज रहाणार नाहीं. एखादें ढोर धन्याकडे जाण्यास खुषी नसतां त्या धन्यास तें ढोर जबरदस्तीनें पकडून आणून, आपल्या हवालीं करून घेतां यावें, त्याप्रमाणें रखमाबाईचा धनी जो दादाजी, त्याकडे जाण्यास ती खुषी नसल्या कारणानें न्यायमूर्तीसमोर दादाजीनें जावें, आणि " माझें पळपुटें ढोर माझ्या हवालीं जबरदस्तीनें करा, व तें नाहीं ह्मणेल तर, त्यास कोंडवाड्यांत तरी निदान अड-कावून टाका " असें ह्मणण्याचा हक्क ज्या कायद्यानें आमच्या इकडील नवऱ्यांस दिला आहे, त्या कायद्याची योग्यता वर्णन करावी तेवढी थोडीच ! यापेक्षां आमच्यानें अधिक कांहीं ह्मणवत नाहीं. तथापि प्रस्तुतस्थळीं इतका उल्लेख केल्याशिवाय आम-च्यानें राहवत नाहीं कीं आपणांस जुन्या चालींचा अत्यन्त मोठा अभिमान आहे असें जगास निरंतर भासविण्याचा यत्न करणारे ' केसरी'कार प्रो. बाळ गंगाधर टिळक यांस या कायद्याचा वीट येऊन तो अजीबात काढून टाकण्याविषयीं १८९१ चे दिसेंब-रांत नागपूर येथें जी " राष्ट्रीय सामाजिक परिषद " जमली होती तिजपुढें त्यांनीं निःशंकपणें सूचना आणिली होती.

पण ही कायदेशीर सोडचिठ्ठी मिळण्यास खर्च फार लागत असल्यामुळें श्रीमान् लोकांच्या बायकांशिवाय इतरांस ही गोष्ट अगदीं अशक्य असते. ती देखील नवऱ्यानें जर बायकोला टाकली असेल, किंवा तिला तो अत्यंत क्रूरतेनें व दुष्टपणानें वागवीत असेल, तरच मिळते. असें असतांही, प्रत्येक दिवशीं लोक हाका मारतात कीं, ही सोडचिठ्ठी मिळविणें फार सुलभ झालें आहे! खरोखर, अगोदर स्त्रीला समाजानें जुलमी धन्याचा बंदाचाकर होऊन रहाण्याशिवाय दुसरा कोणताच धंदा करण्याची मुभा ठेविली नाहीं. यामुळें तिचें सर्व सुख त्या धन्यावर अवलंबून रहाणार. अशा स्थितींत तिला धनी असा मिळाला कीं, तो तिला एखाद्या आवडत्या जनावरासारखा वागवील—केवळ ओझें लादण्याच्या जनावरासारखा वागविणार नाहीं—तर तिचें मोठेंच भाग्य समजावयाचें. परंतु अशा प्रकारचा धनी मिळविण्याची एकच संधि तिला देणें, ह्मणजे निष्ठुर होऊन तिच्या दुःखांत भर घालण्यासारखें नव्हे काय? तेव्हां या एकंदर प्रकारावरून असें अनुमान उघड निघतें कीं, आयुष्यांत तिचें सर्वस्व ज्या अर्थीं ‘ धनी चांगला मिळणें ’ या गोष्टीवर अवलंबून असतें, त्या अर्थीं तसा धनी मिळेपर्यंत एक बदलून दुसरा करण्याची तिला मुभा असावी. वस्तुतः तिला हा असा हक्क द्यावा, असें माझें ह्मणणें नाहीं. कारण, हा विचार अगदीं स्वतंत्र आहे. एक पति सोडून देऊन स्त्रीला दुसऱ्याशीं पुनः लग्न करितां* यावें या हेतूनें सोडचिठ्ठी मिळविण्याचा तिचा हक्क, हा विषय

---

* या प्रकारास इंग्रेजींत ‘डायव्होर्स’ असें नांव आहे. चालू विषयाशीं या विषयाचा प्रत्यक्ष संबंध नसल्यामुळें, निबंधकारानें फक्त त्याचा उल्लेख करून तो विषय सोडून दिला आहे. कारण तो एक स्वतंत्र विषय आहे.

या सोडचिठ्ठीच्या संबंधानें ता. १३ एप्रिल १८९६ चे इंदुप्रकाशांत पत्रव्यवहाराचे सदरांत आलेले एका गृहस्थाचे उद्गार प्रस्तुतस्थळीं संग्रह करण्यासारखे आहेत. ते गृहस्थ ह्मणतातः—ड्या लोकांत पुनर्विवाह करण्याची चाल बरेच दिवसांपासून रूढ आहे

माझ्या प्रस्तुत विषयास सोडून आहे. माझें ह्मणणें एवढेंच कीं, जिला गुलामगिरी किंवा दास्य पतकरण्याखेरीज समाजानें दुसरा मार्गच ठेविला नाहीं, तिला दास्यांतही निवडानिवड करण्याची मुभा ठेवणें, हें अंशतः तरी तिच्या दुःखाचें परिमार्जन करण्यासारखें आहे. आणि ही मुभा न ठेवणें, किंवा एवढाही अधिकार न देणें, ह्मणजे तिला पुरतेपणीं दास करण्यासारखें आहे, असें मी समजतों. कारण, ज्या देशांत गुलामगिरी चालते, तेथें, गुलामाच्या संबंधानें केलेल्या कायद्यांत, धन्यानें दासास अगदीं वाईट रीतीनें वागविलें असतां, तो दास दुसऱ्याला विकून टाकण्यास कायदा धन्याला भाग पाडितो. परंतु, आमच्या या सुधारलेल्या **इंग्लंडां**त बायकोला नवरा कितीही वाईट रीतीनें वागवित असला, तरी तींत व्यभिचाराची भर पडल्याखेरीज आपल्या गांजणाऱ्याच्या हातून त्या बिचारीची सुटका होण्यास मार्गच नाहीं !

२. मला अतिशयोक्ति करण्याची अगदीं इच्छा नाहीं, व अतिशयोक्ति करण्याचें कारणही दिसत नाहीं. स्त्रियांची कायद्याच्या दृष्टीनें जी खरो-

---

व ज्या लोकांत नवऱ्यानें बायकोस सोडचिठ्ठी देण्याची वहिवाट आहे, त्या लोकांमध्यें कधीं कधीं हट्टी नवरे आपले बायकोस विनाकारण त्रास देण्याचे इराद्यानें आपण होऊन बायकोस सोडचिठ्ठी देत नाहींत, त्यांस तशी देण्यास भाग पाडण्याविषयीं कायदा असल्यास चांगलें. कांहीं नवरे नपुंसक असतात, कांहीं महारोगी असतात व कांहीं निव्वळ खुळे असतात. त्यांपासून बायकांस संसार सुख मिळत नाहीं व त्यांचे नवरे त्यांस तें मिळवूं देत नाहींत, व कायदा आड येतो. हा जुलूम नव्हे काय ? जातीचे पंच पूर्वी एकत्र जमून अशी कांहीं भानगड पडल्यास योग्य तो निकाल करीत असत व त्या निकालाप्रमाणें लोकही ते वेळीं बिनतक्रार वागत असत. हल्लीं जसें आमचें राज्य गेलें त्याबरोबर आमचे सर्व अधिकारही गेले. तेव्हां आतां जातीचे पंचांस पुसतो कोण? सोडचिठ्ठी मिळविण्याकरितां दिवाणी कोडतांत दावा लावितां येत नाहीं. आमच्या हिंदुधर्मशास्त्रांत सरकारांनीं व न्यायाधीशांनीं पुष्कळ दुरुस्त्या केल्या आहेत. त्यांत मी वर दर्शविलेल्या संबंधानें एखादी दुरुस्ती झाल्यास पुष्कळ बायका सरकारास दुवा देतील.

खर स्थिती आहे, तिचें वर्णन मीं केलें. वास्तविक लोक आपल्या स्त्रियांस कोणत्या प्रकारें वागवितात, याबद्दल मी एक शब्दही लिहीत नाहीं. बहुतेक देशांतील कायदे, ते अमलांत आणणाऱ्या लोकांपेक्षांही वाईट असतात. ज्या कायद्यांची अंमलबजावणी करण्याचा कधींच प्रसंग येत नाहीं, असे कायदे बहुत काळपर्यंत केवळ नांवापुरतेच रहातात. माझें ह्मणणें असें आहे कीं, केवळ कायद्याच्या दृष्टीनें जर पाहिलें, तर कायदे ज्या पद्धतीचे आहेत तदनुसार विवाहितस्त्रीपुरुषांची स्थिति असती तर, खरोखर समाज ह्मणजे इहलोकींचें नरककुंड झालें असतें ! सुदैवानें अशी गोष्ट आहे कीं, माणसांत दुष्ट दुसऱ्याला पीडा करण्याविषयींची जी प्रवृत्ति असते, तिचें आकलन किंवा संयमन मनुष्यांमध्यें उत्पन्न होणाऱ्या साधुवृत्तींनीं होत असतें. या साधुवृत्तीचें उत्कृष्ट उदाहरण मुख्यत्वेंकरून स्त्रीपुरुषांचा साधारण जो परस्परसंबंध असतो, त्यावरून दृष्टीस पडतें. अशा सारखें दुसरें उदाहरण ह्मटलें ह्मणजे, त्यांचा आणि त्यांच्या मुलांचा परस्पर संबंध. हा संबंध किंवा हा पाश, पहिल्या ह्मणजे स्त्रीसंबंधाच्या पाशाला अधिक दृढ करतो. जी पूर्ण सत्ता पुरुषांस कायद्यानें दिली आहे, तिचा पूर्ण उपयोग बहुधा पुरुष करीत नाहीं. स्त्रियांस जितक्या वाईट रीतीनें त्यांस वागवितां आलें असतें, तितक्या वाईट रीतीनें ते वागवीत नाहींत. एवढ्यावरूनच चालू रूढीचे जे कैवारी आहेत, त्यांस असें वाटतें कीं, प्रस्तुत स्त्रीपुरुषसंबंधाच्या व्यवहाराची दुष्टता न्याय्य आहे ! आणखी, त्यांस असेंही वाटतें कीं, सध्यां जी रूढि आहे तिच्यांत जे दोष आहेत ते टाळण्यासारखे नाहींत, ह्मणून त्याबद्दल कुरकुर करणेंही व्यर्थ आहे. कारण, प्रत्येक चांगल्या गोष्टीच्या मागें वाईट गोष्ट लागलेलीच आहे !* हा किंवा दुसरा कोणत्याही प्रकारचा

* आपल्या भाषेंत एक ह्मण आहे 'गुळाच्यामागें डोंगळे असतातच'! इंग्रेजींतही एक ह्मण आहे कीं, 'कांट्याशिवाय गुलाब नाहीं'

जुलमी कायदा पूर्ण अमलांत राहूनही माणसांची खरोखर वागणूक बऱ्याच सौम्यपणाची असणें हें संभवतें. परंतु यावरून जो जुलुमाचा प्रकार आहे, तो कायमच राहणें इष्ट आहे व योग्य आहे, असें मात्र सिद्ध होत नाहीं. कितीही वाईट रूढि प्रचारांत असल्या, तरी त्यांच्यांशीं टक्कर देण्याची किंवा झुंज खेळण्याची शक्ति मानवी स्वभावांत विलक्षण आहे, एवढेंच काय तें सिद्ध होतें. राज्यव्यवस्थेंत जुलमाच्या प्रकाराचें मंडन करण्याकरितां जें प्रतिपादन करितां येईल, तेंच प्रतिपादन कुटुंबव्यवस्थेंतल्या जुलुमाचें मंडन करण्याकरतां येणार आहे. प्रत्येक जुलमी राजा आपल्या राजवाड्याच्या खिडकींत बसून आपल्या पीडित प्रजांचे सुस्कारे किंवा हुंदके ऐकून आनंद पावतो किंवा प्रजाजनांच्या शरीरावरील जीर्ण झालेलीं रकटीं हिसकावून घेऊन, रस्त्यांत त्यांनीं हिंवांत कुडकुडत रहावें ह्मणून त्यांस हांकून देतो; अशांतला प्रकार थोडाच घडतो. **फिलिप् लीवेल्**, अथवा **नादिरशहा**, किंवा **क्यालिग्यूला** या इतिहासप्रसिद्ध जुलमी बादशहांच्या बरोबरीचा जुलूम **फ्रान्स**चा **सोळावा लुई** यानें केला असें नाहीं. तथापि **फ्रान्सदेशां**त जें प्रसिद्ध बंड झालें, तें होण्यापुरता **लुई** यानें केलेला जुलूम बस्स झाला. आणि त्या बंडाच्या धामधुमींत कांहीं कांहीं कृत्यें घडलीं, तीं जरी फारच भयंकर व निंद्य होतीं, तरी तींही **लुई**च्या जुलमापुढें फिक्कींच पडण्यासारखीं होतीं !*

बायका व त्यांचे नवरे यांमध्यें असणारें परस्पर अलौकिक प्रेम उदाहरणास घ्यावें तर, गुलामांच्या इतिहासांतही अशीं उदाहरणें

* **फ्रान्स**देशांत राजक्रांतीस अनुलक्षून, प्रस्तुतस्थळीं निबंधकारानें जें ह्मटलें आहे, तेंच आमच्या या देशांत इ० स० १८५७ या सालीं शिपायांनीं जें बंड केलें त्याच्या संबंधानेंही ह्मणतां येईल, हें मर्मज्ञ वाचकांच्या लक्षांत आल्यावांचून रहाणार नाहीं.

आढळतात. **ग्रीस** व **रोम** यांच्या इतिहासांत असें आढळतें कीं, दास, आपल्या धन्याचा विश्वासघात करण्यापेक्षां प्रसंग पडल्यास आपले हाल हाल करून घेत व मरण्यासही राजी होत. **रोमन** लोकांत आपसांत तंटे माजले व मोठमोठ्या माणसांचा छल होऊं लागला. कित्येकांस देहांत प्रायश्चित्तें मिळालीं. कित्येकांस देश सोडून जावें लागलें. अशा धामधुमींत प्रत्येक पुत्रानें आपल्या बापाचा विश्वासघात केला, अशीं उदाहरणें आढळतात. परंतु **रोमन** स्त्रिया व दास यांनीं विलक्षण शौर्य, पतिनिष्ठा व स्वामिभक्ति दाखविली. असें असतांही पुष्कळ **रोमन** लोक आपल्या दासांस निष्ठुरपणानें व निर्दयपणानें वागवीत, असें इतिहासावरून स्पष्ट दिसतें, परंतु याविषयीं आपणास इतकें नवल वाटण्याचें कारण नाहीं. कारण, स्वामिनिष्ठा, पतिनिष्ठा, राजनिष्ठा, अशा प्रकारचे हे तीव्र मनोधर्म माणसांच्या मनांत जे उत्पन्न होतात, ते विशेषेंकरून ज्या ठिकाणीं अत्यंत दुष्ट व भयंकर अशा चाली पडल्या आहेत, त्या ठिकाणीं उत्पन्न होतात; व त्यांची तीव्रताही फार असते. या संसारांत जे अनेक चमत्कार आहेत, त्यांतलाच हाही एक चमत्कार आहे कीं, ज्यांच्या हातांत दुसऱ्यास अगदीं जमीनदोस्त करून टाकितां येईल, अशी 'कर्तुमकर्तुमन्यथाकर्तुं' सत्ता असते, असे जे सत्ताधीश त्यांनीं आपण होऊन त्या भयंकर सत्तेचा उपयोग केला नाहीं.—तर जे त्या सत्तेला वश असतात, ह्मणजे ज्या माणसांवर त्यांची ती सत्ता चालण्यासारखी असते, त्या माणसांच्या ठिकाणीं अत्यंत भक्तियुक्त अशी कृतज्ञताबुद्धि उत्पन्न होते! बहुतेक पुरुषांच्या व्यवहारांत हा भाव किंवा हा आशय, धर्मश्रद्धा व धर्मनिष्ठा अशा कामांत देखील किती ओतप्रोत भरून राहिलेला असतो, या गोष्टीचा विचारच न करणें हें बरें! फार काय, आपण प्रत्यहीं असें पहातों कीं, देवाची आपणावर जशी

कृपा आहे, तशी आपल्या शेजाऱ्यांवर नाहीं, असा विचार मनांत आणूनच पुष्कळ लोक देवाचे आभार मानितात असें दिसतें!*

३. ज्या रूढीचें मंडन करावयाचें आहे, ती गुलामगिरी असो, अथवा अनियमित राजसत्ता असो, किंवा कुटुंबाचा जो धनी त्याची अनियंत्रित सत्ता असो—त्या रूढीचे जे कैवारी असतात, ते त्या त्या रूढीचीं चांगलीं उदाहरणें मात्र पुढें मांडून त्यांच्यावरून त्या त्या रूढीची योग्यायोग्यता ठरवूं पहातात! त्यांच्या प्रतिपादनाचा बहुधा प्रकार असा असतो. 'अहो, अमका अमका पुरुष आपला अधिकार कसा सदय अंतःकरणानें बजावीत आहे पहा! आणि त्याच्या हाताखालचीं माणसें तरी पहा. किती नम्रतेनें व प्रेमानें धन्याशीं वागतात! तो धनी तरी आपल्या आश्रित मनुष्यांचें ज्यांत अत्यंत हित होईल, अशाच गोष्टी करितो. काय त्याच्या भलेपणाचें व शहाणपणाचें वर्णन करावें! त्याचीं चाकरमाणसें तरी कशीं नेहमीं हास्यमुख असतात व धन्यास दुवा देत असतात!' हें सर्व खरें. परंतु हें ह्मणणें केव्हां सयुक्तिक होईल? 'या जगांत चांगलीं माणसेंच नसतात,' असें जो प्रतिपादन करील, त्यास हें उत्तर देणें ठीक आहे. मनुष्यच जर मुळीं उत्तम असेल, तर त्याच्या अनियंत्रित अधिकाराखालीं असणारीं मनुष्यें फार सुखी असतील, भलीं असतील, व प्रेमळ असतील. आणि सर्व कांहीं यथास्थित असेल. याबद्दल संशय कोणाला आहे? पण हें लक्ष्यांत ठेविलें पाहिजे कीं, कायदेकानू व रीतिभाती सत्पुरुषांच्या-

---

* केरळकोकिळ या नांवाच्या मासिक पुस्तकाचा एक अंक चाळीत असतां 'अमेरिकेंतील भयंकर अनर्थ' या सदराखालीं ता० ६ जून सन १८९२ रोजीं अमेरिकेमध्यें एक मोठा अनर्थ घडला आणि पुष्कळ जीवांची हानि झाली. त्या हृदयद्रावक प्रसंगाचें वर्णन करीत असतां त्या पुस्तकाचे संपादक आरंभीं ह्मणतातः— "जगदीशानें तेथील लोकांवर एवढा क्षोभ कां केला तें समजत नाहीं" व सरतेशेवटीं ह्मणतातः—"आपल्या आर्यावर्तावर असा प्रसंग येत नाहीं ही परमेश्वराची केवढी कृपा आहे बरें?"

करितां नव्हत, तर दुर्जनांकरितां आहेत. त्यांतून असें पाहिलें पाहिजे कीं, एक तर विवाहपद्धति जी आहे, ती थोड्या माणसांपुरतीच नाहीं. दुसरें असें कीं, विवाहविधि होण्यापूर्वीं दुसऱ्यावर पूर्ण अधिकार योग्य रीतीनें चालविण्यास हीं माणसें लायक आहेत, अशा प्रकारचे लेखी दाखले पुरुषांपासून कोणी मागत नाहीं!

असा एक साधारण नियम आहे कीं, ज्यांच्या अंतःकरणांत साधारण भूतदया किंवा प्राणिमात्रांविषयीं प्रेम अधिक असतें, त्यांचें प्रेम आपल्या बायकांमुलांवरही विशेष असतें. असेही पुष्कळ पुरुष आढळतात कीं, त्यांस आपली बायको व आपलीं मुलें यांच्याखेरीज कोणत्याच प्रकारचे पाश नसतात. ह्मणजे, इतर प्राण्यांविषयीं त्यांना मुळींच कळकळ वाटत नाहीं. पुरुषांमध्यें सुष्टपणाचे आणि दुष्टपणाचे जसे अनेक प्रकार आढळतात, तशी भूतदयाही कमजास्त प्रमाणानें आढळते. ही भूतदया कमी होतां होतां शेवटीं असा एक वर्ग असतो कीं, त्या वर्गांतल्या माणसांचीं हृदयें अगदीं शुष्क असतात. हीं पूर्ण तमोगुणी, ह्मणजे माणसें अत्यंत कठोर अंतःकरणाचीं व निर्दय असून, त्यांस कोणत्याच सामाजिक पाशाचें बंधन नसतें. या माणसांस दाबांत ठेवण्याकरितां समाजाला अगदीं शेवटला उपाय करावा लागतो. ह्मणजे, कायद्यांत सांगितलेल्या शिक्षेच्या द्वारानेंच त्यांस प्रतिबंधांत ठेवावें लागतें! अशा निंद्य स्वभावाचीं जीं माणसें असतात, त्यांच्याही हातांत नवरेपणाचे कायदेशीर हक्क दिलेले असतात! प्रत्येक नीच व दुष्ट मनुष्याचे हातांत एक तरी दुर्भाग्य अशा स्त्रीचा गळा दिलेला असतोच. आणि तिजवर त्याची अशी सत्ता असते कीं, एक तिचा जीव घेण्याखेरीज इतर पाहिजे तो जुलूम त्यानें तिजवर करावा. फार काय, जर तितकी सावधगिरी राखील, तर कायद्याच्या शिक्षेंत न सांपडतां, तिचा जीवही तो घेऊं शकेल! प्रत्येक देशांत नीच जातींमध्यें असे हजारों लोक असतात

कीं, दुसऱ्या कोणत्याहि बाबतींत कायद्याच्या दृष्टीनें ते गुन्हेगार होत नाहींत. परंतु दुसरीकडे कोठें अंमल चालत नाहीं ह्मणून, आपल्या दुर्दैवी बायकोच्या अंगावर हात टाकण्यांत, व तिचा अत्यंत निंद्य प्रकारें छल करण्यांतच नेहमीं आनंद मानतात. कारण, एक तर ती अबला, व विवाहाच्या चमत्कारिक संबंधामुळें बद्ध असल्याकारणानें त्याच्या त्या पशुतुल्य आचरणापुढें त्या बिचारीचें कांहींएक चालत नाहीं. ती सर्वस्वी त्याजवर अवलंबून असल्यामुळें, त्याच्या नीच व रानटी स्वभावास उत्तेजन येतें. वस्तुतः ही सर्वथा पराधीन आहे, असा विचार त्याच्या मनांत येऊन त्यानें सहनशील व सदय असावें, व जिनें आपलें जीवित विश्वासानें आपल्या हवालीं केलें, तिजशीं त्यानें ममतेनें व स्नेहपूर्वक वागावें. परंतु असें न होतां त्याच्या मनाची समजूत उलट झालेली असते. त्याला वाटतें, "या वस्तूचा कायदेशीर मालक मी, व माझ्या खुषीस येईल त्याप्रमाणें मी तिचा उपयोग करीन, व इतर लोकांशीं जसा आर्जवानें, सभ्यतेनें व चांगुलपणानें मी वागतों, तसा बायकोशीं कां ह्मणून वागेन?" कुटुंबांत घडून येणाऱ्या जुलमाची परमावधि होत असतां, पुष्कळ दिवसपर्यंत त्या जुलूम करणाऱ्या गुन्हेगारास शिक्षा करण्याचा कांहींच मार्ग कायद्यांत नव्हता. अलीकडे थोड्या वर्षांपासून अशा प्रकारच्या जुलमाचा प्रतिबंध करण्याचा मळमळीत यत्न कायद्यानें केला आहे. ही गोष्ट जरी खरी आहे, तथापि तो यत्न सर्वथा निष्फळ होय, असें ह्मटलें तरी चालेल. आणखी, असें होणें यांत कांहीं नवलही नाहीं. कारण, जोंपर्यंत गरीब बिचारी गाय खाटकाचे हातांत आहे, तोंपर्यंत त्याची ती हिंसक व पशुतुल्य वृत्ति प्रतिबंधांत ठेवितां येईल, असें समजणें ह्मणजे निवळ भ्रांति नव्हे काय?

आपल्या बायकोच्या शरीराला इजा केल्याचा गुन्हा नवऱ्यावर शाबीद झाल्याबरोबर—निदान प्रथम एकदां त्यानें बायकोस मारल्याचा

गुन्हा त्याजवर शाबीद होऊन तोच अपराध त्यानें पुनः केला, असें सिद्ध झालें कीं, त्या बायकोला सोडचिठ्ठी मिळण्याचा अथवा दुसरा नवरा करण्याचा हक्क असावा. निदान त्या नवराबायकोचा लग्नसंबंध तरी कायद्यानें तोडून टाकावा. आणि जोंपर्यंत असा कायदा होणार नाहीं तोंपर्यंत—हल्लींच्या कायद्यांत स्त्रीला जो इलाज ह्मणून ठेविला आहे, तो नुसता नांवाला आहे, त्याचा कांहींएक उपयोग होत नाहीं. कारण, एक तर बायकोला मारणें तें वाजवीपेक्षां जास्ती किंवा फाजील मारणें कायद्यास लागत असतें; व दुसरें, फिर्यादीचे कामीं येणाऱ्या अनेक अडचणींमुळें फिर्यादीच्या खटपटींत स्त्रिया बिचाऱ्या पडतच नाहींत. याचा परिणाम अर्थात् असा होतो कीं, स्त्रिया आपलीं दुःखें निमूटपणें गिळून टाकतात.

४. कोणत्याही मोठ्या देशांत अगदीं पशूसारख्या माणसांची संख्या केवढी मोठी असते, व वैवाहिक संबंधाच्या कायद्याच्या द्वारानें, एक तरी बळी या नरपशूंच्या हस्तगत होणें किती साहजिक असतें, या गोष्टीचा विचार केला असतां, प्रस्तुतच्या दुष्ट व्यवस्थेमुळें मानवी जातीच्या विपत्तीचा विस्तार फारच भयंकर होत जातो, हें सहज लक्ष्यांत येणार आहे. वर निर्दिष्ट केलेलीं उदाहरणें ह्मणजे अगदीं परमावधीचीं होत. हीं उदाहरणें ह्मणजे मानवजातींतील अगदीं गाळ ह्मटला तरी चालेल. परंतु याहून कमी कमी होत जाणारे प्रकार, किंवा थरांवर थर, हे मानवजातींत आहेतच. गृहव्यवस्थेंत आढळणारा जुलूम काय, किंवा राज्यकारभारांत घडणारा जुलूम काय, प्रकार एकच!—जुलूमी व सर्वसत्ताधीश मनुष्यें कोणती भयंकर गोष्ट केव्हां करतील याचा नेमच नसतो. सर्वगुणसंपन्न साधुपुरुष जसे विरळा, त्याप्रमाणेंच निव्वळ पिशाचस्वरूपाचीं किंवा राक्षसस्वरूपाचीं माणसेंही विरळा! परंतु भयंकर जंगली माणसें कीं ज्यांची वृत्ति बहुतेक हिंसक पशुतुल्य

असून, प्रसंगविशेषीं ज्यांच्यांत मनुष्यपणाची उगीच छाया मात्र भासते, अशाच माणसांची संख्या जगांत जास्त आढळते. मनुष्यजातीचे उत्तम मासले—ह्मणजे ज्यास आपण केवळ 'देवमाणसें' ह्मणतों, अशा माणसांमध्यें व अत्यंत नीच ह्मणजे अगदीं राक्षसवृत्तीचीं माणसें त्यांच्या-मध्यें, अनेक प्रकार व अनेक नमुने असतात. कांहीं बाहेरून मोठे साळसूद, दयाळू, भले, प्रतिष्ठित असे दिसतात. अशा माणसांच्या अंमलांत किंवा कचाट्यांत जोंपर्यंत एखादा मनुष्यप्राणी सांपडला नाहीं, तोंपर्यंतच त्यांचा संभावितपणा ठीक असतो. परंतु त्यांचा खरा स्वभाव ज्या हतभाग्य प्राण्यांस त्यांच्या सत्तेंत रहावें लागतें, त्यांस विचारावा! त्यांचें दुःख त्यांसच ठाऊक. बिचाऱ्यांस खरोखर जिवाचा कंटाळा आलेला असतो. फार मागील काळापासून इतिहास पाहिला तर सत्तेचा दुरुपयोग पुरुष कसा करतात, व बहुतेक माणसें अधिकारापन्न झालीं असतां, सत्तारूप मदानें अंध होऊन जाऊन कसकसे थेर करितात, हें आमच्या वाचकांपैकीं बहुतेकांस विदित असेलच. तेव्हां त्या गोष्टीच्या सिद्धतेकरितां प्रत्यक्ष उदाहरण देण्याचें कारण दिसत नाहीं. त्यांतून असें पहा कीं, ज्या सत्तेचा विचार प्रस्तुत आपण करीत आहों, ती सत्ता एखाद दुसऱ्या पुरुषास मिळते, अशांतली गोष्ट नाहीं; तर प्रत्येक वयांत आलेल्या पुरुषास ती प्राप्त होते. मग तो अत्यंत नीच व भयंकर स्वभावाचा कां असेना? त्यासही ती मिळणारच. कोणताही पुरुष, बाह्यतः मोठा धर्मशील दिसतो. व्यवहारांत ज्याच्यावर त्याची कोणत्याही प्रकारची सत्ता ह्मणून चालणार नाहीं, अशा माणसाशीं तो मोठ्या प्रतिष्ठितपणानें किंवा संभावितपणानें वागतो. किंवा जीं माणसें तो वांकवील तशीं वांकण्याला बांधलेलीं नाहींत, अशा माणसांबरोबर नीट वागतो. क्रोधाच्या ऐन भरांत येऊन, त्यांच्या अंगावर धांवून

जात नाहीं; एवढ्यावरून गृहस्थाश्रमाच्या निर्बंधावस्थेंत त्याचें वर्तन कोणत्या प्रकारचें असेल, याची कल्पना करणें अशक्य आहे. अगदीं सामान्य प्रकारचीं माणसें देखील आपली क्रूर, तामसी व निवळ स्वार्थसाधक, अशी वृत्ति परक्यापाशीं प्रकट न करितां, ज्या कोणावर त्यांची सत्ता चालेल, व ज्यास त्या सत्तेचा प्रतिकार करण्याचें सामर्थ्य नाहीं, अशा माणसाशींच प्रसंग पडल्यास प्रकट करितात. अशा प्रकारचे जे दुर्गुण माणसांच्या प्रकृतींत असतात, त्यांचा मुख्य उगम ह्मटला ह्मणजे, वरिष्ठ व कनिष्ठ यांचा परस्पर संबंध. ज्या ज्या ठिकाणीं हे दुर्गुण दृष्टीस पडतात, त्या त्या ठिकाणीं त्यांची उत्पत्ति सेव्यसेवकभावापासून उत्पन्न झालेली आहे, असें समजावें. आपल्याबरोबरीच्या माणसांशीं जो मनुष्य तुसडेपणानें अथवा दुर्वृत्तपणानें वागतो, तो मनुष्य बहुधा आपल्याहून कनिष्ठ प्रतीच्या लोकांत राहिलेला असतो, असें आढळतें. कारण, ज्यांस धाक दाखवून व त्रास देऊन आपल्या अंकित करून ठेवितां येईल, अशाच लोकांच्या सहवासांत त्याचा जन्म गेलेला असतो. लोक ह्मणतात कीं, उत्कृष्ट कुटुंब ह्मणजे भूतदया, अंतःकरणाचा कोमलपणा, निःसीम प्रेम, स्वार्थपराङ्मुखता इत्यादि सद्गुणांची केवळ एक शाळाच असते! अशी जरी लोकांत ह्मण आहे, तरी वारंवार असें पहाण्यांत येतें कीं, कुटुंबाचा जो मुख्य अधिपति, किंवा पुढारी असतो, त्याच्या संबंधानें पहातां, कुटुंब ह्मणजे हटवादीपणा, उन्मत्तपणा, जुलूम व अमर्याद, मूर्तिमंत असा आपमतलबीपणा, अशा अनेक दुर्गुणांचीच एक शाळा असते, असें ह्मणण्यास हरकत नाहीं! बायको व मुलें यांच्याविषयीं काळजी घेणें, ह्मणजे त्याचा इतकाच अर्थ समजावयाचा कीं, त्या पुरुषाच्या स्वतःच्या पदार्थांची व मालमिळकतीची काळजी घेणें, यापेक्षां कांहीं जास्त नाहीं! फार काय, त्या कुटुंबांतील

व्यक्तिमात्राच्या सुखाचा विचार केला असतां, अगदीं बारीकसारीक गोष्टींमध्येंही तें सर्वथा मुख्य यजमानाच्या मर्जीवर अवलंबून असतें; ह्मणजे, त्याच्या मर्जीस आलें, तरच त्यांस तें मिळतें, नाहीं तर मिळत नाहीं. प्रस्तुत जी रूढि चालू आहे, ती जोंपर्यंत कायम राहील तोंपर्यंत, आहे यापेक्षां चांगली स्थिति कोठून येणार? मनुष्यस्वभावाच्या दुष्ट प्रवृत्ति पाहिजे तशा बहकूं दिल्या नाहींत, किंवा खवळूं दिल्या नाहींत तरच त्या कांहीं मर्यादित रहातात, ही गोष्ट आपणास माहितच आहे. आणि ज्याला दुसरे लोक वश किंवा नम्र होऊन रहातात, तो आपलें घोडें बहुधा पुढें पुढेंच ढकलीत जातो! असें हें त्याच्या हातून बुद्धि-पुरःसर जरी घडलें तरी 'मऊ सांपडलें ह्मणजे, खणीतच जावयाचें, किंवा ऊंस गोड लागला ह्मणजे, मुळासुद्धां उपटून खाऊन टाकावयाचा' या ह्मणी प्रमाणें करणें, ही आपली मनुष्यमात्राला संवयच लागून गेलेली असते. हेंही आपणास ठाऊक नाहीं असें नाहीं. परंतु असा हा दडपून नेण्याचा क्रम बहुत कालपर्यंत चालत नाहीं. त्याची मजल थोडक्यांतच आटपते. कारण, मनुष्याच्या सहनशक्तीसही कांहींएक मर्यादा असतेच. त्या मर्यादेचें उल्लंघन झालें ह्मणजे, वश झालेल्या माणसास विरोध करणें भाग पडतें.* मनुष्याची सर्वसाधारण प्रवृत्ति तर पडली अशा प्रकारची! तेव्हां, प्रस्तुतच्या सामाजिक व्यवहारांत प्रत्येक पुरुषास बहुतेक अनियंत्रित अशी जी सत्ता, दुसऱ्या एका मानवी प्राण्यावर (स्त्रीवर) दिलेली असते—आणखी तीही कोणावर, तर ज्या मानव प्राण्याशीं त्याचा निरंतर सहवास असतो, व जो प्राणी त्याच्या नेहमीं डोळ्यांसमोर असतो, त्याच प्राण्यावर तिचा परिणाम काय होतो तो पहा.—ती सत्ता त्या पुरु-

---

* प्रस्तुत स्थळीं, निबंधकारानें जें एक साधारण तत्त्व किंवा जो एक सामान्य नियम सांगितला आहे, त्याचें उत्कृष्ट उदाहरण मर्मज्ञ वाचकांच्या डोळ्यांसमोर तत्काळ उभें रहाणारें असें ह्मटलें ह्मणजे, १८५७ सालची धामधूम! या संबंधानें फ्रान्स देशांतील राज्यक्रांति हीही दुसरी एक ऐतिहासिक गोष्ट ध्यानांत आणण्यासारखी आहे.

षाच्या प्रकृतिरूप मंदिराचे जे फार दूरदूरचे कोनेकोंपरे असतील, त्यांत छपून राहिलेलीं जीं अप्पलपोटेपणाचीं बीजें, तीं हुडकून काढून बाहेर आणते. अथवा, स्वार्थसाधूपणा हाच कोणीएक अग्नि ह्मणा. तो विझून जाऊन, त्याची जी राख राहिली असेल, त्या राखेमधून, जे थोडेथोडे विझलेले निखारे सांपडतील, किंवा त्या निखाऱ्यांतून ज्या अतिशय मंद अशा ठिणग्या उडत असतील, त्यांस ही द्वाड सत्ता वारा घालून, पुनः तो अग्नि प्रज्वलित करिते! त्या पुरुषाची मूळची खरी प्रकृति परक्यांस कळून येत नाहीं. कारण, तिचा बराच अंश, तो परक्यांशीं व्यवहार करीत असतां, मुद्दाम दाबून ठेवीत असतो. पण ही समाजानें दिलेली सत्ता त्याच्या हातांत न राहती तर आपल्या स्त्रीच्या व्यवहारांतही तो पुरुष आत्मसंयमन करता; आणखी, त्याची मूळची प्रकृति अगदीं बदलून जाती. परंतु, या सत्तेच्या योगानें त्याच्या प्रकृतींतल्या दुर्गुणांस पुष्टि मिळून, उलट उत्तेजन मिळतें!

या प्रश्नास दुसरी एक बाजू आहे, हें मी जाणतों. बायकोला जेथें नवऱ्याशीं विरोध करितां येत नाहीं, किंवा तिच्या विरोधाचा जेथें उपयोग होत नाहीं, अशा ठिकाणीं 'जशास तसें' या न्यायानें तिला वागतां येईल, हें मी कबूल करितों. अशा जोडप्यांत पुरुषाचें जीवित जितकें दुःखमय व कष्टमय करितां येईल तितकें करण्याचें बायकोच्याही हातांत असतें. आणि हें बळ तिला अनुकूळ असल्यामुळें, ज्या गोष्टींमध्यें खरोखर तिचा पगडा चालावा व ज्या गोष्टींमध्यें चालूं नये, अशा दोन्ही प्रकारच्या गोष्टींमध्यें तिचा पगडा चालतो. परंतु, स्वसंरक्षणाचें हें जें एक हत्यार तिच्या हातात असतें—ज्या हत्याराला 'कजाग बायकोचें हत्यार' असें ह्मणतां येईल, व अशा हत्याराचा उपयोग करणाऱ्या शिरजोर बायकांना कृत्या, कैदासिणी, त्राटिका, कैकेयी अशा प्रकारचीं नांवें व्यवहारांत देतात—त्या हत्यारांत एक मोठा घातक दोष असतो.

तो असा कीं, या हत्याराचा उपयोग, जो नवरा अगदीं गरीब व मुळींच जुलूम न करणारा, अशावरच तें विशेष चालतें; व तेंही अत्यंत अयोग्य अशा चाकर माणसांच्या बऱ्याकरितां! दुसरी आणखी एक अशी गोष्ट असते कीं, वास्तविक ज्या नीच बायकांच्या हातांत हें हत्यार देण्याची मुळींच सोय नाहीं, अशा नीच बायकांच्या हातांत विशेषें करून तें हत्यार जात असतें. कारण, बहुधा तामसी, हट्टी व द्वाड अशाच बायकांचें हें शस्त्र असतें. ह्मणजे, पुरुषांस मिळालेली सत्ता ज्यांच्या हातांत गेली असतां, ज्यांच्या हातून खचित तिचा दुरुपयोग होईल, अशाच बायकांच्या हातांत ती सत्ता जात असते. ज्यांचीं मनें कोमल व प्रेमळ असतात, अथवा ज्यांच्यांत स्वाभाविक सौजन्य असतें, अशा स्त्रियांच्या हातून वर सांगितलेल्या हत्यारांचा कांहींच उपयोग होत नाहीं. आणि, ज्या स्त्रिया थोर व उदार मनाच्या असतात, त्या अशा प्रकारच्या हत्यारांस तुच्छ मानितात. आणि उलट पक्षाच्या बाजूनें पाहिलें तर, ज्या नवऱ्यांविरुद्ध या हत्यारांचा उपयोग मोठ्या जारीनें करण्यांत येतो, ते नवरे बहुधा सौम्य व शांत स्वभावाचे असे असतात. दुसऱ्यांनीं चिडविलें असतांही आपल्या अधिकाराचा विशेष कडक रीतीनें उपयोग करून घेण्याचें ज्यांच्या मनांत येतच नाहीं, अशा प्रकारचे ते नवरे असतात. नवऱ्याला त्रास देण्याचें जें बळ बायकोस असतें, त्याचा परिणाम एवढाच होतो कीं, उभयपक्षींही लठ्ठालठ्ठी सुरू होते! आणि कधींकधीं तर असें होतें कीं, ज्या नवऱ्यापासून मुळींच कांहीं त्रास किंवा उपद्रव बायकोस होत नाहीं, किंवा जुलुमी होण्याची ज्या नवऱ्यांमध्यें फारच थोडी प्रवृत्ति असते, असे नवरे कजाग बायकांच्या जुलुमाला बळी पडतात!

५. तर मग या सत्तेपासून होणारे जे दुष्परिणाम त्यांना सौम्य करणारें असें व्यवहारांत असतें तरी काय? व अशी ही सत्ता

पुरुषांच्या हातांत असतांही वस्तुतः जितका भलेपणा किंवा चांगूलपणा आपणास जगांत दिसतो, त्याचीं कारणें काय, असतात? स्त्रियांच्या नुसत्या चोचल्यांचा कांहीं कांहीं व्यक्तींवर जरी बराच परिणाम होतो, तथापि वर सांगितलेल्या साधारण ज्या प्रवृत्ति त्यांवर ह्मणण्यासारखा विशेष परिणाम होत नाहीं. कारण, स्त्रीचे ते नखरे किंवा ते चोचले यांचें सामर्थ्य, जोंपर्यंत ती स्त्री तरुण व मोहक असेल तोंपर्यंतच टिकतें! कधीं कधीं तर, जोंपर्यंत त्यांत कांहीं नवेपणा असतो व निकट संबंधानें किंवा अतिपरिचयाच्या योगानें तिच्या सौंदर्याचें मृगजळ नष्ट झालें नाहीं, तोंपर्यंतच टिकतें! असेही पुरुष हरीचे लाल आढळतात कीं ज्यांच्या मनावर स्त्रियांच्या सौंदर्याचा परिणाम मुळींच घडत नाहीं! तेव्हां, अधिकाराच्या योगानें जुलूम करण्याची जी नैसर्गिक प्रवृत्ति असते, ती प्रवृत्ति कमी होण्याचीं किंवा क्षीणबल व सौम्य होण्याचीं खरीं कारणें निराळींच असतात. तीं कशीं व कोणचीं असतात, याचें केवळ दिग्दर्शन मी येथें करितों. एक तर दोन व्यक्तींमध्यें कालेंकरून वाढणारी परस्पर ममता होय.—इतकें मात्र खरें कीं, त्या पुरुषाच्या स्वभावांत ममतेचें कांहीं बीज मूळचेंच असलें पाहिजे आणि त्या स्त्रीचीही मूळची प्रकृति त्याच्याठायीं ममत्व उत्पन्न करण्यासारखी असली पाहिजे. दुसरें, मुलांविषयीं स्त्रीपुरुषांचें परस्पर—सामान्य अशा प्रकारचें प्रेम. त्याचप्रमाणें तिऱ्हाईत माणसाच्या संबंधानें उभय—सामान्य, ह्मणजे उभयतांच्या हिताचे, असे जे पाश, तेही अनेक प्रकारें कारणीभूत होतात. त्यांतही कमीजास्त प्रकार असतातच. तिसरें कारण असें आहे कीं, पुरुषाच्या नित्त्याच्या सोयीला, सुखाला व उपभोगाला स्त्रीची फारच अवश्यकता असते. यामुळें, केवळ स्वहिताकडे दृष्टि देऊन व स्वसुखाच्या अपेक्षेनें तो बायकोची जी किंमत समजत असतो, तीही लक्षांत आणली पाहिजे. त्या पुरु-

षाचें अंतःकरण कोमल असलें, ह्मणजे दुसऱ्याच्या दुःखानें दुःखित होणारें असलें, तर तो कालेंकरून आपल्या स्त्रीवर, केवळ स्वसुखाचीच अपेक्षा न धरितां, प्रेम करूं लागतो. ह्मणजे, त्याच्या त्या प्रेमास निर्मळ, शुद्ध व उदात्त असें स्वरूप प्राप्त होतें. सरतेशेवटीं, अशीही गोष्ट ध्यानांत ठेविली पाहिजे कीं, बहुतेक सर्व मानवी प्राण्यांवर नेहमीं त्यांच्याजवळ असणाऱ्या माणसांचें साहजिकच वजन अधिक असतें.* तीं जवळचीं माणसें त्यांस खरोखर अप्रिय होणारीं अशीं मात्र नसलीं पाहिजेत. नवरा व बायको यांचें परस्पर सान्निध्य इतर माणसांपेक्षां अधिक असतें, हें सर्वांस माहितच आहे. तेव्हां, हीं जवळचीं माणसें कधींकधीं प्रत्यक्ष विनवण्यांनीं, व कधींकधीं आपले मनोविकार आणि आपले स्वभाव यांच्या अपरिज्ञात संसर्गानें, आपल्या धन्याच्या वर्तनावर विलक्षण व अयोग्य अशा प्रकारची सत्ता प्राप्त करून घेतात. असो. अशा अनेक साधनांनीं, बायको आपल्या नवऱ्यावर आपला पगडा, वाजवीपेक्षां फाजील बसविते, अशीं अनेक उदाहरणें आढळतात. नवऱ्यावर तिचा पगडा बसल्यामुळें ज्या कामांत तिच्या सल्लामसलतीपासून कांहींएक चांगलें होण्याचा संभव नसतो अशा कामांतही नवरा तिच्या सल्लामसलतीस अनुसरून चालत असतो. अशा प्रसंगीं कदाचित् असेंही घडतें कीं, तिचा अभिप्राय खरोखर

* नवराबायकोंचा मुळींच छत्तीसाचा आंकडा असला, व एकमेकांस खरोखर तीं पाण्यांत पहात असलीं, तरी बायकोला नवऱ्याची सत्ता सौम्य करून टाकणें अगदीं अशक्य असतें. किंवा असें समजा कीं, नवरा बाहेरख्याली असला, अथवा परद्वारगमन करणारा असला, तर त्याच्या प्रीतींतली जी स्त्री असेल तिचा, त्याच्यावर जबरदस्त पगडा असल्यामुळें ही वर सांगितलेल्या प्रकारची अनुकूलता बायकोला नसते. तथापि, निबंधकारांनीं सांगितलेला नियम साधारणतः दृष्टीस पडतो. संस्कृतांत एका कवीची अशी उक्ति आहे कीं, राजे, स्त्रिया व लता (वेली) हीं जवळच्याचा आश्रय करितात. शाकुंतलांतील "सर्वः सगन्धेषु विश्वसिति" हें वाक्य ध्यानांत ठेवण्या सारखें आहे. सान्निध्य व सहवास यांचें फल स्नेह होय.

शहाणपणाचा नसून, नीतिविरुद्धही असण्याचा संभव असतो. यामुळें, अशा प्रसंगीं बायकोच्या सल्लामसलतीनें न वागतां नवरा आपल्या स्वतःच्याच विचारानें वागला असतां अधिक श्रेयस्कर व इष्ट असतें. परंतु, कुटुंबाच्या कारभारांत, किंवा राज्यकारभारांत सत्तेचा लाभ हा स्वातंत्र्याच्या नाशाचा योग्य मोबदला होत नसतो. बायकोचा पगडा नवऱ्यावर असल्याकारणानें ज्या गोष्टीविषयीं तिला मुळींच हक्क नसतो, त्याही तिला मिळतात. तथापि तेवढ्यानें आपले हक्क बोलून दाखविण्याचें सामर्थ्य तिला येतें असें मात्र नाहीं.

सुलतानाच्या जनानखान्यांतील जी एखादी आवडती दासी असेल, तिच्या सत्तेखालीं इतर दासी असतात. व त्या दासींवर ती जुलुमानें अम्मलही चालवीत असते. परंतु वस्तुतः इष्ट असतें तें हें कीं, तिलाही दासी नसाव्या, व तिनें स्वतःही दुसऱ्याची दासी होऊन राहूंनये.

पतीच्या अस्तित्वांत आपलें अस्तित्व विसरून जाणें, उभयतांचाही संबंध ज्यांत आहे अशा एखाद्या कामांत, पतीच्या इच्छे–व्यतिरिक्त आपली स्वतंत्र अथवा निराळी ह्मणून इच्छा न ठेवणें—निदान अशी इच्छा अपणांस नाहीं असें आपल्या पतीस भासविणें–व त्याच्या मनोवृत्तींवर निरंतर दाब राखण्यांत आयुष्याची कृतकृत्यता मानणें, इत्यादि साधनानीं एखाद्या स्त्रीला फार झालें तर एक गोष्ट घडवून आणण्यांत आनंद मानितां येईल. ती कोणती ह्मणाल तर, ज्यांच्या विषयीं कोणत्याही तऱ्हेची कल्पना करण्याची योग्यता तिनें संपादन केली नाहीं, अथवा कल्पना केली तरी ती तिची आवडनिवड व दुराग्रह यांच्या योगानें सर्वथैव चुकीचीच असणार, अशा प्रकरच्या इतर व्यवसायसंबंधांत आपल्या पतीला सर्व प्रकारें अनिष्ट असें वर्तन करण्यास लाविणें. याचा परिणाम असा होतो कीं, हल्लींच्या परिस्थितींत जे नवरे आपल्या

स्त्रियांशीं फारच ममतेनें वागतात, त्यांच्या सहवासानें किंवा वजनानें, घराबाहेरील इतर सर्व प्रकारच्या संबंधांत स्त्रियांची वर्तणूक चांगली किंवा वाईट होण्याचा सारखाच संभव असतो. किंबहुना कदाचित् अधिक वाईटही होते. कारण, हल्लींच्या रूढीस अनुसरून बायकोची अशी समजूत घालून दिलेली असते कीं, गृहकृत्यांखेरीज इतर गोष्टींमध्यें मन घालण्याचें तिला मुळींच कारण नाहीं. यामुळें सहजच असें होतें कीं, इतर गोष्टींविषयीं पोक्त व समंजस असे विचार तिच्या मनांत येत नाहींत. गृहकृत्यांशिवाय इतर गोष्टींमध्यें कांहीं एखादा थोर उद्देश मनांत आणून ती वागेल असें घडतच नाहीं. आणि यदाकदाचित् घडलेंच तर, आपल्या स्वतांच्या फायद्याची दृष्टी ठेवील. राजकारणांत खरी बाजू कोणती, याविषयीं तिला मुळींच पर्वा नसते. परंतु आपल्या घरांत प्रतिष्ठा किंवा पैसा कोणत्या द्वारानें येईल, आपल्या नवऱ्यास एखादी बडी किताबत कशी मिळेल, अथवा आपल्या मुलास एखादी हुद्याची जागा, किंवा आपल्या मुलीस चांगलेंसें स्थळ कसें प्राप्त होईल, या गोष्टी मात्र तिला अवश्य कळत असतात. पण कोणीं असें ह्मणेल कीं, कोणताही समाज राजसत्तेखेरीज किंवा राजशासनाशिवाय कसा राहूं शकेल? जसा राज्यकारभारांत, तसा कुटुंबांतही कोणी तरी एक शास्ता अथवा अधिकारी पाहिजेच पाहिजे. विवाहित माणसांमध्यें एखाद्या गोष्टीच्या संबंधानें मतभेद पडला तर, त्या गोष्टीचा निर्णय ठरविणें तो कोणीं ठरवावा? उभयतांच्याही मताप्रमाणें ती गोष्ट घडून येणें तर असंभव असतें. आणखी, त्या गोष्टीचा निर्णय करणें तर जरूर असतें. तेव्हां हें जुळावें कसें! या आक्षेपाचें समाधान मी करितों तें येणेंप्रमाणें:—

७. दोन माणसांमध्यें जो यदृच्छेनें घडून आलेला योग किंवा व्यवसायसंबंध त्या संबंधांत 'दोघांपैकीं एकाच्या हातांत पूर्ण सत्ता असलीच पाहिजे' असें जें कित्येकांचें ह्मणणें आहे, तें खरें नाहीं.

विवाहसंबंधाशिवाय दुसरीं उदाहरणें व्यवहारांत नेहमीं आपल्या पहाण्यांत येतात. त्यांपैकीं उदाहरणाकरितां व्यापाराची सर्कत हीच कां घ्याना! प्रत्येक भागीदारीच्या किंवा सर्कतीच्या व्यवहारांत भागीदारांपैकीं किंवा सर्कतदारांपैकीं हरएक कामांत सर्व अखत्यार एकालाच असावा, व बाकीच्यांनीं त्याच्या केवळ हुकमतींत असावें, आणि तो हुकूम फर्मावील तसें वागावें, असें ठरविणें अवश्य आहे, असें कोणी प्रतिपादन करील काय! उघडच आहे कीं, असें ठरविणें लोकांस अवश्य वाटत नाहीं. कारण, अशा प्रकारच्या सर्कतीच्या व्यवहारांत, मालकाची जबाबदारी तेवढी शिरावर घेऊन, हातांत खरोखर सत्ता किंवा अधिकार पाहिला तर, एखादा कारकून किंवा गुमास्ता असावा याच्याच इतका! तेव्हां, अशा अटी कोण कबूल करील? कोणीही कबूल करणार नाहीं.

विवाहाच्या संबंधानें जी व्यवस्था कायद्यानें केली आहे, त्या प्रकारची व्यवस्था जर इतर करारांच्या संबंधानेंही कायदा करील, तर त्यास असा ठराव करावा लागेल कीं, एका भागीदारानें सर्व दुकानांचा समाईक व्यापार किंवा कारभार आपल्या खाजगी कारभाराप्रमाणेंच करावा, बाकीचे भागीदार केवळ मुकत्याराप्रमाणें समजले जावे, आणि जो एक भागीदार दुकानाचा कारभार मालकाप्रमाणें चालवील त्याची योजना कांहींएका साधारण तत्त्वास अनुसरून करण्यांत यावी. उदाहरणार्थ, सर्वांत वडील असणें! कायद्यानें अशा प्रकारचे मूर्ख ठराव कधीं केले आहेत काय? कधीं नाहींत. त्याचप्रमाणें, भागीदारांचे अधिकार किंवा हक्क कमजास्त असावे, अथवा भागीदार आपल्यांतच ठराव करून जी कांहीं व्यवस्था करतील, किंवा ज्या अटी कबूल करतील, त्यांत, कायद्यानें हात घालावा, व दुसऱ्याच कांहीं अटी कबूल करण्यास भाग पाडावें, असें ठरविण्याची अवश्यकताही अनुभवावरून दिसत

नाहीं. उलट असें दिसतें कीं, भागीदारीच्या किंवा सर्कतीच्या कामांत जो कनिष्ठ किंवा कमी दर्जाचा असेल, त्याच्या हिताला किंवा त्याच्या हक्काला विशेष धोका न बसतां, सर्व सत्ता एकाच्याच हातांत ठेवितां येईल. कारण, त्या सर्कतींतून आपलें अंग काढून आपली सर्कत तोडण्याची मोकळीक भागीदारांस असते. परंतु विवाहसंबंधाची गोष्ट अगदीं निराळी आहे. कारण, बायकोला अशा प्रकारची मुखत्यारी किंवा सत्ता मुळींच नसते. आणि जरी ती असती, तरी बहुधा या सत्तेचा उपयोग करून घेण्यापूर्वीं, दुसऱ्या अनेक उपायांची योजना तिनें करावी, हेंच इष्ट असतें.

८. ज्या गोष्टींच्या संबंधाचा निर्णय रोजच्यारोज करावा लागतो, व ज्याची हळुहळू आपल्या आपणच व्यवस्था लागत नाहीं, अथवा ज्या गोष्टींचा निर्णय सर्वांचा एक विचार झाल्याखेरीज व्हावयाचाच नाहीं, अशा कामांत निर्णय व्हावयाचा तो, एकाच माणसाच्या इच्छेनुसार झाला पाहिजे; ह्मणजे, एकाच माणसाला सर्व प्रकारची मुखत्यारी असली पाहिजे, हें स्पष्ट आहे. परंतु एवढ्यावरून अशी ही जी मुखत्यारी असावयाची, ती नेहमीं एकाच माणसाला असली पाहिजे, असें मात्र ठरत नाहीं. स्वाभाविक व्यवस्था ह्मटली ह्मणजे, उभयतांमध्यें सत्तेचा विभाग झाला पाहिजे. प्रत्येकाकडे जीं जीं कामें सोंपविलीं असतील, तीं तीं बजावण्याच्या कामांत त्यास पूर्ण अखत्यार असला पाहिजे. व तीं कामें चालविण्याच्या पद्धतींत किंवा व्यवस्थेंत फेरबदल करणें झाल्यास तो उभयतांच्या संमतीनें झाला पाहिजे. ही जी कामाची वांटणी व्हावयाची ती पूर्वींच कायद्यानें ठरवून टाकतां येण्यासारखी नसते. खरोखर, कायद्यानें ती ठरवूं नये, हेंच चांगलें. कारण, हा व्यवसायविभाग व्हावयाचा तो प्रत्येक व्यक्तीच्या योग्यतेवर व गुणांवर अवलंबून असतो. या उभयतांची इच्छा असल्यास, हल्लीं जशी

पैशाच्या वगैरे संबंधानें व्यवस्था करावयाची ती लग्नापूर्वींच करून टाकितात, तशीच ही कर्मविभागाची व्यवस्थाही लग्नापूर्वींच कांहीं कराराच्या स्वरूपानें करून टाकावी. परस्परांच्या संमतीनें अशी व्यवस्था होण्यास फारशी अडचण येईल, असें दिसत नाहीं. आतां एवढें मात्र खरें आहे कीं, ज्या ठिकाणीं स्त्रीपुरुषांचें पहिल्यापासूनच मुळीं खडाष्टक असतें, सर्व बाबतींत व सर्व कामांत तंटेबखेडे माजून तीं उभयतांही अत्यंत दुःखभागी होतात, अशा प्रकारच्या नवऱ्या-बायकांची गोष्टच निराळी आहे. त्यांबद्दल आमचें कांहीं ह्मणणें नाहीं. परंतु इतक्या दुःस्थितींत असणारीं युग्में, अल्पसंख्येंत गणिलीं पाहिजेत. आह्मी विचार करीत आहों तो बहुसंख्येचा. असो. तेव्हां वर सांगितल्याप्रमाणें परस्परांच्या अधिकाराचा एकदां विभाग ठरला, ह्मणजे सहजच त्यांच्या कामांची व त्यांच्या परस्परकर्तव्यांची व्यवस्था लागेल. आणि ही गोष्ट अर्थात् उभयतांच्या सल्ल्यानेंच झाली पाहिजे. निदान, कायद्यानें तरी ती ठरवूं नये. सामान्यतः, रूढीनेंच ती ठरली जावी. त्यांतही, विवाहित माणसांस आपल्या खुषीस योग्य वाटेल तो फेरबदल करितां यावा.

९. आतां असें पहा कीं, दोघांपैकीं कायद्यानें कोणासही अधिकार दिला तरी, खरोखर संसारांतील कामांचा निर्णय, बहुतेक दोघांच्या गुणावगुणांवरच अवलंबून रहाणार. प्रस्तुत जो लोकव्यवहार आहे, त्यांतही, हीच गोष्ट दृष्टीस पडते. नवरा बहुधा बायकोहून वडील असतो. हीच गोष्ट नवऱ्याला कांहीं एक प्रकारची पुरी वजनदारी किंवा महत्व देण्यास बस्स होते. निदान, उभयतांच्या वयामध्यें जें अंतर असतें, तें बहुतेक निरुपयोगी होऊन, तीं उभयतां अनुभवानें व ज्ञानानें सारखीं होईपर्यंत असें असतेंच. दुसरें असें आहे कीं, नवराबायकोपैकीं जें माणूस उपजीविकेचें साधन मिळवील त्याला व त्याच्या शब्दाला

वजनदारी अधिक रहाणार. या कारणानें जें वैषम्य असतें, तें विवाहाच्या कायद्यावर अवलंबून नसतें. तर एकंदर मानवी समाजाची प्रस्तुत जी साधारण स्थिति आहे, तिजवरच तें वैषम्य अवलंबून असतें. स्वभावाची उदात्तता, मनाची स्थिरता, व बुद्धीची श्रेष्ठता (मग ती साधारण असो, किंवा कांहीं विशेष कामांत असो) यांचा जो परिणाम व्हावयाचा, तो अवश्य होणारच, व हल्लींही हा नेहमीं होत असतो, असें आढळण्यांत येतें. यावरून, व्यापाराच्या कामांतील भागीदारांमध्यें जसें दृष्टोत्पत्तीस येतें, त्याप्रमाणें संसाराच्या सर्व कामांतील भागीदार जीं स्त्रीपुरुषें, त्यांच्यावरील जबाबदाऱ्या व त्यांच्यावरील अधिकार यांची योग्य व्यवस्था परस्परांच्या संमतीनें व करारानें होणार नाहीं, अशी जी समजूत आहे, तिला मुळींच आधार नाहीं, असें उघड होतें. ज्या ठिकाणीं दोन माणसें विवाहपाशानें बद्ध झाल्यामुळें, सर्वथा दुःखभागी झालीं आहेत, अशांची गोष्ट निराळी. परंतु प्रस्तुतचा लोकव्यवहार पाहिला असतां, नवराबायकोमध्यें अशी व्यवस्था नेहमीं करण्यांत येते. ज्या माणसांचा विवाहसंबंध सर्वस्वी चुकीचा घडलेला नसतो, व परस्परांचा संबंध तुटला असतां उभयपक्षीं फार सुखाची गोष्ट होणार आहे, असा प्रकार ज्या ठिकाणीं नाहीं, त्या ठिकाणीं, एका पक्षीं केवळ सत्तेचा जोर, व दुसऱ्या पक्षीं केवळ आज्ञाधारकत्व, असाच केवळ प्रकार नसतो. कोणी असें ह्मणतील कीं, नवराबायकोमध्यें मतभेद पडला असतां, त्यांची आपसांत जी समजूत होत असते, व संसारांतील कामांचा जो निकाल लागत असतो, त्याचें कारण कायद्यानें पुरुषास जी सत्ता दिलेली असते व तिचा अंमल जबरदस्तीनें न होण्याची जी भीति स्त्रीला असते, ती होय. लोक लवादाकडे आपला तंटा नेऊन तोडून घेतात, याचें कारण इतकेंच असतें कीं, त्यांनीं तसें केलें नाहीं तर, कोर्ट त्यांजकडून आपला हुकूम सक्तीनें अमलांत आणील. परंतु, माझें असें

ह्मणणें आहे कीं, या दोन्ही गोष्टी सारख्या नाहींत. या दोन्ही गोष्टी सारख्या केव्हां मानितां येतील? आपण अशी कल्पना करूं कीं, हल्लीं पक्षकारांच्या कामांत मुकद्दम्याची चौकशी करून उभय पक्षकारांपैकीं ज्याचा हक्क कोर्टास योग्य वाटेल, त्याच्याच तर्फेनें कोर्ट जसें न्याय देत असतें, तसें न करितां, समजा कीं, मुकद्दम्याची चौकशी कोर्ट मुळींच न करतें, व कोर्ट आपलें नेहमीं एकाच पक्षाच्या तर्फेनें— समजा, प्रतिवादीच्याच तर्फेनें—निकाल देतें. असें असतें तर वादीला, लवाद जो कांहीं ठराव करील, तोच कबूल करणें भाग होतें! इकडे प्रतिवादीच्या संबंधानें वादीच्या अगदीं उलट प्रकार घडता. तो कांहींच कबूल करिताना! कारण कीं, कोर्टांत गेल्याबरोबर फैसल्ला आपल्या तर्फेनेंच होणार, हें त्यास पक्कें ठाऊक! यावरून हें उघड होतें कीं, बायको वस्तुतः नवऱ्याच्या पूर्ण सत्तेखालीं असल्यामुळें आपसांतील तडजोडीनें जो कांहीं अधिकार मिळेल तेवढ्यावरच राजी असते याचें कारण कायद्यानें नवऱ्याला जी सर्वतोमुखी प्रभुता, अथवा जो सत्तात्मक अधिकार दिला आहे, तो आहे, असें ह्मणतां येईल. परंतु, नवरा आपला अधिकार स्वेच्छेनें कमी करून घेतो, या गोष्टीचें कारण ती प्रभुता होणार नाहीं. कां कीं, नवऱ्याला कायद्याची व कोर्टाची भीति बाळगण्याचें मुळींच प्रयोजन नाहीं. सदाचारसंपन्न व सभ्य अशा लोकांत, स्त्रीपुरुषांच्या व्यवहारांत ऐक्यभाव असून, उभयतांमध्यें सत्तेचा विभाग चांगल्या प्रकारें झालेला आढळतो. आणि हें केव्हां? तर दोघांपैकीं एकाला—अर्थात् पुरुषाला—नीतीचा किंवा लोकाचाराचा पाश, असें करण्यास मुळींच भाग पाडीत नसतांही, अशी गोष्ट असते. दोन माणसांचा विवाहपाशानें बद्ध झालेला जो संसार, त्याची व्यवस्था दोघांच्याही संतोषानें व इच्छेनें दोघांसही मान्य होण्यासारखी करितां

येते, ही गोष्ट अनुभवसिद्ध आहे. या नियमास प्रतिकूल व अपवादक अशा कांहीं गोष्टींखेरीज, बहुतेक सर्वत्र लागू पडणारीं, अशीं कांहीं स्वाभाविक कारणें, या चमत्काराला असलींच पाहिजेत. दोघांपैकीं एकालाच कायद्यानें सत्ता देणें, याचा उपयोग व्यवहारांत मुळींच होत नाहीं असें दिसतें. कारण वस्तुतः त्यासत्तेची अंमलबजावणी कधींच होत नाहीं. संसाराच्या स्वतंत्र इमारतीची रचना जी व्हावयाची ती, एका पक्षाला पूर्ण सत्ता, व दुसऱ्या पक्षाला पूर्ण परवशता, अशा पायावरच रचली पाहिजे; जो अधिकार, पूर्ण सत्ताधीश, दुसऱ्या पक्षाला केवळ मेहरबानीनें, राजीखुषीनें व स्वसंतोषानें देईल, तोही त्यानें पाहिजे तेव्हां परत घ्यावा, अशा प्रकारचा ठराव कायद्यानें करणें यांत काय लाभ असेल तो असो! मला तर असें वाटतें कीं, त्यापासून खरोखर कांहींएक फायदा नाहीं. शिवाय, अशा प्रकारच्या अनिश्चित अटीवर मिळालेल्या स्वातंत्र्याची किंमत विशेष नसणार, हें उघड आहे. ज्या अर्थीं एकाच पारड्यांत कायदा इतकें वजन घालतो, त्या अर्थीं असल्या स्वातंत्र्याच्या अटी विशेष न्यायाच्या असतील, असें संभवनीय नाहीं. शिवाय अशा प्रसंगीं आपसांत समजूत होत असते ती, अशा दोन माणसांतच होत असते कीं, त्यांपैकीं एकाला, सर्व प्रकारचे अधिकार कायद्यानें दिलेले असतात; व दुसऱ्याला, पहिल्याच्या इच्छेबाहेर कांहींच अधिकार कायद्यानें दिलेले नसतात; एवढेंच नव्हे, तर जुलमाची कितीही परमावधि झाली तरी, त्याजविरुद्ध (नवऱ्याविरुद्ध) बंड न करण्याविषयीं, धर्माचें व नीतीचें जबरदस्त लोढणें त्यांच्या गळ्यांत अडकावून ठेवलेलें असतें! तेव्हां अशा स्थितींत नवराबायको एकमेकांशीं जीं सलोख्यानें वागतात, त्याचीं खरीं कारणें कायद्यानें दिलेल्या सत्तेशिवाय अगदीं निराळीं असतात, हें उघड नाहीं काय?

१०. यावर एखादा दुराग्रही प्रतिपक्षी असें ह्मणेल कीं, नवरे आपल्या बायकांचे योग्य हक्क मान्य करण्यास कबूल असतातच. ते मान्य करण्याचें त्यांस भाग पाडण्याची गरजच नाहीं. परंतु बायकाच असें करण्यास कबूल नसतात. बायकांना जर कांहीं हक्क दिले, तर त्या दुसऱ्याचे कोणतेच हक्क मान्य करणार नाहींत. ह्मणून पुरुषानें केवळ सत्तेच्या जोरावर प्रत्येक कामांत त्यांजवर जुलूम करणें अगदीं जरूर आहे. अशा प्रकारचें प्रतिपादन करण्याचा प्रघात, कांहीं काळापूर्वीं लोकांत जारीनें सुरू असे. त्या काळीं, स्त्रियांवर अनेक प्रकारचे दोष लादण्याची रीतच पडून गेली होती. पुरुषांनीं आपण होऊन, स्त्रियांस जी स्थिति प्राप्त करून दिली होती, त्या स्थितीचें वर्णन करून, उलट आपणच त्यांची निंदा व निर्भर्त्सना करणें हेंच पुरुषांस त्या काळीं मोठें भूषण वाटे! परंतु हल्लीं कोणताही प्रतिष्ठित अथवा सभ्य मनुष्य अशा प्रकारचें प्रतिपादन करणार नाहीं. सांप्रत बहुतेक सुशिक्षित पुरुषांचें असें मत आढळतें कीं, स्त्रियांचा ज्या माणसांशीं अत्यंत दृढ संबंध झालेला असतो, त्यांच्यांशीं त्या, पुरुषांपेक्षां कमी ममतेनें किंवा प्रेमानें वागतात असें नाहीं. फार काय, लोकांचें नेहमीं उलट असें ह्मणणें पडतें कीं, स्त्रिया पुरुषांपेक्षां अधिक चांगल्या व कोमल मनाच्या असतात. आश्चर्य हें कीं, जे पुरुष स्त्रियांचा इतका चांगुलपणा ह्मणून वर्णन करितात, तेच पुरुष, स्त्रिया चांगल्या आहेत असें मानून, तदनुसार त्यांस वागविण्याला मात्र सर्वस्वी विरुद्ध असतात! याचा परिणाम असा होतो कीं, वरील आदरोक्तीची किंमत मानभावी बोलण्यापलीकडे होत नाहीं. तिचा उद्देशच अन्यायाला मनोहर स्वरूप देण्याचा असतो. **गलीव्हर** यानें वर्णन केलेल्या **लिलीपट** देशाचा राजा ज्याप्रमाणें आपल्या अपराध्याला अत्यंत कडक शिक्षा सांगण्यापूर्वीं भूतदयेनें ओतप्रोत भरलेल्या भाषणांची रेलचेल

करून देत असे त्याचप्रमाणें हा प्रकार होय.* पुरुषांपेक्षां स्त्रिया जर एखाद्या कामांत अधिक चांगल्या, असें असेल तर कुटुंबरक्षणांत जो विलक्षण आत्म–निग्रह त्या दाखवितात तो होय. आपल्या कुटुंबांतील माणसांविषयीं त्यांस किती कळकळ वाटत असते व किती झीज त्या सोशीत असतात! परंतु या गोष्टीला मी कांहींच महत्व देत नाहीं. कारण, जोंपर्यंत, 'आपला जन्म दुसऱ्याकरतां आहे, व स्त्रीजातीला देवानें केवळ कष्ट करण्याकरितांच निर्माण केलें आहे,' अशी त्यांच्या मनाची समजूत करून दिलेली असते तोंपर्यंत या गोष्टीला महत्व आहे, असें मानितां येत नाहीं. माझें मत असें आहे कीं, 'स्त्रीपुरुषांचे हक्क सारखे आहेत' या तत्वावर जेव्हां या जगांत व्यवहार सुरू होतील, 'आत्मसंयमन, परदास्य, व स्व-सुख-निरपेक्षता, हाच स्त्री-धर्म,' असें जें प्रस्तुत कृत्रिम स्वरूप स्त्री-स्वभावाच्या उदात्त कल्पनेस प्राप्त झालें आहे, तें जेव्हां नष्ट होईल तेव्हांच स्त्री-स्वभावाची खरी परीक्षा होईल. आणि तेव्हांच, कितीही चांगली बायको घेतली, तरी ती उत्तम पुरुषांपेक्षां अधिक आत्म-निग्रही आढळणार नाहीं. परंतु उलट असें होईल कीं, पुरुषांची स्वार्थ-दृष्टि हल्लींपेक्षां पुष्कळ कमी होईल. व आत्म-निग्रहाच्या कामीं ते अधिक दक्ष होतील. कारण, आपलीच इच्छा काय ती बलीयसी, व ती इच्छाच आपला कायदा, असें मानून तिच्याच अनुरोधानें दुसऱ्या मानवी—प्राण्यानें सर्वस्वी चालावें, असें ते मानणार नाहींत, देवाच्या ठिकाणींच आपण, आपण काय तें पूज्य-दैवत, असें मानणें, याशिवाय दुसरी कोणतीही गोष्ट पुरुष अधिक लौकर शिकत नाहीं. आजपर्यंत जितक्या ह्मणून माणसांस वरिष्ठ हक्क प्राप्त झाले, किंवा ज्या ज्या जाति अधिकार—संपन्न झाल्या, त्यांस 'अहंविशेषः' एतद्रूप जबरदस्त

---

* पहा. गलीवरचा वृत्तांत; लिलीपटची सफर. भाग ७.

व्याधि जडून त्यापासून बहुत पीडा झाली आहे, असें आढळतें. मानवी–जातीमध्यें जे अनेक उच्चानीच प्रकार आढळतात, त्यांत, जों जों खालीं खालीं जावें, तों तों या अहंभावरूप विकाराची तीव्रता अधिकाधिक दृष्टीस पडते. आणि विशेषें करून ज्यांना, आपली दुर्दैवी स्त्री व आपलीं अभागी मुलें, ह्यांच्याशिवाय इतर मनुष्य-प्राण्यांवर सत्ता कशी ती मुळीं प्राप्त झालीच नाहीं, किंवा प्राप्त होण्याची ज्यास आशाही नाहीं अशा लोकांत हा विकार अथवा दोष विशेष आढळतो. मानवी–जातींत इतर जे सर्वसाधारण दोष आढळतात, त्यांत अपवादक अशीं पुष्कळ उदाहरणें असतात. परंतु, या दोषापासून मुक्त असलेलीं माणसें फारच थोडीं सांपडतात. या दुष्ट प्रवृत्तीचें नियंत्रण, धर्म व तत्त्वज्ञान, या उभयतांच्याही हातून आजपर्यंत मुळींच झालें नाहीं, असें ह्मटलें असतां चालेल. तर उलट तिला उत्तेजन देण्याविषयीं त्यांचा निश्चय झालेला दिसतो ! ' सर्व मनुष्य–प्राण्यांचे हक्क सारखे आहेत, ' असें जें खिस्तीधर्म–शास्त्रांत मानलेलें एक तत्त्व आहे, त्याच्यामुळें या दुष्ट प्रवृत्तीला जो कांहीं प्रतिबंध वस्तुतः होतो, तो होतो. एका मनुष्यप्राण्यानें दुसऱ्या मनुष्यप्राण्यावर सत्ता चालवावी, या तत्त्वावर उभारलेल्या ज्या रूढि किंवा संस्था, त्यांस खिस्तीधर्म निःशंक आपली संमति देत असल्यामुळें खिस्तीधर्म शास्त्रांतच आढळणारें जें हें मनुष्यप्राण्याच्या समतेचें महाप्रमेय तदनुसार वर्तन ठेवण्याविषयीं खिस्तीधर्म लोकांस उपदेश करीत नाहीं.

११. आतां ही गोष्ट खरी कीं, ज्यांस समानतेचें तत्त्व आवडत नाहीं, अशा स्त्रियाही पुष्कळ आढळतात. आपलाच हेका धरून बसणाऱ्या, आपल्याच मर्जीप्रमाणें सगळ्या गोष्टी झाल्या पाहिजेत असें मानणाऱ्या, पुरुषाप्रमाणें पुष्कळ स्त्रियाही असतात. काडी मोडून देण्याच्या कायद्याला असलीं मंडळी योग्य विषय होत;

कारण, अशा माणसांनीं वनवाशासारखें एकटेंराहणें हेंच उचित होय! अशा माणसांचा व इतर मनुष्यांचा सहवास जबरदस्तीनें घडवून आणणें हें फारच अयोग्य व अन्यायाचें आहे. परंतु, स्त्रियांमध्यें अशा स्वभावाच्या व्यक्ति, प्रस्तुतची कायदेशीर परवशता जोंपर्यंत कायम राहील, तोंपर्यंत कमी न होतां, उलट्या अधिकच वाढत जातील. पुरुषांस जितकी सत्ता कायद्यानें ठेविली आहे, त्या सर्व सत्तेचा जर तो पूर्ण उपयोग करून घेईल, तर त्याच्या सत्तेखालीं असलेली स्त्री एखाद्या मुंगीसारखी सहज चिरडली जाईल. परंतु असें न करितां तिला जर त्यानें लडिवाळपणानें वागविलें, ती नाचेल तशी नाचूं दिली, व तिला नवऱ्यानें आपल्या डोक्यावर बसूं दिली तर ती आपला पगडा कोठपर्यंत चालवील त्यास मर्यादाच रहाणार नाहीं! हल्लींच्या कायद्याप्रमाणें तिच्या हक्काला किंवा अधिकाराला कोणत्याच प्रकारची मर्यादा ठेविलेली नाहीं, कारण, हल्लींच्या कायद्याप्रमाणें तिला मुळीं कांहीं हक्कच नाहींत. परंतु याचा परिणाम व्यवहारांत असा होतो कीं, ती युक्तिप्रयुक्तीनें जेवढी सत्ता मिळवील तेवढीच सत्ता खरोखर तिला प्राप्त होते.

तेव्हां, नवराबायकोचा हा विशेष संबंध न्यायास अनुसरून व उभयपक्षांस हितावह व्हावा, असें जर असेल तर तसें होण्यास, कायद्याच्या दृष्टीनें विवाहितमाणसांचे हक्क सारखे असणें, हा काय तो एकच मार्ग आहे. एवढेंच काय, परंतु मनुष्यांमध्यें नित्य घडून येणारा परस्परव्यवहार, नीतिशिक्षणाची केवळ शाळाच होऊन रहावी, असा जर हेतु असेल तर, तो हेतु या एकाच साधनानें तडीस जाणें शक्य आहे.

१२. खऱ्या नीतिशिक्षणाची एकच शाळा आहे. ती कोणची! तर सारख्या सारख्या माणसांचा सहवास. हें तत्त्व, कित्येक पिढ्या

गेल्या तरी, लोकांच्या मनांत पूर्णपणें भिनणार नाहीं, किंवा सर्वसामान्य होणार नाहीं. ही गोष्ट निराळी. मानव जातीचें नीति शिक्षण आजपर्यंत बलात्काराच्याच तत्त्वावर चालत आलें आहे. यामुळें, केवळ बलात्कारापासून जे संबंध उत्पन्न होणारे आहेत, तेवढ्या पुरतेंच तें शिक्षण उपयोगी आहे. रानटी स्थितींतलीं माणसें आपल्या बरोबरीच्या माणसांचा संबंध मुळींच मान्य करीत नाहींत. कारण, अशा समाजांत कोणाच्या बरोबरीचें होणें ह्मणजे, प्रत्यक्ष त्याचा शत्रूच होण्यासारखें असतें! अगदीं उच्चस्थितीपासून तों अगदीं नीचस्थितीपर्यंत कोणताही समाज पाहिला तर, तो एखाद्या शिडीसारखा किंवा एखाद्या लांब सांखळीसारखा दिसतो. त्या सांखळीची एखादी कडी, किंवा त्या शिडीची कोणतीही पायरी घेतली, तर ती आपल्या शेजारच्या कडीच्या किंवा पायरीच्या एक वर तरी असते, किंवा खालीं तरी असते! त्याचप्रमाणें समाजांतल्या प्रत्येक माणसाची स्थिति आढळते. जो मनुष्य सत्ताधीश नाहीं, तो बहुधा सत्तावश असतो. ज्याच्या नशिबीं हुकमत नाहीं, त्याच्या भोगाला आज्ञाधारकत्वच येतें. यामुळें, प्रस्तुतची जी नीति आहे, ती मुख्यत्वेंकरून आज्ञा करणारा व आज्ञा मानणारा यांजमधील जो संबंध, किंवा ज्याला सेव्य–सेवक–भाव असेंही ह्मणतां येईल, त्या संबंधाच्याच योग्य आहे. दुर्दैवानें आज्ञा करणें आणि आज्ञा मानणें ह्या अवश्य गोष्टी होऊन राहिल्या आहेत. परंतु खरें पाहतां ही स्थिति आगंतुक आहे. मनुष्यजातीची खरी नैसर्गिक स्थिति ह्मटली ह्मणजे, समतेची होय. आधुनिक काळीं व जों जों सुधारणा अधिकाधिक होत जाईल तों तों हुकूम करणें व हुकूम मानणें, ह्मणजे निव्वळ सेव्यसेवकभाव, याचें प्रमाण लोकव्यवहारांत कमी कमी होत जाऊन समतेचें तत्त्व सर्वसाधारण होत जाईल. पूर्वींच्या युगांतली नीति, सत्तेला सर्वथा वश

होणें, यांतच होती. त्यामागून जो काल आला, त्या कालांत जे दुर्बळ असतील, त्याचें संरक्षण व त्याचा परामर्ष प्रबलाकडून व्हावा, हाच त्यांचा हक्क समजत, व हीच खरी नीति मानीत. समाजाच्या एका स्थितींत योग्य मानलेली जी नीति ती दुसऱ्या समाजानें किती दिवस पतकरून रहावें? परवशतेच्या तत्त्वांतून निघालेल्या नीतींचे कांहीं दिवस गेले. त्यानंतर पराक्रम व औदार्य या गुणांनीं युक्त अशा नीतीचेही कांहीं दिवस गेले. आतां असा काल आला आहे कीं, नीति ही न्यायास अनुसरून असावी. पूर्वींच्या काळीं, ज्या ज्या वेळीं समतेचें तत्त्व समाजांत आणण्याचा यत्न झाला, त्या त्या वेळीं **न्याय-देवतेनें** सद्गुणाचा व सद्धर्माचा पाया केवळ न्यायावर रचण्याविषयींचें बोलणें लाविलें. हा प्रकार प्राचीन कालच्या लोकसत्तात्मकराष्ट्रांत घडून आला. परंतु त्या लोकसत्तात्मकराष्ट्रांत जीं उत्तम राष्ट्रें होतीं, त्यांमध्यें देखील पुरुषजातींपैकीं स्वतंत्र असे जे नगरवासी लोक होते, तेवढ्यांतच समतेचें तत्त्व मर्यादित झालें होतें. दास, स्त्रिया व ज्यांना नगरवासीजनांचे हक्क नव्हते अशीं जीं माणसें होतीं तीं जुलूमाच्याच कायद्याखालीं होतीं. हा भेदाचा प्रकार **रोमन** लोकांत जी पुढें सुधारणा झाली तिनें व खिस्ती धर्मानें उभयतांनीं मिळून नाहींसा केला. यद्यपि तें शास्त्र अमलांत फारसें येत नसे, तथापि निदान धर्मशास्त्रानें आपल्याकडून तरी, लिंग, जाति, अथवा गरीबश्रीमंत, वगैरे भेद मानूं नयेत, कायद्याच्या दृष्टीनें सर्व मनुष्यांस सारखे हक्क आहेत, असें ठरविलें होतें. हे भेद जों नुकतेच कोठें नाहींतसे होत चालले होते, इतक्यांतच उत्तरेकडील लोकांनीं सर्व देश काबीज करून, आपला पगडा सर्वत्र बसविल्याकारणानें, त्या लोकांनीं ते भेद पुनः जशाचे तसेच पूर्ववत् उपस्थित केले. आणि बहुतेक सर्व अर्वाचीन इतिहास पाहिला असतां हे भेद क्रमाक्रमानें

कसे नाहींतसे होत गेले, ही गोष्ट स्पष्टपणें दिसून येते. हल्लीं आलेला काळ कांहीं निराळा आहे. प्रस्तुतच्या मन्वंतरांतली व्यवस्था अशी होणार आहे कीं, न्याय हा पहिला अथवा मुख्य सद्गुण मानण्यांत येणार. पूर्वींप्रमाणें समतेचें तत्व तर त्यांत रहाणारच. विशेष ह्मणून इतकाच होणार कीं, या समतेच्या तत्वाबरोबर, सहानुभूति किंवा भूतदया, हा गुणही साहचर्यानें राहील. स्वसंरक्षणापुरता, ह्मणजे फक्त आपल्या बचावापुरताच जो सारखेपणाचा भाग पूर्वीं होता, तेवढाच भाग हल्लीं नसून, परस्परप्रेम व परस्परांविषयीं पूज्यबुद्धि या गुणांचीही भर त्यांत पडेल. या नवीन व्यवस्थेंतून कोणताही मनुष्यप्राणी वगळला न जातां, सर्वांसच सारखें माप घातलें जाईल. भावी काळास अनुलक्षून आपल्यामध्यें अवश्य होणारे फेरबदल माणसांस स्पष्टपणें दिसत नाहींत. आपले विचार व आपल्या कल्पना पूर्वींच्याच काळाला योग्य असून पुढें येणाऱ्या काळाला उचित नाहींत, ही गोष्ट त्यांच्या ध्यानांतच येत नाहीं. आणि असें होतें याचेंही नवल मानण्याचें कारण नाहीं. मनुष्यजातीची भावी स्थिति ध्यानांत आणणें किंवा जाणणें, हें काम, जीं विलक्षण बुद्धिमत्तेचीं थोडींशीं माणसें जगांत असतात, त्यांच्याकडून एक होत असतें; किंवा त्यांचे जे विद्यार्थी असतात, त्यांच्या हातून होत असतें. त्या भावी स्थितींतील विचार व कल्पना यांचा, प्रत्यक्ष रीतीनें जे अनुभव घेतात, असे हरीचे लाल तर फारच थोडे असतात! आणि जे असतात त्यांना, बहुधा लोकांचा छल सोसावा लागतो! किंबहुना त्यांस आपल्या जिवाचा बळीही द्यावा लागतो *!

*ख्रिस्त, सॉक्रेटीस, न्यूटन, ग्यालिलिओ, लूथर, तुकाराम, ज्ञानदेव वगैरे, अनेक तत्वज्ञांचा सुधारकांचा व भगवद्भक्तांचा छल त्या त्या कालीं, त्या त्या कालच्या लोकांनीं कसा केला ही गोष्ट इतिहासज्ञांच्या लक्ष्यांत येणार आहे.

नवीन काळास किंवा स्थितीस आरंभ झाल्यानंतर बराच काळपर्यंत संस्था, ग्रंथ, शिक्षण, व समाज, पूर्वीच्या काळास जे मार्ग उचित होते तेच मार्ग, मानव–प्राण्यांना पुढेंही शिकवीत सुटतात! तेव्हां नवीन काल अजून यावयाचा आहे अशा स्थितींत जुना प्रकार चालू राहतो यांत नवल काय? परंतु मनुष्यप्राण्यांचा खरा सद्गुण ह्मटला ह्मणजे, बरोबरीच्या नात्यानें एकत्र रहाण्याची त्यांच्या ठायीं योग्यता येणें; दुसऱ्यास आपण जें स्वेच्छेनें देणार नाहीं, तें दुसऱ्यापासून घेण्याची इच्छा न करणें; आपल्याहून इतर मनुष्यप्राण्यांना कोणत्याही प्रकारें आपल्या आज्ञेंत किंवा सत्तेंत ठेवण्याची अपेक्षा अल्प कालपर्यंतच टिकणारी आहे, असें समजणें; ज्या ज्या वेळेस शक्य असेल, त्या त्या वेळेस दुसऱ्याच्या अनुरोधानें आपण चालणें व आपल्या अनुरोधानें दुसऱ्यास चालविणें, असा प्रकार परस्परांच्या संबंधांत ठेवण्याविषयीं यत्न करणें. प्रस्तुतच्या लोकव्यवहाराची जी स्थिति आहे, ती ध्यानांत आणिली असतां, या गुणांच्या अभिवृद्धीस किंवा उत्कर्षास कारणीभूत होण्यासारखें कांहींच दिसत नाहीं. आमचें कुटुंब ह्मणजे निव्वळ बलात्काराचें तत्व शिकविण्याची शाळा! या कुटुंबरूपी शाळेंत बलात्काराच्या ज्या चांगल्या गोष्टी किंवा चांगले गुण आहेत तेवढ्यांचीच अभिवृद्धि होते, असें नाहीं. तर त्या गुणांबरोबर दुर्गुणांचीही अभिवृद्धि होते. स्वतंत्र देशांत नगरवासी लोकांमध्यें समतेनें वागणारास समाजाचें शिक्षण अंशतः मिळतें. परंतु अलीकडल्या आधुनिक व्यवहारांत नगरवासीपणाचा भाग फार थोडा असतो. यामुळें माणसांचा जो नित्याचा व्यवहार असतो, त्याच्या नेहमींच्या ज्या संवयी असतात, किंवा त्यांच्या अंतःकरणांतले जे विकार असतात, त्यांशीं नगर–वासीपणाचा विशेष संबंध नसतो.

कुटुंबाची रचना व व्यवस्था, यथान्याय व योग्य प्रकारें होईल तर,

स्वातंत्र्यापासून प्राप्त होणारे जे सद्गुण, ते शिकण्याची कुटुंब ही एक खरी शाळा होणार आहे. फार काय, इतर सर्व गुणही त्याच शाळेंत खास शिकवितां येतील. कुटुंबरूप शाळेंत मुलांनीं आज्ञाधारक होण्यास शिकणें, व आईबापांनीं मुलांस आपल्या आज्ञेंत ठेवणें, हा प्रकार नेहमीं रहाणारच. परंतु जी सुधारणा पाहिजे आहे, ती ही कीं, त्याच शाळेंत प्रत्यक्ष आईबापांनीं प्रेमानें एकत्र रहाणें, व तेंही बरोबरीच्या नात्यानें राहून, परस्परांनीं परस्परांस मान देणें, व परस्परांवर ममत्व ठेवणें, असें असून एकाच्या हातांत सत्ता किंवा हुकमत, व दुसऱ्यानें त्याच्या हुकुमांत रहाणें, हा प्रकार मुळींच नसला पाहिजे. आणि असें होईल तेव्हांच, संसारांतील इतर जे नानाविध संबंध किंवा पाश, त्यांस योग्य करणारे जे सद्गुण, ते आईबाप या कुटुंबरूप शाळेंत शिकत असल्यासारखें होईल. आईबापांची परस्पर--वर्तणूक, व परस्परांविषयीं प्रेम व पूज्य–बुद्धि, इत्यादि पाहून त्या मुलांची ती अल्पकाळ टिकणारी आज्ञा–धारकतेची स्थिति संपल्यावर, आपल्या आईबापांच्या कित्त्याप्रमाणें आपलें वर्तन ठेवण्याच्या संवयी त्यांस सहजच लागणार आहेत. माणसांत जी अनेक प्रकारें सुधारणा होत आहे, तिचा जो मुख्य हेतु त्या हेतूस अनुसरूनच, मनुष्य--जातीचें नीति--शिक्षण असलें पाहिजे, हें उघड आहे. परंतु मानवी--समाजाच्या नैसर्गिक--रचनेंत उपलब्ध होणारा नीति--संबंधाचा जो मुख्य नियम (व्यक्तिमात्रांचें स्वातंत्र्य व समता) तो नियम कुटुंबाच्या व्यवस्थेंत, जोंपर्यंत अमलांत आणिला नाहीं, तोंपर्यंत तें शिक्षण त्या हेतूस अनुसरून कधींच असणार नाहीं. त्या शिक्षणाची ती दिशा खचित चुकेल. ज्या माणसांवर त्याची सर्वस्वी पूर्ण सत्ता आहे, ज्या माणसांचा तो आपणास मालक व यजमान समजतो, अशा माणसांशींच फक्त ज्याचा अत्यंत निकट संबंध व अत्यंत स्नेह व अत्यंत परिचय, अशा पुरुषाची स्वातंत्र्य-विषयक जी भक्ति असा-

वयाची ती खरी व ख्रिस्तिधर्मास मान्य अशी भक्ति नव्हे. तर ही स्वातंत्र्याची भक्ति ह्मणजे प्राचीन काळच्या लोकांत व मध्य--युगें (Middle Ages) ह्मणून ज्या काळास संज्ञा दिली आहे, त्या काळच्या लोकांत साधारणतः ज्या प्रकारची असे तशीच ह्मणावयाची--ह्मणजे काय, तर प्रत्येक पुरुषाला फक्त आपली प्रतिष्ठा व आपली महती काय ती मुख्य आहे असें वाटणें. जी पारतंत्र्यरूप बेडी, तो आपल्यापुरता विचार करीत असतां त्यास अत्यंत निंद्य व तिरस्कार्य वाटे, त्याच बेडीचें, एकंदर मानव--जातीच्या संबंधानें विचार करीत असतां, त्यास कांहींच वाटत नसे. एवढेंच नव्हे तर ती बेडी किंवा शृंखला, तो आपल्या स्वतःच्या हिताकरितां, गौरवाकरितां व प्रतिष्ठेकरितां दुसऱ्यांच्या हातापायांत घालण्यास खुशाल एका पायावर तयार असे!

१३. कायद्याच्या प्रस्तुत स्थितींतही पुष्कळ विवाहित माणसें, समतेचें तत्त्व कायद्यानें ठरविल्याप्रमाणेंच मानून परस्परांशीं योग्य प्रकारें वर्तन करितात, ही गोष्ट मी कबूल करितों. आणि मागें पुढें हें समतेचें तत्त्व सर्वमान्य होईल अशी जी थोडीशी आशा मला वाटते, ती या गोष्टीवरूनच. ही स्थिति विशेषेंकरूत इंग्लंदांतील उंच प्रतीच्या लोकांत बरीच आढळेल. कोणताही एक काळ घेतला तरी त्या काळीं चालू असणारे जे कायदे, त्यांच्यापेक्षां अधिक नीतीचीं व अधिक उदात्त विचाराचीं माणसें जगांत जर बरींचशीं नसतीं, तर कायद्यामध्यें सुधारणा ह्मणून कधींच झाली नसती, आणि ज्या तत्त्वाचें उद्घाटन किंवा प्रतिपादन या ग्रंथांत मी करीत आहें, तीं तत्वें, मी ह्मणतों कीं, अशाच माणसांनीं पसंत करावीं. कारण, योग्य वर्तन करणारीं जीं युग्में असतील त्यांच्याचसारखीं जगांतील इतर विवाहित स्त्रीपुरुषांचीं युग्में बनावीं, हाच त्या तत्त्वांचा उद्देश आहे. परंतु जीं

माणसें स्वतः नीतिमान व सदाचारसंपन्न असतात त्यांस स्वतंत्र विचार करण्याची संवय नसते. त्यांस बहुधा असें वाटत असतें कीं, ज्या रूढि प्रचारांत आहेत त्या ठीकच आहेत. कारण जे कायदे किंवा ज्या रूढि असतात, त्यांजपासून होणाऱ्या अनिष्ट परिणामांचा अनुभव त्यांस प्रत्यक्ष नसतो. यामुळें, त्याजपासून इतरावर वाईट परिणाम घडतात, असें त्यांच्या स्वप्नींही कधीं येत नसतें. एवढेंच नव्हे, तर उलटें त्यांस असें वाटतें कीं, ज्या अर्थी ते कायदे किंवा त्या रूढि सर्वमान्य झाल्यासारख्या दिसतात, त्या अर्थी समाजास त्या इष्ट व हितकारकच असल्या पाहिजेत; आणि त्या बंद करूं पाहणें, किंवा त्यांचा प्रतिकार करण्याचा यत्न करणें, हें अगदीं गैर होणार आहे. तथापि असें समजणें ह्मणजे, त्या विवाहित माणसांची खरोखर केवढी मोठी चूक आहे? कारण ज्या विवाहपाशानें ते स्वतः बद्ध झालेले असतात, त्याच्या कायदेशीर अटी, जरी बारा महिन्यांतून एकदांही त्यांच्या मनांत येण्याचा प्रसंग आला नाहीं, आणि कायद्याच्या दृष्टीनें आपले हक्क समसमान आहेत, असें समजूनच जरी त्या पति-पत्नींचा परस्परांशीं सर्वथा आचारविचार असला, तरी एवढ्यावरून ज्या ठिकाणीं नवरा केवळ नर-पशु किंवा राक्षसी स्वभावाचा नाहीं, त्या ठिकाणचीं विवाहित सर्व जोडपीं आपल्यासारखींच असतील, असें मानणें ह्मणजे हा केवढा भ्रम आहे बरें? असें मानणें ह्मणजे, जगांत खरोखर घडून येत असलेल्या गोष्टींविषयीं व एकंदर मनुष्य-स्वभावाविषयीं सारखेंच अज्ञान दाखविणें आहे. ज्या मानानें एखादा मनुष्य सत्ताधारी होण्यास कमी लायक असेल, ज्या मानानें दुसऱ्यांच्या संमतीनें किंवा राजीखुषीनें एका माणसास त्या दुसऱ्या माणसावर सत्ता चालवूं देण्याची परवानगी मिळण्याचा संभव कमी असेल, त्या मानानें कायद्यानें दिलेल्या सत्तेचें किंवा अधिकाराचें महत्त्व त्या मनुष्यास अधिक वाटून,

तो त्या सत्तेस अधिकच बिलगून रहातो. एवढेंच नव्हे, तर आपल्या अधिकाराचा जितका कडक व पूर्ण अंमल त्यास चालवितां येईल, व लोक-प्रचार (अर्थात् त्याच्या सारख्या इतर पुरुषांनीं पाडिलेला प्रचार) त्यास चालवूं देईल तितका चालवितो. फार काय, अमुक एक सत्ता किंवा फलाणा एक अधिकार आपल्या हातांत आहे, ही जी गोड समजूत किंवा उल्हास-जनक कल्पना, ती त्या सत्तेला चिकटून रहाण्याविषयीं त्या माणसाला अधिक प्रोत्साहन देत असते. यामुळें, त्या सत्तेचा होईल तितका व यथेच्छ उपभोग करून घेण्यांत त्यास सुख वाटतें. एवढेंच नव्हे, तर नीच जातीमध्यें जे लोक स्वभावतः अत्यंत पशु-तुल्य-वृत्तीचे असतात, व ज्यांस नीति-संबंधाचें मुळींच कांहीं शिक्षण मिळालेलें नसतें, अशा लोकांस एखाद्या चीजवस्तेसारखा किंवा जनावरासारखा बायकोचा प्रत्यक्ष कबजा नवऱ्यास मिळविण्याचा कायद्यानें दिलेला हक्क, व कायद्यानें ठरविलेली स्त्रियांची दास्यत्वाची स्थिति, या दोन गोष्टीमुळें उलट असें वाटत असतें कीं, आपल्या बायकोखेरीज इतर परक्या स्त्रीशीं, किंवा मानवी प्राण्याशीं संभावितपणानें व पूज्य-बुद्धीनें वागणें, हें नीटच आहे. परंतु जी स्त्री प्रत्यक्ष आपली बायको असेल, त्या बायकोस तुच्छ मानणें, तिचा उपमर्द करणें, व ती आपल्याहून फारच कमी दर्जाची आहे असें मानणें, हेंच योग्य! तेव्हां अर्थात् अशा या कल्पनेमुळें आपली बायको ह्मणजे, तिचे पाहिजे तसे हाल करण्याचा, वाटेल त्या रीतीनें तिचा अपमान करण्याचा व पायमल्ली करण्याचा, आपणास पूर्ण अधिकार आहे, असें ते नर-पशु समजतात. ज्याला सूक्ष्मावलोकनानें माणसांच्या अंतःकरणांतल्या गोष्टी त्यांच्या बाह्य-लक्षणांवरून कळत असतील, त्यानें योग्य प्रसंग पाहून अवलोकन करावें, व मी ह्मणतों तसा प्रकार खरोखर आहे किंवा नाहीं याचा अनुभव घ्यावा. आणि तसा प्रकार त्यास आढळेल तर

माणसांचीं मनें दूषित किंवा घाणेरीं करून टाकणें, हाच ज्या रूढींचा साहजिक परिणाम होय, अशा रूढींचा जितका राग व जितका वीट येईल, तेवढा थोडाच आहे, असें त्यालाही खास वाटेल.

१४. आतां कदाचित् कोणी आह्मांस असें सांगतील कीं, स्त्रियांनीं पुरुषांच्या आज्ञेंत रहावें, अशी धर्म-शास्त्राचीच आज्ञा आहे. अर्थात् ज्या गोष्टी वाईट आहेत असें सिद्ध होऊन, ज्यांचें मंडन युक्ति-वादानें करितां येतच नाहीं, त्या करण्याविषयीं धर्म-शास्त्राची आज्ञा, ही आपली 'दत्त' ह्मणून नेहमीं उभी असतेच! **ख्रिस्ती** धर्मावर कांहीं सूत्र-ग्रंथ आहेत, त्यांमध्यें या आज्ञा-धारकतेचें समर्थन केलेलें आढळतें, हें खरें, परंतु, अशा प्रकारची आज्ञा-धारकता प्रत्यक्ष **ख्रिस्ती** धर्मांत कोठें आढळण्यांत येत नाहीं, किंवा त्या धर्माच्या मूलतत्त्वांवरूनही ती अनुमानानें सिद्ध होत नाहीं. आतां कोणी हें वाक्य पुढें आणतील कीं, ***सेंटपॉल** ह्मणाला पत्न्यांनो! तुह्मी आपल्या पतींच्या आज्ञेंत रहा. पण **सेंटपॉल**चें असेंही वाक्य आहे कीं, 'दास हो! तुह्मी आपल्या धन्याच्या आज्ञेंत रहा.' **ख्रिस्ती** धर्माचा प्रसार करणें हा **सेंटपॉल**चा मुख्य उद्देश होता. तेव्हां त्याच्या काळीं जे कायदेकानू किंवा ज्या रूढि प्रचारांत होत्या, त्यांविरुद्ध लोकांस वागण्याचा उपदेश करण्याचें कांहीं त्यास कारणच नव्हतें. तो त्याचा हेतुच नव्हता. त्या धर्म-प्रसारकानें असाही उपदेश केला आहे कीं, 'जे राज्य-कर्ते आहेत, ते ईश्वराच्याच इच्छेनें आपली सत्ता चालवितात, असें समजावें.' परंतु एवढ्यावरून आमचे लोक बादशाही अंमल कबूल करतील काय? **ख्रिस्ती** धर्माला संमत अशीच राज्य-पद्धति घेऊन, एकाच मनुष्याच्या पूर्ण-सत्तेखालीं प्रजाजनांनीं रहावें, असें मानून

* सेंटपॉल या नांवाचा एक महंत किंवा साधु पुरुष ख्रिस्ती धर्माच्या इतिहासांत होऊन गेला. त्यानें ख्रिस्ताच्या मागें त्याच्या धर्माचा प्रसार केला.

राज्याच्या उलाढाली टाकून देणें किंवा अधिकारापन्न प्रधान मंडळास नालायक ठरवून, त्यांची योग्य प्रसंगीं उचलबांगडी करण्याची खटपट बिलकूल न करणें या गोष्टी लोकांस पसंत पडतील* काय ? जर नाहीं तर आपल्या काळच्या रूढि व लोक-व्यवहार **सेंटपॉल** साधूनें पसंत केल्या कारणानें सदरहू लोक-व्यवहार व रूढि यांजमध्यें योग्यकालीं फेरबदल किंवा सुधारणा करण्याचा यत्न करूं नये, व तसें करणें **ख्रिस्ती** धर्माला असंमत आहे हें ह्मणणें किती शोभेल बरें ? आणि असें ह्मणणें ह्मणजे, **ख्रिस्ती** धर्माला **महंमदी** धर्माच्या किंवा ब्राह्मणाच्या धर्माच्या बरोबरीला आणून ठेवण्यासारखें होणार आहे.

ख्रिस्ती धर्मानें ही गोष्ट केली नाहीं, ह्मणजे सुधारणेच्या आड तो धर्म आला नाहीं; यामुळेंच मानव-जातीपैकीं ज्या लोकांचें पाऊल पुढें पडलें आहे, त्यांचा तो धर्म होऊन बसला. आणि **मुसलमानी धर्म, ब्राह्मण-धर्म,** वगैरे धर्म, ज्या लोकांचें पाऊल मागें आहे, त्या लोकांतच ते धर्म अद्याप चालू आहेत. † **ख्रिस्ती** धर्माच्या सर्वकाळीं,

---

* **इंग्लंडांत** हल्लीं जी राज्य-पद्धति आहे, तिजमध्यें लोक-सत्तात्मकतेचाच भाग विशेष असून, राणी ही फक्त नांवाला असते. व लोक-नियुक्त-सभा (पार्लमेंट) ही पाहिजे तेव्हां त्या वेळेला आपलें प्रधान-मंडळ बदलूं शकते. या गोष्टीस उद्देशून वरील मजकूर निबंधकारांनीं लिहिला आहे, हें वाचकांच्या लक्ष्यांत आलेंच असेल.

† निबंधकारांचें हें जें मत आहे तें आह्मांस मान्य नाहीं. कारण, एकच धर्म खरा, असें आमचें मत नाहीं. यामुळें कोणत्याही धर्माचा खरेपणा किंवा खोटेपणा हा, कोणत्याही राष्ट्राच्या उन्नतीस किंवा उत्कर्षास कारणीभूत होतो, असें आह्मांस वाटत नाहीं. **ब्राह्मण-धर्म ख्रिस्ती** धर्माहून कमी समजणें, ह्मणजे त्या धर्माविषयीं अत्यंत अज्ञान प्रगट करणें होय. निबंधकाराच्या वडिलांस **हिंदुस्थाना**च्या इतिहासाची जितकी माहिती होती, तितकीच माहिती **ब्राह्मणां**च्या धर्माविषयीं किंवा त्यांच्या धर्म-ग्रंथांविषयीं प्रस्तुत निबंधकारांस होती, असें ह्मटलें असतां चालेल. इंग्रज, अमेरिकन् व युरोपांतील इतर सुधारलेले लोक यांचा जो जयजयकार किंवा उत्कर्ष आजकाल दृष्टीस पडतो तो केवळ ख्रिस्ती धर्माचा प्रभाव आहे असें ह्मणणें निवळ भ्रांतिमूलक होय. या संबंधानें मिस्तर **हरबर्ट स्पेन्सर** यांचें मत मिल्ल साहेबांच्या अगदीं उलट आहे.

त्या धर्मास असलें वाईट स्वरूप देण्याचा ज्यांनीं यत्न केला, अशीं बरींच माणसें होऊन गेलीं. ह्मणजे, त्यांनीं ख्रिस्ती धर्मानुयायी लोकांस एक प्रकारचे **ख्रिस्ती-मुसलमान**च करण्याचा प्रयत्न केला. फरक एवढाच कीं, **कुराणा**च्या ऐवजीं **बायबल** दिलें. व प्रत्येक सुधारणेला प्रतिबंध केला. अशा माणसांच्या हातांत जबर सत्ता होती, व त्या सत्तेशीं ज्यांनीं विरोध केला, त्यांपैकीं पुष्कळ लोकांस आपले जीव बळी द्यावे लागले! सारांश ही गोष्ट खरी कीं, सुधारणेला जे प्रतिकूळ लोक त्यांच्याशीं आपणांस झगडावें लागलें; व विरोध करावा लागला. आपली सध्यांची जी स्थिति आहे, ती त्या विरोधाचेंच फल होय, आणि पुढेंही आपली जी उन्नति व्हावयाची ती विरोधाच्याच योगानें होईल, हें लक्ष्यांत ठेविलें पाहिजे.

१५. स्त्रियांनीं पुरुषांच्या आज्ञेंत रहावें हाच त्यांचा धर्म होय. या मताच्या संबंधानें इतका वेळपर्यंत वर जें विवेचन झालें, त्यावरून, आपल्या स्वतःच्या मिळकतीवर स्त्रीचा हक्क असावा, याविषयीं कांहीं बोलण्याचें कारणच आलें नाहीं. विवाहाच्यापूर्वीं कोणत्याही स्त्रीची जी मिळकत असेल, तिजवर विवाहानंतर तिचीच पूर्ण सत्ता रहावी, हीच गोष्ट योग्य व न्याय्य आहे, असें ज्यांस वाटत नसेल, किंवा अशाविषयीं ज्यांना कांहीं सकारण प्रतिपादन लागत असेल, अशा माणसांच्या मनावर माझ्या या ग्रंथापासून कांहीं ठसा बठेल, अशी आशा करणें व्यर्थ होय. स्त्री-धनाच्या संबंधाचा मी ह्मणतों तो नियम फारच स्वल्प आहे; तो असा:—बायको काय किंवा नवरा काय, त्या दोघांचें लग्न होण्याच्या पूर्वींची तिची किंवा त्याची जी कांहीं मिळकत असेल, तिजवर, लग्न झाल्यानंतरही व पुनः त्यांचा संबंध तुटेपर्यंत, तिची किंवा त्याची एकट्याची पूर्ण सत्ता रहावी, ह्मणजे, लग्न होण्यापूर्वीं नवऱ्याची जी मिळकत असेल, ती लग्न

झाल्यानंतरही त्याच्याचकडे रहावी. त्याचप्रमाणें बायकोची जी असेल ती बायकोच्याच सत्तेंत रहावी, या नियमानें लग्नाच्या वेळीं, पुढें होणाऱ्या मुलांच्या संगोपनाकरितां, जी कांहीं एक मिळकतीची व्यवस्था (marriage-settlement) करीत असतात, त्या व्यवस्थेला या नियमानें बाध येण्यासारखा नाहीं. दोन जीवांचा एकत्र काल्पनिक-संयोग किंवा मिश्रण, ही जी विवाहाची कल्पना आहे, ती कल्पना, पैशाआडक्याच्या संबंधांत वगैरे पति-पत्नीचा निराळा विचार असावा, या कल्पनेशीं जुळत नाहीं; असें कित्येकांस वाटून त्यांच्या मनाला मोठा धक्का बसतो! मला स्वतःला देखील एकत्रपणा व एकविचार फार आवडतो. परंतु, तो केव्हां? तर जेव्हां त्या मालकांचीं अंतःकरणें खरोखर एक असतील तेव्हां. ह्मणजे अशा व्यवस्थेंत जितके हिस्सेदार किंवा भागीदार असतील, त्या सर्वांचा एकच विचार असून, त्या सर्वांना सारखा अधिकार असला पाहिजे. परंतु ज्या समाइकीचें व एक विचाराचें मुख्य तत्त्व ह्मणजे, 'जें तुझें तें माझें; आणखी माझें तें माझेंच!' अशा प्रकारची जी व्यवस्था ती मला मुळींच पसंत नाहीं! अशा प्रकारची व्यवस्था प्रत्यक्ष माझ्याच फायद्याची जरी असली तरीही ती मला मान्य होणार नाहीं.

१६. स्त्रियांच्या संबंधानें घडत असलेला या प्रकारचा हा अन्याय व हा जुलूम साधारण लोकांच्या दृष्टीसही इतर गोष्टींपेक्षां अधिक ठळक दिसतो. यामुळें बाकीच्या अन्यायाच्या गोष्टी जरी तशाच राहिल्या, तथापि, एवढ्या कामांत सहज उपाय होण्यासारखा आहे. हा अन्याय फार लौकर दूर करण्यांत येईल, यांत शंका नाहीं.* अमे-

---

* यासंबंधानें पृष्ट ५६ याखालीं दिलेली टीप अवश्य पाहण्यासारखी आहे तीवरून वाचकांच्या ध्यानांत येईल कीं, मिल्ल साहेबांचा हा निबंध प्रसिद्ध झाल्यानंतर बराच काळ जावा लागला तेव्हां त्यांच्या ह्मणण्याप्रमाणे कायदा इंग्लंडांत पास झाला; कारण, इंग्लंडांतही स्त्रीधनासंबंधाचा कायदा थोडक्याच वर्षांपूर्वीं पास झाला. त्यांतील मुख्य

रिकेंतील बहुतेक जुन्या व नव्या स्वतंत्र संस्थानांतून जे कायदे पास झाले आहेत त्या कायद्यांत, स्त्री-धनाच्या बाबतींत पुरुषांच्या बरोबरीचे अधिकार स्त्रियांस आहेत, हें तत्त्व मान्य करण्यांत आलें आहे. यामुळें ज्या स्त्रियांची स्वतःची ह्मणून कांहीं मिळकत असते, त्यांच्या स्थितींत, लग्नाच्या संबंधांत, बरीच सुधारणा झाली आहे; व तेणेंकरून त्यांच्या हातांतून गेलें नाहीं, किंवा त्यांच्यापासून हिसकावून घेतलें नाहीं, असें हें एक तरी शस्त्र त्यांच्या हातांत शिलक राहतें. त्याचप्रमाणें, लग्न-संबंधाचा दुसराही जो एक अन्यायाचा व जुलमाचा प्रकार होत असे, तोही बंद झाला आहे. तो असाः—एकादा दुष्ट मनुष्य विवाहाच्या रूढीचा अत्यंत निंद्य असा दुरुपयोग करी. ह्मणजे, तिचा पैसा उपटण्याच्या उद्देशानें एखाद्या पोरीला फसवून तिला स्त्रीधन वगैरे कांहींएक न देतां, तिच्याशीं लग्न करी. लग्न झाल्यानंतर, जुन्या कायद्याप्रमाणें, ‘ जें तिचें, तें त्याचें ’ अशी स्थिति असल्यामुळें तो लबाड नवरा तिला सोडून गेला, तर ती बिचारी अगदीं अनाथ होई. ही स्थिति हल्लीं अमेरिकेंत राहिली नाहीं. ज्या वेळेस कुटुंबांचा निर्वाह वडिलोपार्जित किंवा स्वकष्टार्जित मिळकतीवर चालत नसून, केवळ स्वतःच्याच रोजमुऱ्यावर अवलंबून असतो, त्या वेळेस नेहमींची जी साधारण व्यवस्था ह्मणजे, पुरुषानें मिळवून आणावें, आणि बायकोनें घरांतला जमाखर्च वगैरे पहावा,

---

तत्त्व हें:—कोणत्याही स्त्रीची लग्नापूर्वीं मिळविलेली मिळकत असो, किंवा लग्न झाल्यानंतर मिळविलेली असो, तिच्या नवऱ्याचा तिच्या मिळकतीवर कांहींएक हक्क नाहीं. लग्नाच्यापूर्वींप्रमाणेंच दोघेही आपापल्या मिळकतीचे पूर्ण व स्वतंत्र मालक आहेत ! हें तत्त्व अमेरिका व इंग्लंड या दोन सुधारलेल्या देशांतून हल्लीं सर्वमान्य झालें आहे.

हा कायदा Married Women's Property Act (विवाहित स्त्रियांच्या मिळकती संबंधाचा कायदा) या नांवानें प्रसिद्ध आहे आमच्या स्त्रियांस हिंदुधर्मशास्त्रांतील असमतेचा कायदा जाऊन समतेच्या तत्त्वांवर केलेला हा कायदा प्राप्त होईल काय ?

व घरांतील देखरेख करावी, अशा प्रकारच्या या व्यवस्थेनें, दोन माणसांमध्यें श्रम-विभागमात्र उत्तम तऱ्हेनें होतो, असें मला वाटतें. नऊ मासपर्यंत गर्भाचें ओझें सहन करून, व शारीरिक यातना सोसून, व बालकांचें लहानपणीं संगोपन करणें व त्यांस योग्य शिक्षण देणें वगैरेचीही सर्व जबाबदारी घेऊन, नवऱ्यानें मिळविलेल्या पैशाअडक्याचा विनिमय, बायको एकंदर कुटुंबाच्या सुखाकरितां काळजीपुरःसर व मित-व्ययानें करीत आहे, तर त्या उभयतांच्या संसारास लागणारे जे शारीरिक व मानसिक कष्ट त्या कष्टांचा योग्य वांटा ती उचलिते एवढेंच नव्हे, तर बहुधा मोठाच वांटा तिच्या हिश्शाला जातो, असें ह्मटलें पाहिजे. याखेरीज दुसरीं कांहीं कामें जर तिनें पत्करिलीं, तर वर सांगितलेलीं जीं गृह-कृत्यें त्यांच्यापासून तिची मुक्तता न होतां तीं गृह-कृत्यें तिच्याकडून बरोबर होत नाहींत. घराची व मुलाबाळांची जर तिनें काळजी घेतली नाहीं, तर दुसरा कोणी तिकडे पहात नाहीं. यामुळें जीं मुलें मरत नाहींत, तीं वांचलीं तरी कशींबशीं वांचतात; व त्यांची अतिशय हेळसांड होते. आणि घरचें कोणी पाहण्यास नसल्यामुळें, घरांतली व्यवस्था इतकी वाईट होऊन जाते कीं, मित-व्ययाच्या दृष्टीनेंही त्या बायकोच्या द्रव्योपार्जनाची किंमत कांहींच राहत नाहीं. याजकरितां वस्तुस्थिति न्यायास अनुसरून जशी असावी तशी असती तर, बायकोनें आपण श्रम करून कुटुंबाच्या उत्पन्नास भर घालण्याची ही चाल इष्ट वाटली नसती. परंतु वस्तु-स्थिति चमत्कारिक व अन्यायाची असल्या कारणानें, तिनें असें करणें, ह्मणजे बायकोनें आपल्या श्रमानें कुटुंबाच्या प्राप्तींत भर घालणें ही गोष्ट तिच्या फायद्याची व कल्याणाची आहे. कां तर, जो मनुष्य तिचा कायदेशीर धनी मानिला जातो, त्या मनुष्याच्या दृष्टीनें तिची किंमत वाढते. परंतु कधीं कधीं उलट परिणाम असा होतो कीं, आपल्या अधिकाराचा

दुरुपयोग करण्याविषयीं मात्र तो प्रवृत्त होतो. ह्मणजे तो असें करितो कीं, तिला मात्र कष्ट करण्यास लावून, व कुटुंबाच्या पोषणाचा भार तिजवर लादून, आपण आपला बहुतेक काळ आळसांत व मद्य-पानांत घालवितो! ज्या स्त्रीला स्वतंत्र अशी कांहीं मिळकत नाहीं, त्या स्त्रीला द्रव्योपार्जन करण्याचा अधिकार असणें ही गोष्ट तिच्या मानमान्यतेची व प्रतिष्ठेची आहे. विवाहसंबंध जर बरोबरीच्या नात्याचा असता; एकानें दुसऱ्याच्या आज्ञेंत असावें अशी अट नसून उभय पक्षांचे हक्क जर सारखे असते; प्रस्तुतप्रमाणें दोन पक्षांपैकीं, एकाच पक्षाला (अर्थात् स्त्रियांना) हा लग्नसंबंध निव्वळ अपकारक व बलात्काराचा असा नसून, ज्या स्त्रीनें योग्य कारण दाखविलें तिला आपल्या नवऱ्यापासून स्वतंत्रपणानें निराळें* राहतां आलें असतें; व त्या निराळ्या स्थितींत तिला पाहिजे ते प्रतिष्ठेचे व मानमान्यतेचे उद्योग करण्यास पुरुषाप्रमाणेंच पूर्ण मुभा असती; सारांश, या सर्व गोष्टी जर तिला अनुकूल असत्या, तर विवाहित-स्थितींत आपल्या बुद्धि-सामर्थ्यानें द्रव्य-संपादन करण्याचा अधिकार केवळ तिच्या रक्षणार्थ तिला मुद्दाम देण्याचें प्रयोजन राहिलें नसतें.

पुरुष जसा उदर-निर्वाहार्थ एखादा धंदा पत्करितो, त्याचप्रमाणें ज्या स्त्रीनें एकदां लग्न केलें, तिनें गृह-कृत्यें करणें, मुलाबाळांचें संगोपन करणें, त्यांस शिक्षण देणें, ह्मणजे ज्यास आपण एकंदर संसार किंवा प्रपंच असें लौकिकांत ह्मणतों—तोच धंदा करण्याचें पत्करिलें, व त्या कामाकरितां तिच्या आयुष्याचे जितके दिवस लागतील तितके दिवसपर्यंत तिचें पहिलें कर्तव्य तेंच, असें समजावें. आणि इतर सर्व व्याप किंवा व्यवसाय तिनें सोडून दिलेच पाहिजेत, असें जरी ह्मणतां

* 'प्रस्तुत स्थळीं काडी मोडून देणें किंवा घटस्फोट करणें (Divorce) या विधीस उद्देशून मी बोलत नाहीं' असें निबंधकारांनीं मुद्दाम सुचविलें आहे.

आलें नाहीं, तथापि ज्या गोष्टींनीं तिच्या प्रपंचाची गैरसोय होणार, अशा गोष्टी तिनें सोडून दिल्या, असें समजून चाललें पाहिजे. घरांत राहून जे व्यवसाय करितां येत नाहींत, अथवा जे व्यवसाय घराबाहेर राहूनच व नियमितपणें केले पाहिजेत, ते सर्व व्यवसाय, वर सांगितलेल्या नियमाप्रमाणें बहुतेक विवाहित स्त्रियांस वर्ज्य होणार, हेंही उघडच आहे. परंतु माझें ह्मणणें एवढेंचः—साधारण नियमांची योजना करितांना अशी करावी कीं, व्यक्तिमात्रांच्या विशेष गुणांचा विकास होण्यास ठेवितां येईल तितका पुष्कळ अवकाश ठेवावा. विवाहितस्थितींत देखील, इतर धंद्यांत विशेष बुद्धीचा किंवा विशेष गुणाचा विकास होण्यास कोणताही प्रत्यवाय किंवा अडथळा नसावा. मात्र, कुटुंबाची मालकीण या नात्यानें, तिला केलींच पाहिजेत अशीं जीं नित्यकृत्यें, तीं सर्व तिच्याकडून न घडल्यास, ती उणीव दुसऱ्या कांहीं योग्य साधनानें दूर केली पाहिजे. सारांश, लोक—मताचा ओघ या विषयाकडे जर बरोबर रीतीनें वळेल, तर अशा या बारीक सारीक गोष्टी कायद्यानें ठरविण्याची गरजच राहणार नाहीं. त्या गोष्टी लोकमतावर बिनधोक सोंपवाव्या, हेंच मला प्रशस्त दिसतें.

भाग ३.



१. स्त्री-पुरुषांचे हक्क सारखे आहेत, हें तत्त्व आपण एकदां मान्य केलें कीं, त्याबरोबर आपण प्रबल पुरुषांनीं जे उद्योग व जे व्यापार आपल्या एकट्यापुरतेच ह्मणून दडपले आहेत, त्यांत, स्त्रियाही वांटेकरी होणारच होणार, हेंही कबूल केलें पाहिजे. या गोष्टीविषयीं कोणाचीही खात्री करणें कठिण नाहीं. कुटुंबाच्या संबंधांत किंवा गृह-व्यवस्थेंत स्त्रिया परवश असाव्या, असें पुरुषांस वाटत असल्यामुळें इतर कामांतही त्यांस परवश ठेवण्याविषयीं पुरुष उत्सुक असतात, हें उघड आहे. कारण बहुतेक पुरुष-जातीस इतर माणसांशीं बरोबरीच्या नात्यानें वागण्याची कल्पना अद्यापि रुचतच नाहीं, हेंच खरें. असें नसतें तर, अर्थ-शास्त्र व राज्य-तंत्र यांविषयीं लोकांत जीं मतें प्रस्तुत पसरलीं आहेत, त्यांचा विचार करितां, ज्या धंद्यांत चांगली किफायत होते असे बहुतेक धंदे, व समाजांत प्रतिष्ठेचे मानलेले मोठमोठे अधिकार, हे, मानवी जातीच्या अर्ध्या भागास सर्वथा वर्ज्य किंवा निषिद्ध केले जावे, ही मोठ्या अन्यायाची गोष्ट आहे, असें प्रत्येकजण कबूल करिता. पुरुषांपैकीं अगदीं नीच व मूर्खशिरोमणि अशा मनुष्यासही, जे अधिकार किंवा जीं कामें कायदेशीर रीतीनें मिळविण्याचा पूर्ण हक्क आहे, अशीं कामें करण्यास स्त्रिया मात्र योग्य नाहींत, किंवा योग्य होण्याचा अगदीं संभव नाहीं, असा ठराव, त्यांच्या जन्मापासून करून

टाकणें; अथवा त्या कशाही योग्य व पात्र असल्या तरी, अशीं कामें केवळ पुरुषांच्याच कल्याणार्थ राखून ठेवून, तीं कामें करण्याची स्त्रियांस मनाई करणें, हा सर्व प्रकार फारच अनुचित व अन्यायाचा आहे, असें प्रत्येकजण कबूल करिता. आलीकडल्या दोनशें वर्षांत प्रस्तुत विषय कोठें निघालाच, व स्त्रिया अमुक अमुक कामें करण्यास अनाधिकारी किंवा अयोग्य असें कां ठरविलें, किंवा ठरवावें, असा प्रश्न विचारिला, तर लोक त्याचें उत्तर देतः–"अशी व्यवस्था आजपर्यंत चालत आली आहे. ह्मणूनच हेंच कारण!" कां कीं त्या वेळेस सार्वजनिक-कृत्यांत पडण्याचा अधिकार सर्वच स्त्रियांस निषिद्ध नसल्यामुळें, खरोखर त्यांची बुद्धि कशी आहे, याची अनेक प्रसंगीं पारख होत असे. यामुळें स्त्रियांची मानसिक शक्ति पुरुषांपेक्षां कमी आहे, ही सबब त्या वेळेच्या लोकांस सांगता येतच नसे. आणि कोणी कदाचित् सांगूं लागलाच तर, अशा सबबींवर वस्तुतः कोणाचा भरंवसाही बसत नसे. त्या काळीं स्त्रिया अमुक कामास अयोग्य आहेत, असें न ह्मणतां, 'स्त्रियांस अमुक कामें न करूं देणें हेंच लोक-समाजाच्या हिताचें आहे,' असें ह्मणत, 'लोक-समाजाच्या' ह्मणजे अर्थात् 'एकट्या पुरुषांच्या' हिताचें, हें उघडच आहे. जसें हल्लीं राज-कारणांत लोकांवर अंमल करीत असणारें सरकार कोणतीही गोष्ट करणें ह्मणजे त्यास 'राजकीय कारण' लावून मोकळें होतें. व त्या सबबींवर कधीं कधीं फारच अनिर्वाच्य व अश्लाघ्य अशीही कामें करून जातें.* त्याचप्रमाणें स्त्रियांच्या संबंधानें त्या काळीं तसाच प्रकार होता. प्रस्तुत काळीं अधिकारसंपन्न माणसें वर लिहिलेल्या

*या गोष्टीचा अनुभव या आमच्या हतभाग्य देशांत दयाळू राणी-सरकारच्या व बादशाहिणीच्या अमलांत आमच्या लोकांस किती वेळ आला असेल, त्याची नामावळि सांगत बसणें हृदय-भेदक होणार नाहीं काय? हल्लीं अह्मां इंडियन् लोकांवर अंमल करीत असणारें श्वेतद्वीपस्थ आमचें दयाळू मायबाप इंग्रज सरकार कोणतीही गोष्ट करणें झालें तरी

भाषेहून अंमळ सौम्य भाषेचा उपयोग करितात. यामुळें, ज्यांजवर जुलूम करणें त्यांस प्रशस्त वाटत असेल, त्यांजवर ते जुलूम करितात. अमुक एक गोष्ट ही ज्याजवर जुलूम करावयाचा त्याच्या हिताचीच आहे, असा त्यांस बहाणा करावा लागतो. या नियमास अनुसरून, स्त्रियांवर अधिकार चालविणारे पुरुष जेव्हां एखादी गोष्ट स्त्रियांस मना करावी ह्मणून इच्छितात, तेव्हां, ती गोष्ट करण्याविषयीं स्त्रियांनीं उमेद बाळगणें ह्मणजे आपल्या खऱ्या कल्याणाचा व सुखाचा मार्ग त्या सोडतात, असें होतें,' वगैरे निव्वळ लबाडीचें प्रतिपादन त्यांस करावें लागतें. हें प्रतिपादन घटकाभर खरें आहे, असें धरून चाललें तरी त्या प्रतिपादनाप्रमाणें पुरुष वर्तन कोठें करितात? अपणास हमेषा जो अनुभव येतो, त्यावरून पाहिलें तर, पुरुषांनीं खरोखर स्त्रियांच्या कल्याणाकडे व सुखाकडे पाहून जितक्या गोष्टी करावयास पाहिजेत, तितक्या करण्यास ते तयार असतात, असें दिसत नाहीं.* बुद्धि-सामर्थ्यानें पुरुषांपेक्षां स्त्रिया एकंदरींत कमी असतात; असें प्रतिपादन करून बस्स होतनाहीं. त्याचप्रमाणें, अत्यंत बुद्धि-सामर्थ्याचीं जीं कामें, किंवा जे व्यवसाय, तीं करण्यास योग्य अशा स्त्रियांची संख्या पुरुषांच्या संख्ये

त्यांस ' राजकीय कारण ' (Political Reason) लावून मोकळें होतें व त्या सबबीच्या जोरावर (वस्तुतः सद्दीच्या जोरावर) कधीं कधीं फारच अश्लाघ्य अशीं कामें करून जातें या संबंधानें वाचकांस इल्बर्ट बिलाच्या धामधुमीचा इतिहास स्मरल्या वांचून राहणार नाहीं प्रतिपक्षी चहापिकविणार (टीप्लांटर) व अन्य यूरोपियन् हे **पुरुष** व एतद्देशीय मंडळी **बायका** एवढी कल्पना केली ह्मणजे प्रस्तुत निबंधांत केलेलें प्रतिपादन आमच्या स्थितीशीं अगदीं बरोबर जुळतें.

* प्रस्तुत स्थळीं आमच्या इकडल्या संबंधानें पुष्कळशीं उदाहरणें देण्यास अवकाश नाहीं. परंतु ता० ३० जुलै १८८८ च्या **ज्ञान-प्रकाशांत** ' केशवपन ' या सदराखालीं एका विधवा झालेल्या बाईनें जें हृदय-द्रावक पत्र लिहिलें होतें, त्याचें स्मरण मर्मज्ञ वाचकांस होईलच होईल.

हून कमी असते, असें ह्मणण्यानेंही कार्य भागत नाहीं.* तर स्पष्ट असा सिद्धांत ठरविणें अवश्य आहे कीं, अशा प्रकारचीं अत्यंत बुद्धिमत्तेचीं कामें करण्यास लायक अशी एकही स्त्री जगांत आढळणार नाहीं, किंवा नसते. शिवाय, आणखी असेंही सिद्ध केलें पाहिजे कीं, अत्यंत बुद्धिमान स्त्रिया घेतल्या तरी, त्यांची मानसिक-शक्ति, प्रस्तुत तीं कामें ज्यांकडे आहेत, अशा अगदीं सामान्य बुद्धीच्या पुरुषांहूनही कमी प्रतीची असते! माझें ह्मणणें इतकेंच कीं, कोणतेंही बुद्धिमत्तेचें काम करण्याची पात्रता उमेदवारांच्या केवळ गुणांकडे लक्ष देऊन ठरविली पाहिजे. मग निवडणूक करण्याची कोणती कां पद्धति घ्याना—इतकेंच कीं, लोकांचें खरें हित जिच्यायोगानें साधेल, त्याच पद्धतीचा स्वीकार

---

* स्त्रियांवर अधिकार चालविणारे पुरुष जेव्हां एखादी गोष्ट स्त्रियांस वर्ज्य करावी ह्मणून इच्छितात, तेव्हां ती गोष्ट स्त्रिया करण्याविषयीं असमर्थ आहेत, व ती करण्याविषयीं स्त्रियांनीं उमेद बाळगणें हें त्यांस अहितकारक आहे, लांछनास्पद आहे, श्रेयस्कर नाहीं. असें ह्मणणें पुरुषांस भाग पडतें! कांहीं कांहीं स्त्रिया कांहीं कांहीं पुरुषांपेक्षां कमी बुद्धीच्या असतात—अथवा ज्या कामास अत्यंत बुद्धिमत्तेची गरज आहे अशा कामास योग्य असे पुरुष जितके सांपडतील तितक्या स्त्रिया सांपडणार नाहींत—एवढेंच सिद्ध करून फारसा उपयोग नाहीं. जें सिद्ध केलें पाहिजे तें हें—'एकंदर स्त्रिया मोठमोठे हुद्दे करण्यास नालायक आहेत. हल्लीं असे हुद्दे करीत असलेले साधारण बुद्धीचे पुरुष घेतले तरी त्यांच्यापेक्षां उत्तमोत्तम स्त्रिया मानसिक शक्तीनें कमी असतात,' असें सिद्ध केलें पाहिजे. सार्वजनिक हिताकडे योग्य नजर देऊन चांगलीं चांगलीं माणसेंच मोठमोठ्या हुद्द्यांकरितां मिळावीं. या हेतूनें जो मार्ग लोकांनीं पसंत केला असेल, किंवा परीक्षा घेऊन योग्य माणसें निवडण्याचें ठरविलें असेल तर तो मार्ग, अथवा ती परीक्षा स्त्रियांसही लागू करून त्यांची योग्यायोग्यता ठरविणें, हें रास्त दिसतें. आणि असें झालें असतां, महत्वाचीं कामें करण्यासाठीं साधारणतः ज्या पुरुषांची योजना करण्यांत येते त्या पुरुषांहून कमी हुशारीच्या स्त्रियांस तीं कामें मिळतील अशी भीति रहाणार नाहीं. शिवाय, आणखीही अशी एक गोष्ट कदाचित् घडून येईल कीं, कांहीं एका प्रकारच्या धंद्यांत किंवा कामांत पुरुषांच्या संख्येपेक्षां स्त्रियांची संख्या कमी सांपडेल. सांपडो. कारण हा परिणाम कांहीं केलें तरी होणारच कां तर, दुसऱ्या एखाद्या धंद्यांत, तो धंदा विशेषेंकरून स्त्रियांसच योग्य असल्यामुळें, स्त्रियांचीच अधिक संख्या होईल.

करावा, एवढी गोष्ट मात्र ध्यानांत ठेविली पाहिजे. आणि असें झालें असतां, महत्वाचीं कामें करण्यासाठीं साधारणतः ज्या पुरुषांची योजना करण्यांत येते, त्या पुरुषांहून कमी हुशारीच्या स्त्रियांस तीं कामें कदाचित् मिळतील, अशी धास्ती बाळगण्याचें कारणच नाहीं. झाला तर एवढाच परिणाम होईल कीं, कांहीं एका प्रकारच्या धंद्यांत किंवा कामांत पुरुषांच्या संख्येपेक्षां स्त्रियांची संख्या कमी येईल. येईल तर येवो. कारण असा हा परिणाम कांहीं केलें तरी होणारच. कां तर, दुसऱ्या एखाद्या धंद्यांत, तो धंदा विशेषेंकरून स्त्रियांसच योग्य असल्यामुळें व त्यांच्याशीं स्पर्धा करण्यास पुरुष न आल्यामुळें स्त्रियांचीच अधिक संख्या होईल. स्त्रियांचा कसाही मोठा निंदक किंवा हाडवैरी असला तरी, एवढी गोष्ट कबूल करील कीं, प्राचीन काळचा इतिहास व आलीकडल्या काळांतील अनुभव ताडून पहातां, पुष्कळ स्त्रियांनीं जीं जीं कामें केलीं, तीं मोठ्या नेकीनें, शहाणपणानें, पुरुषाच्या बरोबरीनें केलीं आहेत असें आढळतें.* तेव्हां, फार फार तर इतकेंच ह्मणतां येईल कीं, कांहीं कांहीं पुरुषांच्या हातून जशीं अनेक अलौकिक कामें घडलीं आहेत, तशीं त्या स्त्रियांच्या हातून घडलीं नाहींत. ह्मणजे अगदीं पहिल्या पाहिरीला येऊन पोंचलीं नाहींत. तथापि, केवळ बुद्धि—सामर्थ्यावर अवलंबून असणारीं जीं कामें त्यांत त्याच स्त्रिया

* आमच्या इकडे प्राचीनकाळच्या व आर्वाचीनकाळच्या चतुर व प्रतापी अशा स्त्रियांच्या नांवांची संख्या लहान आहे काय? सुलभा, मैत्रेयी, वाचक्नवी, सुवर्चला, **गार्गी**, **सावित्री**, **कल्याणदेवी**, **सीता**, **मंदोदरी**, **तारा**, **द्रौपदी**, इत्यादि सर्वमान्य अशा प्राचीन स्त्रियांची नांवें सांगतां येतील. परंतु अर्वाचीनकाळच्याही **झांशीची राणी**, पेशव्यांची **रमाबाई**, **अहिल्याबाई** होळकरांची **मुक्ताबाई**, **जनाबाई**,— फार काय, आमच्यापिढींतल्या परंतु आमच्या दुर्भाग्यामुळें काळानें अकालींच व अकस्मात् झांप घालून नेल्या अशा दोघी—एक प्रसिद्ध कलकत्त्याकडील कवयित्री **तोरुदत्त** व दुसरी अमेरिकेहून आयुर्वेद शिकून आलेली प्रतापशाली **आनंदीबाई जोशी**—अशा स्त्रियांची बुद्धि लोकोत्तर होती, ही गोष्ट कसाही स्त्रीद्वेष्टा पुरुष असला तरी **नाकबूल** करण्याचें धाष्टर्य करील काय?

दुसऱ्या पाहिरीपर्यंत पोंचल्या नाहींत, अशीं फारच थोडीं उदाहरणें आहेत. अशी गोष्ट उघड उघड असतां, मोठमोठीं सार्वजनिक कामें स्त्रियांस सर्वथा निषिद्ध असावीं, व तीं मिळविण्याविषयीं खटपट करण्याचा हक्क पुरुषांच्या बरोबरीनें स्त्रियांस असूं नये, हा स्त्रियांवर केवढा जुलूम आहे? शिवाय, या गोष्टीमुळें समाजाचें ही किती नुकसान होत आहे, याची कोणास कल्पना तरी होत असेल काय? तीं तीं कामें करीत असलेल्या पुरुषांपेक्षां शतपट हुशार अशा स्त्रिया असतात, व खरोखर त्या पुरुषांची व त्या स्त्रियांची परीक्षाच घेतली तर, पुरुषांस स्त्रिया खास मागें टाकतील, अशी स्थिति वास्तविक व्यवहारांत आढळते, हें कोण नाकबूल करणार आहे?* या वर सांगितलेल्या स्त्रिया दुसरीं कांहीं कामें करीत असलेल्या इतर कांहीं पुरुषांपेक्षां बुद्धि-सामर्थ्यानें कमी आहेत, असें जरी असलें, तरी त्यावरून सिद्ध होणार तें काय? प्रत्येक धंद्यांत अशी गोष्ट आहेच आहे. उंच प्रतीचीं कामें करण्यास अत्यंत योग्य व वाकबगार अशा पुरुषांची इतकी का रेलचेल समाजांत आहे कीं, लोक–समाजानें खरोखर हुषार माणसांचा अनादर करावा व त्यांच्या हातून कामें घेण्याचें नाकारावें? जगांत जेवढीं ह्मणून माणसें आहेत, त्यांच्यापैकीं अर्धीं माणसें एकदम नालायक ठरवून, त्यांच्या बुद्धि व त्यांच्या शक्ति, कितीही अलौकिक असल्या तरी, तीं आमच्या अगदीं उपयोगी नाहींत, असा निश्चय-पूर्वक ठराव करून टाकणें, ह्मणजे केवढा अन्याय आहे? यापेक्षां अधिक शोचनीय गोष्ट कोणती असावी? लोकोपयोगी व महत्वाचें असें एखादें काम उभें राहिलें, तर त्यास सर्वथा पात्र व लायक असा पुरुष–जातीपैकीं नेहमीं सांपडेलच सांपडेल, अशी खातरी कशावरून बाळगावी? आणि क्षणभर अशी आमची खातरी

---

* आमचे लोक देखील मुलांपेक्षां मुली मोठ्या चलाख व तीव्र–बुद्धीच्या असतात, ही गोष्ट कबूलच करितात. याच्या उलट ज्यांची समजूत आहे, किंवा जे प्रतिपादन करितात, असे फारच थोडे लोक सांपडतील.

आहे, असें जरी ह्मटलें, व बायकांच्या शहाणपणावांचून आमचें अडत नाहीं असें जरी असलें, तथापि, आपापला धंदा आपापल्या खुषीनें व आपापल्या जबाबदारीवर पसंत करण्याचा जो हक्क प्रत्येक मनुष्यास आहे तो अमान्य करणें; प्रतिष्ठा, कीर्ति, किंवा नांव मिळविण्याविषयीं मनुष्यमात्रास नैसर्गिक जी इच्छा असते, तिचा उच्छेद करून टाकणें, ही गोष्ट न्यायास अनुसरून आहे काय? हा निव्वळ जुलूम नव्हे काय? आणि हा अन्याय केवळ स्त्रियांस बाधक होतो असें नाहीं, तर त्यांच्याकडून मोठमोठीं कामें करून घेण्याविषयीं जे कोणी उत्सुक असतील, त्यांसही बाधक होतो. अमुक व्यक्तींनीं वैद्याचा धंदा करूं नये, किंवा वकिलीचा धंदा करूं नये, किंवा अमुक माणसाचा वर्ग पार्लमेंट सभेचे सभासद होण्यास नालायक आहे, असा नियम करून टाकणें, ह्मणजे, ज्यांस हा नियम लागू होतो, व बाधक होतो, तेवढ्यांचेंच नुकसान करण्यासारखें आहे, असें नाहीं. तर ज्यांना ज्यांना ह्मणून वैद्यांची गरज आहे व वकिलांची गरज आहे व ज्यांना पार्लमेंटांमध्यें आपल्या तर्फे सभासद नेमण्याकरितां योग्य माणसांची निवड करण्याचा हक्क आहे, त्या सर्वांचें अत्यंत नुकसान करणें होय. तें असें:—एक तर स्त्रिया नालायक ठरविल्यामुळें, परस्परांत जी योग्य ईर्षा उत्पन्न होते तेणेंकरून काम करणाऱ्यांवर जो एक प्रकारचा लोकोपयुक्त व उत्साह-कारक परिणाम होतो, त्यास त्यांच्यामध्यें जागाच रहात नाहीं. आणि दुसरें असें कीं, योग्य वाटेल ती व्यक्ति, विवक्षित कामाकरितां, ज्यांतून निवडून काढावयाची, तो प्रदेश आकुंचित होतो.*

* या गोष्टींचें एक उदाहरण आपल्या इकडलें दिलें असतां, निबंधकारांचें ह्मणणें बरेंच व्यक्त होईल, असें वाटल्यावरून देतों. कोंकणस्थ, देशस्थ, कऱ्हाडे, हे जे प्रकार ब्राह्मणांत माजले आहेत, त्यांच्या योगानें ज्याच्या त्याच्या जातीचें क्षेत्र संकुचित राहून वरास वधू व वधूस वर मिळण्याची केवढी पंचाईत पडते? तेव्हां, क्षेत्र जितकें विस्तृत करितां येईल, तितकें अधिक हितकारक होतें. हा निबंधकाराचा आशय.

२. यापुढें मीं माझ्या विषयाचें जें विवेचन करणार आहें, त्यांत फक्त लोकोपयुक्त किंवा सार्वजनिक कामापुरताच विचार केला असतां कदाचित् बस्स होईल, असें मला वाटतें. कारण, सार्वजनिक कामें करण्याची मोकळीक स्त्रियांस असावी, अशी जर मीं वाचकांची खातरी केली, तर इतर सर्व इष्ट व महत्वाच्या कामांतही त्यांचा प्रवेश व्हावा, ही गोष्ट आमचे प्रतिपक्षी कदाचित् सहज कबूल करतील. या ठिकाणीं एवढें सांगणें अवश्य दिसतें कीं, स्त्रियांच्या बुद्धीशीं किंवा मानस-शक्तीशीं, ज्या हक्काचा किंवा अधिकाराचा मुळींच संबंध नाहीं, असा एक हक्क किंवा अधिकार आहे. तो कोणता ह्मणाल तर, पार्लमेंट व म्युनिसिपालिटी यांतील सभासद निवडण्याचा अधिकार होय. लोकांनीं जो अधिकार कोणत्याही मनुष्यास आपला प्रतिनिधि ह्मणून द्यावयाचा तो अधिकार कोणास द्यावा, या गोष्टींचा निर्णय करून, योग्य माणसाची निवड करण्याचा जो हक्क आहे तो, ज्याला बुद्धिमत्ता असेल त्यालाच असतो असें नाहीं. कारण, असें पहा कीं, पार्लमेंटांत उमेदवार होण्यास जो लायक नाहीं, त्याला, आपल्या तर्फेनें नुसता उमेदवार निवडून देण्याचाही अधिकार नसता तर, आमच्या या इंग्लंडाची राज्य-व्यवस्था फारच थोडक्या माणसांच्या हातांत गेली असती व निव्वळ बाच्छाई झाली असती. आपणांवर जीं माणसें सत्ता चालविणार, त्यांची निवड करण्याचा अधिकार असणें, हें स्व-संरक्षणाचें एक साधन आहे. हें साधन प्रजेपैकीं प्रत्येकाला असलेंच पाहिजे. मग दुसऱ्यावर अधिकार किंवा सत्ता चालविण्याचें काम त्याला जरी कधींही मिळालें नाहीं, तरी राज्य-कर्ते निवडण्याचा हक्क त्याला असलाच पाहिजे हें उघड आहे. अशा प्रकारच्या अधिकारास स्त्रिया लायक आहेत, ही गोष्ट लोकांस मान्य आहे असें वाटतें. कारण, हल्लींच्या कायद्यानें, त्यांच्या हिताच्या

व अत्यंत महत्वाच्या अशा गोष्टींत, ह्मणजे आपल्यास योग्य असा पति निवडण्याच्या कामांत, हा अधिकार त्यांना दिलेला आहे. जो पुरुष, आपल्यावर जन्मभर सत्ता चालविणार, तो पुरुष, स्त्रीनें आपल्या इच्छेनें वरावा अशी बहुतेकांची समजूत किंवा कल्पना असते. ज्या ठिकाणीं सार्वजनिक कामाकरितां कांहीं कांहीं माणसांची निवड करावयाची असते, त्या ठिकाणीं अवश्य लागणाऱ्या अशा अटी किंवा मर्यादा ठरविणें, हें कायद्याचें काम आहे. परंतु, ज्या ज्या अटी किंवा ज्या ज्या मर्यादा पुरुषांच्या बाबतींत बस्स आहेत, त्या त्या, स्त्रियांच्या बाबतींतही बस होतील, असें आमचें ह्मणणें आहे. स्त्रियांच्या बाबतींत विशेष अटी असण्याची जरूर दिसत नाहीं. माझा ह्मणण्याचा आशय हा आहे कीं, पुरुषांना आपलें मत देण्याच्या अधिकाराला, ज्या ज्या अटींची व ज्या ज्या मर्यादांची योजना केली आहे, त्याच अटींवर व त्याच मर्यादेंत, स्त्रियांसही आपलें मत देण्याचा अधिकार कां मिळूं नये? मिळूंनये, असें ह्मणण्यास कांहींच योग्य कारण दिसत नाहीं. कोणत्याही एका वर्गातील स्त्रिया घेतल्या तर, त्यांपैकीं बहुतेक स्त्रियांचीं राजकीय संबंधानें जीं मतें असतील, तीं मतें त्याच वर्गातील पुरुषांच्या मताहून भिन्न असण्याचा संभव फारच थोडा. आतां, एवढें मात्र खरें कीं, जेव्हां एकट्या स्त्री-वर्गाच्याच हिताहिताचा संबंध उत्पन्न होईल, तेव्हां मात्र गोष्ट निराळी. कारण, अशा प्रसंगीं बहुतेक पुरुषांचीं मतें विरुद्ध पडणार. परंतु इतर प्रसंगीं स्त्रियांचीं व पुरुषांचीं मतें सारखींच असण्याचा जर पुष्कळ संभव आहे, तर स्त्रियांनाही प्रतिनिधि निवडण्याचा अधिकार असला पाहिजे, हें उघड दिसतें. आपल्याला योग्य न्याय मिळतो व आपणांस बरोबरीच्या नात्यानें पुरुष वागवीत आहेत, अशा प्रकारचा जिम्मा पुरुषांकडून स्त्रियांस मिळाल्यासारखें होणार नाहीं

काय? ज्या इतर गोष्टी सिद्ध करण्याचा मी यत्न करीत आहें, त्या गोष्टी ज्यांना मान्य किंवा पसंत नाहींत त्यांना, एवढी ही गोष्ट तरी मान्य झालीच पाहिजे, असें मी समजतों. प्रत्येक स्त्री जर कोणाची तरी बायको होऊन राहिली, आणि प्रत्येक बायको ह्मणजे गुलाम असें जरी असलें, तरी त्या गुलामाला कायदेशीर आत्म-रक्षणाची अधिक अपेक्षा रहाणार. जे कायदे त्यांच्या धन्यांनीं केलेले असतात, त्या कायद्यांत, त्या गुलामांच्या रक्षणासंबंधीं कशा तजविजी केलेल्या असतात, हें अपणांस ठाऊक नाहीं असें नाहीं!

३. येथपर्यंत पार्लमेंटांत किंवा म्युनिसिपॉलिटींत आपल्या तर्फे प्रतिनिधि निवडण्याचा हक्क स्त्रियांस असावा किंवा नाहीं, याबद्दल विचार झाला. आतां, मोठमोठीं जबाबदारीचीं व सार्वजनिक कामें करण्यास स्त्रिया योग्य आहेत किंवा नाहींत, या संबंधाचा आपण विचार करूं. आमच्या प्रतिस्पर्ध्यांचा आक्षेप बहुधा असा असतो कीं, ही गोष्ट व्यवहारांत चालण्यासारखी नाहीं. या वाद-ग्रस्त मुद्याच्या संबंधानें, स्त्रियांच्या योग्यायोग्यतेचा विचार करणें अवश्यच आहे असें नाहीं, ह्मणून पूर्वीं मीं उल्लेख केलाच आहे. कारण, जी स्त्री कोणताही प्रतिष्ठित धंदा उघडपणानें करील, व त्यांत तिला जर यश प्राप्त होईल तर ती स्त्री त्या धंद्यास लायक आहे, असें उघड सिद्ध होतें. तिच्या पात्रतेविषयीं दुसरें प्रमाण काय देतां येईल? सार्वजनिक कामाच्या संबंधानें विचार करितां, ही गोष्ट उघडच आहे कीं, लायक माणसें निवडणें व नालायक माणसें टाळणें, ही गोष्ट एकंदर देशामध्यें ज्या प्रकारची राज्य-पद्धति असेल तिजवर अवलंबून असते. ज्या पद्धतीनें अयोग्य पुरुषांचा प्रवेश टाळतां येईल, ह्मणजे, ज्या राज्य-तंत्रांत अयोग्य व अपात्र पुरुषांचा प्रवेश होत नाहीं, त्याच राज्य-तंत्रांत अयोग्य व अपात्र अशा स्त्रियांचाही प्रवेश होणार नाहीं. होईल असें मानण्यास कांहीं

सयुक्तिक कारण दिसत नाहीं. परंतु चांगलीं माणसें निवडून वाईट माणसें टाळणें, हा गुण ज्या राज्य-पद्धतींत नसेल, त्या राज्यपद्धतीच्या योगानें नालायक व वाईट माणसें राज्य कारभारांत शिरणारच हें उघड आहे. मग तीं नालायक माणसें पुरुष असोत किंवा स्त्रिया असोत. स्त्रिया असल्यानेंच कांहीं विशेष नुकसान होईल असें ह्मणतां येत नाहीं. तेव्हां सार्वजनिक कामें किंवा अधिकार चालविण्यासारख्या स्त्रिया थोड्या तरी पण आहेत, असें जोंपर्यंत लोक कबूल करितात, तोंपर्यंत या थोड्या स्त्रियांच्या संबंधापुरताच जरी विचार केला तरी, ज्या कायद्याच्या योगानें त्यांस प्रतिबंध होत आहे, तो कायदा न्यायाचा होऊं शकत नाहीं. मग स्त्रियांच्या एकंदर बुद्धिमत्तेबद्दल कोणाचें कसेंही मत असो. तथापि स्त्रियांच्या एकंदर बुद्धिमत्तेचा विचार प्रस्तुत वादांत महत्वाचा नाहीं असें नाहीं. स्त्रियांच्या बुद्धि-सामर्थ्याविषयीं जर निःपक्षपातानें विचार केला, तर स्त्रियांच्या अपात्रतेविरुद्ध जीं जीं प्रमाणें दाखविण्यांत येतात, व जें प्रतिपादन करण्यांत येतें, त्यांत विशेष भर पडेल व व्यवहारांत या गोष्टीची उपयुक्तता सिद्ध करण्याचे कामीं उत्तम प्रकारची मदत होईल. यास्तव तोच विचार आतां आपण करूं.

४. मानस–शास्त्रदृष्ट्या ज्या गोष्टी सिद्ध करितां येतात त्या, सध्यां आपण एकीकडे ठेवूं. स्त्रिया व पुरुष यांच्यामध्यें मानिलेले जे मानसिक–भेद, ते नैसर्गिक किंवा मूळप्रकृतीचे नसून, केवळ कृत्रिम भेद असून स्त्रियांस मिळत गेलेलें एकंदर शिक्षण व त्यांच्या भोंवतालची एकंदर स्थिति, यांचे स्वाभाविक परिणाम आहेत. अशा तात्पर्याचे निदर्शक जे विचार आहेत, त्यांचा विचार प्रस्तुत आपणास कर्तव्य नाहीं. हल्लीं स्त्रिया आपणास कशा आढळतात किंवा पूर्वीं कशा होऊन गेल्या, व त्यांनीं आपली बुद्धिमत्ता प्रत्यक्ष व्यवहारांत

कशी दाखविली, तेवढ्यापुरताच विचार प्रस्तुत आपल्यास कर्तव्य आहे. आजपर्यंत त्यांनीं जीं कामें केलीं, किंवा जी कर्तृत्व--शक्ति दाखविली, त्यांवरून, तीं कामें तरी त्यांस करितां येतात, व तेवढी कर्तृत्व—शक्ति त्यांमध्यें आहे, हें खास सिद्ध होतें. फक्त पुरुषांकरतांच ह्मणून राखून ठेवलेले जे उद्योग किंवा जे व्यवसाय, ते स्त्रियांस न शिकवितां, होतां होईल तितकें त्या व्यवसायांपासून त्यांस दूर ठेवण्याचा यत्न असतो. या गोष्टीचा विचार केला असतां, स्त्रियांचा पक्ष, जीं कामें त्यांनीं प्रत्यक्ष करून दाखविलीं आहेत, तेवढ्यांवरच सिद्ध होतो. जी गोष्ट प्रतिपक्ष्यांस मान्य आहेच, असें ह्मणण्यास हरकत नाहीं, तेवढ्याच गोष्टीवर माझें सर्व प्रतिपादन आहे. या प्रश्नांत नास्ति—पक्षाच्या प्रमाणास मुळींच कांहीं किंमत नाहीं. व अस्ति—पक्षाचें प्रमाण अगदीं निर्णायक आहे, असें मानलें पाहिजे. ज्या कामांत **होमर,*** **ऑरिस्टाटल्,†** **मायकेल्‡ अंजेलो,** किंवा **बिथोव्हेन्§** या प्रसिद्ध पुरुषांनीं उत्तम नांवलौकिक मिळविला; त्या कामाच्या बरोबरीचें असें एकादें

---

* हा **ग्रीक** लोकांचा आद्य-कवि होय. हा **ख्रिस्ती** शकापूर्वी अजमासें हजार वर्षांपूर्वी होऊन गेला. आपल्या इकडे जसें वाल्मीकीनें रामायण लिहिलें, किंवा **व्यासानें महा-भारत** रचिलें, तशाच योग्यतेचीं **होमरनें इलियड व आडिसी** नांवाचीं काव्यें लिहिलीं.

† हा **ग्रीक** तत्त्व वेत्ता होता. तो ख्रि० श० पू० ३८४ या वर्षी जन्मला. व ख्रि० श० पू० ३२२ या वर्षी मृत्यु पावला. आपल्या **शिवाजी** राजाचा जसा **रामदास-स्वामी**, तसा हा **शिकंदर** बादशाहाचा गुरु होता.

‡ यास **'बुओनारोटी'** असेंही ह्मणतात. आपल्या इकडे जसा **रविवर्मा** किंवा **भिवासुतार** तसा हा **इटालीदेशांत** प्रसिद्ध चित्र-कार, मूर्ति-कार, शिल्प-कार व कवि होऊन गेला. हा इ० स० **१४७४** त जन्मला व इ० स० १५६३ त मरण पावला.

§ हा **प्रशिया** देशांत इ० स० १७७० त जन्मला. हा, आपल्यांत जसे **तानसेन** किंवा प्रोफेसर **मौलाबक्ष रहिमतखा**, किंवा बीनकार **बंदे अल्ली** यांच्यासारखा संगीतवादनादिकलांमध्यें व सुंदर स्वर-रचनेमध्यें ज्याची लोकोत्तर बुद्धि असा पुरुष होऊन गेला. हा इ० स० १८२७ त मरण पावला.

काम आजपर्यंत एकाही स्त्रीनें केलें नाहीं. यावरून **होमर, आरिस्टॉटल,** वगैरे होण्यास एकही स्त्री योग्य नाहीं, असें अनुमान करणें अगदीं अयोग्य होईल. एवढ्या या नास्ति-पक्षाच्या गोष्टीवरूनच ह्मणजे, कोणीही स्त्री आजपर्यंत **होमरकवी**सारखी किंवा इतर लोकोत्तर-गुण प्रकट केलेल्या एखाद्या पुरुषासारखी झालेली नाहीं, या गोष्टीवरून, फार फार झालें तर तो प्रश्न अनिश्चित राहील. व मानसशास्त्रामध्यें तो विचार करण्यासारखा आहे असें ह्मणतां येईल. परंतु कोणती एखादी स्त्री राणी **इलिझाबेथ,*** **डिबोरा,**† अथवा **जोन् आफ् आर्क**‡ होऊं शकेल, ही गोष्ट अगदीं खास आहे, कारण, ती अनुमानानें ठरावयाची आहे असें नव्हे, तर प्रत्यक्ष घडलेल्या गोष्टींपैकींच ती एक आहे. प्रस्तुतच्या व्यवहार-शास्त्रान्वयें, ज्या गोष्टी करण्याचा स्त्रियांस निषेध आहे, त्याच गोष्टी त्यांस चांगल्या रीतीनें करितां येतात, हें सिद्ध झालें आहे. हें पाहून फार चमत्कार वाटतो. **शेक्सपीयर**चीं सर्व नाटकें अथवा **मोझार्ट्**चीं§ सर्व संगीत काव्यें कर-

---

* या नांवाची **इंग्लंडामध्यें** एक मोठी राणी होऊन गेली. त्या वेळीं **शेक्सपीयर**सारखे मोठे कवि व **बेकन**सारखे मोठे तत्त्व-वेत्ते झाले, व **प्रॉटेस्टंट** धर्माचा उत्कर्ष झाला. हिनें मोठ्या चातुर्यानें पुष्कळ दिवस राज्य केलें. हिच्या अमदानींत इंग्लंडांत मोठी भरभराट झाली. आपल्या इकडील **अहिल्याबाईहोळकर** व **बायजाबाई शिंदे**, वगैरे स्त्रियांचीं उदाहरणें ध्यानांत आणण्यासारखीं आहेत.

† ही एक अशीच लोक-प्रसिद्ध व विशिष्टगुणान्वित स्त्री **इंग्लंडांत** होऊन गेली.

‡ ही बाई मोठी शूर होती. हिनें युद्धामध्यें अग्रेसरता पत्करून आपल्या (**इंग्लंड**) देशांत नांवलौकिक मिळविला. हिला ' अर्लियन येथील कुमारी ' असें ह्मणत. ही इ० स० १४११ त जन्मली. आणि इ० स० १४३१ त मरण पावली. आपल्या इकडे जशी **झांशीची** शूर राणी **लक्ष्मीबाई** हिची कीर्ति आहे, तशाच प्रकारची इतिहासांतरीं ह्या फ्रेंच बाईचीही आहे.

§ हा **जर्मन्** इ० स० १७५६ त जन्मला, व इ० स० १७९१ त मरण पावला. आपल्याइकडील जसे प्रसिद्ध कै० **अण्णा किर्लोसकर** नुकतेच होऊन गेले, तशाच प्रकारचा हा असून यानें संगीतासारखीं काव्यें केलीं होतीं.

ण्याला, स्त्रियांस प्रतिबंधक असा एकही कायदा नाहीं. परंतु राणी **इलिझाबेथ,** किंवा **व्हिक्टोरिया** राणी, यांना जर वारसाच्या हक्कानें राज्य-पद प्राप्त झालें नसतें तर मोठमोठ्या राज्य-कारस्थानांचा भार ज्या **इलिझाबेथनें** उत्तम प्रकारें वाहिला, त्यांच्यापैकीं शतांश किंवा सहस्रांश देखील तिला प्राप्त झाला नसता.

५. मानस–शास्त्रदृष्ट्या विचार करितां, केवळ अनुभवावरून जर कांहीं निर्णायक अनुमान निघण्यासारखें असेल, तर तें हेंच कीं, जीं कामें करण्याची स्त्रियांस मनाई होती, त्याच कामांमध्यें त्यांचें बुद्धि-सामर्थ्य विशेष व्यक्त झालें. व तीं कामें करण्यांत त्यांनीं आपली विशेष पात्रता दाखविली. दुसऱ्यांवर अधिकार चालविण्याचे किंवा लोक-शासनचा अधिकार चालविण्याचे जे थोडेसे संधि–जे थोडेसे प्रसंग–दैव योगानें त्यांस प्राप्त झाले, त्यांत, त्यांची पात्रता उघड झाली नाहीं काय? नाहीं असें कोणी ह्मणेल तो ह्मणो बिचारा! चमत्कार असा कीं, जीं कामें करण्याची त्यांना उघडपणें पूर्ण मुभा ठेविली होती, त्यांत त्यांनीं कांहीं एक विशेष प्रकारची दक्षता दाखविली नाहीं. परंतु जीं कामें करण्याचा समाजानें त्यांस प्रतिबंध केला, त्यांतच त्यांनीं आपलें बुद्धि–सामर्थ्य दाखविलें. जगाचा इतिहास पाहिला असतां, त्यांत राजांच्या संख्येच्या मानानें, राज्य करणाऱ्या राण्यांची संख्या फारच थोडी दृष्टीस पडते. परंतु या लहानशा संख्येपैकीं बहुतेक स्त्रियांनीं राज-कारणांत आपली बुद्धिमता निःसंशय प्रकट केली आहे. विशेषेंकरून त्यांपैकीं बऱ्याच स्त्रिया ऐन आणीबाणीच्या प्रसंगीं राज्य-पदावर आरूढ झाल्या होत्या, ही गोष्ट लक्षांत आणिली असतां आश्चर्य वाटतें. स्त्रियाविषयीं काल्पनिक व लोकांत रूढ असलेल्या ज्या समजुती आहेत, ह्मणजे, स्त्रिया मनाच्या चंचल वगैरे जे दुर्गुण त्यांच्यामध्यें स्वभावतः आहेत असें मानण्याचा

प्रघात आहे, त्याच्या अगदीं उलट वर्तन त्यांनीं केलें. अशीं उदाहरणें त्यांत पुष्कळ आढळतात. त्यांनीं जो राज्य कारभार केला, त्याच्यामध्यें त्यांची जशी बुद्धि-मत्ता दृष्टीस पडते, तशीच त्यांच्या मनाची दृढता, दृढ निश्चय, कुवत किंवा धमक, वगैरे गुण दृष्टीस पडतात. बादशाहिणी व राण्या यांच्या संख्येंत, मोठमोठ्या प्रांतावर ज्यांनीं वहिवाटदारिणी व कारभारिणी अशा संबंधानें आपली सत्ता चालविली, अशा स्त्रियांची भर घातल्यास, ज्या स्त्रियांनीं लोक-शासनाच्या कामांत उत्तम प्रकारचा नांवलौकिक मिळविला, अशा स्त्रियांची संख्या बरीच मोठी होईल.* ही गोष्ट इतकी निर्विवाद आहे कीं, कांहीं दिवसांपूर्वीं आमच्या या ह्मणण्याला एकानें उत्तर देण्याचा यत्न केला होता. आणि जी गोष्ट त्याला मान्य करावी लागली, तिचा त्यानें उपहास केल्यासारखें करून तो असें ह्मणाला कीं, राजांपेक्षां राण्या चांगल्या असतात, याचें कारण, राजांच्या

* या ठिकाणीं निबंध कारांनीं एक टीप दिलेली आहे. ती येणेंप्रमाणें:—

"या संबंधानें **एशियाखंड** व **यूरोपखंड** या दोहोंचा विचार केला असतां, राज्य-कारभार ज्या स्त्रियांनीं उत्तम रीतीनें चालविला, अशाच स्त्रियांची संख्या फार मोठी होते **हिंदुस्थानां**तील एकाद्या प्रांतांत किंवा संस्थानांत राज्य-कारभार मोठ्या बंदोबस्तानें, जागरूकतेनें व मितव्ययानें असा चालत असला; रयतेवर जुलूम होत नसून उत्तम प्रकारें व्यवस्था असली; जमिनीची लागवड दिवसानुदिवस वाढत असून, लोक सुखी असले; तर अशा प्रत्येक चार संस्थानांपैकीं तीन संस्थानें तरी स्त्रियांच्या अधिकाराखालचीं किंवा स्त्रियांच्या सत्तेंतलीं आहेत, असें पक्कें समजावें! ही गोष्ट मला अगदीं अनपेक्षित किंवा अपरिचित होती. परंतु **हिंदुस्थाना**च्या मुख्य राज्य-कारभाराच्या खात्याशीं माझा संबंध असल्या कारणानें, **हिंदुस्थानां**तील राज्यें व संस्थानें यांच्या संबंधाची जी माहिती मला दफ्तरांतून मिळाली, तींतून मीं ही माहिती गोळा केली आहे. अशा प्रकारचीं पुष्कळ उदाहरणें आढळतात. हिंदु लोकांच्या चालीप्रमाणें व रूढीप्रमाणें स्त्रीला राज्य करण्याचा अधिकार नाहीं; असें जरी आहे, तरी वारस अज्ञान असल्याचे प्रसंग वारंवार येतात. आणि याचें कारण राजे बहुतेक आळशी व विषयासक्त असल्या कारणानें ते अकालीं मरतात. ह्या कारभारणी किंवा राज-पत्न्या लोकांसमोर कधीं येत नाहींत. आपल्या कुटुंबाखेरीज पर-पुरुषाशीं त्या कधीं भाषण करीत नाहींत,

अमदानींत खरोखर स्त्रियाच राज्य करीत असतात; व राण्यांच्या अमदानींत वस्तुतः पुरुषच राज्य करीत असतात.

६. अशा प्रकारचें उपहासाचें किंवा थट्टेचें भाषण करणाराजवळ गंभीरपणानें एखाद्या विषयाचें प्रतिपादन करणें निरर्थक होय, असें प्रथमतः मनांत येतें. तथापि ही वरील ह्मण पुष्कळ लोकांनीं उच्चारिलेली मीं ऐकिली आहे व त्या ह्मणींत कांहीं शहाणपणाचा अंश आहे असें समजून, त्यांनीं ती उच्चारिली असावी. कसेंही असो, चालू विषयाच्या विवेचनास आरंभ करण्यापूर्वीं, या ह्मणींत तथ्य कितपत आहे तें पाहूं. मी असें निश्चय-पूर्वक सांगतों कीं, राजांच्या अमदानींत राज्य खरोखर स्त्रिया करीत असतात, किंवा राज्य-कारभार खरोखर स्त्रियांच्या हातांत असतो, ही गोष्ट खरी नाहीं. अशा प्रकारचीं उदाहरणें क्वचित् आढळलीं तरी फारच थोडीं आढळतात. ज्या ज्या ठिकाणीं दुर्बळ व नेभळ्या राजांनीं राज्य वाईट केलें, त्या त्या ठिकाणीं, त्यांच्या मर्जींतल्या स्त्रियांच्या सल्ल्यानें राज्यकरण्यापेक्षां, पुरुष-जातीपैकींच जीं त्यांचीं आवडतीं माणसें होतीं, त्यांचाच पगडा त्यांच्यावर अधिक होता, असें आढळतें. जेव्हां एखादा राजा एखाद्या स्त्रीवर लंपट होऊन तिच्या सल्ल्यानें राज्य करितो तेव्हां, राज्य चालण्याचा मुळींच संभव नसतो. तथापि या गोष्टीलाही कधीं कधीं अपवाद आढळतात. फ्रेंच राजांचा इतिहास

किंवा केलें तरी पडद्याच्या आंतून करितात. त्यांस वाचतां येत नाहीं, आणि आलें तरी राज्यकारभाराच्या संबंधाची माहिती ज्या पुस्तकांत दिली आहे, असें पुस्तक त्यांच्या भाषेंत एकही नाहीं. या गोष्टी लक्षांत ठेविल्या असतां, स्त्रियांच्या अंगीं राज्य-कारभार करण्याविषयीं स्वभावतःच बुद्धि-सामर्थ्य आहे, ही गोष्ट मनांत चांगली ठसते. इतिहास प्रसिद्ध शूर झांशीची राणी, व योग्य दानधर्म करण्याच्या संबंधानें सर्व विश्रुत अशी अहिल्याबाई होळकरीण या दोन स्त्रियांचीं उदाहरणें ही वाचकांनीं ध्यानांत आणण्या सारखीं आहेत.

पहातां, दोघां राजानीं आपल्या खुषीनें राज्याचा कारभार पुष्कळ वर्षेपर्यंत स्त्रियांकडेच सोंपविला होता. त्यांपैकींच एकजण त्याची आई होती. व दुसरी प्रत्यक्ष त्याची बहीण होती. या दोन राजांपैकीं एक **आठवा चार्लस** हा केवळ पोरसवदा होता. परंतु त्यानें राज्य–सूत्र जें आपल्या मातोश्रीच्या स्वाधीन केलें होतें तें, त्याचा बाप जो **अकरावा लुई** त्याच्या हेतूस अनुसरूनच केलें होतें. हा **अकरावा लुई** त्या काळचा फारच उत्तम राजा होता. दुसरा राजा **सेन्टलुई** हाही फार उत्तम राजा होता. **शार्लमेन्*** राजा झाल्यानंतर, तेव्हां-पासून इतका जोमदार राजा दुसरा झाला नाहीं. या दोघीही राण्यांनीं जो राज्य-कारभार चालविला, त्याची बरोबरी, त्या वेळच्या राजांपैकीं, एकाही राजानें केली नाहीं. **पांचवा चार्लस** हा बादशाहा होता. तो आपल्या काळचा मोठा राज-कार्य-धुरंधर असून, त्याच्या दरबारांत राजकारण-दक्ष अशीं पुष्कळ माणसें होतीं. आपल्या खऱ्या हिता-कडे दुर्लक्ष करून, केवळ मनोविकारास वश होणें, ही गोष्ट तर त्याच्या कधीं स्वप्नांत ही येत नसे. असें असून या बादशहानें आपल्या कुटुंबांतील दोन राज-पुत्र्यांस **नेदर्लंडस्** या देशाच्या गव्हर्नरचा अधिकार एकीपासून एकीस दिला होता. हा राजा जीवमान होता तोंपर्यंत, त्या दोन्ही राण्यांनीं एकामागून एक असा तो कारभार चालविला होता. व त्याच्या मरणानंतर तो **नेदर्लंड**चा गव्हर्नराचा अधिकार त्या राज-घराण्यांतील तिसऱ्या एका राज-पुत्रीस मिळाला. सदरहू दोन स्त्रियांनीं फारच उत्तम रीतीनें राज्य-कारभार चालविला. व त्या दोघींपैकीं एक **मार्गारेट ऑफ ऑस्ट्रिया** ही त्या काळीं, राजकारणांत अत्यन्त दक्ष अशी स्त्री मानलेली होती. याप्रमाणें या

---

* हा आपल्या देशांत जसे **हरिश्चंद्र**, **रामचंद्र**, किंवा आलिकडील **अकबर**, हे राजे होऊन गेले, त्या वर्गापैकींच **शार्लमेन्** हा राजा फ्रान्स देशांत होऊन गेला.

ह्मणीच्या एका भागाचा विचार झाला. आतां दुसऱ्या भागाचा विचार करूं. लोक जें ह्मणतात कीं, 'राण्यांच्या अमदानींत खरी राज्य-सत्ता पुरुषांच्या हातांत असते.' या ह्मणण्याचा अर्थ, 'राजांच्या अमदानींत खरी सत्ता स्त्रियांच्याच हातांत असते.' या ह्मणण्यासारखाच समजावयाचा कीं काय? जे पुरुष त्यांच्या मर्जींतले व विशेष कृपेंतले असतात, ह्मणजे ज्यांपासून त्यांस विषय-सुख प्राप्त होतें, असे पुरुष राज्य-कारभार चालविण्यास त्या पसंत करितात. असें ह्मणणें आहे कीं काय? मला असें वाटतें कीं, असा प्रकार, **दुसरी क्याथरीन्** हिच्यासारख्या ज्या अत्यन्त दुराचारी स्त्रिया असतात, त्यांच्यांत देखील क्वचित् आढळतो. व अशा प्रकारच्या स्त्रियांच्या अमदानींत, पुरुषांच्या हातांत राज्य-सत्ता असल्या कारणाने तें राज्य चांगलें चालतें, असें कधींही घडत नाहीं. आणि हें जर खरें असेल तर, राणीच्या अमदानींत, साधारण एखाद्या राजाच्या अमलापेक्षां राज्य-कारभार चांगल्या माणसांच्या हातांत असतो, असेंच ह्मटलें पाहिजे. आणि हें ह्मणणें खरें असल्यास, आपल्या चांगल्या कारभाऱ्यांची निवड करितां येण्यापुरती बुद्धि-मत्ता राण्यांच्या अंगीं असते, हें मान्य करणें भाग आहे. आणि त्यावरून हें उघड होतें कीं, राजाच्या अधिकाराला आणि त्याचप्रमाणें, त्याचा मुख्य अमात्य किंवा प्रधान, या दोन्ही अधिकारांनां पुरुषांपेक्षां स्त्रियाच अधिक योग्य होतात. कारण, मुख्य प्रधानाचें काम जातीनें सर्व कारभार पाहण्याचें नसून, सार्वजनिक कामें किंवा एकंदर कारभार चालविण्याकरितां प्रत्येक खात्यांत उत्तम व योग्य माणसांची निवड करणें, एवढेंच आहे.

पुरुषांपेक्षां स्त्रिया ज्या गुणांत श्रेष्ठ असतात, असें बहुतेक लोक कबूल करितात त्या गुणांपैकीं दुसऱ्याचें इंगित सत्वर ताडणें, हा एक गुण फार महत्त्वाचा आहे. ज्या मनुष्यास इतर मनुष्य-प्राण्यांवर

सत्ता चालविण्याचें काम करावयाचें असतें, त्याला या गुणाची अत्यंत आवश्यकता असते. यामुळें, योग्य माणसांची निवड करण्याच्या कामास पुरुषांपेक्षां स्त्रिया अधिक लायक असतात, असें सिद्ध होतें. **क्याथरीन् डी मिडिसी** या नांवाची एक अविचारी अशी राज-पुत्री होती. तथापि तिला देखील **चान्सेलर डी ल्हॉपिटाल्** या नांवाचा जो एक राज-कारण-कुशल पुरुष होऊन गेला, त्याच्या गुणांची परीक्षा करितां आली. आजपर्यंत ज्या मोठमोठ्या राण्या होऊन गेल्या त्या, राज्य-कारभार करण्याचा त्यांच्यांत जो लोकोत्तर गुण होता, त्याच्याच योगानें प्रसिद्धीस आल्या, व त्यांच्या हाताखालीं काम करण्यास त्यांना जीं माणसें मिळालीं, तींही त्याच कारणामुळें चांगलीं मिळालीं. ही गोष्ट कांहीं खोटी नाहीं. त्या राण्यांनीं एकंदर कारभाराचें मुख्य सूत्र आपल्या हातांत ठेविलें. त्यांनीं चांगल्या मंत्र्यांची सल्लामसलत ऐकून तदनुसार वर्तन ठेविलें, या गोष्टीवरून, राज्य-कारभार करण्याच्या कामांत ज्या मोठमोठ्या अडचणी उत्पन्न होतात, त्या अडचणींतून आपल्या शहाणपणानें पार पडण्याचें सामर्थ्य त्यांच्या अंगीं होतें, ही गोष्ट त्यांनीं निर्विवाद सिद्ध केली, असें ह्मटलें पाहिजे.

७. राज-कारणासारखीं जीं मोठमोठीं कामें, तीं करण्याची ज्यांच्या अंगीं योग्यता असते, त्या माणसांच्या अंगीं साधारण कामें करण्याची योग्यता नसते, असें समजणें योग्य होईल काय? ज्या ज्या वेळेस प्रसंग येईल, त्या त्या वेळेस राज-स्त्रिया व राज-भगिनी, राज्य-कारभारास राजपुत्रांप्रमाणेंच योग्य अशा आढळाव्या, व राज-कारण-निष्णात पुरुष, किंवा मोठमोठ्या कारखान्यांचे चालक व सामाजिक संस्थांचे व्यवस्थापक, यांच्या बायकांस आणि बहिणींस, त्यांचे नवरे व त्यांचे भाऊ जीं कामें करितात, तीं कामें करितां येणार नाहींत

असें मानण्यास कांहीं वास्तविक कारण आहे काय? खरें कारण एवढेंच दिसतें कीं, राज-घराण्यांतल्या स्त्रिया सामान्य पुरुषांपेक्षां उच्च-स्थितींत व श्रेष्ठ-वर्गांत असल्या कारणानें, राज-कारणांत आपण पडणें हें अयोग्य किंवा अप्रशस्त आहे, अशा प्रकारचा उपदेश त्यांस कधींही मिळालेला नसतो. शिक्षणानें ज्यांचें मन विस्तृत अथवा विकसित झालें आहे, ज्यांना विद्येचा संस्कार दृढ झाला आहे, ज्यांच्या-भोंवतालीं चालू असलेल्या ज्या अनेक मोठ्या उलाढाली-कीं ज्यांत पाहिजे त्या वेळीं त्या माणसांचा संबंध उत्पन्न होण्याचा संभव असतो—अशा माणसांस त्या उलाढालींच्या संबंधानें आस्था वाटणें, हें फारच स्वाभाविक आहे. हें तत्त्व लक्षांत ठेवून, राज-घराण्यांतल्या स्त्रियांस जर अशा प्रकारची आस्था वाटली, व त्यांनीं राज-कारणांत मन घातलें, तर त्यांस कोणी प्रतिबंध करीत नाहीं. यामुळें, पुरुषांप्रमाणेंच ज्यांच्या बुद्धीचा विकास होण्यास ज्यांना अनेक प्रसंग असतात अशा स्त्रिया, राज-घराण्यांतल्या स्त्रियांखेरीज इतरांच्या नसतात. तेव्हां, पुरुषांपेक्षां त्यांच्यांत कांहीं कमीपणा आढळत नाहीं, ही गोष्टही विस्मय-कारक नाहीं. ज्या ज्या मानानें व ज्या ज्या ठिकाणीं, राज-सत्ता चालविण्याचा प्रसंग स्त्रियांस आला, व त्यांच्या बुद्धि-सामर्थ्याची परीक्षा झाली, त्या त्या मानानें व त्या त्या ठिकाणीं, त्यांची योग्यता सिद्ध झाली.

८. हा सिद्धांत, स्त्रियांच्या विशेष बुद्धि-सामर्थ्याच्या अथवा योग्यतेच्या संबंधानें जगाला जो थोडासा अनुभव आलेला आहे, त्याजपासून निघणारें जें अनुमान, त्यास अनुसरूनच आहे. या संबंधानें ही गोष्ट लक्षांत ठेविली पाहिजे कीं, स्त्रियांची जी स्थिति आजपर्यंत कायम आहे, तेवढ्याच पुरता हा अनुभव आला. यापुढें त्या कशा होतील, त्या संबंधानें आज कांहींच सांगतां येत नाहीं. स्त्रिया निसर्गतः कशा आहेत किंवा कशा नाहींत, त्यांचे स्वाभाविक धर्म

कोणते आहेत किंवा कोणते नाहींत, अथवा पुढें त्यांचे धर्म अमुक होतील किंवा अमुक होणार नाहींत, अशा प्रकारचा निश्चयात्मक सिद्धांत ठोकून देणें, हें निव्वळ साहसाचें किंवा धाष्ट्यांचें काम आहे, असें मी समजतों. आजपर्यंत त्यांचा जो यदृच्छेचा विकास, किंवा त्यांच्या मानसिक व इतर शक्तींची स्वाभाविक वृद्धि, तिची गति कृत्रिम कारणांनीं कुंठित झाल्यामुळें, त्यांच्या मूळप्रकृतींत पुष्कळ वेडावांकडा बदल होऊन, कांहीं कांहीं प्रकृति-धर्म अगदीं गूढ राहून गेले, किंबहुना नष्टप्राय झाले, ह्मटलें तरी चालेल. स्त्रियांच्या स्वभावास जर पुरुषांच्या स्वभावाप्रमाणें मोकळेपणानें कांहींएक वळण मिळालें असतें ; त्यांच्या त्या त्या वेळच्या स्थितीस अवश्य होतें त्याखेरीज कृत्रिम प्रकारचें वळण देण्याचा यत्न जर करण्यांत आला नसता, व तें वळण स्त्रिया व पुरुष या उभयतांसही सारखें देण्यांत आलें असतें, तर जें बुद्धि-सामर्थ्य किंवा ज्या मानसिक-शक्ति प्रकट झाल्या असत्या, त्यांमध्यें कांहीं विशेष–किंबहुना मुळींच काहीं–भेद पडला असता किंवा नाहीं, हें कोणासही निश्चय-पूर्वक सांगतां येणार नाहीं. प्रस्तुत ज्या भेदाबद्दल विशेष वाद नाहीं, ह्मणजे जे बहुतेक भेद उभय पक्षांसही मान्य करावे लागतात, ते भेदही अशाच प्रकारचे आहेत. ह्मणजे, स्वाभाविक बुद्धींत किंवा मूळ प्रकृतींत ते भेद होते असें नसून, केवळ बाह्य उपाधींच्या योगानें, ह्मणजे भोंवतालच्या स्थितीमुळें ते उत्पन्न झाले असावे, असें मी पुढें दाखविणार आहेंच. परंतु चालू व्यवहारांत स्त्रियांच्या संबंधानें जो अनुभव येतो, तो पाहिला असतां, त्याच्या संबंधानें खरोखर निदान एवढें तरी खास ह्मणतां येईल कीं, त्यांच्या बुद्धीची साधारण प्रवृत्ति व्यवहारांतल्या गोष्टींकडे अधिक असते. वर्तमानकाळाचा किंवा भूतकाळाचा स्त्रियांचा जो इतिहास

आढळतो, त्याशीं आमचें हें ह्मणणें ताडून पाहिलें असतां, बरेंच सुसंगत दिसेल. रात्रंदिवस ज्या गोष्टी आपल्या प्रत्ययास येतात, त्यांवरूनही ही गोष्ट सिद्ध होते. कोणतीही एखादी मोठी बुद्धिमती स्त्री घेतली तर, तिच्यांत जे विशेष मानसिक गुण किंवा ज्या विशेष शक्ति आढळतील, त्यांत अधिक काय असतें, याचा आपण विचार करूं. ते गुण किंवा त्या शक्ति बहुतेक अशा प्रकारच्या असतात कीं, त्यांचा उपयोग व्यवहारास फार होतो. त्यांची नैसर्गिक प्रवृत्ति व्यवहाराकडेच विशेष असते. बायकांची जी उपजत-बुद्धि ह्मणत असतात, त्याचा अर्थ तरी काय? त्याचा अर्थ एवढाच कीं, त्यांच्या आसपास जें काय घडत असतें, तें यथार्थतेनें व सत्वर त्यांच्या मनांत शिरतें. सर्वसाधारण नियम किंवा साधारण तत्त्वें, हीं त्यांच्या लौकर ध्यानांत येत नाहींत. शास्त्ररीत्या जो सृष्टि-नियम शोधून काढलेला, तो कोणास उपजत-बुद्धीनें समजला आहे काय? आचारसंबंधाचा, किंवा धर्मसंबंधाचा, अथवा शहाणपणाच्यासंबंधाचा कोणताही एखादा नियम एखाद्यास उपजत बुद्धीनें समजला आहे, असें कधींही घडलें नाहीं. या ज्या गोष्टी आहेत त्या, पुष्कळ दिवसांचा अनुभव एकत्र करून, पुष्कळ गोष्टींची तुलना करून, फार काळजी पुरः-सर, व सावकाश, अशा रीतीनेंच समजण्यांत येतात. ज्यांची उपजत-बुद्धि तीव्र आहे, अशा प्रकारचे पुरुष घेतले, किंवा स्त्रिया घेतल्या, तरी असें हें शास्त्र-नियमन करण्याचें काम, अशा एखाद्या माणसाकडून झालें आहे, असें उदाहरण पाहण्यांत नाहीं. आतां, अशा प्रकारचा जो अनुभव लागतो, तो ज्याचा त्यास प्राप्त होऊन, मग तो कांहीं एक अनुमान किंवा सिद्धांत ठरवितो, ती गोष्ट निराळी. माणसांची उपजत-बुद्धि किंवा उपजत शहाणपण ह्मणून ज्याला ह्मणतात, त्या गुणामुळें स्वावलोकनाचीं जीं साधनें त्यास प्राप्त झालीं असतील, त्यांच्यापासून साधारण नियम किंवा तत्त्वें शोधून काढणें, या कामाविषयीं त्या

माणसांच्याठायीं काहींएक विशेष योग्यता किंवा पात्रता उत्पन्न होते. तेव्हां पुरुषांप्रमाणें वाचन-द्वारा व शिक्षण-द्वारा इतर लोकांच्या अनुभवापासून प्राप्त होणारें ज्ञान जेव्हां स्त्रियांसही कर्मधर्म-योगानें प्राप्त होतें, तव्हां–कर्मधर्म-योगानें ह्मणण्याचें कारण, ज्या ज्ञानाच्या किंवा शिक्षणाच्या योगानें संसारांत मोठमोठीं कामें करण्याचा अधिकार स्त्रियांस प्राप्त होतो त्याच्या संबंधानें पहातां–खरोखर ज्या सुशिक्षित स्त्रिया आढळतात, त्या बहुतेक आत्म–शिक्षितच असतात. तेव्हां व्यवहार-दक्षतेस लागणारे जे अवश्य गुण ते पुरुषांपेक्षां त्यांत अधिक येतात. ज्या पुरुषांना पुष्कळसें शिक्षण मिळालेलें आहे, त्यांस, वर्तमानकाळाची काय स्थिति आहे या गोष्टीचें भान चांगलेंसें असण्याचा संभव नसतो. ज्या गोष्टी प्रत्यक्ष त्यांच्यासमोर घडून येतात, व ज्या गोष्टींचा निर्णय त्यांस करावयाचा असतो, त्यांत वास्तविक काय तत्त्व आहे, तें त्यांस दिसत नाहीं. पढलेल्या ज्ञानाच्या पलीकडे त्यांच्या दृष्टीची मजल पोहोंचतच नाहीं. परंतु असा हा प्रकार, ज्या स्त्रिया खरोखर हुषार असतात त्यांचा क्वचित् घडतो. त्यांच्यांत जी एक नैसर्गीक प्रतिभा असते, किंवा ज्या गुणास आपण उपजत-बुद्धि ह्मणतों, तिच्यामुळें ही अडचण त्यांस प्राप्त होत नाहीं. ज्यांचा अनुभव व साधारण बुद्धि-सामर्थ्यें हीं सारखींच आहेत, असा एक पुरुष व अशी एक स्त्री, अशीं दोन माणसें घेतलीं तर, ज्या ज्या उलाढाली किंवा जे जे व्यवहार प्रत्यक्ष त्यांच्यासमोर चाललेले असतात, त्यांचा ठसा पुरुषापेक्षां स्त्रीच्या मनावर अधिक स्पष्ट वठतो. वर्तमानकाळची स्थिति मनावर उत्कृष्ट प्रकारें प्रतिबिंबित होणें, हा गुण व्यवहार-दृष्ट्या, ह्मणजे केवळ शास्त्र-दृष्ट्या नव्हे--फारच उपयुक्त आहे. सर्वसामान्यनियम किंवा सर्वसाधारणतत्त्वें शोधून काढणें, हें काम कल्पना-शक्तीचें आहे. ते नियम किंवा तीं तत्त्वें लागू होतात अशा प्रकारचीं विवक्षित उदाहरणें शोधून काढणें, तीं

तत्त्वें विशेष उदाहरणांनीं किंवा दृष्टांतांनीं सिद्ध करून दाखविणें, व त्यांतील सूक्ष्म भेदाभेद कळणें, हें काम व्यवहार-निष्णाततेचें आहे. आणि या कामास प्रस्तुतकालीं स्त्रिया जशा आहेत, ह्मणजे ज्या स्थितींत त्या आजकाल आढळतात, त्या स्थितींतही त्या विशेष योग्य आहेत, असें मला वाटतें. आतां सामान्य नियम किंवा साधारण-तत्त्वें समजल्याखेरीज व्यवहारासही चांगुलपणा येत नाहीं. ह्मणजे, कोणतीही गोष्ट शास्त्रतः युक्त व हितावह ठरली नसेल तर, ती प्रयो-गतःही हितावह होणार नाहीं ही गोष्ट मला मान्य आहे. त्याच-प्रमाणें, स्त्रीच्याठायीं जे विशेष गुण आढळतात, त्या गुणांपैकीं तीव्र अशी ग्राहकशक्ति, सूक्ष्मावलोकन, किंवा दर्शन-पाटव, हा जो एक मुख्य गुण आहे, त्याच्यामुळें कधीं कधीं असेंही घडतें कीं, ती आपल्या स्वतःच्या अनुभवावरून फाजील घाईनें भलतींच अनुमानें काढिते. तथापि ही गोष्टही ध्यानांत ठेविली पाहिजे कीं, ज्या मानानें तिचा अनुभव विस्तृत होत जातो, त्या मानानें ती अशा प्रकारचीं अनुमानें बदलण्यासही तत्पर व सिद्ध असते. तेव्हां स्त्रीच्याठायीं अस-णारा हा जो दोष किंवा ही जी न्यूनता, ती दूर होण्यास योग्य व उत्तम मार्ग ह्मटला ह्मणजे, इतिहासाचें ज्ञान तिला करून देणें व एकंदर मानव-जातीचा अनुभव तिच्या बुद्धि-मार्गांत आणून सोडणें; ह्मणजे, अर्थात् तिला बहुश्रुत करणें, हाच होय. हें काम उघडच शिक्षणाच्या योगानें होणारें आहे. एकाद्या हुशार व आत्म-शिक्षित पुरुषाकडून ज्या प्रकारच्या चुका घडतात, तशाच प्रकारच्या चुका स्त्रियांकडूनही घडतात. जे पुरुष एकाद्या कामांत पुष्कळ दिवस रुळ-लेले असतात, त्यांना ज्या गोष्टी कळत नाहींत, त्या त्यांस कळतात. परंतु, ज्या गोष्टींचें ज्ञान पुष्कळ दिवसांपूर्वीं प्राप्त झालेलें असतें, त्या गोष्टींविषयीं तो अज्ञान असल्या कारणानें, त्याच्या हातून कांहीं चुका

घडतात. पूर्वीच प्राप्त झालेलें ज्ञान हें तर त्यानें संपादन केलेलें असतें, हें उघडच आहे. आणि तसें नसतें तर, त्याचें पाऊल पुढें पडलेंच नसतें. जें ज्ञान त्यास प्राप्त झालेलें असतें, तें त्यानें तुटक तुटक मिळविलेलें असतें, पद्धतवार मिळविलेलें नसतें. प्रस्तुतकालीं स्त्रियांच्याही ज्ञानाचा प्रकार असाच आहे.

९. परंतु, स्त्रियांच्या मनाची जी प्रवृत्ति वर्तमानकाळाकडे, किंवा जगांत खरोखर ज्या गोष्टी घडून येतात त्यांतलें इंगित जाणण्याकडे असते, त्या प्रवृत्तीपासून यद्यपि पुष्कळ प्रमाद अथवा चुका घडतात, तथापि एका दृष्टीनें पाहिलें असतां अशा या प्रवृत्तीच्या अभावापासून ज्या चुका घडतात, त्या चुका टाळण्यास ही स्त्रियांची प्रवृत्ति फार उपयोगाची असते. ज्या पुरुषांस कल्पनेचा फार उपयोग होतो, किंवा गूढ व खोल विचार करावा लागतो, त्यांत एक मोठी उणीव असते. ती ही कीं, स्त्रियांची ही अवलोकन-शक्ति, किंवा प्रत्यक्षाचें तीव्रभान असणें हा गुण, त्यांत कमी असतो. यामुळें कोणत्याही महत्त्वाच्या प्रश्नासंबंधानें ज्या ज्या प्रक्रिया किंवा कल्पना ते बसवितात, त्या कल्पनांचा बाह्य गोष्टींशी विरोध असतो, एवढेंच नाहीं, तर कल्पना-शक्तीचा जो योग्य हेतु, तो ते विसरून जातात. यामुळें, त्यांच्या कल्पना-शक्तीस कोणत्याही प्रकारचें नियंत्रण न राहून, ती, ज्या प्रांतांत सचेतन किंवा अचेतन असे भाव किंवा पदार्थ वस्तुतः नाहींत, अशा प्रांतांत भ्रमण करीत रहाते. केवळ शब्द-जालामध्यें गुंतून जाऊन, मानस-शास्त्राच्या भ्रांतियुक्त सिद्धांतांनीं उत्पन्न केलेले छायामय प्राणी किंवा पुरुष कल्पून, त्या छाया अत्यंत उदात्त व श्रेष्ठ अशा तत्त्व-विवेचनाचे योग्य विषय होत, असें ते समजतात. केवळ अवलोकनानें व अनुभवानें ज्ञानाच्या साधनांचा संचय करण्यामध्यें गुंतला नसून केवळ कल्पनेच्या व विचाराच्या

योगानें जें ज्ञान पूर्वीं प्राप्त झालें असेल, त्यांतून मोठमोठीं व्यापक प्रमेयें शोधून काढून, शास्त्र-रचना व आचाराचे नियम बांधण्यांत जो गुंतला आहे, अशा पुरुषानें आपलें हें शास्त्र-रचनेचें काम एकाद्या खरोखर श्रेष्ठ बुद्धिसंपन्नस्त्रीच्या देखरेखीखालीं व तिच्या साहाय्यानें करणें, याहून अधिक महत्त्वाची गोष्ट क्वचितच असेल. वस्तु-स्थितीच्या व सृष्टींत खरोखर घडून येणाऱ्या गोष्टींच्या मर्यादेंत आपले विचार ठेवण्यास दुसरें असें साधनच नाहीं. निव्वळ कल्पनेच्यामागें वेड्यासारखी धांवत जाणारी स्त्री क्वचित् आढळते. तिच्या मनाचा झोंक नेहमीं व्यक्तीकडे असून, वर्गाकडे नसतो. ह्मणजे, जातीवर रहाणाऱ्या धर्माकडे तिची दृष्टि जात नसून, प्रत्यक्ष व्यक्तीकडे जात असते. शिवाय दुसरें असें कीं, तिच्या समोर जीं माणसें येतात, त्यांच्या अंतःकरणांतले भाव किंवा विकार, तिला पुरुषांपेक्षां अधिक कळतात. यामुळें व्यवहारांत कोणतीही गोष्ट करावयाची असली तरी, तिचा परिणाम भोंवतालच्या माणसांवर कसा होईल, हा विचार पहिल्या प्रथम तिच्या मनांत येतो. या दोन गोष्टींमुळें, ज्या कल्पनेंत किंवा व्यवस्थेंत व्यक्तींचा विचार केला नाहीं, केवळ एकाद्या काल्पनिक पुरुषाच्या किंवा प्राण्याच्या हिताकरितांच वस्तुमात्र निर्माण केली आहे अशा समजुतीवर जिचा पाया रचला आहे, व सचेतन प्राण्यांच्या मनोभावांचा अंतर्भाव व विचार जिच्यांत मुळींच नाहीं, अशी एखादी निव्वळ मानसिक-सृष्टि, कोणी तिच्या पुढें ठेविल्यास तिजवर ती मुळींच भरंवसा ठेवीत नाहीं. यावरून ज्याप्रमाणें पुरुषांचे विचार स्त्रियांच्या विचारास व्यापकता व विस्तृतता देण्याच्या कामीं उपयुक्त होतात किंवा होतील, त्याचप्रमाणें स्त्रियांचे विचार तत्त्व-विवेचनांत निमग्न झालेल्या पुरुषांस, तत्त्व-दृष्टि देण्याच्या कामीं फार उपयोगीं पडतील हें वाचकांच्या ध्यानांत आलेंच असेल. स्त्रियांच्या

विचाराची विस्तृतता अथवा व्यापकता क्षणभर एकीकडे ठेविली, व त्या विचारांतील केवळ गंभीरतेचा भाग लक्ष्यांत आणिला, तर या गंभीरतेच्या व उदात्ततेच्या बाबतींत प्रस्तुत-कालींही. स्त्रिया पुरुषांपेक्षां कमी आहेत, असें मला मुळींच वाटत नाहीं

१०. प्रस्तुत उपलब्ध होणाऱ्या स्त्रियांचे मानसिक गुण, तत्त्व-विवेचनाच्या कामास आपल्या कल्पना-शक्तीनें साहाय्य करण्याच्या कामीं जर महत्त्वाचे व अगत्याचे आहेत, तर कल्पना-शक्तीचें काम ज्या ठिकाणीं सरून त्याच शक्तीच्या जोरानें जे सिद्धांत ठरविले जातात त्यांचा उपयोग व्यवहारांत करणें, या कामास तर ते गुण अधिकच उपयुक्त व महत्त्वाचे आहेत, हें उघड दिसतें. वर जीं कारणें मीं दाखल केलीं आहेत त्यांच्यामुळें पुरुषांकडून बहुधा जी एक चूक होत असते, ती स्त्रियांकडून होत नाहीं. कोणत्याही संबंधानें जे कांहीं साधारण नियम ठरलेले असतात, ते नियम विशेष किंवा विवक्षित गोष्टीला लागू पडत नाहींत, असें पाहून त्या गोष्टींचा विशेष प्रकारानें विचार करावा लागतो; ह्मणजे ते नियम कांहीं विवक्षित वर्गांतल्या गोष्टींसच लागू पडतात. हें तत्त्व लक्षांत न आल्या कारणानें, पुरुषांचे वर्तन पुष्कळ प्रसंगीं चुकीचें घडत असतें, अशा प्रकारची ही चूक पुरुषांपेक्षां स्त्रियांच्या हातून क्वचित् घडते. तेव्हां व्यवहारांत ज्या गुणांचा अत्यंत उपयोग होतो, अशांतला हा गुण नव्हे काय? व्यवहारांत कोणतीही एखादी गोष्ट करावयाची असली ह्मणजे, तिचा झटकन् निकाल करणें, या गोष्टीवर सर्वस्व अवलंबून असतें. केवळ तत्व-चिंतेची किंवा शास्त्र-विचाराची गोष्ट अशी नाहीं. शास्त्र-विचार जो असतो त्यांत कोणत्याच गोष्टीचा त्वरित निर्णय करण्याचें प्रयोजन नसतें. जो नुसता मीमांसक किंवा विचार करणारा मनुष्य आहे, त्यास थांबतां येतें. त्यास अवकाश विपुल असतो. जीं प्रमाणें

त्याच्यासमोर असतील, तीं जर, एखादा सिद्धांत ठरविण्यास पुरेशीं नसतील, तर अधिक प्रमाणें मिळविण्यास त्यास पाहिजे तेवढी फुरसत मिळण्यासारखी असते. आपली मीमांसा एकदम पूर्णतेस आणलीच पाहिजे, अशा प्रकारें तो बांधलेला नसतो. कारण, 'काय करावें बोवा, मी असें करीत बसलों तर, इकडे वेळ निघून जात आहे' अशांतला प्रकार त्याचा नसतो. आतां, हें खरें कीं, जो वेडावांकडा किंवा अपुरता पुरावा असेल, जीं अल्पस्वल्प प्रमाणें उपलब्ध असतील, त्यांपासून निघणारें किंवा काढितां येण्यासारखें जें उत्तम अनुमान, तें काढण्याची शक्ति असणें हा गुण, तत्त्व-विवेचनाच्या किंवा मीमांसेच्या कामीं निरुपयोगी आहे, असें नाहीं. समोर असलेल्या गोष्टींशीं ज्या अनुमानाचा किंवा प्रक्रियेचा उत्तम मेळ बसतो, अशा प्रकारची एखादी तात्कालीन कल्पना किंवा उपपत्ति बसविणें ही गोष्ट, त्या विषयाची अधिक चौकशी करण्याला अथवा अधिक माहिती मिळविण्याला अवश्य साधनीभूत होते. तथापि, अशा या शक्तीचा किंवा गुणाचा उपयोग, तत्त्व-विवेचनाच्या कामीं मुख्य नसून, केवळ साहाय्यभूत असतो. आणि तत्त्व-चिंतेच्या मुख्य कार्याला व गौण कार्याला, ह्मणजे केवळ साधनीभूत कामाला, अशा दोन्ही कार्यास, तत्त्व-चिंतकास पाहिजे तितका काळ मिळण्यासारखा असतो. त्याला जें काम करावयाचें असतें. तें फार जलदीनें किंवा घाईनें करण्याचें कारणच नसतें. उलट त्याला, धीरता व शांतता या गुणांचा फार उपयोग असून, ज्या प्रश्नाचा तो विचार करीत असेल, त्याच्यावर उत्कृष्ट प्रकारचा प्रकाश पडेपर्यंत व त्याच्या निव्वळ तर्काला सिद्धांताची योग्यता येईपर्यंत, त्याला स्वस्थमानसानें काम करावें लागतें. परंतु ज्यांचें काम नित्य व्यवहाराचें असतें, ह्मणजे ज्यांना अल्प-कालीन व नश्वरसंबंधाच्या गोष्टींशीं प्रसंग असतो, त्यांना

जाति-विशिष्ट विचार करावा लागत नसून, व्यक्ति विशिष्ट विचार करावा लागतो. अशा माणसांस, जो विचार ठरवावयाचा, तो लौकर ठरवावा लागतो. निर्णय करावयाचा तो त्वरित करणें, ही शक्ति, प्रत्यक्ष विचार करण्याची जी शक्ति, तिच्याच बरोबरीची व योग्यतेची आहे, असें ह्मटलें असतां चालेल. ज्याच्या विचाराच्या दोऱ्या त्याच्या हातांत नाहींत, त्याच्याकडून हुकमी काम होत नाहीं. ह्मणजे, ज्याच्या बुद्धीचा उपयोग प्रसंगास घडत नाहीं, त्याला ती असून नसून सारखीच. असा मनुष्य नुसती पोकळ टीका करीत बसण्यास मात्र योग्य असेल. परंतु प्रसंगास एखादें काम रेटून नेऊन पार पाडील, ही गोष्ट त्याच्या हातून घडणार नाहीं. हा जो गुण आहे, त्या गुणांत स्त्रिया, व प्रायः स्त्रीसदृश-स्वभावाचे जे पुरुष असतात, ते या गुणांतच श्रेष्ठ असतात. ज्यांच्यांत हा गुण नसतो, अशा जातीचे पुरुष, त्यांच्यांत जरी अन्य कांहीं अपूर्व गुण असले तरी, मनावरची जी हुकमत ह्मणून ह्मणतात, ती त्यांस फार हळूहळू प्राप्त होत जाते. ज्या गोष्टी त्यांना पक्क्या माहीत असतात, अशा गोष्टीमध्यें देखील निर्णयाची त्वरा, शहाणपणानें एखादें काम करण्याची दक्षता, हे गुण त्या माणसांत आले, तरी ते फार सावकाश व हळूहळू येत असतात. एवढेंच नव्हे, तर ते गुण प्राप्त करून घेण्यास, त्यांना मोठा दीर्घ प्रयत्न करावा लागतो.

११. आतां कदाचित् कोणी असें ह्मणेल कीं, गृह-कृत्यांतले जे व्यवहार आहेत, त्या व्यवहारांखेरीज इतर व्यवहारांस, स्त्रिया जात्याच अपात्र आहेत. कारण स्त्रिया मनाच्या फार चंचल असतात. त्या चिरडखोर, तामसी व हट्टी असतात. ज्या घटकेला जी त्यांची लहर लागेल, त्या लहरीच्या अगदीं अधीन होऊन त्या रहातात. सतत उद्योग, दृढ निश्चय, या गुणांचा त्यांच्याठायीं अभाव असतो. त्यांची बुद्धि

अस्थिर असून, त्यांच्या एकंदर मानसिक-शक्तीचे व्यापार अनिश्चित व विषम असतात. मोठमोठीं कामें करण्यास स्त्रिया नालायक आहेत, ह्मणून प्रतिपादन करितांना ज्या अडचणी दाखविण्यांत येतात, त्यांचा समावेश या दोषांत बहुतेक होतो. आतां हे जे दोष आहेत, त्यांचें मुख्य कारण पाहूं जातां, स्त्रियांची ओतप्रोत भरून जाणारी जी मानसिक-शक्ति असते, त्या मानसिक-शक्तीला योग्य वळण न मिळणें, हेंच दिसतें. याशिवाय, या दोषांचा बराचसा प्रकार, कांहीं जाणून बुजून घडतो, व कांहीं सहज घडतो. अंगांत येणें, भुतानें झपाटणें, अशा प्रकारच्या ज्या व्याधि किंवा जे मेंदूचे दोष एकाकाळीं बायकांना जडत असत, ते कालवशात् नाहींतसे होत गेले. शिवाय उच्च वर्णाच्या स्त्रियांपैकीं बहुतेक स्त्रिया कोणच्या स्थितींत वाढतात व त्या कोणत्या स्थितींत असतात, हेंही लक्षांत आणिलें पाहिजे.* त्यांनां शुद्ध हवा मिळत नाहीं, त्यामुळें त्या निरामय रहात नसून, एखाद्या पिकुटलेल्या व खुटलेल्या झाडासारख्या असतात. रुधिराभिसरणाला प्रोत्साहक होऊन, स्नायूंना दृढ करणारे असे व्यवसाय मुळींच त्या करीत नाहींत. त्यांच्या मेंदूची शक्ति, विशेषेंकरून त्यांच्या मनोविकाराच्या संबंधानें पाहिलें असतां, फारच जागरूक ठेविलेली असते. त्यांचे मनोव्यापार फारच जारीनें चालू असतात. यामुळें अशांपैकीं ज्या स्त्रिया क्षयानें मरत नाहींत, त्यांचीं शरीरें व मनें अगदीं अशक्त राहून, साधारण बारीकसारीक कारणांनींही अशक्त होतात. त्यांना दीर्घ परिश्रम करवत नाहींत. कोणतेंही शारीरिक किंवा मानसिक काम करण्याची कुवत त्यांच्यामध्यें रहात नाहीं, यांत कांहीं आश्चर्य नाहीं. परंतु ज्या स्त्रियांना आपल्या

*प्रस्तुत स्थळीं, 'इतर कोणत्याहि देशांपेक्षां, आमच्या (इग्लंड) देशांतल्या उच्च वर्गांतल्या स्त्रियांची स्थिति कांहीं बरी आहे. ही गोष्ट मी नाकबूल करीत नाहीं.' असें कंसांत एक लहानसें वाक्य घालून निबंधकारांनीं ह्मटलें आहे.

पोटाकरितां खपावें लागतें, त्यांच्या ठिकाणीं असे हे दोष क्वचित् दृष्टीस पडतात. ज्या स्त्रियांस नेहमीं एकाच ठिकाणीं बसून काम करावें लागतें, व अगदीं कोंदट आणि दमट अशा खोल्यांमधून काम करीत रहावें लागतें, त्यांची गोष्ट निराळी. लहानपणी ज्या स्त्रियांना आपल्या भावांबरोबरच आरोग्यकारक असें शारीर-शिक्षण मिळालें असून, ज्यांना बरीच मोकळीक मिळालेली असते, व ज्यांचे स्वैर व्यापार बरेच अनियंत्रित असतात, ज्यांना मोठेपणीं पाहिजे तितकी स्वच्छ हवा व लागेल तितका व्यायाम मिळत असतो, अशा स्त्रिया श्रमाचीं कामें करण्याला पात्र असून, त्या चंचल, तामसी, वगैरे दोषांनीं भरलेल्या रहातात, असें घडत नाहीं. स्त्रियांत काय आणि पुरुषांत काय, अशीं कांहीं माणसें असतात कीं, ज्यांच्या मेंदूची क्षीणता किंवा मनाची दुर्बलता त्यांच्या एकंदर वर्तनावर फार मोठा परिणाम घडवून आणीत असते. अशा प्रकारची ही शरीराची रचना किंवा प्रकृति, वंशपरंपरेनें प्राप्त झालेली असते. आणखी, ती जशी मुलांना तशीच मुलींना—दोहोंनाही प्राप्त होते. ज्याला तामसी प्रकृति किंवा पित्त-प्रकृति असें ह्मणतात, ती प्रकृति स्त्रियांस त्यांच्या आईबापांपासून प्राप्त झालेली असते. आणि अशा प्रकृतीची संख्या पुरुषांपेक्षां स्त्रियांत अधिक सांपडते. ही गोष्ट आपण धरून चालूं. आणि ही गोष्ट धरून चाललें तरी, मी असें विचारतों कीं, जीं कामें व जे धंदे बहुतेक पुरुष करितात, तीं कामें किंवा ते धंदे करण्यास अशा प्रकृतीचे पुरुष अयोग्य आहेत, असें ठरलें आहे काय? जर नाहीं, तर अशाच प्रकृतीच्या स्त्रिया मात्र तेवढ्या अयोग्य कां ठराव्या? ज्या माणसांच्या प्रकृति कांहीं विशेष प्रकारच्या असतात, अशीं माणसें, कांहीं कामांस अगदीं नालायक असतात. ह्मणजे त्या कामांत, त्यांस यश येण्याला त्यांची प्रकृति प्रतिबंधक होते. पण कांहीं कामांत तीच

प्रकृति त्यांच्या फार उपयोगी पडते, ही गोष्ट खरी आहे. परंतु जेव्हां कोणताही उद्योग त्या प्रकृतीस अनुकूल असेल, फार काय, कधीं कधीं जेव्हां प्रतिकूल असेल तेव्हांही, ज्यांची प्रकृति फारच तलख अशा लोकांस त्या धंद्यांत उत्कृष्ट प्रकारचें यश मिळाल्याचीं कांहीं प्रसिद्ध उदाहरणें वारंवार घडतात. ज्यांची प्रकृति शांत किंवा सत्त्वस्थ आहे, अशा माणसांपेक्षां तामसी प्रकृतीचीं माणसें ज्या व्यवसायांत गुंततात, त्यांत, एका प्रकारचा अधिक उत्साह दिसून येतो. प्रसंगविशेषीं त्यांच्या प्रकृतीस एक प्रकारचें प्रोत्साहन मिळालें ह्मणजे, त्यांच्या शक्तींत व इतर लोकांच्या शक्तींत फार अंतर दिसून येतें. अशीं माणसें कांहीं कांहीं प्रसंगीं एखादें काम इतक्या उत्साहानें करितात कीं, जीं कामें करणें इतर प्रसंगीं त्या माणसांस बहुतेक अशक्य असतें, तींच कामें समयविशेषीं तींच माणसें सहज करून जातात. अशा माणसांच्या प्रकृतींचा हा जो उत्तेजक व क्षोभक गुण, हा केवळ विद्युत्तेजाप्रमाणें, उत्पन्न झाल्याबरोबर नाहींसा व्हावा, मागें त्याचा कांहींएक मागमूस राहूं नये, व कोणत्याही एका विषयाच्या ठिकाणीं, त्याच्या मनाला स्थिरता प्राप्त होऊंच नये, अशांतला प्रकार हा असतो असें नाहीं. तामस प्रकृतीचा धर्मच असा असतो कीं, एकदां त्यानें उचल खाल्लीं, किंवा एकाद्या कामांत त्याची तंद्री लागून गेली, ह्मणजे त्या कामाच्या पूर्णतेकरितां किती व कसाही दीर्घ प्रयत्न करावा लागला, तरी तो करितो. ज्या गुणाला तेजस्विता किंवा व्यवहारांत ‘ पाणी ’ असें ह्मणतात, तोच गुण हा. आणि याच गुणामुळें पैजेकरतां तयार केलेले जातिवंत जे घोडे असतात ते, आपला वेग कमी न करितां, एकसारखे धांवत सुटतात. ते इतके कीं, शेवटीं थकून जाऊन धरणीवर मरून पडतात. परंतु आपलें सत्व-हरण करूं देत नाहींत. याच कारणामुळें नाजुक प्रकृतीच्या शेंकडों स्त्रिया, अनेक मान-

सिक-दुःखें व शारीरिक-यातना सोसून, कसाही वेडावांकडा प्रसंग आला तरी, अत्यंत उदात्त अशा प्रकारचा दृढ निश्चय व मनाची स्थिरता प्रकट करतात. यावरून हें उघड दिसतें कीं, अशा प्रकारच्या प्रकृतीचीं माणसें, मनुष्यांचे अग्रणीत्व अथवा पुढारीपणा स्वीकारण्यास अत्यंत योग्य असतात. अशा माणसांपैकीं मोठमोठे वक्ते, मोठमोठे धर्मोपदेशक, व लोकांच्या मनावर, आपल्या वाणीनें व उत्साहानें उत्कृष्ट प्रकारचा ठसा वठविणारे, अशा प्रकारचे नीतिप्रसारक निपजण्याचा संभव असतो. आतां, अशा प्रकृतीच्या माणसांत, राजकारणी पुरुषांस किंवा न्यायाधीशास जे गुण लागतात, ते कमी असतील, असें कदाचित् कोणी समजतील. मी ह्मणतों, माणसाची प्रकृति नेहमींच क्षुब्ध स्थितींत रहाते, अशी जर गोष्ट असती, तर हें ह्मणणें शोभतें. परंतु अशा प्रकृतीस योग्य वळण लागणें, हा शिक्षणाचा भाग आहे. ज्यांचे मनोविकार तीव्र असतात, ज्यांची प्रकृति जात्या तामसी व तेजस्वी असते, त्यांच्या कडून आत्म-संयमनही दृढ होतें. ह्मणजे, आत्मनिग्रह करण्याच्या कामीं ते बहाद्दर होतात. परंतु असें होण्यास त्यांना योग्य प्रकारचें वळण मिळावें लागतें, हें मी ह्मटलेंच आहे. ज्या साधनांनीं इंद्रिय-निग्रह करितां येईल, त्या साधनांचें अवलंबन करावें लागतें. आणि अशा प्रकारचें शिक्षण त्या प्रकृतीला मिळालें असतां तीं माणसें केवळ मनाच्या झटक्याबरोबर, जें काय होईल तेवढेंच करणारीं निपजतात असें नाहीं. तर मनोजय व आत्म-संयमन यांच्या योगानें तीं माणसें आपलें शौर्य प्रकट करितात. अनुभव व इतिहास यांवरून असें सिद्ध झालें आहे कीं, ज्यांचे मनोविकार अत्यंत जाज्वल व तीव्र असे असतात, अशीं माणसें सत्व-रक्षणाच्या कामींही फार दक्ष असून, व्रत-भंग न होण्याविषयीं व आपलें कर्तव्य बजावण्याविषयीं त्यांचा फार कटाक्ष असतो. पण हें केव्हां, तर जेव्हां

त्यांच्या त्या मनोविकारांस योग्य मार्गाकडे वळण लावावें तेव्हां. एकाद्या कामांत दोन पक्षांपैकीं एका पक्षाकडे त्याचें अंतःकरण त्यास ओढीत असून, जो न्यायाधीश खरोखर न्यायच करितो, त्या न्यायाधीशास आत्म-संयमनामुळें व दृढ निश्चयामुळें आपली न्याय-बुद्धि दृढ करण्यास अधिक उत्तेजन मिळत जाऊन, अशा प्रकारचा हा मनोजय करण्याची त्याची शक्ति वृद्धिंगत होत जाते. मनुष्याचा रोजचा जो स्वभाव असतो तो एकीकडे राहून प्रसंगवशात् अत्यंत उदात्त व अपूर्व अशा प्रकारची त्याची उल्लसित-वृत्ति होत असते. त्या उल्लसित-वृत्तीचा परिणाम त्याच्या नित्याच्या वर्तनावरही घडतो. प्रसंगवशात् प्राप्त होणारी जी ही स्थिति, त्या स्थितींत तो असतां, त्याच्याठायीं उत्पन्न होणारी महत्त्वाकांक्षा व कर्तृत्व-शक्ति यांचा त्याच्या मनावर विशेष ठसा उठून, इतर प्रसंगीं होणारें जें त्याचें वर्तन व जे त्याचे विचार त्यांच्याशीं तो त्या स्थितींतील गोष्टींची तुलना करूं लागतो. यामुळें, प्रसंगविशेषीं जो उल्हास किंवा जो उत्साह त्यास प्राप्त होतो, त्याच्या अनुरोधानें आपलें वर्तन नेहमीं ठेवण्याची त्यास संवय लागते. अर्थात् हा उत्साह किंवा ही उल्लसित-वृत्ति, मानवी-प्राण्याच्या नश्वर-प्रकृतीचा किंवा शरीराचा विचार केला असतां, दीर्घकाल टिकणारी नसून, अल्पकालीन किंवा क्षणभंगुर असते, हें उघडच आहे. जसा व्यक्तिमात्रांचा त्याचप्रमाणें जातीचा (ह्मणजे मोठ्याशा लोक-समूहाचा) अनुभव पाहिला तरी, ज्यांची प्रकृति राजसी आहे, अशीं माणसें एकंदरींत पहातां, विचार करण्याच्या कामीं किंवा व्यवहाराच्या कामीं, सात्विक माणसांपेक्षां कमी लायक असतात, असें आढळत नाहीं. **ट्युटॉनिक** लोकांपेक्षां **फ्रेंच** लोक व **इटालियन्** लोक स्वभावानें निःसंशय अधिक चंचल व रजोगुणविशिष्ट असतात. निदान **इंग्लिश** लोकांची व त्यांची तुलना केली असतां, त्यांच्या नित्यक्रमांत व

एकंदर संसाराच्या उलाढालींत मनोविकारांचा पगडा त्यांच्यावर अधिक असतो. व रजोगुणाचा प्रभाव त्यांच्यामध्यें विशेष आढळतो. परंतु सार्वजनिक कामांत, शास्त्र-प्रसाराच्या कामांत, युद्धाच्या कामांत, कायदेकानू व न्याय वगैरे हरएक कामांत ते कमी आहेत, असें कोण ह्मणेल? त्याचप्रमाणें, प्राचीन **ग्रीक** लोकही त्यांच्या हल्लींच्या वंशजां-प्रमाणेंच अत्यंत रजोगुणी किंवा क्षोभक प्रकृतीचे होते, असें मानण्यास पुष्कळ कारणें आहेत. माणसांच्या हातून घडण्यासारख्या अशा हरएक कामांत व प्रत्येक गोष्टींत त्यांनीं आपली दक्षता दाखविली, हें सांगणेंच नको. **यूरोपखंडां**तील दक्षिण प्रांतांत राहणाऱ्या **रोमन्** लोकांचीही त्याचप्रमाणें मूळ-प्रकृति होती. परंतु, त्यांस मिळणारें जें राष्ट्रीय-शिक्षण, तें सौम्य प्रकारचें नसून, **स्पार्टन्** लोकांप्रमाणेंच कडक असे. त्यामुळें त्यांच्या स्वभावाची जी एक तऱ्हा झाली, ती उलट प्रकारची झाली. त्यांच्या स्वाभाविक मनोविकारांची तीव्रता, शिक्ष-णाच्या योगानें पुढें जो त्यांचा स्वभाव बनला, त्याच्यामध्यें अधिकच दृष्टोत्पत्तीस आली. या उदाहरणांवरून ज्या लोकांमध्यें स्वभावतः-च एक प्रकारचा तेजस्वितेचा गुण असतो, तीं माणसें कशीं बनवितां येतात, हें उघड दिसतें. **ऐरिश केल्ट** लोकांचें उदाहरण या संबंधानें प्रथमदर्शनीं विचारांत घेण्यासारखें दिसतें. ह्मणजे, त्यांस कोणत्याही प्रकारचें कृत्रिम-शिक्षण न मिळाल्या कारणानें त्यांच्या मूळच्या स्थितींत ते राहिले. यामुळें त्यांचें उदाहरण लक्षांत आणण्यासारखें आहे. परंतु मूळच्या स्थितींत ते राहिले, असें ह्मणतां येईल किंवा नाहीं, याचा संशयच आहे. कारण, कित्येक शतकें-पर्यंत त्यांजवर अंमल चालविणारें जें दुष्ट सरकार होतें, त्या जुलमी सरकारचा त्यांजवर प्रत्यक्ष रीतीनें घडणारा परिणाम व **क्यॉथलिक** पंथाच्या धर्मोपदेशकांपासून मिळणारें प्रत्यक्ष शिक्षण, व **क्यॉथलिक**

धर्मावर असणारी त्यांची पूर्ण श्रद्धा, या सर्व गोष्टींचा विचार केला असतां, **ऐरिश** लोकांचें उदाहरण फारसें अनुकूल आहे असें ह्मणतां येत नाहीं. तथापि, ज्या ज्या वेळीं एखाद्या व्यक्तीस विशेष अनुकूल गोष्टी प्राप्त होत गेल्या, त्या त्या वेळीं **ऐरिश** लोकांनीं अनेक गोष्टींमध्यें आपल्या बुद्धीची तीव्रता व श्रेष्ठता प्रकट केली. त्याची बरोबरी दुसऱ्या एखाद्या तरी राष्ट्रांतील लोकांनीं केली आहे काय? **फ्रेंच** लोकांची तुलना जर **इंग्रजांशीं** केली, **ऐरिश** लोकांची **स्विस्स** लोकांशीं केली, **ग्रीक** आणि **इटालियन्** लोकांची जर **जर्मन्** लोकांशीं केली, तर एकंदरींत पहातां, त्याच गोष्टी किंवा तींच कामें करण्यास उभयतांही सारखेच पात्र आहेत, असें आढळेल. मात्र कांहीं कामांत कांहीं माणसें विशेष प्रवीण असतात. असा हा भेद किंवा हें वैचित्र्य नेहमीं असणारच. परंतु आजपर्यंत स्त्रियांस मिळणारें शिक्षण, त्यांच्या मूळ प्रकृतीस चिकटलेली जी दुर्बलता, अथवा जे दुर्गुण, ते अधिक वाढविणारें आहे. ज्याच्या योगानें ती दुर्बलता किंवा ते दुर्गुण दूर होतील, अशा प्रकारचें शिक्षण जर त्यांस मिळालें, तर एकंदरींत पुरुषांच्या बरोबरीनें स्त्रिया हुशार होतील, व सर्व कामें पुरुषांच्या बरोबरीनें करूं शकतील, यांत मला तिळमात्र संशय वाटत नाहीं.

१२. तथापि, स्त्रियांचीं मनें पुरुषांपेक्षां स्वभावतः अधिक चंचल असतात, कोणत्याही कामांत एकसारखा दीर्घ प्रयत्न करणें, किंवा दृढ निश्चयानें तें काम तडीस नेणें, ही गोष्ट त्यांच्या हातून घडत नाहीं. कोणताही एकच मार्ग धरून, त्याच्या अगदीं शेवटास जाऊन पोंचण्यासारखी त्यांची बुद्धि स्थिर नसून अनेक गोष्टींमध्यें त्यांच्या बुद्धीचें सामर्थ्य वांटलें जातें. या गोष्टी खऱ्या आहेत, अशी कल्पना केली तरी, प्रस्तुतकाळीं स्त्रिया जशा किंवा ज्या स्थितींत आहेत, त्या संबंधापुरत्याच या गोष्टी खऱ्या असतील. एवढेंच नव्हे, तर या ह्मणण्यास

अपवादक अशींही बरींच उदाहरणें आढळतील. अत्यन्त बुद्धिमान् असे जे पुरुष, त्यांची बरोबरी स्त्रियांच्यानें करवत नाहीं. त्याचें कारण, ज्या गोष्टींमध्यें मनाची एकाग्रता अवश्य आहे, जे विचार व जे व्यवसाय एकाच गोष्टींत केले पाहिजेत, अशा गोष्टींमध्यें आजपर्यंत स्त्रियांचीं मनें सर्वथा व्यापृत झालीं नाहींत, हेंच असेल. तथापि, हा भेद, प्रत्यक्ष त्या गुणाच्या संबंधाचा नसून, किंवा व्यवहारांत त्या गुणाची जी किंमत असते तिच्या संबंधाचा नसून, त्या गुणाच्या जातीपुरताच आहे. मनाची किंवा बुद्धीची शक्ति एकाच कामाकडे लागणें, समग्र विचार-शक्ति एकाच विषयांत निमग्न होऊन रहाणें, व एकाच कामांत तिचा विनिमय होणें, हेंच योग्य आहे, किंवा हितावह आहे, असें सिद्ध केलें पाहिजे. अशा या एकात्मकतेनें जर कांहीं विशेष हित होत असेल, तर त्याबरोबर संसारांतील इतर कामांविषयीं ती बुद्धि असमर्थ होणें, हें एक नुकसानच आहे. माझें हें ठाम मत आहे कीं, तत्त्वविवेचनाच्या कामांतही एकाद्या कठीण प्रश्नाचा विचार करीत असतां एकसारखें त्या प्रश्नास चिकटून राहण्याच्या ऐवजीं बुद्धीला मधून मधून विश्रांति देऊन, व इतर विषयांकडे लावून, पुनः त्या प्रश्नावर येणें, हें अधिक श्रेयस्कर होतें. निदान व्यवहारांत तरी, अगदीं लहान गोष्टीपासून तों फार महत्त्वाच्या गोष्टीपर्यंत, एका विषयाचा विचार करीत असतां, तो सोडून व बुद्धीची तीव्रता कमी न होतां, दुसऱ्या विषयांत मन शिरकविण्याची जी शक्ति, ती अधिक मौल्यवान् आहे. आणि ही शक्ति स्त्रियांच्याठायीं ज्या चांगल्या गुणाचा आरोप करण्यांत येतो, त्याच्याच योगानें अत्युत्कृष्ट प्रकारची असते. ही शक्ति स्त्रियांच्या अंगीं कदाचित् उपजतच येत असेल. परंतु शिक्षणाच्या व संस्काराच्या योगानें ही ती प्राप्त होते, ही गोष्ट खास आहे. कारण, स्त्रियांचे बहुतेक व्यवसाय, बहुधा बारीकसारीक अशा अनेक

गोष्टींची व्यवस्था करण्याच्या संबंधाचे असतात. त्यांपैकीं प्रत्येक गोष्टीचा विचार करण्यास त्यांस खरोखर फारच थोडी संवय असते. कोणत्याही एका गोष्टींत अधिक विचार करण्याची गरज पडल्यास, तो विचार करण्याकरितां त्यांना, कसा तरी चोरूनमारून वेळ काढावा लागतो. कधीं कधीं असे कांहीं आणीबाणीचे प्रसंग येतात व वस्तुस्थिति अशी कांहीं असते कीं, खरोखर तशा प्रसंगीं कोणताही पुरुष, 'आपणास विचार करण्याची सवड नव्हती,' अशी सबब सांगून मोकळा होतो. त्या प्रसंगीं एखाद्या विषयाचा विचार करण्यास, स्त्रियांस वेळ नसतांही, त्या विषयाचा त्या विचार करितात, अशीं हीं उदाहरणें अनेक वेळां पहाण्यांत आलीं आहेत. स्त्रीचे मन बारीकसारीक व्यवसायांतच कां होईना, परंतु नेहमीं गुंतलेलें रहातें. तें शून्य असें कधींच रहात नाहीं. संसारामध्यें पुरुष आपलें जें कांहीं कर्तव्य ह्मणून समजतो, त्यांत, जर तें गुंतलेलें नसलें, तर तें अनेक वेळां शून्य रहातें. तसें स्त्रीचें रहात नाहीं. साधारणतः अनेक कामें तिच्याकडे असतात. यामुळें जसा हा विश्वाचा गोल फिरण्याचें कधीं बंद पडत नाहीं, तसेंच तिचें कामही कधीं बंद पडत नाहीं.

१३. परंतु कित्येक असा आक्षेप काढतात कीं, पुरुष व स्त्रिया यांची तुलना केली असतां बुद्धिसंबंधानें पुरुषांचें वर्चस्व आहे, अशा विषयीं शारीरशास्त्राचें प्रमाण मिळतें. पुरुषांचा मेंदु स्त्रीच्या मेंदूपेक्षां अधिक मोठा असतो. यावर एक तर माझें असें उत्तर आहे कीं, ही गोष्ट संशयात्मक आहे. स्त्रीचा मेंदु पुरुषाच्या मेंदूपेक्षां कमी असतो, ही गोष्ट अजून कोणत्याही तऱ्हेनें सिद्ध झाली नाहीं. स्त्रीचें शरीर आकारमानानें साधारणतः पुरुषाच्या शरीरापेक्षां कमी असतें. एवढ्यावरूनच जर हा तर्क केला असेल तर अशा या

प्रतिपादनाच्या पद्धतीनें कांहीं विलक्षणच अनुमानें निघतील. अशा पद्धतीनें सिद्ध करूं गेल्यास, भल्ला उंच आणि धिप्पाड असा मनुष्य एखाद्या लहान मनुष्यापेक्षां बुद्धिसामर्थ्यानें किती तरी श्रेष्ठ ठरेल! त्याप्रमाणें हत्ती व देवमासा हे दोन प्राणी तर, सर्व मनुष्यजातीपेक्षां बुद्धिमत्तेनें फारच श्रेष्ठ मानावे लागतील! शरीर–शास्त्रवेत्ते तर असें ह्मणतात कीं, मनुष्यजातीमध्यें मेंदूच्या आकारमानांत शरीराच्या आकारमानापेक्षां अथवा मस्तकाच्याही आकारमानापेक्षां फारच थोडा भेद दृष्टीस पडतो.—त्यामुळें एकावरून दुसऱ्याचें प्रमाण मुळींच बसवितां येणार नाहीं.—कांहीं स्त्रियांचा मेंदु पुरुषांच्या मेंदू एवढा मोठा असतो हें निश्चित आहे. ही गोष्ट प्रत्यक्ष माझ्या माहितींतली आहे. एका गृहस्थानें पुष्कळ माणसांचे मेंदु वजन करून पाहिले होते. तो ह्मणाला कीं, आजपर्यंत जितके मेंदु मीं तपासून पाहिले त्या सर्वांत **कुव्हिएरच्या*** मेंदूपेक्षाही एका स्त्रीचाच मेंदु जास्त

---

* **कुव्हिएर** या नांवाचा एक प्रसिद्ध प्राणिशास्त्रवेत्ता **फ्रान्स** देशांत होऊन गेला. तो होऊन गेल्यास ५० वर्षें झालीं. त्याच्या मेंदूचें वजन चौसष्ट औंसांवर ह्मणजे अदमासें १६० तोळे होते, असें ह्मणतात. पुरुषांच्या मेंदूचें साधारण वजन (युरोपांतील लोकांत) आदमासें ५० औंस असतें.

सुप्रसिद्ध सृष्टिशास्त्रवेत्ता आणि प्राणिविद्याशास्त्राचा पुरस्कर्ता कुव्हिएर यानें आपण मेल्यावर आपलें मस्तिष्क विद्वान् लोकांचे स्वाधीन करावें व त्यांणीं त्यावर परीक्षक मंडळी नेमून त्याची तपासणी करावी असें आपले मृत्युपत्रांत लिहिलें होतें. त्याप्रमाणें तो मेल्यावर त्याचें मस्तिष्क डाक्तर लोकांचे ताब्यांत दिलें. त्याचें वजन ६४ औंस ह्मणजे पक्के दोन शेर भरलें. साधारण बुद्धीचे पुरुषाच्या मास्तिष्काचें वजन ४६ पासून ५३ औंसांपर्यंत असतें त्याचप्रमाणें साधारण बुद्धीचे स्त्रीच्या मस्तिष्काचें वजन ४१ पासून ४७ औंसापर्यंत असतें. मनुष्यांच्या कमीजास्त बुद्धीप्रमाणें त्यांच्या मेंदूचें वजन कमीजास्त असतें. अतिशय बुद्धिमंताच्या मेंदूचें वजन अतिशय जास्त असतें व अतिशय मंदबुद्धीच्या मेंदूचें वजन अतिशय कमी असतें. मेंदु हा मनुष्याच्या बुद्धीचें मुख्य स्थान आहे. आमच्यामधील आज जे अत्यंत बुद्धिमान् व कल्पक लोक आहेत त्यांचें मस्तिष्क अतिशय वजनदार असलें पाहिजे, हें उघड आहे.

भरला. यापूर्वीं **कुव्हिएरच्या** मेंदू एवढा दुसऱ्या कोणाचाही मेंदु आढळला नव्हता. इतके दिवस **कुव्हिएरचाच** मेंदु मोठ्यांत मोठा मानला होता. आणखी मला येथें असें ह्मणून ठेविलें पाहिजे कीं, मेंदु व बुद्धिसामर्थ्य या दोहोंमध्यें नक्की संबंध काय आहे, हें अजून पूर्णपणें समजलें नाहीं. त्याविषयीं वाद आहे. मेंदु आणि बुद्धि या दोहोंत फार निकट संबंध आहे, याविषयीं शंकाच नाहीं. वेदना (भावना) व विचार यांचे बाह्य (जड) इंद्रिय मेंदु होय, हें तर खचित. आतां मेंदूच्या निरनिराळ्या भागांचा व निरनिराळ्या मानसिक शक्तींचा परस्पर संबंध काय आहे, हा जो वादग्रस्त विषय आहे, तो आपण क्षणभर एकीकडे ठेवूं. मी एवढें कबूल करतों कीं, इंद्रियाचा आकार व त्याचीं कार्यें यांचा परस्पर संबंध कांहीं नाहीं, असें ह्मणणें ; किंवा साधनाचें आकारमान मोठें असून त्याच्यापासून जास्त शक्ति प्राप्त होत नाहीं असें ह्मणणें ; ह्मणजे इंद्रियरचनेचे व प्राणि-शास्त्राचे जे सर्व-साधारण नियम, त्या नियमांत विसंगतता व अपवाद आहेत, असे ह्मणण्यासारखें होईल. परंतु इंद्रियाच्या केवळ आकार-मानावरच त्याची (इंद्रियाची) शक्ति अवलंबून आहे, असें ह्मण-णेंही योग्य होणार नाहीं. सृष्टिमध्यें जीं सूक्ष्म कार्यें घडतात त्यांत प्राणिकोटींतील कार्यें विशेष सूक्ष्म असतात. आणि त्यांतही विशेषेंकरून प्राण्यांच्या ज्ञानतंतूमुळें घडणारीं कार्यें तर अत्यंत सूक्ष्म असतात. त्या कार्यांच्या परिणामांमध्यें दिसणारे भेद, हे बाह्येंद्रि-याच्या आकारावर जितके अवलंबून असतात तितकेच त्या इंद्रि-याच्या रचनेवर अवलंबून असतात. साधनाची योग्यता ठरविणें ती त्या साधनानें घडणाऱ्या कार्यांच्या सूक्ष्मतेवरून व नाजूकपणावरून ठरविली पाहिजे. हें जर खरें आहे तर, पुरुषांपेक्षां स्त्रियांचा मेंदु, ह्मणजे त्यांतील ज्ञानतंतूंचा व्यूह एकंदरींत जास्त सूक्ष्म आहे, असें स्पष्ट दिसतें.

गुणसंबंधीं भेदाचा खरेखोटेपणा अनुभवास आणून देणें हें काम मोठें कठीण आहे. तेव्हां तें एकीकडेस ठेवूं. इंद्रियांची शक्ति केवळ आकारमानावरच नव्हे तर त्याच्या चपलतेवरही अवलंबून असते. आणि त्या इंद्रियांतून रक्ताचे अभिसरण ज्या वेगानें होतें त्या वेगावरून त्याच्या चंचलतेचें स्थूल परिमाण आपणांस काढितां येतें. कारण, इंद्रियास वेग देणारी व पुनःपूर्वींच्या स्थितींत आणून पोंचविणारी, अशा ज्या दोन शक्ति, त्या मुख्यत्वेंकरून रुधिराभिसरणावर अवलंबून असतात. केवळ मेंदूच्या आकारमानाकडे पाहतां पुरुषांकडे श्रेष्ठत्व येतें. परंतु मेंदूतील रुधिराभिसरण पाहतां त्यांतील चपलतेसंबंधानें स्त्रियांकडे वर्चस्व येतें, असें दिसून आलें तर त्यांत आश्चर्य वाटण्याजोगें कांहीं नाहीं. कारण, स्त्रिया व पुरुष यांच्या मानसिक क्रियासंबंधाचे जे जे भेद आजपर्यंत दृष्टीस पडले आहेत, त्यांचा व वरील गोष्टीचा चांगला मेळ बसतो. दोन शरीरांच्या तुलनेपासून शरीररचनेंतील भेद आपणांस कळून जें अनुमान निघतें त्यापासून अमुक परिणाम घडावे असें जें आपणांस वाटत असतें, त्या परिणामांचा मेळ प्रत्यक्ष अनुभवास येणाऱ्या कांहीं गोष्टींशीं बसला पाहिजे. तो असा. प्रथमतः पुरुषांच्या मानसिकक्रिया, स्त्रियांच्या मानसिक क्रियांपेक्षां मंदगतीनें चालल्या पाहिजेत. दुसरें असें कीं, विचारक्रिया स्त्रियांमध्यें जितक्या लौकर होतात, किंवा सुखदुःखाचें ज्ञान जितकें स्त्रियांस होतें, तितकें पुरुषांस होऊं नये.

पदार्थ जितका मोठा असेल त्या मानानें त्यास वेग येण्यास जास्त वेळ लागतो. त्याचप्रमाणें, एकदां कामाची सुरुवात झाली ह्मणजे पुरुषाचा मेंदु जास्त जास्त काम करील. ज्या दिशेनें तो निघाला असेल, त्याच दिशेकडे जाण्याचा आपला क्रम कायम राखील. एक काम टाकून तावडतोब दुसऱ्या कामास लागण्याला त्याला अधिक अडचण पडेल, हें खरें. परंतु हातीं घेतलेलें काम, लवकर न थकतां,

पुरुष पुष्कळ वेळ पर्यंत रेटील. ज्या ज्या कामांत स्त्रियांपेक्षां पुरुषांची श्रेष्ठता दिसून येते, तीं तीं कामें अशीं असतात कीं, त्यांस सतत यत्न व दीर्घ परिश्रम लागतात. स्त्रियांकडून चांगलीं होणारीं कामें, त्वरित होतात, असें आपणांस आढळून येत नाहीं काय? स्त्रियांचा मेंदु लवकर थकतो व अगदीं थकूनही लवकर जातो. परंतु जितका लवकर थकतो त्या मानानेंच तो पूर्व स्थितीवरही लवकर येतो, असें अनुमान काढतां येईल. तथापि, पुनः पुनः मी असें निक्षून सांगतों कीं, ही विचारसरणी, ज्या गोष्टींचा निश्चय अजून झाला नाहीं, अशा गोष्टींवर अवलंबून आहे. अमुक दिशेनें विचार करावा एवढेंच त्यासरणीपासून घ्यावयाचें आहे. यापेक्षां अधिक महत्त्व तिला देतां येत नाहीं. हें मीं पूर्वीं ह्मणून ठेवलेंच आहे कीं, साधारण स्त्रिया व पुरुष यांच्या बुद्धि-सामर्थ्यांत अथवा प्रवृत्तींत कांहीं नैसर्गिक भेद आहेत ही कल्पनाच मुळीं मला मान्य नाहीं. मग ते भेद कोणचे आहेत याविषयीं विचारच नको. मनुष्याचा वर्तन–क्रम कशा तऱ्हेनें बनतो यासंबंधीं मानसशास्त्राच्या नियमांचा अभ्यास जोंपर्यंत लोक वरून वरूनही करूं लागले नाहींत, किंवा प्रस्तुत गोष्टीसंबंधानें शास्त्रीय रीत्या ते नियम लाऊन पाहिले नाहींत तोंपर्यंत, वरील गोष्टी नीट तऱ्हेनें समजणें, हें शक्य नाहीं. त्याचप्रमाणें जिज्ञासु लोक व पंडित जोंपर्यंत निरनिराळ्या व्यक्तींच्या वर्तनक्रमांतील भेदांची सहजगत्या दृष्टीस पडणारीं कारणेंही लक्षांत आणीत नाहींत, व सध्यांचे सृष्टिशास्त्रवेत्ते व मानसशास्त्रवेत्ते त्या कारणांस तुच्छ मानून त्यांची सर्वथा उपेक्षा करितात, तोंपर्यंत वरील गोष्टींचें ज्ञान होण्याचा संभव नाहीं. हे लोक निरनिराळ्या व्यक्तींमध्यें शारीरिक भेद काय आहेत, याचा शोध लावण्यांत गुंतले असोत; किंवा मानसिक भेद काय आहेत, याचा शोध लावण्यांत गढले असोत. एक गोष्ट सदैव त्यांच्या ठिकाणीं दृष्टीस

पडते. ती गोष्ट ही कीं, समाजाशीं व्यक्तींचे निरनिराळे संबंध असतात, त्या संबंधांवरून जे पंडित व्यक्तिव्यक्तींच्या वर्तनक्रमांतील भेदांचा कार्यकारणभाव दाखवूं लागतात, त्या लोकांस सदैव हाणून पाडण्याचा यत्न करितात.

१४. स्त्रीस्वभावाच्या संबंधानें ज्या समजुती आढळतात त्या फारच उपहासास्पद असतात. त्या समजुती ह्मणजे सरासरी ठोकळ मानानें कांहीं तरी दडपून दिलेलीं अनुमानें. त्यांत योग्य प्रकारचें कांहींएक विवेचन केलेलें नसून ते तर्कशास्त्राच्या नियमानुसार ठरलेले सिद्धांत आहेत, असें मुळींच मानितां येत नाहीं. प्रथमदर्शनीं जीं उदाहरणें डोळ्यांसमोर आलीं असतील, त्यांवरून एकदम कांहीं तरी अनुमानें ठोकून दिलेलीं असतात. स्त्रियांचा स्वभाव ह्मणजे अमुक, अशी जी लौकिक कल्पना असते, ती भिन्नभिन्न देशांत भिन्नभिन्न प्रकारची आढळते. आणि ती ती कल्पना, त्या त्या देशांत राहणाऱ्या स्त्रियांवर तेथील लोकमत व देशस्थिति यांचा जसा न्यूनाधिक किंवा बरावाईट परिणाम घडला असेल, त्याच्या अनुरोधानें झालेली असते. पूर्वात्य मनुष्यांस वाटतें, स्त्रिया जात्याच विशेष विषयासक्त असतात. **हिंदु** लोकांच्या ग्रंथांत अशा या समजुतीनें यिस्त्रांची किती निंदा व निर्भर्त्सना केलेली आढळते ती पहा. **इंग्रेज** लोकांनां प्रायः असें वाटत असतें कीं, स्त्रिया स्वभावतः मंद व मठ्ठ असतात. स्त्रियांच्या चंचलतेच्या संबंधाच्या जितक्या ह्मणी आढळतात, त्यांपैकीं बहुतेक फ्रेंच ह्मणींपासून आलेल्या आहेत. **इंग्लंड** देशामध्यें 'स्त्रिया पुरुषांपेक्षां किती तरी अस्थिर मनाच्या असतात,' असें लोकांस ह्मणतांना आपण पुष्कळ वेळां ऐकतों. स्त्रियांच्या ठिकाणीं चांचल्य ह्मणजे मोठा दोष होय, अशी **इंग्लंड** देशांतील लोकांची फार दिवसांपासून समजूत आहे. अशी ही समजूत **फ्रान्स** देशांत फार दिवस टिकली नाहीं. दुसरें

असें आहे कीं, **इंग्लंड** देशांतील स्त्रियांच्या मनावर लोकमताचा जात्याच विशेष पगडा असतो. कदाचित् असें ह्मणतां येईल कीं, केवळ स्त्रियांसच नव्हे तर पुरुषांनाही किंबहुना एकंदर मानवीप्राण्यांना स्वाभाविक अशा गोष्टी कोणत्या, याचा निर्णय करण्याचा यत्न करणें **इंग्रेज** मनुष्यांनीं करूं नये. कारण केवळ **इंग्लंड** देशांतील अनुभव त्यांनीं घेतला तर त्यांची स्थिति, अशा कामास विशेष प्रतिकूल आहे. '**इंग्लंड**देशांतील अनुभव' असें ह्मणण्याचें कारण, मनुष्यस्वभावाची जी सहजावस्था किंवा मूळ प्रकृति, तिचा गंध देखील येथें उरला नाहीं. असा देश **इंग्लंड**शिवाय दुसरा नसेल. चांगल्या अर्थानें ह्मणा, किंवा वाईट अर्थानें ह्मणा. आधुनिक किंवा अर्वाचीन काळच्या दुसऱ्या कोणत्याही लोकांपेक्षां **इंग्रेज** लोक मूळ स्वभाव टाकून फार दूर गेले आहेत. इतर कोणत्याही लोकांपेक्षां सुधारणा व शिक्षण यांचा परिणाम **इंग्रेज** लोकांवर जास्त झाला आहे. ज्या देशांत सामाजिक शिक्षणाला बरेंच यश आलें आहे, असा देश पाहूं जातां **इंग्लंड** होय. जी जी गोष्ट लोकमताशीं विरुद्ध असेल ती ती नुस्ती दाबून टाकावयाची, असा प्रकार **इंग्लंडांत** फार आहे. कायद्याप्रमाणें किंवा नियमाप्रमाणें वागणें—एवढेंच नव्हे तर आपले मनोधर्मही तदनुसार वळविणें, हा प्रकार इतर लोकांपेक्षां **इंग्रेज** लोकांत अधिक आढळतो. इतर देशांत शिकविलेल्या गोष्टींचा किंवा समाजानें ठरविलेल्या गोष्टींचा पगडा व्यक्ति-मात्राच्या मनावर अधिक असला तरी, त्याच्या खालीं दडपून गेलेला जो व्यक्ति-विशिष्ट स्वभाव तो नेहमीं स्पष्ट दृष्टीस पडतो. एवढेंच नव्हे, तर तो आपल्याकडून आपल्यावर पडलेला दाब उचलून फेंकून देण्याचा यत्न करीत असतो, असेंही कधीं कधीं आढळतें. अशा ठिकाणीं मूळचा स्वभाव लोकरूढीनें कितीही आक्रांत करून टाकिला असला, तरी तो जिवंत राहिलेला

असतो. परंतु, इंग्लंडांत लोकरूढीनें मूळस्वभावास स्थानभ्रष्ट करून त्याची जागा आपणच पटकावली आहे. संसारांतील बहुतेक वागणूक लोकरूढीच्या अनुरोधानें होत असते. ज्याच्या त्याच्या प्रवृत्त्यनुसार होत नाहीं. कारण, स्वतंत्र प्रवृत्ति ह्मणून तेथें मुळींच कांहीं राहिली नसून लोकरूढीस अनुसरून चालणें हीच प्रवृत्ति झाली आहे. आतां असा हा प्रकार एका दृष्टीनें हितकारक आहे हें खरें. तथापि, दुसऱ्या दृष्टीनें पाहिलें तर ही गोष्ट अत्यंत घातक होय. निदान केवळ आपल्या अनुभवावरून मनुष्यस्वभावाचे मूळचे धर्म काय आहेत, या गोष्टीचा निर्णय करण्याच्या कामीं **इंग्लंडां**तील मनुष्य विशेषतः अपात्र ठरतो, एवढें तरी सिद्ध होतें. या विषयाच्या संबंधानें अन्य देशांतील विचार करणाऱ्या लोकांच्याकडून ज्या चुका घडतात त्या दुसऱ्याच प्रकारच्या घडतात. मनुष्य-स्वभावाच्या संबंधानें **इंग्लिश** मनुष्य मुळींच अज्ञान असतो. **फ्रेंच** मनुष्याचे ग्रह चुकीचे असतात. **इंग्लिश** मनुष्याच्या चुका नास्तिपक्षाच्या असतात. **फ्रेंच** मनुष्याच्या अस्तिपक्षाच्या असतात. ह्मणजे, ज्या गोष्टी त्यानें पाहिलेल्या नसतात त्या जगांत मुळींच कोठें नाहींत, असें **इंग्लिश** मनुष्यास वाटत असतें. **फ्रेंच** मनुष्यानें ज्या गोष्टी पाहिलेल्या असतात त्या सर्वत्र व सदैव असल्याच पाहिजेत, असें त्यास वाटतें. इंग्लिश मनुष्यास स्वभाव किंवा निसर्ग मुळींच कळत नाहीं. कारण, तो पहाण्याचा प्रसंगच त्यास कधीं येत नाहीं. **फ्रेंच** मनुष्याला त्याची माहिती पुष्कळ असते. परंतु त्याच्याकडून अनेक प्रसंगीं प्रमाद घडतात. कारण, त्यानें जो स्वभाव पाहिलेला असतो तो अशुद्ध स्थितींतला व विकृत केलेला असा पाहिलेला असतो. ज्या व्यक्तीचा विचार कर्तव्य आहे, त्या व्यक्तीस समाजाच्या अथवा लोकमताच्यायोगानें जी कृत्रिमअवस्था किंवा जें विकृतस्वरूप प्राप्त होतें, त्याच्यामुळें त्याच्या नैसर्गिक

प्रवृत्ति छपल्या जातात. त्या छपण्याचे दोन प्रकार आहेत. एक तर मूळचा स्वभावच नष्टप्राय होतो. किंवा दुसरा प्रकार असा होतो कीं, त्याचें स्वरूपांतर होतें.

यांपैकीं जेव्हां पहिला प्रकार होतो, त्या वेळीं स्वभावाचा जो सुकून वाळून गेलेला भाग तो शिल्लक राहिलेला असतो. जेव्हां दुसरा प्रकार होतो, तेव्हां स्वभावाचा बराच भाग कायम राहिलेला असतो. परंतु तो यहच्छेनें ज्या दिशेनें वाढत जावा तसा वाढत गेलेला नसून भलत्याच एखाद्या दिशेनें वाढत गेलेला असतो.

१५. मीं हें पूर्वीं ह्मणून सोडलेंच आहे कीं, स्त्रिया व पुरुष यांजमधील प्रस्तुत उपलब्ध होणाऱ्या मानसिक भेदांपैकीं किती भाग नैसर्गिक अथवा स्वाभाविक आहे व किती कृत्रिम आहे, हें समजणें अशक्य आहे. किंबहुना ' स्वाभाविक ' ह्मणतां येतील असे भेद मुळींच कांहीं आहेत किंवा नाहींत, आणि असल्यास त्या भेदांचीं जीं कृत्रिम कारणें आहेत तीं कारणें दूर केलीं असतां स्वाभाविक ह्मणण्यासारखे भेद कोणते हें कळण्याचा मुळींच संभव नाहीं. जी गोष्ट मीं अशक्य व असंभाव्य आहे असें ह्मणून सोडली आहे, ती करण्याविषयीं यत्न करण्याच्या भरीस मी पडत नाहीं. परंतु एखाद्या गोष्टीविषयीं शंका उत्पन्न झाली तरी तेवढ्यानें तिच्या संबंधानें तर्क करण्यास कांहीं प्रत्यवाय दिसत नाहीं. आणि यद्यपि ती गोष्ट निश्चयात्मक कळेलच असें जरी नसलें, तरी अशीं कांहीं साधनें प्राप्त होण्याचा संभव असतो कीं, ज्यांच्या योगानें त्या गोष्टीविषयीं अंशतः तरी आपली खात्री होते. या दृष्टीनें विचार केला तर पहिला मुद्दा असा निघतो कीं, आपल्या प्रत्यक्ष अवलोकनांत आलेले जे भेद ते उत्पन्न झाले कसे ? हा मुद्दा विचार करण्यासारखा आहे. या प्रश्नाचें उत्तर देतांना ज्या एकाच मार्गानें आपण गेलों असतां आपणास

यशप्राप्ति होईल त्याच मार्गानें जाण्याचा मी यत्न करितों. तो मार्ग कोणचा ह्मणाल तर सांगतों. बाह्य उपाधींचे जे परिणाम मनावर होतात त्यांची उपपत्ति करणें, ह्मणजे ते शोधून काढणें. मनुष्यप्राणी असा आहे कीं, त्याच्यासंबंधानें आपणांस अन्वयव्यतिरेकाचा उपयोग करितां येत नाहीं. मनुष्याला त्याच्या बाह्य उपाधींपासून निराळा करून, प्रत्यक्ष प्रयोगानें त्याचा मूळ स्वभाव काय आहे तो ठरवितां येणार नाहीं. तथापि, वर्तमानकाळीं तो कसा आहे व आजपर्यंत त्याच्या मागें कोणच्या उपाधी होत्या व त्या उपाधींपासून, ज्या अवस्थेंत मनुष्यप्राणी आज आपण पहातों त्या अवस्थेंतला मनुष्यप्राणी निपजणें संभवतें किंवा नाहीं, या गोष्टीचा आपणांस निर्णय करितां येईल.

१६. तेव्हां आतां केवळ शरीरबलाचा विचार क्षणभर एकीकडे ठेऊन, पुरुषांहून स्त्रियांचा कमीपणा ज्या एका विशेष गोष्टींत नेहमीं आपणांस भासतो त्या गोष्टीचा प्रथम विचार करूं. तत्त्वज्ञान, शास्त्र किंवा कला अशा विषयांवर उत्तम व सर्वमान्य असा ग्रंथ आजपर्यंत एकाही स्त्रीच्या हातून झाला नाहीं. असें कां? या प्रश्नाचें समाधान स्त्रिया जात्याच अशा प्रकारचे ग्रंथ निर्माण करण्याविषयीं असमर्थ आहेत, असें मानण्याशिवाय दुसऱ्या कांहीं मार्गानें करितां येईल किंवा नाहीं, हें पाहिलें पाहिजे.

१७. पहिल्या प्रथम मी असें विचारितों कीं, या संबंधानें कांहीं एक सिद्धांत ठरविण्यापुरतीं प्रमाणें, जो अनुभव आपणांस आला आहे, त्यांतून मिळण्यासारखीं नाहींत. कांहीं ठळक ठळक परंतु फारच थोडीं अशीं उदाहरणें शिवाय करून, तत्त्वज्ञान, शास्त्र अथवा कला अशा विषयांत स्त्रिया आपली बुद्धि घालूं लागल्यास अद्यापि तीन पिढ्याही लोटल्या नाहींत. बऱ्याच स्त्रिया या चालू पिढींतच

कायतो यत्न करूं लागल्या आहेत. आणि अशा स्त्रियांची संख्या वर्तमानकाळींही, **इंग्लंड** व **फ्रान्स** हे दोन देश खेरीज करून इतर सर्व देशांत फारच थोडी आहे. पुरातनकाळीं ज्या स्त्रिया होऊन गेल्या त्या स्त्रियांपैकीं ज्या स्त्रियांची अभिरुचि व भोंवतालची स्थिति अशा कामास अनुकूल होती, अशा स्त्रियांत, तत्त्वज्ञानाच्या कामीं किंवा एखाद्या कलेंत पहिल्या प्रतीची योग्यता व प्रवीणता मिळविण्यास अवश्य लागणारीं साधनें ज्या स्त्रीस अनुकूल आहेत अशी स्त्री, केवळ दैवयोगानें निपजलीच पाहिजे, असें ह्मणणें आहे कीं काय? मला वाटतें असा प्रश्न विचारणें असंबद्ध किंवा अप्रस्तुत होणार नाहीं. कांहीं कांहीं अत्यन्त बुद्धिमत्तेच्या व अति उंच प्रतीच्या कामाशिवाय इतर सर्व कामांत—विशेषेंकरून ग्रंथलेखनाच्या (गद्य व पद्य) कामांत आजपर्यंत त्यांनीं बराच काळ घालविल्यामुळें त्यांस मिळालेल्या कालावधीचा जर विचार केला व ज्यांच्याशीं त्यांस स्पर्धा करावी लागली त्यांची संख्या जर ध्यानांत आणली, तर त्या मानानें त्यांनीं पुष्कळच यश मिळविलें, व तें काम त्यांनीं खरोखरच चांगलें केलें असें ह्मटलें पाहिजे. याहीपेक्षां अधिक प्राचीन काळाचा, ह्मणजे ज्याकाळीं फारच थोड्या स्त्रियांनीं ग्रंथलेखनाच्या कामीं यत्न केला, अशा काळाचा विचार केला तर, ज्या थोड्या स्त्रियांनीं अशा कामीं आपली बुद्धि खर्च केली, त्या स्त्रियांनीं खरोखर सोळा आणे यश मिळविलें! **ग्रीक** लोकांमध्यें **सॉफो** या नांवाची कवयित्री झाली. तिची गणना ते आपल्या महाकवींमध्यें करीत. त्याचप्रमाणें **पिंडार** या नांवाचा प्रसिद्ध कवि, **मिरटिस्** या नांवाची एक स्त्री होती तिजपासून कवनें करावयास शिकला. उत्कृष्ट काव्यास बक्षिसें देण्याच्या समारंभाचे प्रसंगीं **कोरिन्ना** या नांवाच्या स्त्रीनें **पिंडार** याचे हातून पांच वेळा बक्षिस हिरावून नेलें. या गोष्टी इतिहासप्रसिद्ध

आहेत. **पिंडार**सारख्या कवीच्या बरोबरच ज्या अर्थीं या दोन स्त्रियांच्या नांवाचा उल्लेख केला आहे, त्या अर्थीं त्यांचें बुद्धिसामर्थ्य व त्यांची योग्यताही तशीच असली पाहिजे, हें उघड आहे. **ॲस्पेशिया** हिनें तत्त्वज्ञानाच्या संबंधानें लिहिलेले कांहीं ग्रंथ उपलब्ध नाहींत. परंतु **सॉक्रेटीस**सारखा महापंडित व तत्ववेत्ता तिच्यापासून उपदेश मिळावा या हेतूनें तिच्या सहवासांत राहिला होता व तिजपासून आपणांस बरेंच ज्ञान प्राप्त झालें, असें त्यानें प्रांजलबुद्धीनें कबूलही केलें आहे. ही गोष्टही इतिहासप्रसिद्ध आहे.

१८. ग्रंथरचनेच्यासंबंधानें, किंवा इतर कलांच्यासंबंधानें, आधुनिककालच्या स्त्रियांच्या ज्या कृति आहेत, त्यांचा विचार केला, व पुरुषांच्या कृतींशीं त्यांची तुलना केली तर, जो कमीपणा आपल्या पहाण्यांत येईल, त्यांतलें मुख्य तत्त्व पाहूं जातां एकच परंतु तें फारच महत्वाचें आहे. तें कोणतें? तर, नवीनपणाचा अभाव असणें. 'अभाव' असें कदाचित् ह्मणतां येणार नाहीं. कारण, कोणतीही मानसी सृष्टि किंवा कृति घ्या. तिला खरोखर जर कांहीं किंमत असेल तर, कांहीं एका प्रकारचा नवेपणा तिजमध्यें असतोच असतो. कारण, ज्या बुद्धिपासून त्या कृतीची उत्पत्ति झाली असेल, ती कृति, दुसऱ्या एखाद्या गोष्टींचें अनुकरण न करितां त्या बुद्धीनें स्वतःच बनविलेली असते, असें ह्मटलें पाहिजे. अशा प्रकारचे अभिनव किंवा अपूर्व विचार—ह्मणजे दुसऱ्यापासून न घेतलेले, विचार-कर्त्रीच्या निव्वळ स्वावलोकनापासून अथवा स्वतंत्र मनोव्यापारापासून निर्माण झालेले, असे विचार स्त्रियांच्या ग्रंथांमधून व लेखांमधून पुष्कळ आढळतात. परंतु अत्यंत उदात्त व भोंवतालच्या अनेक गोष्टींवर प्रकाश पाडणाऱ्या अशा अपूर्व कल्पना—कीं ज्यांच्या योगानें तत्वज्ञानाच्या इतिहासांतील विशिष्ट काल निर्दिष्ट केला जातो—अशा कल्पना मात्र आजपर्यंत स्त्रियां

पासून निघाल्या नाहींत. त्याचप्रमाणें, ज्यांच्या योगानें एखाद्या विवक्षित कलेसंबंधीं अदृष्टपूर्व अशा अगण्य परिणामांचा प्रांत दृष्टिगोचर होतो, व एखादें नवीन दर्शन (प्रक्रिया अथवा प्रमेय) स्थापित होतें, अशा अगदीं नवीन कल्पनाही अद्यापि स्त्रियांच्या मस्तकांतून बाहेर पडल्या नाहींत. स्त्रियांचे जे ग्रंथ आहेत त्यांची जुळणी बहुधा जे विचार जगांत चालू असतात, त्यांस अनुसरूनच केलेली असते. त्यांच्या कृति, (ग्रंथ) चालू काळांत आढळणारे जे नमुने किंवा जे ठसे, त्यांस फारशा सोडून केलेल्या नसतात. स्त्रियांच्या ग्रंथांतून स्पष्ट दिसणारा जो मुख्य दोष किंवा कमीपणा तो हाच. कारण, याशिवाय इतर गोष्टी ध्यानांत आणल्या तर, एकंदर ग्रंथरचनेचें काम, विचारसरणी, भाषासौंदर्य, योजना-चातुर्य, वगैरे गोष्टींत स्त्रियांचा मुळींच कमीपणा दिसत नाहीं. ग्रंथ-रचनेचें कौशल्य व भिन्न भिन्न भागांचा सुव्यवस्थितपणा, या दोन गुणांच्यासंबंधानें पहातां, आमचे उत्कृष्ट कादंबरीकार बहुतेक स्त्रीवर्गांतीलच आहेत. आधुनिक ग्रंथसंग्रह पाहूं जातां, त्यांत **म्याडम् डि स्टॉल** या बाईच्या ग्रंथांसारखें निरनिराळे विचार दाखविणारें असें कोणतेंही साधन अन्यत्र आढळत नाहीं. त्याचप्रमाणें कादंबऱ्या लिहिण्याचें अलौकिक चातुर्य **म्याडम् स्यान्ड** या बाईच्या गद्य ग्रंथांत इतकें आहे कीं, तिचे ग्रंथ वाचित असतां **हेडिन** किंवा **मोझार्ट** या प्रसिद्ध संगीताचार्यांच्या मधुर ताना ऐकत असल्याप्रमाणें आनंद होतो व वृत्ति तल्लीन होतात, मीं ह्मटलेंच आहे कीं, अचाट कल्पना किंवा अगदीं नवे असे विचार काढणें, या गोष्टीचीच काय ती मुख्य उणीव स्त्रियांत आहे. आतां ही जी उणीव आहे, तिच्या कारणांची कांहीं प्रकारें उपपत्ति लावितां येईल कीं नाहीं, हें आपण पाहूं.

१९. प्रथमतः ही गोष्ट आपल्या स्मरणांत ठेविली पाहिजे कीं, जग निर्माण झाल्यानंतर जो काल शिक्षणाच्या प्रसारांत किंवा

उत्कर्षांत गेला; व ज्या कालांत केवळ बुद्धीच्या जोरानें, पूर्वीचें अध्ययन आणि पूर्वार्जित ज्ञानाची पुंजी हीं दोन्हीही साधनें नसतां मोठमोठीं तत्त्वें (ज्यांपासून पुढें अनेक विचार सुचतात अशी) माणसांनीं शोधून काढिलीं; अशा कालीं तत्त्व-मीमांसेच्या कामांत स्त्रियांनीं मुळींच आपलें मन घातलें नाहीं. **हिपेशिया*** ज्या काळांत होऊन गेली, तेव्हांपासून यूरोपांत **रेफर्मेशन्** (धर्म-क्रांति) होईपर्यंत, तत्त्व-मीमांसेसारखें काम ज्या स्त्रीचे हातून हो-ण्यासारखें होतें, अशी स्त्री काय ती एक **हिलॉइझा** या नांवाची होऊन गेली. परंतु याही अलौकिक बुद्धीच्या स्त्रीचें विचार करण्याचें किती तरी सामर्थ्य, तिजवर आलेलीं जीं संकटें किंवा जे दुर्धर प्रसंग त्यांच्या-मुळें जगास नाहीं सारखें झालें, हें कोणाच्यानें सांगवेल? पुष्कळशा स्त्रिया गंभीर विषयांवर विचार करण्यास लागल्यापासून अगदीं नवीन विचार सुचणें हें काम सोपें नाहीं. निव्वळ मानसिक शक्तीच्या जोरावर जे विचार सहजगत्या सुचण्यासारखे असतात, असे विचार केव्हांच जगांत येऊन गेले आहेत! आणि 'विचारांची अभिनवता' या शब्दांचा जर खरा अर्थ घेतला तर ती (अभिनवता) सुशिक्षणानें व विद्वत्तेनें परिपूर्ण व पूर्वीच्या विद्वान् लोकांच्या विचारांचें ज्यांनीं चांगल्या प्रकारें परिशीलन केलें आहे, अशा लोकांस प्राप्त होतें. इतरांस होत नाहीं. मला वाटतें, प्रस्तुत काळासंबंधानें लिहितांना **मॉरिस्** साहेबानें असें म्हटलें आहे कीं, सध्यांचे नवीन विचार काढणारे तत्त्ववेत्ते कोण? तर ज्यांस पूर्वकालीन विद्वानांच्या विचारांचें परिपूर्ण ज्ञान आहे ते. आणि, यापुढेंही खरोखर नेहमीं अशीच स्थिति असणार. ज्ञानाच्या इमारतीचें काम सध्यां जितकें उभारलें आहे, त्याच्यापेक्षां तें

---

* ही स्त्री **अलेक्झांड्रिया** येथील राहणारी असून, गणितशास्त्र व तत्त्वज्ञान या दोन शास्त्रांत निपुण होती. ती अदमासें १६०० वर्षांपूर्वी होऊन गेली.

आपल्या हातून अधिक उंच करावें, अशी महत्वाकांक्षा ज्याच्या मनांत असेल, त्याला एक दगड वर अधिक ठेवायचा ह्मटला ह्मणजे, तो इतरांनीं रचलेल्या दगडांवर ठेवावयाचा असल्यामुळें, स्वतां वर जाण्याचे व सामानसुमानही नेण्याचे किती तरी कष्ट पडतील ? इतकी खटपट ज्यांनीं केली आहे अशा स्त्रिया हल्लीं किती सांपडतील ? आज-कालच्या स्त्रियांत गणित शास्त्रासंबंधीं एखादा मोठासा शोध लावण्यास जितकें गणिताचें ज्ञान पाहिजे तितकें ज्ञान जिला आहे, अशी एक कदाचित् **मिसेस् समरव्हिल्** ही बाई आहे. या बाईच्या आयुष्यांत गणितशास्त्राचें पाऊल पुढें पडण्यास जीं दोन माणसें कारणीभूत झालीं, त्यांत या बाईचें नांव नसलें ह्मणून तेवढ्यावरून स्त्रियांचा कमीपणा सिद्ध होतो काय ? अर्थशास्त्राला शास्त्रपणा आल्यापासून त्या विषयावर उपयुक्त लेख लिहिण्यापुरतें अर्थशास्त्राचें ज्ञान ज्यांस आहे अशा आज-वर दोन स्त्रिया आढळल्या. तेवढ्याच कालावधींत व त्याच विषयावर, ज्या असंख्य पुरुषांनीं लेख लिहिले त्यांचेविषयीं यापेक्षां अधिक तें काय ह्मणतां येणार आहे ? कोणी असें ह्मणेल कीं आजपर्यंत, एखादी स्त्री मोठी इतिहासकर्त्री होऊन गेली नाहीं. गोष्ट खरी. पण मी असें विचारतों कीं, इतिहास लिहिण्यास विद्येची व ज्ञानाची जी सामग्री पाहिजे, ती कोणत्या स्त्रीला प्राप्त झाली आहे बरें ? त्याचप्रमाणें, फार मोठी भाषा-शास्त्रवेत्ती अशी स्त्री आजकाल नाहीं खरी. पण, **स्लाव्हॉनिक्**, **संस्कृत**, **गॉथिक**, व ज्या भाषेंत **झंदावेस्ता** हा ग्रंथ लिहिला आहे ती **फारशी** भाषा, इत्यदि भाषांचे अध्ययन कोणत्या स्त्रीनें केलें आहे बरें ? साधारण व्यवहारांतल्या गोष्टींमध्येंही ज्या बुद्धीला शिक्षण संस्कार घडला नाहीं, तिच्यांत नवेपणा कितपत असतो, हें आपणांस ठाऊकच आहे. नवेपणा ह्मणजे बहुधा त्याचा अर्थ इतकाच असतो कीं, पुष्कळशा शोधक माणसांनीं एका मागन एक ज्या युक्त्या काढल्या असतील, किंवा

शोध केले असतील, त्याच युक्त्या किंवा तेच शोध मूलतत्त्वांच्या स्वरूपानें पुनः काढणें. खरोखर एखादा नवीन शोध लावणें किंवा नवीन तत्त्वें शोधून काढणें, या कामास जितकी तयारी पुरुषांस करावी लागते, तितकी तयारी स्त्रिया करतील, तेव्हां मग स्त्रियांमध्येंही ही शक्ति किंवा हा गुण आहे किंवा नाहीं, तें ठरविण्याचा काल येईल. आणि तोंपर्यंत, या संबंधानें कांहीं एक ह्मणतां येणार नाहीं.

२०. आतां असें मात्र कधीं कधीं निःसंशय घडत असतें कीं, कोणत्याही एका विषयावर दुसऱ्या माणसांचे काय विचार आहेत, ते सविस्तर व अगदीं बरोबर रीतीनें समजून घेतल्याशिवायच एखाद्या माणसास एखादी फारच सुरेख कल्पना सुचते. हें फल त्या माणसास सृष्टीनें दैववशात् दिलेली जी कुशाग्र बुद्धि, किंवा ज्यास उपजत शहाणपणा ह्मणतात, त्याचें होय. आणि अशा माणसानें सुचविलेली कल्पना यद्यपि त्यास सिद्ध करून दाखवितां आली नाहीं, तरी तिचें चीज करून दाखविणारा व तिला परिपक्वतेस आणणारा जर कोणी निघाला तर तीच कल्पना ज्ञानभांडारांत मोठ्या महत्वाची भर पडण्यास कारणीभूत होते. परंतु, कल्पना चांगली असली तरी ज्यानें पुष्कळ अध्ययन केलें आहे असा एखादा मनुष्य तिला हातांत घेउन, तिला कसोटीला लावून, तिला शास्त्रीय किंवा व्यावहारिक स्वरूप देईल तोंपर्यंत व शास्त्रसंबंधीं किंवा तत्त्वज्ञानासंबंधीं जीं प्रमेयें त्या कालीं माहित झालेलीं असतील, त्यांत तिला योग्य स्थल पाहून तिची स्थापना करील तोंपर्यंत ती तशीच पडून राहते. तिचें चीज होत नाहीं. आणि अशा सुरेख कल्पना, व असे सुंदर विचार स्त्रियांच्या डोक्यांत उत्पन्नच होत नाहींत, असें लोक समजतात कीं काय? छे! प्रत्येक बुद्धिमान् स्त्रीच्या मनांत असे शेंकडों विचार येतात व अशा शेंकडों कल्पना सुचतात. परंतु काय उपयोग? त्या कल्पनांची व

त्या विचारांची खरी किंमत जाणण्यापुरता ज्याचा अधिकार आहे व ते विचार जगापुढें आणण्यापुरतें बुद्धिसामर्थ्य ज्यास आहे, असा एखादा नवरा किंवा मित्र त्या स्त्रीला न मिळाल्याकारणानें ते सर्व विचार व त्या सर्व कल्पना नष्टप्राय होतात. आणि कदाचित् जर ते विचार जगापुढें आलेच तर ते त्या नवऱ्याचे किंवा मित्राचे ह्मणून येतात. ज्या माणसापासून त्या विचारांची खरोखर उत्पत्ति होते, त्याचें नांव गुप्तच राहतें. पुरुषवर्गांतील ग्रंथकारांनीं प्रसिद्ध केलेले जे अगदीं नवे ह्मणून मानलेले विचार, त्यांपैकीं स्त्रियांनीं सुचविलेले व त्या ग्रंथकारांनीं निश्चित करून नीट तऱ्हेनें केवळ त्यांची जुळणी केली, असे विचार किती असतील, हें कोणी सांगावें? मी आपल्या स्वतःच्या अनुभवावरून पाहूं लागलों तर, खरोखर असे पुष्कळ विचार स्त्रियांच्या डोक्यांतून निघत असावे, असें मला वाटतें.

२१. केवळ तत्त्वज्ञानाची गोष्ट एकीकडे ठेविली, व सामान्य ग्रंथरचनेचा आणि ललितकलांचा विचार केला तरी, स्त्रियांचे ग्रंथ, त्यांतील सर्वसाधारण कल्पना व त्यांतील मुख्य मुख्य अंगें पाहिलीं तर, ते ग्रंथ पुरुषांचे अनुकरण करून केलेले असतात, असें आढळतें. पण असें असण्याचें एक अगदीं उघड कारण आहे. विद्वान् लोकांनीं असें अनेक प्रसंगीं ह्मटलें आहे कीं, **रोमन** लोकांचा ग्रंथसंग्रह नवीन नसून त्यांत **ग्रीक** लोकांचेंच अनुकरण आहे. असें कां? तर **ग्रीक** लोक **रोमन** कोकांपूर्वीं झाले ह्मणून. ज्या देशांत पुरुष राहतात, त्या देशांत न राहतां अगदीं भिन्न देशांत जर स्त्रिया राहत्या व पुरुषांचे ग्रंथांपैकीं एकही ग्रंथ त्यांनीं वाचला नसता, तर त्यांचा स्वतःचा ग्रंथसंग्रह अगदीं नवीन झाला असता. परंतु खरा प्रकार असा झाला कीं, फारच चांगल्या स्थितीला पोंचलेला ग्रंथसंग्रह त्यांच्या अगोदरच होऊन गेल्यामुळें त्यांनीं आपला स्वतंत्र ग्रंथसंग्रह

केला नाहीं. प्राचीन शिल्पकलांचें ज्ञान नष्टप्राय झालें नसतें तर, किंवा **गॉथिक** तऱ्हेचीं देवळें बांधिलीं जाण्यापूर्वीं, शिल्पकलेचा उद्धार करण्याविषयीं **रेनाइसान्स** (पुनरुज्जीवन) या नांवाची जी मोठी खटपट **यूरोपांत** झाली, ती, **गॉथिक** देवळें बांधण्यापूर्वींच झाली असती तर, तीं देवळें कधींच बांधिलीं गेलीं नसतीं. **फ्रान्स** व **इटाली** देशांत प्राचीन ग्रंथ-लेखनपद्धतीचें अनुकरण, लोक करूं लागल्यामुळें, तेथील लोकांनीं ग्रंथलेखनाची जी पद्धत सुरू केली होती, ती तेथेंच खुंटली. ज्या ज्या स्त्रिया ग्रंथलेखनाचें काम करितात, त्या त्या, पुरुषवर्गांतील जे मोठमोठे ग्रंथकार होऊन गेले, त्यांच्या शिष्यिणी असतात. **यूरोपांतील** प्रसिद्ध चित्रकार जो **रॅफेल** त्याच्या तोडीचा जरी एखादा चित्रकार असला, तरी त्याच्या पहिल्या चित्रांची तऱ्हा, जो त्याचा गुरु असेल, त्या गुरूनें काढिलेल्या चित्रांच्या तऱ्हेहून फारशी भिन्न नसते. **मोझार्ट**सारख्या अलौकिक संगीतरचनाकाराच्या पहिल्या पद्यांत, त्यानें मागाहून दाखविलेली जी जबरदस्त कर्त्तबगारी आहे, ती दिसत नाहीं. नैसर्गिक बुद्धीच्या व्यक्तीस जशी विवक्षित वयाची अपेक्षा असते, तशीच व्यक्ति-समूहाला पुष्कळसा काल जाण्याची अपेक्षा असते.* स्त्रियांनीं लिहिलेल्या ग्रंथाची पद्धति पुरुषांच्या पद्धतीहून एकंदरींत भिन्न असावी असा जर कांहीं योग यावयाचा असेल, व स्त्रियांच्या नैसर्गिक प्रवृत्तींचें भिन्नत्व त्या पद्धतींत व्यक्त व्हावयाचें असेल, तर

---

* या भाषांतर्गत निबंधकाराचा भाव स्पष्ट झाला नाहीं. तो अधिक स्पष्ट करून सांगणें अवश्य दिसतें. रॅफेल किंवा आमचे इकडील उदाहरणें पाहिजे असल्यास, प्रसिद्ध भिवा सुतार **रविवर्मा** अथवा पुणे प्रदर्शनांत आमचे पहाण्यांत आलेले **करवीरस्थ** चित्रकार **आबालाल** यांच्यासारखा एखादा चित्रकार घेतला; किंवा **मोझार्ट**–अथवा आमचे इकडील उदाहरण पाहिजे असल्यास कैलासवासी **अण्णा किर्लोसकर** यांच्यासारखा एखादा संगीताचार्य घेतला; सारांश, कोणत्याही कलेंत ज्यानें आपलें अलौकिक बुद्धिसामर्थ्य दाखविलें, असा कोणताही पुरुष घेतला तर पुरुषाच्या अगदीं पहिल्या कृति केवळ अनुकरणात्मक असतात, असें दिसून येतें. त्यांचें स्वतंत्र व उत्कृष्ट स्वरूप

तसें होण्यास जितका काल जावयास पाहिजे आहे, तितका काल अद्यापि गेला नाहीं. त्यांच्यासमोर असलेलीं उदाहरणें, किंवा त्यांनीं पसंत केलेले जे लेखनपद्धतीचे नमुने, त्यांच्या दाबांतून मुक्त होऊन, ज्या दिशेकडे त्या पद्धतीची सहज प्रवृत्ति असेल, त्या दिशेनें ती जाऊं लागण्यास अजून बराच काल लोटला पाहिजे. माझी स्वतःची अशी समजूत आहे कीं, स्त्रियांत उपलब्ध होणाऱ्या अशा कांहीं स्वाभाविक प्रवृत्ति ह्मणून नाहींतच. तेव्हां आहेत असें जरी सिद्ध झालें नाहीं, व पुरुषांची बुद्धि व स्त्रियांची बुद्धि, उभयतांच्या बुद्धींत विशेष भेद आहे, असें कधीं काळीं स्थापित झालें नाहीं, तरी स्त्रीग्रंथकारांमध्यें एकेकीच्या व्यक्तिविशिष्ट प्रवृत्ति असतातच असतात. त्या प्रवृत्तींवर प्रस्तुतकालीं जुन्या वहिवाटींचा व समोर असलेल्या उदाहरणांचा पगडा बसलेला आहे. जमिनींत रुजत घातलेली जशी एखादी बी फुगून तिला मोड येतो, व तो मोड आपल्या डोक्यावर असणाऱ्या व आपल्यास दाबून टाकणाऱ्या जमिनीस दुभागून आपलें डोकें वर करितो,* त्याचप्रमाणें स्त्रियांचा व्यक्तिविशिष्ट गुण बराच वृद्धिंगत किंवा परिणत झाल्याखेरीज जुन्या वहिवाटीच्या पगड्यास न जुमानतां त्यास आपलें डोकें वर काढितां येणार नाहीं.

२२. स्त्रियांमध्यें मूळचें बुद्धिसामर्थ्य कमी आहे असें दाखविण्यास गायन, नर्तन, चित्रकला, इत्यादि कला, ज्यांस ललितकला असें

प्रकट होण्यास कांहीं वयाचेंही मान लागत असतें. ही गोष्ट व्यक्तीची जशी आहे, तशीच ती व्यक्तिसमूहासही लागू पडते. आमच्या निबंधकारांचें ह्मणणें एवढेंच आहे कीं स्त्रीग्रंथकारांची सध्यांची स्थिति ही पूर्व स्थिति, ह्मणजे—अनुकरणाची स्थिति, आहे. ही स्थिति बराचसा काल व बऱ्याचशा पिढ्या गेल्यानंतर नाहींशी होऊन, त्यांचे स्वतंत्र विचार जे कांहीं असतील, ते मग पुढें बाहेर पडण्याचा संभव आहे. त्यांच्या प्रस्तुतच्या स्थितीवरून कांहीं विरुद्ध अनुमान करणें, हें न्याप्य होणार नाहीं.

*हा दृष्टांत मूळच्या ग्रंथांत नाहीं. तो, केवळ निबंधकाराचें ह्मणणें वाचकांच्या मनांत ठसावें ह्मणून, भाषांतर करीत असतां सहजीं सुचल्यावरून येथें दिला आहे.

ह्मणतात, त्यांच्यापासून फारच बळकट पुरावा मिळतो, असें प्रथमदर्शनीं वाटण्याचा संभव आहे. कारण, कांहीं लोक असें ह्मणतात कीं, लोक-रूढि किंवा लोक-मत स्त्रियांस ललितकला शिकण्याविषयीं प्रतिकूल नाहीं किंवा प्रतिबंध करीत नाहीं, एवढेंच नव्हे तर त्यांनीं ललितकला शिकाव्या, अशाविषयीं उलट त्यांस उत्तेजन देत असतें. विशेषेंकरून श्रीमान् लोकांच्या स्त्रियांस जें शिक्षण मिळतें, त्यांत ललितकला वगळल्या जातात, असें नसून उलट ललितकलांमध्यें स्त्रिया चांगल्या तरबेज झाल्या ह्मणजे त्यांच्या एकंदर शिक्षणाचा भाग संपला, असा प्रकार असतो.* असें असून इतर कोणत्याही कामांत स्त्रिया जितक्या मागें पडल्या नाहींत, तितक्या त्या या कामांत पुरुषाच्या मागें पडल्या. तथापि हा दोष असण्याचें कारण अगदीं उघड अशी एक गोष्ट आहे व ती आपल्या प्रत्यहीं पहाण्यांत येते. विशेषेंकरून तिची सत्यता इतर बाबतींपेक्षां, ललितकलांच्या संबंधानें सर्वत्र सारखी दृष्टीस पडते. ती ही कीं, ती ती कला, जो धंद्याकरितां व आपल्या निर्वाहाकरितां ह्मणून शिकतो तो मनुष्य, त्या त्या कलेंत केवळ हौशीकरितां व शौकाकरितां शिकणाराहून फारच निष्णात झालेला असतो. या

---

* या संबंधानें सिड्ने स्मिथ यांनीं 'स्त्री शिक्षणावर विचार' या सदराखालीं असें लिहिलें आहेः "'आज मित्तीस स्त्रीशिक्षणाचा एकंदर रोख झटला ह्मणजे त्या पुरुषास अधिक प्रिय कशा होतील, इतक्या पुरताच आहे. गायन, नर्तन, चित्रकला यांतच स्त्रियांस प्रावीण्य मिळावें ह्मणून विशेष श्रम घेण्यांत येतात. परंतु या सर्व कलांचा उपयोग अर्थातच मर्यादित असला पाहिजे. तारुण्यांत असतांना पुरुषाचें मन सुप्रसन्न करून आपण त्यांस आवडतें व्हावें व पुढेंही थोडा काळपर्यंत उभयतांस करमणूक व्हावी. या पलीकडे या कलांचा फारसा उपयोग नाहीं. आतां या कलांवरच उपजीविका करण्याचा ज्यांचा उद्देश असेल, त्यांनीं त्यांचा अभ्यास करण्यांतच सर्व वेळ खर्च केल्यास तें खचित गैरवाजवी होणार नाहीं."

येथें एक गोष्ट सांगणें अवश्यक आहे कीं, इंग्लंड देशांत गाण्याबजावण्यावर उपजीविका करणाऱ्या सर्व स्त्रिया इकडल्याप्रमाणें वेश्यावर्गांतीलच नसतात.

देशांत सुशिक्षित वर्गांतील स्त्रियांस ललितकलांपैकीं एखाद दुसरी कला अवश्य शिकवितात. परंतु त्या कलेवर त्यांचा निर्वाह व्हावा, किंवा समाजांत त्यांचें वजन वाढावें, अशा हेतूनें शिकवीत नाहींत. एखाद्या कलेमध्यें निष्णात झालेल्या अशा जितक्या स्त्रिया* आढळतात, तितक्या बहुतेक ती कला हौसेनें व मौजेनें ह्मणून शिकलेल्या असतात. या गोष्टीस अपवाद आहेतच. परंतु त्या अपवादांवरून साधारण नियम निश्चित होतो. संगीतशास्त्र व वादनकला स्त्रियांस शिकवितात

---

* ज्या मूळच्या शब्दांचें हें लांबलचक भाषांतर करावें लागलें, ते शब्द असे आहेतः—' Women artists are all amateurs" "Women artists" या शब्दांचें बरोबर भाषांतर ह्मटलें ह्मणजे ' कलावंतिणी किंवा कसबिणी स्त्रिया ! ' अथवा ' कसब करणाऱ्या किंवा दाखविणाऱ्या स्त्रिया ! ' कसेंही करूं लागलों तरी भलताच अर्थ होऊं लागतो ! ' Artist ' या शब्दाचा अर्थ, ज्यास एखादी कला अवगत झाली आहे तो. तात्पर्यः—एखाद्या शब्दाचा अर्थ एक असतां व तो चांगला असतां, मागाहून त्या शब्दास कालवशात् भलताच एक वाईट अर्थ प्राप्त होतो, हें अशा स्थळीं लक्षांत येतें. नृत्य व गायन या कला केवळ मनोरंजनार्थ प्राचीनकाळीं श्रीमान् घराण्यांतील प्रतिष्ठित स्त्रिया मात्र शिकत. तथापि, अलीकडल्या काळीं त्या कलांची झालेली दुःस्थिति मनांत आली ह्मणजे विषाद वाटल्याखेरीज रहात नाहीं. अजानें इंदुमतीस उद्देशून 'प्रियशिष्या ललित कला-विधौ' असें ह्मटलें तीच गोष्ट जर एखादा आधुनिक सुशिक्षित तरुण ' सुधारक ' (किंवा दुर्धारक ह्मणा) आपल्या मनांत आणील किंवा करून पाहण्याचा यत्न करील तर, जगांत त्याचा केवढा उपहास होईल; व लोक त्याच्या प्रिय ' शिष्यस ' किती नांवें ठेवितील, हें मनांत आल्याबरोबर अंगावर शहारेच उठतात! मेघदूतांत कालिदासानें वर्णन केलेले प्रसंग व ललितकला-निपुण अशी विदग्ध यक्षपत्नि कोणीकडे, आणि आधुनिक यवन-सत्तेमुळें दूषित झालेल्या अभिरुचींचा काल कोणीकडे ? असो. ' चक्रनेमिक्रम ' न्यायानें एकदां कालचक्र फिरलें ह्मणजे सगळींच चक्रें फिरतात असें ह्मणून समाधान करून घ्यावें ! दुसरें काय ?

' सुधारक ' कर्त्यांनीं एका ठिकाणीं ह्मटलें आहेः—" येथील (आमच्या इकडील) स्त्रीशिक्षणांत या कलांचा अतिरेक झाला नाहीं; इतकेंच नाहीं, तर त्यांचा अजून प्रवेशच होणें आहे. व तो अंशतः होऊन त्यापासून स्त्रियांचें स्वतःचें मनोरंजन होऊन त्यांच्या पतीस ही करमणूक होऊं लागली, व तेणेंकरून बाहेरख्यालीपणावर परिणाम घडला तर अर्थात् फारच इष्ट आहे." अगदीं बरोबर आहे.

हें खरें. परंतु एखादें गाणें तालसुरावर बसवून गातां येईल किंवा वाद्यावर वाजवितां येईल अशा प्रकारचें शिक्षण त्यांस मिळत नाहीं. जें गाणें आयतें तालसुरांत बसविलें असेल तेवढेंच त्या गातात किंवा वाजवितात. स्त्रियांपेक्षां संगीत रचना करण्याच्या कामांत पुरुष अधिक निष्णात होतात याचें कारण हेंच. ह्मणजे, ज्या पद्धतीचें शिक्षण पुरुषांस मिळतें, त्या पद्धतीचें शिक्षण स्त्रियांस मिळत नाहीं. ललित-कलांपैकीं खरोखर ज्या कलेवर स्त्रिया आपला निर्वाह करितात, व ज्या कलेंत आपला सारा जन्म घालवितात अशी कला ह्मटली तर एक नाट्यकला होय. आणि या कलेंत स्त्रिया पुरुषांवर ताण करितात, असें जरी ह्मणतां आलें नाहीं, तरी पुरुषांच्या बरोबरीनें त्या काम करितात एवढी गोष्ट कबूल केलीच पाहिजे.*

स्त्रियांत व पुरुषांत योग्य तुलना करावयाची ह्मटली तर कोणत्याही एका कलेंत, स्त्रियांनीं केलेलीं कामें व ज्या पुरुषांनीं एखादी कला आपला धंदा ह्मणून पतकरिली नसून केवळ हौसेनें स्वीकारिली आहे अशा पुरुषांनीं केलेलीं कामें, अशा कामांमध्यें तुलना केली पाहिजे. उदाहरण, संगीतरचनेचें काम फक्त हौसेनें जे पुरुष व ज्या स्त्रिया करितात, असे पुरुष व अशा स्त्रिया घेतल्या तर त्या उभयतांच्या कामांत सारखेच गुण आढळतात. आजकाल चित्रें काढून आपला निर्वाह करणाऱ्या कांहीं स्त्रिया दृष्टीस पडतात. परंतु अशा स्त्रियांची

* इंग्लंडांत अलीकडे ह्मणजे दान तीनशें वर्षांत नाटकांत स्त्रियांच्या भूमिका स्त्रियाच घेतात. पोरें स्त्रियांचे भाग करीत नाहींत. शेक्सपीयरचे वेळीं, आमच्या इकडल्या नाटकांप्रमाणें स्त्रीभाग तरुण मुलेंच घेत, असें त्याच्या नाटकांवरून उघड दिसतें. नाट्य-कलेंत नांवाजलेल्या अलीकडील स्त्रिया ह्मणजे, मिस अंडरसन्, मिसेस लॉंगट्री, मिस टेरी वगैरे विलायतेंतील आनंदोद्भवांतून व आर्यभूषणांतून आपल्या नाट्यकलेनें रसिक श्रोतृजनांचीं अंतःकरणें कशी हालवून सोडतात. त्याचें वर्णन तिकडील वर्तमानपत्रांत दिलेलें असतें. आमच्या इकडे असा दिवस कधीं येईल काय !

संख्या फारच थोडी आहे. आणि अशा स्त्रिया होऊं लागल्यापासून जितका काल गेला तितक्याचा जर विचार केला, तर स्त्रियांची बुद्धिमत्ता चित्रलेखनाच्या कामांत बरीच आढळते. मि. **रस्किन्**सारखे पुरुषजातीचे चित्रलेखक घेतले तरी त्यांनीं या गेल्या कांहीं शतकांत कांहीं विशेष बुद्धिमत्ता दाखविली आहे, असें नाहीं. आणि खरोखर चित्रलेखनाच्या संबंधानें विचार करितां कांहीं लोकोत्तर कामें चितान्यांच्या हातून होण्यास कदाचित् बराच काळ लोटावा लागेल. कारण, प्राचीन काळचे चितारी अर्वाचीनकाळच्या चितान्यांहून फारच श्रेष्ठ असण्याचें कारण असें आहे कीं, त्या काळीं चित्रकलेच्या कामीं अत्यंत बुद्धिमान् लोक आपली बुद्धि खर्च करीत. चौदाव्या व पंधराव्या शतकांत **इटाली** देशांत जे चित्रकार होऊन गेले, त्यांची गणना त्या काळचे लोक महापंडितांत करीत. **ग्रीस** देशांत प्राचीनकाळीं प्रसिद्ध असे जे महापंडित होऊन गेले, त्यांच्याप्रमाणें, **इटाली** देशांतील चित्रकारांत जे अग्रगण्य किंवा प्रमुख होते, त्यांची गति अनेक विद्यांमध्यें असून त्यांचें ज्ञान व त्यांची मानसिक शक्ति विशाल होती. परंतु त्याकाळीं ललितकलांच्या संबंधानें लोकांची समजूत अथवा कल्पना फारच उदात्त होती. ह्मणजे, मनुष्य प्राण्याच्या हातून घडण्यासारखीं जीं उत्तमोत्तम कामें त्या कामांपैकीं ललितकला ही एक आहे असें त्यावेळीं लोक मानीत; आणि राजकारणांत किंवा युद्धकलेच्या कामांत जे पुरुष लौकिक मिळवीत त्यांच्याप्रमाणेंच ललितकलेमध्यें प्रवीण असलेल्या माणसांचा राजे लोक बहुमान करीत व मोठ मोठ्या सरदारांच्या बरोबरीनें त्यांस मान देत. प्रस्तुत काळीं अशा प्रकारचें बुद्धिसामर्थ्य ज्यांस असेल ते लोक आपल्या बुद्धीचा व्यय चित्रकलेच्या कामीं न करितां ज्या कामांत कीर्ति व प्रतिष्ठा प्राप्त होईल अशा एखाद्या इतर अधिक महत्वाच्या कामांत आपली बुद्धि खर्च करितात. **रेनॉ-**

ल्डस किंवा **टर्नर** अशा पुरुषांसारखीं अलौकिक बुद्धीचीं माणसें चित्रकलेमध्यें आपलें आयुष्य घालविणारीं आजकाल फारच थोडीं आढळतात. संगीतकलेची गोष्ट अगदीं निराळी आहे. त्या कलेस चित्रकलेप्रमाणें नानाप्रकारच्या मानसिक शक्तींची गरज लागत नाहीं. ती कला कांहीं विशेष प्रकारच्या ईश्वरी देणगीवर अवलंबून असते. ज्या ज्या माणसांनीं संगीतरचनेच्या कामांत नांव मिळविलें, अशा माणसांत एकही स्त्री आढळूं नये ही गोष्ट विस्मयकारक आहे, असें कोणास वाटेल. परंतु असा विचार केला पाहिजे कीं, ही नैसर्गिक बुद्धि, ही सृष्टिदत्त देणगी जरी एखाद्या माणसास प्राप्त झाली असली, तरी तिच्या योगानें कांहीं अपूर्व व उदात्त वस्तु निर्माण करावयाच्या ह्मटलें ह्मणजे एक तर बराच अभ्यास करावा लागतो व शिवाय त्या कामांत रात्रंदिवस तनमन घालून झटावें लागतें. पुरुषांमध्यें सुद्धां संगीतरचनेच्या कामीं उत्तम प्रतीचें चातुर्य ज्यांनीं दाखविलें, असे पुरुष **जर्मनी** व **इटली** या दोन देशांत मात्र झाले. परंतु चमत्कार असा पहा कीं, त्याच दोन देशांतील स्त्रिया, साधारण शिक्षणांत किंवा विशेष प्रकारच्या शिक्षणांत **फ्रान्स** व **इंग्लंड** या देशांतील स्त्रियांपेक्षां फारच मागें पडल्या. फार काय—**जर्मनी** व **इटली** देशांतील स्त्रियांस मुळींच शिक्षण मिळालेलें नसतें, असें ह्मटलें असतां अतिशयोक्ति होईल असें वाटत नाहीं. विशेषेंकरून वरिष्ठ प्रकारच्या मानसिक शक्तींपैकीं ज्या स्त्रियांच्या एखाद्या शक्तीस तरी उत्तम संस्कार घडला आहे, अशा स्त्रियांचीं उदाहरणें फार क्वचित् आढळतात. ज्या देशामध्यें वादनकलेचीं अथवा संगीतरचनेचीं मूलतत्त्वें अवगत आहेत असे शेंकडों, किंबहुना हजारों पुरुष आढळतात, त्याच देशांत या कलेंत प्रवीण असणाऱ्या स्त्रिया वीसही आढळत नाहींत. तेव्हां सरासरीचा विचार करितां असें प्रमाण बसतें कीं, या कामां-

तही ज्या ठिकाणीं नामांकित असे पन्नास पुरुष निघतील त्या ठिकाणीं फार तर नामांकित अशी एकच स्त्री निघेल. गेल्या तीन शतकांत **जर्मनीं**त किंवा **इटली** देशांत संगीतरचनेच्या कामांत नांवाजलेले असे पुरुष पन्नास देखील निपजले नाहींत.

२३. येथपर्यंत जीं कारणें दाखविण्यांत आलीं, तीं, जे धंदे किंवा जीं कामें करण्याचा अधिकार अथवा मोकळीक उभयतांसही सारखीच आहे अशा कामांत स्त्रिया पुरुषांच्यामागें पडल्या अशा संबंधाचीं झालीं. याशिवाय या गोष्टीचीं आणखीही कांहीं कारणें आहेत. प्रथमतः एक तर अशीं कामें करण्यास लागेल तेवढी फुरसत ज्यांस सांपडते अशा स्त्रियांची संख्या फारच थोडी असते. कदाचित् हें ह्मणणें फारच चमत्कारिक व खोटें भासेल. परंतु मी ह्मणतों ही गोष्ट अगदीं खरी आहे. प्रत्येक स्त्रीचे बहुतेक विचार व प्रत्येक स्त्रीचा बहुतेक काळ तिचे नित्यक्रमापैकीं जे व्यवहार असतात त्या व्यवहारांत जातात. प्रथम कुटुंबाची देखरेख ठेवणें व घरांतला खर्चवेंच पाहणें अशा कामांत प्रत्येक कुटुंबांतील एक तरी स्त्री सदा गुंतलेली असते. आणि ही स्त्री, बहुधा जिचें वय पोक्त आहे व जिला बराच अनुभव प्राप्त झाला आहे अशी असते. हें काम मजुरीनें करून घेण्यासारखी एखाद्या कुटुंबाची ऐपत असेल तर ती गोष्टच निराळी. तथापि हेंही खरें, कीं, ज्या ठिकाणीं हें घरांतील खर्चवेंच पाहणें वगैरे जबाबदारीचें काम मजुरीनें करून घेण्यांत येतें, त्या ठिकाणीं पैशाची अफरातफर, पुष्कळशी अव्यवस्था व पदार्थांची नासधूस होणें वगैरे ज्या गोष्टी अनिवार्य असतात त्या मुकाट्यानें सोसाव्या लागतात. घराची देखरेख पाहणें ह्मणजे आधींच त्रासदायक काम आहे. आणि इतर गोष्टींनीं जरी तें काम त्रासदायक नसलें तरी स्वस्थपणानें विचार करण्याच्या कामास तें काम अत्यंत विघातक आहे. संसार-

कृत्यांत निमग्न असणाऱ्या मनुष्यास एकसारखी दक्षता ठेवावी लागते, बारीक सारीक गोष्टींतही पहावें लागतें व क्षणोक्षणीं, दृष्टपूर्व व अदृष्टपूर्व अशा ज्या अनेक अडचणी पुढें येतात त्यांचा विचार करून निकाल करावा लागतो. या कारणानें जी स्त्री गृहकृत्यांच्या संबंधानें जबाबदार असते, तिची त्या पाशापासून कधींच सुटका होण्याचा संभव नसतो. संसाराच्या काळजीपासून जिला अंशतः तरी दूर राहतां येईल अशी स्थिति व ऐपत एखाद्या स्त्रीची असली तरी तिच्यामागेंही दुसरे पाश असतात. ज्याला लौकिक असें ह्मणतात तें एक मोठें बंड तिला संभाळावें लागतें. त्या कुटुंबाचे जे इष्टमित्र व आप्तवर्ग असतील त्यांच्याशीं भाषण करणें, त्यांच्या भेटी घेणें, त्यांस संतुष्ट ठेवणें, वगैरे कामें एकंदर कुटुंबाच्या तर्फेनें तिला करावीं लागतात. कुटुंबसंबंधाची किंवा गृहकृत्यसंबंधाची दगदग तिला जितक्या मानानें कमी असेल, तितक्याचमानानें समाजकृत्याची दगदग तिच्या मागें अधिक लागते. नाच, तमाशे वगैरेस जाणें, भेटी घेणें, मेजवान्या करणें, पत्रव्यवहार ठेवणें वगैरे थोडे का व्याप असतात? या शिवाय दुसरा एक मोठा व्याप फक्त स्त्रियांच्याच मागें समाजानें लावून दिलेला असतो तो निराळाच. हा व्याप कोणचा ह्मणाल तर त्यांनीं आपणांस होईल तितकें सुशोभित व हृदयंगम बनविणें! वेणी फणी करणें, चांगले पोषाख करणें, ठाकठीकपणा राखणें. उंच वर्गांतील हुषार व चतुर ह्मणविणाऱ्या प्रत्येक स्त्रीच्या अकलेचा बराच भाग भाषण-चातुर्य संपादन करणें, वगैरे कामें शिकण्यांत खर्च होतो. या विषयाचा उगीच वरवर विचार केला तरी असें दिसेल कीं, पोषाख चांगला करणें व नीटनेटकेपणानें वागणें ह्मणजे काय हें ज्या स्त्रियांस समजतें (हें माझें ह्मणणें पोषाख उंची व मूल्यवान् असण्याच्या संबंधाचें नसून पोषाखावरून दिसून येणारी जी सदभिरुचि किंवा जें

चातुर्य त्याच्या संबंधाचें आहे) अशा सर्व स्त्रिया आपल्या स्वतांच्या पोषाखांत व आपल्या मुलींच्या पोषाखांत जितकी बुद्धि खर्च करितात तितक्यावरून विचार केला तर, फक्त नेपथ्य—मीमांसेंत त्यांच्या मानसिक शक्तीचा किती तरी व्यय होत असलेला दिसतो! तीच बुद्धि जर त्या एखाद्या कलेमध्यें, ग्रंथरचनेंत किंवा साहित्यशास्त्रांत अथवा पदार्थविज्ञानासारख्या एखाद्या शास्त्राच्या अध्ययनांत घालतील तर नांवाजण्यासारखीं व लोकमान्य कामें त्यांच्या हातून घडतील, यांत संशय नाहीं.* नित्य व्यवहारांतील वर सांगण्यांत आलेल्या बारीकसारीक गोष्टी (स्त्रियांची समजूत त्या फार महत्त्वाच्या आहेत अशी मुद्दाम केलेली असते) करूनही जर पुष्कळशी फुरसत सांपडेल व मानसिक स्वातंत्र्य आणि उत्साह त्यांच्या ठिकाणीं राहतील आणि ती फुरसत, तें स्वातंत्र्य व तो उत्साह एखाद्या कलेच्या अध्ययनांत अथवा तत्त्वमी-

* "ज्या योग्य मानसिक व्यापारानें ललितकलेच्या व इतर कलांच्या तत्त्वांचा नित्य परिचय होतो व योग्यायोग्यतेची अथवा यथार्थतेची कल्पना मनुष्यप्राण्यास प्राप्त होते, त्याच मानसिक व्यापाराचा उपयोग अलंकरणाच्या व शरीरभूषेच्या कामीं होतो असें दिसतें. हेतु जरी लहान असला तरी त्याचें मूळचें स्वरूप एकच आहे. पूर्णत्व हा मध्य बिंदु कल्पिला असतां शरीरभूषा किंवा नेपथ्यकला हें एक तोच मध्य बिंदु धरून काढिलेलें लहानसें वर्तुळ होय. हें तत्त्व, नेपथ्य रचनेचा (पोशाख करण्याच्या तऱ्हेचा) विचार केला असतां अधिक स्पष्ट होणार आहे. पोषाखाच्या कामांत आवडनिवड असते एवढेंच नाहीं, तर त्या आवडीनिवडींत बरा वाईट असा प्रकार असतो, हें सर्व कबूल करितात. सदभिरुचि व दुष्ट अभिरुचि असा भेद सर्वमान्य आहे. पोषाखाच्या अवयवांत नेहमीं बदल होत असतो. मोठ्याचें लहान व लहानाचें मोठें असें होत असतें. तथापि त्यांचें सामान्य स्वरूप कायम राहतें. त्याची साधारण आकृति बदलत नाहीं. पोषाखाच्या धर्तींत निरंतर जो बदल होत असतो तो मुळचा आकार कायम राहून होत असतो. पोषाखाच्या तऱ्हेंत जो एखादी नवी सुधारणा करितो, किंवा पोषाख करण्यांत ज्याची निवड उत्कृष्ट असते त्याची ती कल्पक-शक्ति तो जर अधिक उदात्त कामांत खर्च करील तर कौशल्याच्या व कारागिरीच्या मोठमोठ्या कामांतही त्याचें चातुर्य दिसून येईल व त्याची योग्य सदभिरुचि व्यक्त होईल."—

सर जॉशुआ रेनोल्डस. ७.

मांसेच्या कामांत त्या घालवितील असा प्रकार संभवत असेल तर आपण असा विचार करा कीं, एकंदर पुरुषसंख्येपैकीं बऱ्याच मोठ्या संख्येच्या मानसिक शक्तीपेक्षां स्त्रियांची मूळची प्रवर्तक बुद्धि किंवा मानसिक शक्ति फारच मोठी असते, असें उघड सिद्ध होईल. परंतु एवढेंच नव्हे. संसारांतील नित्यक्रमापैकीं कामें स्त्रियांस करावीं लागतात ही गोष्ट एकीकडे ठेवीली तरी त्यांच्या वेळेवर व त्यांच्या मानसिक शक्तीवर प्रत्येक मनुष्याचा नेहमीं हक्क आहे अशी लोकांची समजूत असते, ही गोष्ट ध्यानांत ठेविली पाहिजे. पुरुषाला जरी कांहीं एखादा पोटापाण्याचा धंदा किंवा रोजगार करावयाचा नसला व तो सुखवस्तु असला तरी ही त्याचा वेळ लोक घेऊं पहात नाहींत. आणि त्यानें जर एखादा उद्योग केवळ हौसेनें हातीं घेतला असला व तो आपला वेळ त्या कामांत घालवीत असला, तर त्या बद्दल कोणालाही वैषम्य वाटत नाहीं. प्रसंग विशेषीं त्याची गरज जर कोणास लागली व 'सध्यां मी उद्योगांत आहें—मला फुरसत नाहीं' अशी त्यानें सबब सांगितली, तर ती सबब योग्य आहे असें समजतात व त्या बद्दल कोणासही कांहीं वाईट वाटत नाहीं. परंतु, एखाद्या स्त्रीनें आपल्या आवडीचीं अशीं कामें केवळ हौसेनें करण्याचें मनावर घेतलें व त्यांत ती आपळा सर्व वेळ घालवूं लागली, तर अर्थात् लौकिकसंबंधाचे पाश तिला तोडावे लागणारच. आणि जर ते तिनें तोडले तर तिचे आप्त, इष्टमित्र व एकंदर जन तिला हांसल्या शिवाय राहतील काय? फार काय—तिचीं अवश्य ह्मणून मानिलेलीं कर्तव्यें, ह्मणजे घरांतलें पहाणें वगैरे; त्यांत देखील तिनें निरंतर निमग्न होऊन सहणें चांगलें नाहीं. त्यांचीही एकवेळ हेळसांड तिनें केली तरी हरकत नाहीं. परंतु लौकिक हा तिनें राखलाच पाहिजे. घरांत कोणी निजून असेल, किंवा एखादी तशी कांहीं विशेष अडचण घरांत असेल, तर मात्र लोकांची

करमणूक करण्याचें काम मागें टाकून आपल्या स्वतांच्या कामाकडे लक्ष पोंचविण्याचा तिला अधिकार आहे, असें समजतात. एरवीं तिला कोणीही हांक मारिली तरी तिनें नेहमीं दक्ष असलें पाहिजे व 'जी हजर' ह्मटलें पाहिजे. तिनें एखादा व्यवसाय हातीं घेतला, किंवा एखाद्या विषयाचा अभ्यास करण्याचें मनांत आणिलें, तर त्या कामाकरितां तिला कसा तरी व केव्हां तरी मारून मुटकून थोडासा वेळ काढावा लागतो. एका प्रसिद्ध स्त्रीनें आपल्या एका ग्रंथांत असें लिहिलें आहे कीं, (हा ग्रंथ कधींकाळीं तरी प्रसिद्ध होईल अशी मला फार आशा आहे) "स्त्रीला प्रत्येक गोष्ट राहिल्या-साहिल्या वेळेंत करून घ्यावी लागते!" असो. तेव्हां अशी एकंदर स्थिति असल्यामुळें ज्या कामास मनाची एकाग्रता लागते; काया, वाचा, मन, एक करून एक सारखें झटावें लागतें व आपल्या शारी-रिक व मानसिक शक्तींचा उत्तमोत्तम अंश अर्पण करून जीवित-सर्वस्व खर्च करावें लागतें, अशा कामांत स्त्रीला अगदीं पहिली पाहिरी जरी मिळाली नाहीं, तिनें जर अगदीं तंतोतंत शंभर गुण जरी मिळविले नाहींत, व कौशल्याची अगदीं सीमा करून सोडली नाहीं तर ही गोष्ट मोठ्या आश्चर्याची आहे काय? आणि अशा कामां-पैकींच तत्वमीमांसेचे काम व विशेषें करून कलाकौशल्याचें व कारा-गिरीचें काम होय—कीं ज्याच्यामध्यें उत्तम कौशल्य प्राप्त करून घेणें असेल अशा मनुष्यास आपले सर्व विचार व आपल्या सर्व मानसिक शक्ति घालाव्या लागतात एवढेंच नव्हे, तर निरंतर अंगमेहनतही करीत राहावें लागतें.

२४. वर निर्दिष्ट केलेल्या गोष्टींखेरीज दुसरी एक गोष्ट विचार करण्यासारखी आहे. नानातऱ्हेच्या हरहुन्नरांत व बुद्धिमत्तेच्या कामांत केवळ उपजीविका चालविण्यापुरती प्रवीणता अंगीं असणें, हा एक

प्रकार झाला. परंतु ज्या करामतीच्या योगानें त्या कारागिराच्या हातून मोठमोठीं व लोकोत्तर कामें घडून येतात व त्याची कीर्ति अमर होते, अशी उंच प्रतीची करामत अंगीं असणें, हा अगदीं भिन्न प्रकार आहे. पहिल्या प्रकारास लागणारें कौशल्य, तो तो व्यवसाय आपल्या निर्वाहाचा धंदा आहे असें समजून जीं माणसें करितात, त्यांस प्राप्त होतें व प्राप्त करून घेण्यापुरतें उत्तेजनही त्यांस मिळतें. परंतु दुसऱ्या प्रकारास लागणारी प्रवीणता, जगांत आपलें नांव व्हावें अशी उत्कट इच्छा ज्या माणसास नसते, किंवा त्याच्या आयुष्यांत कधींकाळींही ती उत्पन्न झाली नसेल तर कधींही प्राप्त होत नाहीं. अत्यंत बुद्धिमत्तेचीं दर्शक व अत्यंत सुंदर अशीं जीं कामें आपल्या पहाण्यांत येतात, त्या कामास लागणारें लोकोत्तर कौशल्य उगीच प्राप्त होत नसतें. ज्या माणसांस सृष्टीनें अपूर्व बुद्धीचें दान केलें आहे, अशा माणसांसही दीर्घ प्रयास व अतोनात कष्ट करावे लागतात. आणि असे कष्ट त्या माणसांच्या हातून जे होतात त्यांत मूळ हेतु पाहतां कीर्तिची इच्छा ही होय. ती जर नसेल तर त्याच्या हातून कांहीं एक होणार नाहीं. ही कीर्तिविषयीं उत्कट इच्छा स्त्रियांमध्यें क्वचित् आढळते--मग असें असण्याचें कारण स्वाभाविक असो, किंवा कृत्रिम असो. स्त्रियांची महत्वाकांक्षा प्रायः अत्यंत मर्यादित असते. त्यांच्या अत्यंत सन्निध असणारीं जीं माणसें त्यांच्यावर मात्र आपलें वजन ठेवण्याचा त्या यत्न करितात. ज्यांस त्या प्रत्यक्ष आपल्या डोळ्यांनीं पहातात, त्यांची भक्ति आपणावर बसावी, त्यांनीं आपणावर ममता करावी व त्यांस आपण प्रिय व्हावें, एवढीच कायती त्यांची इच्छा असते. आणि तेवढ्या कामास जेवढें ज्ञान, जेवढें शहाणपण, जितक्या कला किंवा जितके गुण लागतात तितके त्यांनीं संपादन केले ह्मणजे त्या बहुधा संतुष्ट राहतात. प्रस्तुतकाळीं

स्त्रियांची जी स्थिति आपणास आढळते त्या स्थितीचें विवेचन करितांना त्यांच्या स्वभावाचा हा धर्म अवश्य विचारांत घेतला पाहिजे. आतां हा धर्म स्त्रियांमध्यें मूळचाच आहे असें मला मुळींच वाटत नाहीं. त्यांच्या एकंदर स्थितीचा हा परिणाम आहे. ह्मणजे, हा धर्म स्त्रियांच्या ठायीं मागून उत्पन्न झालेला आहे व कृत्रिम आहे. पुरुषांच्या ठायीं दिसून येणारी जी कीर्तीची इच्छा तिला, त्यांस मिळणारें एकंदर शिक्षण आणि लोकमत या दोहोंकडून सतत प्रोत्साहन मिळत असतें. महत्वाकांक्षा ह्मणजे मनाची एक प्रकारची दुर्बलता होय, असें जरी ह्मटलें आहे, तरी स्वसुखाविषयीं निरभिलाष होऊन व विषयसुख तुच्छ मानून केवळ कीर्ति करितां अविश्रांत श्रम करणें, हें महाभागांचें लक्षण आहे व उदात्त स्वभावाच्या पुरुषांचें कर्तव्य आहे, असें मानितात. कीर्त्यभिलाषाच्या योगानें महत्त्वाकांक्षेचे जे जे हेतु किंवा जे जे विषय असतात, ते ते प्राप्त करून घेणें पुरुषांस सुलभ असतें. अशाच हेतूंपैकीं स्त्रियांचा अनुग्रह संपादन करणें, हाही एक हेतु असतो. असो. सारांश, असा हा प्रकार असल्यामुळें पुरुषांच्या कीर्त्यभिलाषास उत्तेजन मिळत असतें. परंतु चमत्कार असा कीं, तेच हेतु स्त्रियांस सर्वथा निषिद्ध! स्त्रीनें महत्वाकांक्षा बाळगणें, किंवा तिनें किर्तीची इच्छा करणें, हें स्त्रीधर्मविरुद्ध, स्त्रीजातीस अनुचित व धाष्टर्य ह्मणून मानलें जातें! शिवाय, आपण असा विचार केला पाहिजे कीं, ज्या माणसांशीं तिला रात्रंदिवस व घडोघडीं प्रसंग पडणार, त्या माणसांचे ग्रह आपल्या विषयीं चांगले व्हावे या गोष्टीकडे तिचें सर्व लक्ष असतें यांत नवल तें काय? कारण, समाजानें असें मुळीं शास्त्रच ठरवून टाकिलें आहे कीं, त्या माणसांशिवाय इतर माणसाशीं तिला कांहीं एक कर्तव्य नाहीं. खेरीज तिचें सर्व सुख जेणें करून त्या माणसावरच अवलंबून राहील, अशी योजना

केलेली असते. आपल्या लोकांनीं आपणांस मान द्यावा व पूज्य मानावें अशा विषयींची स्वाभाविक इच्छा पुरुषांप्रमाणें स्त्रियांच्याठायींही प्रबळ असते. परंतु, समाजानें ठरविलेली व्यवस्था ह्मणा, किंवा रूढ प्रचार ह्मणा, असा असतो कीं, साधारणतः सर्व गोष्टींत स्त्रीला लोकांत प्रतिष्ठा किंवा मान्यता मिळावयाची ती तिचा नवरा असेल तर त्याच्याच द्वारानें, किंवा नवरा नसेल तर पुरुष जातीचे जे तिचे आप्त असतील त्यांच्या द्वारानेंच मिळावयाची. ही झाली समाजाच्या किंवा जगाच्या संबंधाची गोष्ट. आतां खासगी संबंधानें पहातां घरांत जी तिची प्रतिष्ठा असावयाची ती बहुधा तिनें आपलें नांव पुढें न करण्यावर अवलंबून असते. ह्मणजे, कोणत्याही प्रकारें आपला व्यक्तिसंबंध तिनें पुढें न आणितां ती पुरुषांचा केवळ आनुषंगिक एक भाग ह्मणोन राहिली, तरच गृहप्रतिष्ठा अबाधित राहते! निष्कर्ष मिळून एवढाच कीं, एकंदर कुटुंबसंबंधाची व समाजसंबंधाची स्थिति, त्याचप्रमाणें संसारांत वागण्याची एकंदर तऱ्हा, किंवा जन्मभर दृढ झालेली संवय ह्मणा—या गोष्टींचा परिणाम माणसांच्या मनांवर किती होतो हें समजण्याचें सामर्थ्य ज्यांस यत्किंचित् असेल, त्यांच्या ध्यानांत, स्त्रिया व पुरुष यांजमध्यें भासमान होणारे बहुतेक सर्व भेद (जे भेद विशेषतः स्त्रियांच्या कमीपणाचे दर्शक आहेत असें मानिलें जातें त्या सुद्धां) काय कारणाणें दिसतात, ही गोष्ट पूर्णपणें सहज आलीच पाहिजे.

२९. स्त्रिया व पुरुष यांजमधील बुद्धिसंबंधाच्या भेदांचा विचार एकीकडे ठेवून फक्त नीतिसंबंधाच्या भेदांचा विचार केला, तर असें दिसतें कीं, या बाबतींत लोक स्त्रियांस श्रेष्ठ समजतात. पुरुषांहून स्त्रिया अधिक नीतिमान किंवा सदाचारसंपन्न असतात असें ह्मणतात. परंतु हें ह्मणणें रिकामें भूषण आहे. तें ऐकून प्रत्येक पाणीदार स्त्रीला हांसूं आल्या खेरीज व खेद वाटल्याशिवाय राहाणार नाहीं! कारण

चांगल्या माणसांनीं वाईट माणसांच्या आज्ञेंत रहावें असें शास्त्र जेथें पक्कें ठरून गेलें आहे व अशी व्यवस्था योग्य व स्वाभाविक आहे असें मानिलें जातें, असा हा प्रकार साऱ्या संसारांत स्त्रीपुरुषांच्यासंबंधा प्रमाणें दुसऱ्या संबंधांत आढळणार नाहीं. स्त्रिया पुरुषांपेक्षां चांगल्या असतात ह्या वायफळ बडबडीचा जर कांहीं उपयोग होण्यासारखा असेल, तर तो इतकाच कीं, सत्तेच्या योगानें सत्ताधारी माणसांचीं मनें बिघडतात व नीतिभ्रष्ट होतात, ही गोष्ट पुरुषांस कबूल करावी लागणार. कारण, स्त्रिया पुरुषांहून अधिक नीतिसंपन्न किंवा साधु वृत्तीच्या असतात ही गोष्ट जर खरी ठरली, तर सत्तेनें माणसें बिघडतात हें प्रमेयही त्याच गोष्टीवरून चांगलें सिद्ध होतें. आणि ही गोष्ट अगदीं खरी आहे कीं, दासभाव किंवा सेव्यसेवकभाव, खरोखर पशुतुल्य करून सोडणारा अशा प्रकारचा जर नसेल तर, यद्यपि तो धन्यास व दासांस उभयतांस ही बिघडविणारा व अपकारक असला, तथापि दासांच्या मालकापेक्षां प्रत्यक्ष दासांस कमी अपकारक असतो. कोणत्याही प्रकारचा दाब किंवा बंधन ज्या सत्तेस नाहीं, अशा प्रकारची सत्ता चालविणाराची नीति जितक्या अंशानें बिघडते, तितक्या अंशानें, अनियंत्रित अशा सत्तेच्या दाबांत रहाणाऱ्या माणसाची नीति बिघडत नाहीं. *फौजदारी कायद्यानें ठरविलेले गुन्हे पुरुषांच्यापेक्षां स्त्रियांच्या हातून थोडे घडतात, असेंही लोक ह्मणतात. कारागृहांत पुरुषांच्यापेक्षां स्त्रियांची संख्या कमी आढळते, असें ही सांगतात. हीच गोष्ट शिद्दी गुला-

---

*निबंधकारांचा आशय हा दिसतो कीं, एखाद्या अतिशय जुलमी किंवा अनियंत्रित अधिकार चालविणाऱ्या माणसाच्या हाताखालीं एकवेळ राहणें बरें, ह्मणजे नम्रता, सहन-शीलता, आत्मसंयमन, उद्योगिता वगैरे गुण देखील अंगीं येण्याचा संभव असतो. व त्याच्या नैतिक प्रकृतीस किंवा त्याच्या साधुवृत्तीस फारशी दुष्टबाधा होणार नाहीं. अनिय-न्त्रित सत्ता ज्याच्या हातांत आहे त्याच्या वृत्तीस जितकी दुष्टबाधा होईल तितकी बाधा त्या सत्तेच्या अमलाखालीं वागणाऱ्या माणसांच्या वृत्तीला होत नाहीं.

मांच्या संबंधानेंही पण ह्मणतां येईल. जे दुसऱ्याच्या सत्तेंत असतात त्यांस वारंवार गुन्हे करणें अशक्य असतें. आणि त्यांनीं गुन्हे केलेच तर ते स्वामिकार्यास्तव व धन्याच्या हुकुमावरून त्यांस करावे लागतात. सामान्य लोक तर राहिले, परंतु रात्रंदिवस मनुष्य स्वभावाचें अध्ययन व परिशीलन करणाऱ्या पंडितांचाहि कळप त्यांतच सामील होऊन अंधाप्रमाणें त्यांनींही समाजस्थितीमुळें व्यक्तिमात्रावर होणाऱ्या परिणामांकडे दुर्लक्ष करावें व मूर्खपणानें स्त्रियांची बुद्धि एकीकडून कमी किमतीची ठरवावी, व दुसरीकडून वेडगळपणानें त्यांच्या नीतिमत्तेचे गुणानुवाद गावे, याहून जगाच्या विलक्षण अंधत्वाचें अधिक ठळक उदाहरण माझ्या तर पहाण्यांत नाहीं!

२६. ज्या तोंडानें पुरुष नीतिसंबंधानें स्त्रियांचें श्रेष्ठत्व केवळ उपचारार्थ वाखाणतात, त्याच तोंडानें स्त्रियांचा स्वभाव फारच चंचल व पक्षपाती असतो, एखाद्या माणसाकडे त्यांचें मन तेव्हांच वळतें, वगैरे आरोप* करून ते स्त्रियांची निंदाही करितात. पुरुष असेंही ह्मणतात कीं, स्त्रियांची व्यक्तिविषयक जी आवडनिवड असते, ती त्यांच्या गळयांत एक प्रकारचें लोढणेंच असतें. राग, द्वेष, प्रिय, अप्रिय अशा विकारांस त्या सहज वश होतात व तेणेंकरून त्यांची विवेकशक्ति लुली पडते, हें ह्मणणें खरें असें धरून जरी चाललें तरी, पुरुष स्वार्थसाधनाकरितां कुमार्गाकडे वळल्याचे असे जितके प्रसंग आढळतात, त्या प्रसंगांपेक्षां स्त्रिया आपल्या मनोविकारांच्या आधीन होऊन भलत्या मार्गाकडे वळल्याचे प्रसंग अधिक आढळतात, ही गोष्ट

* **आशबर्नर** नांवाच्या एका बड्या साहेबांनीं आमच्या गतभर्तृका अनीतीचें वर्तन करणाऱ्या असतात, असें विधान केल्याबरोबर आमच्या लोकांस केवढा राग आला! पण तेच लोक बापानें आपली मुलगी बरींच वर्षें अविवाहित ठेविली तर ती खास बिघडली असें विधान खुशाल कारितात! नुसत्या लग्नसंस्कारामुळें इतका जबरदस्त फरक पडतो, हें प्रमेय आह्मांस ठाऊक नव्हतें.!

निराळी सिद्ध झाली पाहिजे. समजा, तीही सिद्ध झाली, तरी त्यांत एक मोठा भेद रहाणारच. तो हा कीं पुरुष जेव्हां कर्तव्यभ्रष्ट होतात व लोकहितास पराङ्मुख होतात, तेव्हां ते तसे केवळ स्वार्थाकरितां होतात. आणि स्त्रिया कर्तव्यपराङ्मुख झाल्या तरी त्या स्वार्थाकरितां होत नसून दुसऱ्याच्याकरितां होतात. कारण, समाज त्यांस स्वार्थ-संबंधाच्या कांहींच गोष्टी करूं देत नाहीं. दुसऱ्याही एका गोष्टीचा विचार केला पाहिजे. स्त्रियांस जें शिक्षण समाजापासून प्राप्त होतें, तेवढ्यावरून त्यांस असें वाटूं लागतें कीं, ज्या व्यक्तींशीं प्रत्यक्ष आपला संबंध असतो त्या व्यक्तींच्या संबंधाचें मात्र काय तें कर्तव्य आपणांस असतें व ज्यांच्या हिताकडे आपलें लक्ष्य पोंचलेंच पाहिजे अशा व्यक्ति काय त्या तेवढ्याच. यामुळें, श्रेष्ठ प्रकारची जी नीति, ह्मणजे ‘ वसुधैव कुटुंबकम् ’ या वचनांत प्रतिपादिलेली जी उदात्त वृत्ति व परो-पकाराचे जे मोठमोठे विषय, त्यांचें आकलन करण्यास ज्या प्रकारचें शिक्षण बुद्धीस लागतें, त्यांचीं मूलतत्त्वेंही त्यांस अवगत नसतात. तेव्हां जो आरोप स्त्रियांवर करण्यांत येतो त्याचा इत्यर्थ पाहूं जातां इतकाच निघतो कीं, जें एक कर्तव्य त्यांस शिकविलेलें असतें—फार काय जें एकच कर्तव्य ह्मणून बजावण्याची मुभा समाजानें त्यांस दिली आहे, तें, त्या बिच्याऱ्या फारच निष्ठेनें करितात. स्त्रियांवर पुरुष जी सत्ता चाल-वितात तिजबद्दल स्त्रिया स्वतां मुळींच कुरकुर करीत नाहींत, असें ही एक पुरुषांचें ह्मणणें असतें. उघड आहे ! ज्यांच्या हातांत अधिकार आहे व सत्ता आहे, अशीं माणसें, त्या सत्तेस वश असणाऱ्या माणसांस जेव्हां जेव्हां कांहीं अधिकार किंवा हक्क देतात, तेव्हां तेव्हां त्या अधिकार-हीन व सत्तावश माणसांच्या अंगीं ते हक्क जबरीनें मिळविण्याचें सामर्थ्य असल्याखेरीज त्यांस ते मिळतच नाहींत. यामुळें, स्त्रियांच्या परवशते विरुद्ध कितीही सबळ पुरावा आणिला आणि कसेंही प्रतिपादन केलें

तरी, जोंपर्यंत 'आपल्या परवशतेच्या संबंधानें स्त्रियांची तक्रार नाहीं' अशी गोड समजूत लोक करून घेतील तोंपर्यंत त्या प्रतिपादनाकडे ते मुळींच लक्ष्य देणार नाहींत हें उघडच आहे. स्त्रिया कुरकूर करीत नाहींत या गोष्टीमुळें ही अन्यायाची सत्ता आणखी कांहीं काळपर्यंत पुरुष चालविणार हें खास आहे, तथापि, तेवढ्यावरून ती सत्ता कमी अन्यायाची होते असें नाहीं. मुसलमान, बंगाली, वगैरे पूर्वात्य देशांतील लोकांच्या जनानखान्यांत राहणाऱ्या स्त्रियांच्या संबधानेंही असाच कोटिक्रम लढवितां येईल. त्या स्त्रिया, '**यूरोपिअन** स्त्रियांस मिळणारें स्वातंत्र्य आह्मांस नाहीं ह्मणून कोठें कुरकूर करितात? उलट त्या स्त्रिया आमच्या स्त्रियांस अतिशय उद्धट व स्त्रीधर्मशून्य समजतात. समाजांत दिसून येणारी जी एकंदर व्यवस्था तिजबद्दल कुरकूर करणारे असे पुरुष तरी किती आढळतात? जगांत आपल्याहून भिन्न प्रकारची ह्मणून कांहीं एक व्यवस्था आहे, असें ज्यांस मुळींच ठाऊक नाहीं ते तर मुळींच कधीं कुरकूर करणार नाहींत किंवा असंतोष दाखविणार नाहींत. स्त्रियांच्या एकंदर स्थितीविषयीं स्त्रिया कुरकूर करीत नाहींत, असें ह्मणतां येत नाहीं. कारण स्त्रियांच्या लेखांत अशा प्रकारचे विलापरव किंवा दुःखोद्गार पुष्कळ आढळतात. आणि जोंपर्यंत अशा कुरकुरींत किंवा विलापांत कांहीं व्यावहारिक हेतु आहे, असा संशय जोंपर्यंत लोकांस आला नाहीं तोंपर्यंत असे लेख फारच बाहेर पडत. परंतु या कुरकुरी किंवा हे उद्गार ह्मणजे, या संसाराविषयीं किंवा नरदेहाविषयीं पुरुष जसे असमाधानाचे उद्गार काढितात तशाच प्रकारचे असतात. त्यांचा अर्थ, त्यांबद्दल ह्मणजे कोणावर दोष ठेवावा किंवा असलेल्या स्थितींत कांहीं बदल व्हावा असें ह्मणण्याचा नसतो. परंतु स्त्रियांची एकंदर पुरुषांच्या सत्तेविषयीं किंवा एकंदर नवऱ्यांच्या सत्तेविषयीं जरी कुरकुर नसते, तरी प्रत्येक स्त्री आपल्या नवऱ्याबद्दल कुरकुरत असते, किंवा आपल्या मैत्रिणींच्या नवऱ्यांबद्दल

कुरकुरत असते. दास्याचे जितके ह्मणून प्रकार आहेत तितक्यांत हीच तऱ्हा आढळते. निदान दास्यविमोचनार्थ जी पहिली हालचाल होत असते तिच्या आरंभीं असा प्रकार व्हावयाचाच. पूर्वी **यूरोपांत सर्फ** ह्मणून जमिनीची मशागत करणारे जे दास होते, त्यांनीं **लॉर्डस्** (जमीनदार) लोकांच्या सत्तेबद्दल प्रथम कुरकूर केली नाहीं. तर फक्त त्यांच्याकडून होत असलेल्या जुलुमाबद्दल कुरकूर करण्यास त्यांनीं आरंभ केला. त्याचप्रमाणें **कॉमन्स** (प्रजापक्षीय) लोकांनीं प्रथम फक्त कांहीं नागरिक अधिकार आपणांस मिळावे, ह्मणून बोलणें लाविलें. त्यांत त्यांस यश आल्यावर नंतर मग आपल्या संमतिशिवाय आपणांवर राजानें कर बसवूं नये, असें त्यांनीं मागणें केलें. परंतु प्रत्यक्ष राजाच्या सार्वभौम सत्तेचा किंवा अधिकाराचा अंश आपणांस मिळावा, असें जर त्यावेळीं त्यांनीं मागणें केलें असतें, तर आपलें हें मागणें खरोखर फारच धाष्ट्यांचें व फाजीलपणाचें आहे, असें त्यांचें त्यांसच वाटलें असतें. पुष्कळ दिवस, प्रजेनें राजाच्या विरुद्ध बंड करणें, किंवा राजाशीं विरोध करणें, हें अनुचित व धर्मविरुद्ध होय, अशी लोकांची दृढ समजूत होती. कालवशात् ती समजूत बदलून अशा प्रकारचा हक्क रयतेस आहे असा सिद्धांत सर्वमान्य होऊन गेला.* ठरलेल्या ज्या वहिवाटी, रूढ झालेले जे प्रचार, तद्विरुद्ध वर्तन करणें, हें जसें अयोग्य मानिलें जात असे; ज्या प्रमाणें आपल्या

---

* कारण उघड आहे एक तर राजा ह्मणजे ईश्वराचा अंश–' नाविष्णुः पृथिवीपतिः ' अशी जी समजूत पूर्वीपासून चालत आली होती. ती विद्याप्रसाराच्या व शास्त्रज्ञानाच्या योगानें नाहींशी झाली. त्याचप्रमाणें प्रजेकरितां राजा, राजासाठीं प्रजा नाहीं. असा सिद्धांत ठरून राजा जर प्रजेवर जुलूम करील तर प्रजेनें राजास पदच्युत करावें, असें शेंकडों लोकांनीं उघड प्रतिपादन करून शेवटीं होतां होतां त्यांनीं लोकप्रवृत्ति निव्वळ लोकसत्तात्मक राज्याकडे वळविली. असा हा प्रकार होण्यास विद्या प्रसार व तदनुषंगानें प्राप्त झालेलें विचार-स्वातंत्र्य हीं कारणीभूत झालीं, असें कोण कबूल करणार नाहीं !

राजाविरुद्ध वागण्याचा हक्क रयतेस नाहीं अशा प्रकारची लोकांची जशी समजूत होती तशीच समजूत प्रस्तुत एक काय ती स्त्रियांच्या संबंधांत राहिली आहे. नवऱ्याला जी खटपट किंवा जो व्यवसाय नापसंत असतो, त्यांत जी बायको सामील होते, तिला आपलें सर्वथा नुकसान करून घ्यावें लागतें. एवढेंच नव्हे, तर ज्या कार्याकरितां ती आपली हानि करून घेण्यास कबूल असते, तें कार्यही तिच्या हातून सिद्ध होत नाहीं. कारण, ती गोष्ट करण्याचा प्रतिबंध तिचा नवरा कायद्याच्या मदतीनें करितो. सारांश, मला असें वाटतें कीं, पुरुषांची बरीच संख्या या कामीं स्त्रियांस मनापासून साहाय्य करण्यास तयार झाल्याशिवाय स्त्रीदास्यविमोचनार्थ स्त्रिया आपण होऊन झटतील, अशी आशा करणें व्यर्थ आहे.

भाग ४ था.



१. आतां एका प्रश्नाचा निर्णय करावयाचा राहिला. हा प्रश्न पूर्वीं मीं ज्या ज्या प्रश्नांचा विचार केला, त्यांपेक्षां कमी महत्त्वाचा नसून आमच्या प्रतिपक्ष्यांपैकीं ज्यांचीं मतें मुख्य मुद्याच्या संबंधानें अंमळ बदललीं असतील ते तो प्रश्न मुद्दाम पुढें आणतील. तो प्रश्न असा–'आपल्या चालू असलेल्या रीतीभातींमध्यें बदल केल्यापासून आपणांस फायदा काय? तुमच्या ह्मणण्याप्रमाणें स्त्रियांस पूर्ण स्वातंत्र्य दिलें तर मानव जातीचें अधिक कल्याण होईल कीं काय? जर नाहीं, तर लोकांचीं मनें विनाकारण क्षुब्ध करण्यांत काय अर्थ आहे? व केवळ काल्पनिक हक्काच्या नांवानें समाजांत असंतोष उत्पन्न करण्याचा यत्न कां करावा?'

२. आतां या प्रश्नांपैकीं एकेका प्रश्नाचा आपण विचार करूं. स्त्रियांच्या प्रस्तुत स्थितींत विवाहसंबंधानें बदल व्हावा याविषयीं कोणास संशय असेल, असें मला वाटत नाहीं. विवक्षित स्त्रिया विवक्षित पुरुषांच्या आधीन करून टाकल्यामुळें असंख्य उदाहरणांवरून ज्या विपत्ति, जे दुराचार, ज्या अनेक प्रकारच्या वाईट गोष्टी आपल्या अवलोकनांत येतात, त्या इतक्या भयंकर असतात कीं, त्यांजकडे आपणांस दुर्लक्ष करितांच येत नाहीं. जे लोक अविचारी असतात व ज्यांस उघड बोलणें रुचत नाहीं असे लोक, ज्या गोष्टी प्रसिद्धीस

येतात व ज्यांत दुष्टपणा परमावधीस पोंचलेला असतो तेवढ्याच गोष्टी गणनेंत धरून असें ह्मणतील कीं, अशीं दुर्धर परिणामाचीं उदाहरणें थोडींच आढळतात. थोडीं कां होईनात; तथापि अशा वाईट गोष्टी घडतात व कांहीं कांहीं प्रसंगीं मनुष्याची नीचता अतिरेकास पोंचते, हें कोणाच्यानेंही नाकबूल करवणार नाहीं. आणि हें तर अगदीं स्पष्ट आहे कीं, जोंपर्यंत माणसांच्या हातांत सत्ता असते, तोंपर्यंत त्या सत्तेचा दुरुपयोग टाळतां येतच नाहीं. ही सत्ता किंवा हा अधिकार सज्जनांसच दिलेला असतो, अथवा साधारण सभ्य मानिलेल्या पुरुषांस मात्र देण्यांत येतो असें नाहीं; तर, जेवढे ह्मणून पुरुष, त्या सर्वांच्या हातांत ही सत्ता देण्यांत येते. अत्यंत नीच व पशुतुल्य आचरण करणाऱ्या पुरुषांच्याही हातांत ही सत्ता जाते. या सत्तेला वस्तुतः निर्बंध ह्मणून काय तो लौकिकाचा किंवा अब्रूचा. परंतु अशा नराधमांस लौकिक किंवा अब्रू ह्मणजे काय पदार्थ आहे हें मुळींच ठाऊक नसतें. अशा पुरुषांनीं जर कायद्यानें त्यांच्या स्वाधीन केलेल्या एखाद्या मनुष्यप्राण्याशीं क्रूर, पशुतुल्य व जुलमी आचरण केलें नाहीं तर इहलोकच्या वस्तीस स्वर्गस्थितिच प्राप्त झाली असें मानिलें पाहिजे. असें असल्यावर मग पुरुषांच्या दुष्ट प्रवृत्तींचें दमन करण्याकरितां कायद्याची तरी काय जरूर? विवाहसंबंधानें जो दासत्वाचा कायदा आढळतो तो प्रस्तुत सुधारलेल्या तत्त्वांस अगदीं विरुद्ध आहे एवढेंच नव्हे, तर आधुनिक काळास भयंकर लांछन आहे. जीं अनुभवजन्य प्रमेयें मोठ्या कष्टानें हळूहळू प्राप्त झालीं आहेत व सर्वमान्य होऊन बसलीं आहेत, त्या सर्वांशीं तो विसंगत असा दिसतो. इंग्लंडाच्या राज्यछत्राखालीं दुसरी गुलामगिरी नाहींशी झाली. दासदासी नाहींशा झाल्या. पण ही गुलामगिरी मात्र अद्यापि कायमच आहे. संपूर्ण बुद्धिसामर्थ्य ज्यास आहे

अशा एका मानवी प्राण्याला दुसऱ्या मानवी प्राण्याच्या स्वाधीन करणें आणि तें अशा आशेनें कीं, कदाचित् तो त्याला ममतेनें वागवील व त्याच्या कल्याणाविषयीं झटेल. खरोखर केवढा हा भ्रम! या सुधारलेल्या काळांत कायद्यानें मान्य केलेली अशी एकच दासपणाची स्थिति उरली आहे, असें मी समजतों. कायद्याच्या दृष्टीनें कोणी कोणाचा दास नाहीं खरा. परंतु, प्रत्येक कुटुंबाची मालकीण ह्मणजे निवळ दासी होय.

३. तेव्हां आपल्या विषयाचा हा जो भाग आहे त्याच्यासंबंधानें 'फलश्रुति काय?' असा प्रश्न निघणार नाहीं. कदाचित् कोणी असें ह्मणेल कीं, तुह्मीं ह्मणतां त्याप्रमाणें समाजांत व्यवस्था झाली, किंवा बदल झाला, तर चांगल्यापेक्षां वाईट परिणाम फार होतील. हें कसेंही असो, पण याहींपेक्षां अधिक महत्वाचा दुसरा एक प्रश्न आहे. त्या प्रश्नांत मुख्यत्वें ज्या गोष्टींचा समावेश होतो त्या येणें प्रमाणें:— प्रस्तुत पुष्कळ कामें करण्याविषयीं स्त्रियांस मनाई आहे किंवा त्या अपात्र मानल्या आहेत. ही मनाई किंवा ही अपात्रता दूर करणें, नागरिक जनांचे सर्व हक्क पुरुषांच्या बरोबरीनें त्यांस देणें, सर्व प्रकारची उपयुक्त व प्रतिष्ठेचीं कामें करण्याचें सामर्थ्य ज्या शिक्षणाच्या योगानें त्यांच्या अंगीं येईल तें शिक्षण त्यांस मिळेल अशी योजना करणें, इ०.

'स्त्रियांस पुरुषांच्या बरोबरीनें हक्क देऊं नयेत अशा विषयीं जीं कारणें दाखविण्यांत येतात तीं पुळपुळीत असतात, असें नुसतें ह्मणणें उपयोगी नाहीं. तर हें वैषम्य दूर करून समतेचें तत्त्व व्यवहारांत आणल्यास फायदे कोणते होतील ते सांगा!' असें ह्मणणारे पुष्कळ आहेत. एवढ्याकरितां याच गोष्टीचा आपण विचार करूं.

४. प्रथम ही गोष्ट लक्षांत ठेविली पाहिजे कीं, माणसा माणसांत

परस्पर जे अनेक संबंध असतात त्यांमध्यें अत्यंत सार्वत्रिक व व्यापक असा जो स्त्रीपुरुषसंबंध, तो अन्यायनिबद्ध न राहतां न्यायनिबद्ध होईल, हा पहिला फायदा. एकंदर मानव जातीस ही व्यवस्था किती हितावह व श्रेयस्कर होणार आहे, हें अधिक स्पष्ट करून सांगणें अशक्य आहे. ज्याला वाईट बरें, न्याय अन्याय हे शब्द कळतात, त्यास 'अन्यायाचे ठिकाणीं न्याय होईल' एवढें सांगणें पुरें होणार आहे. मनुष्य जातीच्या एकंदर स्वार्थसाधक प्रवृत्ति, अहंभाव, अन्यायानें आपलें हित साधण्याची संवय, वगैरे सर्व दुर्गुणांचें मूळबीज, मूळउगम पाहूं जातां तो, स्त्रीपुरुषांच्या परस्परसंबंधाची प्रस्तुत जी व्यवस्था आढळते तिच्यांतच आहे, असें लक्षांत येईल. 'मी कितीही मंद-बुद्धि, मूर्ख, टोणपा असलों तरी पुरुषाच्या जन्मास मी ज्या अर्थीं आलों आहें, त्या अर्थीं एकंदर मानव जातीपैकीं अर्ध्या माणसांच्यापेक्षां माझ्यांत कांहीं जरी गुण नसला, तरी मी श्रेष्ठ व शहाणा आहें,' अशी प्रत्येक मुलाची समजुत होणें, त्या मुलास किती हानिकारक होते याचा विचार करा. अशी एखादी मुलगी असते कीं, ती आपल्यापेक्षां खरोखर श्रेष्ठ आहे असा दररोज किंबहुना घटकोघटकीं त्या मुलाला अनुभव येत असतो. फार काय, जरी त्या मुलीच्या सल्लामसलतीनें तो मुलगा निरंतर आपलें वर्तन ठेवीत असला तरी जर तो बेटा मूर्ख असला तर या 'मुलाहून मी जातीची बायको असल्यामुळें कमी बुद्धीची व कमी अकलेची आहें' असें तिला वाटतें.—आणि तो जर मूर्ख नसला तर याहीपेक्षां वाईट परिणाम होतो. तो कोणचा? तर ही आपल्यापेक्षां श्रेष्ठ आहे असें जाणूनसवरूनही 'मी हुकूम करणार आणि ही माझ्या हुकमाची बंदी, असा माझा अखत्यार व हक्क आहे,' असें त्याला वाटतें. अशा या समजुतीचा किंवा धड्याचा परिणाम त्याच्या

एकंदर वर्तनावर कसा होत असेल याचा आपणच विचार करा. हजारों पुरुषजातीय प्राण्यांच्या मनांवर हा दुष्ट ठसा पक्क्या रीतीनें बठतो, ही गोष्ट सुशिक्षित लोकांपैकीं पुष्कळांच्या स्वप्नींही नसते. ज्यांस सत्शिक्षण मिळालें आहे व ज्यांस विचारशक्ति प्राप्त झाली आहे, असे लोक स्त्रीपुरुषांमधील हा अनिष्ट भेद जितक्या रीतीनें टाळतां येईल तितक्या रीतीनें टाळण्याचा यत्न करीत असतात. विशेषेंकरून मुलांच्या डोळ्यांपुढें तो जितका न येईल तितकें बरें, असें समजून तदनुसार वर्तन करितात. मुलांनीं बापाचा मान राखावा व तसाच आईचाही राखावा अशी तजवीज ठेवितात. मुलांनीं बापाची आज्ञा जशी मानिलीच पाहिजे तशीच आईचीही मानिली पाहिजे, अशी मुलाची समजूत करून देण्याचा यत्न करितात. भावांस आपल्या बहिणींवर हुकमत चालविण्याची किंवा शेखी मिरविण्याची सक्त मनाई असते, एवढेंच नाहीं, तर उलट आपल्यापेक्षां आपल्या बहिणींची काळजी आईबाप अधिक घेतात, असें पहाण्याचीच संवय मुलांस अधिक लावतात. होतां होईल तितकें मुलींच्या सुखाविषयीं व सोईविषयीं मुलांनीं अधिक जपलें पाहिजे, त्या जात्या नाजुक आहेत, त्या अबला आहेत, त्यांचें संरक्षण करणें, त्यांचा संतोष ठेवणें हेंच पुरुषाच्या जातीचें कर्तव्य आहे, ही गोष्ट मुलांच्या मनावर ठसविण्याचा प्रयत्न असतो. त्याचप्रमाणें त्या मुलीस प्राप्त होणारें जें दास्य (गुलामगिरी) त्याची कल्पना मुलांच्या डोक्यांत न शिरेल अशाविषयीं जपतात. अशा या कारणांनीं, ज्यांस चांगलें शिक्षण प्राप्त झालें आहे अशा श्रेष्ठ वर्गांतील तरुण मुलांच्या मनावर लहानपणापासून दुष्ट संस्कार व्हावयाचा तो पुष्कळ प्रसंगीं टळतो. ही सर्व व्यवस्था लहानपणाची झाली. परंतु तींच मुलें जेव्हां मोठीं होतात, व आपल्या वयांत येतात, तेव्हां जगांत कसकशा गोष्टी

खरोखर घडून येतात हें त्यांस पूर्णपणें कळतें. वर सांगितलेल्या प्रकारचें वळण लहानपणींच मुलांस लागलें नाहीं, आणि जर निराळ्या प्रकारचें लागलें तर त्याचा किती वाईट परिणाम होतो, हें सभ्यघराण्यांतील पुष्कळ लोकांच्या ध्यानांत येत नाहीं. 'आपण मुलीच्या जातीपेक्षां किती तरी श्रेष्ठ आहों! कशी झाली तरी मुलगीच ती. आणखी आपण कसें झालों तरी पुरुष!' ही समजूत त्या पोराच्या अगदीं लहानपणापासून त्याला चिकटते. आणि अशी ही दुष्ट समजूत त्याच्या वाढीबरोबर वाढत जाते व त्याचें शरीर जसजसें दृढ व टणक होत जातें तसतशी तीही दृढ व टणक होत जाते. शाळेंत पहावें तों मुलेंही तोच ठसा एकमेकांच्या मनावर वठवितात. अगदीं बाळपणापासूनच त्या पोराला वाटूं लागतें: 'आपल्या आईपेक्षां आपण किती तरी श्रेष्ठ व शहाणे आहों! अंः ती काय बोलून चालून वेडी! कशी झाली तरी बायकोच किनई! आपण तो तिला काय मान द्यायचा आहे? तिच्या अपराधाबद्दल मात्र एखादे वेळीं आपण तिला क्षमा केली पाहिजे!' विशेषें करून ज्या वेळीं त्याचें लग्न होतें तेव्हां ज्या स्त्रीस तो आपल्या सुखदुःखाची वांटेकरीण करितो, तिच्यापेक्षां आपण किती मोठे, किती थोर. आपण जसे कांहीं सुलतान् व ती आपली जशी गुलाम आहे असें त्यास वाटूं लागतें! त्या मनुष्याचा, व्यक्तिदृष्ट्या किंवा समाजाचा एक अवयव अशा दृष्टीनें विचार केला, तर त्याच्या एकंदर वागणुकीवर वर सांगितलेल्या प्रकाराचा कांहींच दुष्ट परिणाम होत नाहीं, असें लोक समजतात काय? आपण राजघराण्यांत उत्पन्न झालों आहों, ह्मणून आपण वंशपरंपरेनेंच इतर सर्व माणसांपेक्षां श्रेष्ठ आहों व शहाणे आहों; किंवा सरदाराच्या घराण्यांत आपण उत्पन्न झालों ह्मणून आपण मूळचेच थोर आहों, ही

जी समजूत त्या समजुतीच्या बरोबरीचीच हीही समजूत आहे. नवरा व बायको, अथवा पति आणि पत्नी यांजमधील संबंध **लॉर्ड** आणि **व्हासल** (ह्मणजे जमीनदार व त्याचा दास) यांच्या संबंधासारखा असतो. अंतर इतकेंच कीं, दासापेक्षां देखील पत्नीला पतीच्या अधिक आज्ञेंत रहावें लागतें. परवशतेमुळें दासाच्या स्वतःच्या स्थितीवर किंवा वर्तनावर जो काय बरा वाईट परिणाम होत असेल त्याचा विचार एकीकडे ठेविला, तथापि जमीनदाराच्या वर्तनावर बराच वाईट परिणाम घडतो, हें कोणाच्याही ध्यानांत आल्याशिवाय रहाणार नाहीं. आपला रयतावा किंवा आपलीं ताबेदार कुळें, आपल्यापेक्षां खरोखर श्रेष्ठ आहेत, असें जमीनदारास कधीं तरी वाटत असेल काय? निदान आपल्या सारख्याच योग्यतेच्या माणसांवर आपण सत्ता चालवितों व हुकमत ठेवितों, हा परिणाम किंवा हें फल आपल्या प्रतापाचें, आपल्या श्रमाचें, किंवा आपल्या गुणांचें नसून, **फिगेरो*** ह्मणतो त्याप्रमाणें, जन्मास येण्याची जी तक्लीफ आपण घेतली तिचें फल आहे, हें तत्त्व त्याच्या कधीं तरी ध्यानांत येत असेल काय? जशी आत्म-प्रतिष्ठा राजास वाटते, जशी आत्म-प्रतिष्ठा संस्थानिकास किंवा सरदारास वाटते, तशीच आत्मप्रतिष्ठा मानवी प्राण्यास वाटत असते! आपण न मिळविलेला मोठेपणा किंवा अधिकार ज्यांस प्राप्त होतो, त्यांना लहानपणापासून त्या मोठेपणाची अथवा अधिकाराची शेखी मिरवून पोकळ डौल मारण्याची संवयच लागलेली असते.

---

* **फिगेरो** या नांवाचें एक विनोदी पात्र फ्रेंच नाटकांतलें आहे हीं नाटकें प्रसिद्ध असून त्यांचीं नांवें 'Le Barbier de Seville' (सेव्हील या गांवांतील न्हावी) व 'Le Mariage de Figaro' (फिगेरोचें लग्न) अशीं आहेत. या दोन नाटकाचा कर्ता **बो मार्शेस** (Beau Marchais) या नांवाचा होता. पहिल्या नाटकांत फिगेरो हें पात्र एका विनोदी व हुषार न्हाव्याचें आहे दुसऱ्यांत एका राजाच्या हुजऱ्याचें आहे. फिगेरो या नांवाचें विलायतेंत एक विनोदी वर्तमानपत्रही आहे.

ह्मणजे, तसें केल्याशिवाय त्यांस रहावतच नाहीं. ज्यांनीं कांहीं विशेष प्रकारचे हक्क अथवा अधिकार आपल्या गुणांनीं मिळविलेले नसून ज्यांस ते वंशपरंपरेनें प्राप्त झाले आहेत अशा माणसांस, त्या हक्कांस किंवा अधिकारांस वस्तुतः आपण पात्र नाहीं असें वाटून ज्यांच्या अंगीं उलट अधिक नम्रता येते, अशीं माणसें जगांत नेहेमीं थोडींच आढळावयाचीं. आणि जीं थोडीं आढळतात तीं सर्वांत उत्तम असतात. बाकीचीं माणसें ताठ्यानें व वृथाभिमानानें भरलेलीं असतात. अशा माणसांस जो अभिमान वाटत असतो तो आपल्या पराक्रमानें मिळविलेल्या गोष्टींविषयीं वाटत नसून केवळ दैववशात् प्राप्त झालेल्या गोष्टींविषयीं वाटत असतो! आणि तेवढ्यावरून ते आपणांस किती तरी मोठे समजतात. एकंदर स्त्री जातीपेक्षां आपण फार श्रेष्ठ आहों अशी यांची मूळची समजूत असून, त्या जातीपैकीं एखाद्या तरी व्यक्तीवर अधिकार चालविण्याचा हक्क प्रत्येकास प्राप्त होतो. मग काय विचारावें? ज्यांचीं अंतःकरणें जात्याच कोमल व सदय असतात अशा माणसांना, सदसद्बुद्धि, ममता, व सहिष्णुता इत्यादि गुण शिकण्याची ती शाळाच होते, हें खरें. तथापि याच्या विरुद्ध स्वभावाचीं जीं माणसें असतात, त्यांस, वृथा गर्व, नसता अभिमान, उन्मत्तपणा वगैरे दुर्गुण संपादन करण्याचा मात्र एक तालीमखानाच तयार होतो! घराबाहेर आपल्या बरोबरीच्या इतर पुरुषवर्गीय माणसांशीं व्यवहार करितांना या आपल्या दुर्गुणांचा प्रतिरोध होईल, इतर माणसें हे आपले दुर्गुण खास सहन करणार नाहींत, अशी त्यांची पक्की खातरी असते. यामुळें, ज्या बिचाऱ्या माणसांत ते त्याचे दुर्गुण मुकाट्यानें सहन करणें भाग पडतें त्यांजवरच ते उसळतात व उचल करितात. पुष्कळ प्रसंगीं बहुधा असें घडून येतें कीं, घराच्या बाहेर जे दुर्गुण त्याला नाइलाजामुळें आवरून धरावे लागतात, त्यांच्या दोऱ्या घरांत आल्याबरोबर तो

एकदम सैल सोडून देतो. आणि तिकडला वचपा इकडे बिचाऱ्या आपल्या अभागी स्त्रीवर काढितो!

५. याप्रमाणें, संसाराच्या पायाची रचना ज्यासंबंधावर केलेली असते तो संबंध, समाजानें परस्पर व्यवहारांत मान्य केलेलीं जीं मूलतत्त्वें, त्यांच्याशींच विसंवादी किंवा विसंगत असल्यामुळें, माणसांच्या मनोविकारांस जो कुसंस्कार घडत आहे व जें वळण लागत आहे, त्याचा फारच भयंकर व दुष्ट परिणाम घडत आहे. आणि मनुष्याचा स्वभावच असा कीं, असा हा परिणाम घडलाच पाहिजे. मात्र आपल्या सध्यांच्या अनुभवावरून पहातां, हा संबंध दूर केला असतां किंवा नाहींसा केला असतां, त्यापासून समाजाच्या स्थितींत इतकीं सुधारणा होईल कीं, त्या सुधारणेची कल्पना करणें देखील सध्यां आपल्यास दूरापास्त आहे. बळाच्या कायद्यापासून, ह्मणजे 'बळी तो कान पिळी' या तत्त्वापासून व्यक्तिमात्राच्या वर्तनावर घडणारे दुष्परिणाम दूर करून, त्यांच्या ठिकाणीं न्यायाच्या कायद्यापासून होणारे सुपरिणाम घडवून आणण्याचा प्रयत्न, सुधारणेच्या व शिक्षणाच्या द्वारें चालला आहे, तो सर्व व्यर्थ आहे. कारण, तो सर्व वरचा आहे; मूळ गाभ्याशीं गेलेला नाहीं. शत्रूच्या प्रत्यक्ष गढीवर हल्ला केला नाहीं, आणि वरून वरून कितीही गोळ्या मारल्या तरी शत्रू कायमच रहाणार! आधुनिक कालीं नीतिसंबंधानें व राजकारणसंबंधाचें सर्वमान्य तत्त्व ह्मटलें ह्मणजे 'गुणाः पूजास्थानं' हेंच होय. मीं अमक्याचा अमुक आहें असें ह्मणणारास आह्मी मानीत नाहीं. तर, मी अमुक एक प्रताप केला, किंवा अमुक एक गुण माझ्या अंगीं आहे असें जो सिद्ध करून दाखवील तोच मानार्ह होय, असें आपण समजतों. ज्याच्या त्याच्या क्रियेप्रमाणें ज्याची त्याची योग्यायोग्यता ठरणें

हेंच न्याय्य आहे, असें आपण ह्मणतों. अधिकार किंवा सत्ता जन्मावर अवलंबून असावी हें योग्य व न्याय्य नाहीं, तर गुणांवर अवलंबून असावी हेंच योग्य व न्याय्य आहे, असें आपण मानितों. नवऱ्याच्या अधिकारासारखा मूळचाच चिरकालीन अधिकार, ह्मणजे एका माणसानें दुसऱ्या माणसावर सत्ता करण्याचा हक्क, समाजानें जर दिला नसता, तर त्याला (समाजाला) एका हातानें कांहीं विवक्षित दुष्ट प्रवृत्तींचें लालन करावें व दुसऱ्या हातानें त्याच प्रवृत्तींचें निर्दालन करण्यास उद्युक्त व्हावें, असा प्रसंग आला नसता. शिवाय, इहलोकीं जन्मास आल्या घटकेपासूनच ज्या मार्गानें बालकानें गेलें पाहिजे त्याच मार्गानें जाण्याचें वळण त्यास लागलें असतें. आणि तो मोठा झाल्यावरही तो मार्ग सोडून भलत्याच मार्गानें जाण्याचाही संभव राहिला नसता. परंतु, जोंपर्यंत, बलवानाचा पगडा अबलांवर चालणें हा प्रकार समाजांत धडधडीत व राजरोसपणानें चालू राहील, तोंपर्यंत समाजाच्या सर्व बाह्य क्रिया, ' दुर्बलांस व प्रबलांस सारखेच हक्क आहेत ' अशा तत्त्वावर किंवा अशा रोखानें चालविण्याचा यत्न करणें, ह्मणजे छातीवर डोंगर घेऊन पहाड चढण्यासारखेंच होणार आहे. कारण, न्यायाचें तत्त्व, (ख्रिस्ती धर्माचेंही तत्त्व तेंच आहे,) माणसांचे मनोविकार जोंपर्यंत उलट दिशेनें जात आहेत तोंपर्यंत त्यांच्या अंतःकरणांत बिंबणारच नाहीं, हें स्पष्ट आहे.

६. आपल्या मानसिक शक्तींचा उपयोग करण्याचें स्वातंत्र्य स्त्रियांस दिल्यापासून होणारा दुसरा एक फायदा आहे. तो हा. पाहिजे ते व्यवसाय करण्याची पूर्ण मुभा जर स्त्रियांस ठेविली, जीं जीं बक्षिसें व उत्तेजनें व्यवहारांत पुरुषांच्यासाठीं मात्र आहेत त्यांत स्त्रियांही विभागिनी केल्या, तर एकंदर मानव जातीचें ज्यांत अत्यंत हित आहे, किंवा ज्या गोष्टी मनुष्यसमुदायास अत्यंत श्रेयस्कर होत, अशा

गोष्टींच्या उपयोगीं पडण्यासारखें जें ज्ञान अथवा जी मानसिक शक्ति, ती दुपटीनें वाढली, असें होणार आहे. उत्तम उपदेशक, उत्तम कारभारी, अशासारखीं लोकांचें हित करणारीं व एकंदर सुधारणेच्या कामास झटणारीं माणसें घेतलीं, तर हल्लीं जेथें एक एक माणुस आहे, तेथें दोन दोन निपजण्याचा संभव आहे. हल्लीं कोणत्याही प्रकारचें बुद्धि-सामर्थ्य पाहिलें तरी आपणांत अगोदर फारच कमी आहे. ज्या कामाला बरेंच बुद्धि-सामर्थ्य लागतें, असें हरएक काम उत्तम रीतीनें करणाऱ्या माणसांची आधींच फार कमताई आहे. यामुळें, जगांतील एकंदर बुद्धि-सामर्थ्यापैकीं अर्धें बुद्धि-सामर्थ्य जगाला नाहींसें करून टाकणें, ही हानि खरोखर फारच मोठी आहे. आतां, हें बुद्धि-सामर्थ्य सर्वथा फुकट जात नाहीं, ही गोष्ट खरी. कारण, त्यापैकीं बऱ्याच अंशाचा उपयोग गृहव्यवस्था व स्त्रियांस वर्ज्य केले नाहींत असे जे इतर कांहीं उद्योग, यांत होतो; आणि बाकी राहिलेला अंश कांहीं विशेष व्यक्तींच्या हितास अप्रत्यक्ष रीतीनें कारणीभूत होतो. ह्मणजे, विवक्षित पुरुषांवर विवाक्षित स्त्रियांचें जें वजन असतें, त्यासंबंधानें त्या पुरुषांचें हित होण्याचा संभव असतो. परंतु, हे फायदे गणनेंत घेतां येत नाहींत. कारण, त्यांचें क्षेत्र अत्यंत संकुचित असतें. मनुष्याच्या बुद्धीची एकंदर एक मोठी रास केली, तर त्या राशीपैकीं निम्मे रास जी हल्लीं बंधांत आहे, ह्मणजे अगदीं कुलपांत घातल्यासारखी आहे, ती बंधमुक्त केली तर अर्थात् समाजास उपयोगी पडणारी ही जी नवीन शक्ति तिच्यांतून वर सांगितलेल्या प्रकारानें प्रस्तुतच्या व्यवस्थेंतही उपयोगांत येणारी शक्ति मजुरा घालणें वाजवी आहे, हें मी कबूल करितों. तथापि, दुसरा असा विचार केला पाहिजे कीं, स्पर्धेच्या किंवा अहमहमिकेच्या योगानें पुरुषांच्या बुद्धीसही एक प्रकारची स्फूर्ति, किंवा उत्तेजन येणार आहे. हा लहान सहान फायदा होणार आहे काय? कारण, ज्यांस

बुद्धि-सामर्थ्याचीच अपेक्षा ज्यास्त आहे अशा समाजाच्या एकंदर मोठमोठ्या उलाढालींत स्त्रियांपेक्षां आपली उपयुक्तता अधिक आहे, किंवा पुढें सरसावण्यास स्त्रियांहून आपणच अधिक योग्य आहों, असें सिद्ध करून दाखविणें पुरुषांस भाग पडणार आहे.

७. याप्रमाणें मनुष्यजातीच्या बुद्धि-सामर्थ्यांत, विशेषेंकरून तिच्या कामाची व्यवस्था चांगल्या रीतीनें लागण्यास अवश्य अशी जी बुद्धि, त्या बुद्धींत ही मोठी भर पडणार आहे. हा जो फायदा व्हावयाचा तो, स्त्रियांस प्रस्तुत मिळत आहे त्यापेक्षां अधिक चांगलें मानसिक शिक्षण मिळण्यापासूनच होणार. आणि त्यांच्या शिक्षणांत सुधारणा व्हावयाची ती पुरुषांच्या शिक्षणाबरोबरच व्हावयाची, हेंही उघडच आहे. सामान्य व्यवहार, सार्वजनिक व लोकहिताचीं कामें व मोठमोठ्या तत्त्वविचाराच्या गोष्टी समजण्याचा अधिकार, समाजाच्या एका विवक्षित वर्गांतील पुरुषांच्या बरोबरीनें त्याच वर्गांतील स्त्रियांसही प्राप्त होईल. इतर माणसांनीं जीं मोठमोठीं कामें अथवा जे मोठमोठे विचार केले असतील ते समजण्यापुरता अधिकार तर ज्यांस आहेच—परंतु स्वतांही मोठमोठीं कामें व मोठमोठे विचार करण्याचा अधिकारही ज्यांच्या अंगीं आहे, अशा प्रकारच्या स्त्रीपुरुषात्मक उभय वर्गांतील थोड्या निवडक माणसांना आपापली ज्ञानसंपत् वाढविण्यास व आपापल्या बुद्धीस सुधारण्यास व योग्य वळण देण्यास एकसारख्या सोई होतील, व एकसारखींच साधनें प्राप्त होतील. याप्रमाणें, पुरुषांच्या बरोबरीचें शिक्षण स्त्रियांस दिल्याच्या योगानें व एकाच्या शिक्षणांत कालवशात् होणाऱ्या सुधारणांचा फायदा दुसऱ्यासही मिळत गेल्याकारणानें, स्त्रियांच्या व्यवसायाचें क्षेत्र विस्तृत होऊन जगाचें बहुत कल्याण होणार आहे. पण हाही विचार एकीकडे ठेविला, तरी स्त्रियांच्या

मार्गांत ठेविलेली ही आडकाठी नुसती दूर करण्यानें देखील शिक्षण-दृष्ट्या अत्यंत उपयुक्त व अत्यंत इष्ट असा परिणाम होणार आहे. मनुष्याच्या विचाराचे व व्यवसायाचे जे जे मोठे विषय आहेत, ज्या ज्या गोष्टी केवळ खासगी संबंधाच्या नसून सार्वजनिक हिताच्या आहेत; असे सर्व विषय, अशा सर्व गोष्टी, पुरुषांचीं कामें आहेत, त्यांत आह्मां बायकांचा कांहीं संबंध नाहीं, त्यांपैकीं बहुतेक आह्मांस सर्वथा निषिद्ध आहेत,–ही नुसती कल्पना जरी नष्ट झाली, किंवा दूर करितां आली, तरी देखील किती फायदा होणार आहे? इतर मानवी प्राण्यांप्रमाणेंच आपणही एक मानवी प्राणी आहों, आपले उद्योग आपणांस पहाण्याचा व पसंत करण्याचा पूर्ण अधिकार आहे, मानवी प्राण्यांच्या हिताच्या हरएक बाबतींत लक्ष पुरविण्यास आपल्यालाही हक्क आहे, प्रसंग आहे, उत्तेजन आहे; व्यक्तिविशिष्टमताला जें वजन असतें, त्याची जी मातबरी लोक समजतात तशा प्रकारचें वजन व तशा प्रकारची मातबरी माणसांच्या सर्व उलाढालींत आपल्याही मताला द्या ह्मणून ह्मणण्याचा आपणांसही अधिकार आहे. मग आपण त्या उलाढालींत प्रत्यक्ष असलों किंवा नसलों तरी हरकत नाहीं. असें प्रत्येक स्त्रीला वाटणें, आपल्या ठिकाणीं अशा प्रकारचा विश्वास प्रत्येक स्त्रीच्या ठायीं उत्पन्न होणें, एवढ्यानेंच देखील केवढें मोठें कार्य होणार आहे? एवढ्यानें सुद्धां स्त्रियांच्या बुद्धि-सामर्थ्यास केवढा विस्तार प्राप्त होणार आहे? त्यांचे नीतिविषयक विचार किती उदात्त होणार आहेत? त्यांची सदसद्विवेकशक्ति किती प्रसृत होणार आहे?

८. हल्लीं जगांत अक्कल इतकी खचित सवंग झाली नाहीं कीं सृष्टीनें दिलेला जो बुद्धीचा गड्डा त्यापैकीं अर्धा भाग आपणांस गरज नाहीं ह्मणून टाकून द्यावा! तो टाकून न देतां माणसांचे कारभार उत्तम रीतीनें चालवितां येण्यास अवश्य व उपयुक्त अशी जी व्यक्ति-

विशिष्ट बुद्धि तिच्या राशींत जर आणखी भर पडत असेल तर ती अगत्य पडूं द्यावी. माणसांच्या ज्या एकंदर समजुती व जे एकंदर विचार त्यांजवर स्त्रियांच्या विचारांचा अधिक परिणाम होईल असें ह्मणण्यापेक्षां अधिक श्रेयस्कर व हितावह परिणाम होईल असें ह्मटलें पाहिजे. 'अधिक श्रेयस्कर होईल' असें ह्मणण्याचा हेतु एवढाच कीं, मनुष्याचा जितका इतिहास उपलब्ध आहे त्यांतील अगदीं प्रारंभापासून पाहतां स्त्रियांच्या विचाराचा दाब अथवा स्त्रियांचें वजन एकंदर लोकमतावर बरेंच असल्याचें आढळून येतें. आपल्या मुलांच्या वर्तनावर लहानपणीं आईच्या शिक्षणानें होणारा परिणाम, तरुण स्त्रियांनीं आपणांस वाखाणावें एतद्विषयीं तरुणांची उत्कट इच्छा, हे प्रकार सर्वविश्रुत आहेत. ज्या ज्या कालाचा इतिहास उपलब्ध आहे, त्या त्या कालीं पुरुषांच्या वर्तनावर मोठे महत्त्वाचे परिणाम घडवून आणण्यास स्त्रिया बऱ्याचकारणीभूत झाल्या. एवढेंच नाहीं तर सुधारणेचें पाऊल पुढें पडण्यास मुख्यत्वें त्याच सहाय्यभूत झाल्या. **होमर** ह्मणून ग्रीक लोकांत जो महाकवि होऊन गेला, त्याचे वेळींही अशीच कल्पना होती. **हेक्टर** ह्मणून त्याच्या काव्यांतील मुख्य नायक आहे, त्याच्या वर्तनावर सदरहू काव्यांतील नायिकेच्या हातून सर्वमान्य व महत्त्वाचे असे परिणाम घडवून आणिले आहेत. नीतिदृष्ट्या स्त्रियांच्या संबंधानें पुरुषांवर जे परिणाम घडत असतात ते दोन प्रकारचे घडत असतात. त्यांतला पहिला प्रकार ह्मटला ह्मणजे, पुरुषांचीं कठोर व निर्दय अंतःकरणें मृदु व सदय करणें! काम, क्रोध, लोभ, मोह, उन्माद अशा उग्र मनोविकारांच्या तडाक्यांत सांपडून अंध झालेल्या पुरुषांच्या हातून व्हावीं तितकीं क्रूर व निंद्यकर्मे झालीं नाहींत व बलात्काराचा किंवा जुलुमाचा अतिरेक झाला नाहीं, असें जेथें जेथें आढळेल, तेथें

तेथें असें समजावें कीं स्त्रियांनीं आपला पगडा व आपलें वजन कांहीं तरी बसविलें खास! ज्यांना युद्धकलेंत शिक्षण मिळालें नव्हतें, त्यांनीं युद्धाहून अन्य कोणत्या तरी मार्गानें आपापल्या तंट्यांचा निकाल करून घ्यावा, हाच पक्ष उत्तम असा सहजींच अभिप्राय दिला. सामान्यतः आपले स्वार्थसाधक मनोविकार यथेच्छ तृप्त करून घेण्यानें ज्यांस अत्यंत पीडा सोसावी लागली व ज्यांची फार मोठी हानि झाली, त्यांनीं त्यांनीं मनोविकाराचा प्रतिरोध करण्यास साधनीभूत होणारा नीतिसंबंधाचा कायदा निघाल्यास त्यास त्यांनीं आपला पूर्ण आश्रय दिला. ख्रिस्ती धर्मापूर्वीं जितके धर्म होऊन गेले, त्यापेक्षां ख्रिस्ती धर्म स्त्रियांस अधिक अनुकूल असल्यामुळें, ह्मणजे ख्रिस्तीधर्म स्त्रियांचा अधिक कैवारी असल्यामुळें, उत्तरेकडून आलेल्या लोकांनीं ज्या समयीं यूरोपांत स्वाऱ्या केल्या त्या समयीं त्यांच्याकडून ख्रिस्ती धर्माचा स्वीकार करविण्याच्या कामांत मुख्यतः स्त्रियांच साधनीभूत झाल्या. ***अँग्लो-साक्सन्** व **फ्रँक** लोकांचें धर्मांतर करण्यास प्रथमारंभ, †**एथेल्बर्ट** व ‡**क्लोव्हिस्** ह्मणून जे त्यांचे पहिले राजे होते त्यांच्या बायकांनीं केला, असें ह्मटलें असतां चालेल. स्त्रियांच्या मताच्या योगानें पुरुषांच्या मनावर घडलेल्या परिणामांचा दुसरा प्रकार असा झाला कीं, शौर्य, धैर्य इत्यादि जे गुण त्यांच्या स्वतांच्या अंगीं नव्हते ते आपल्या संरक्षकांच्या (पुरुषांच्या) अंगीं असलेच पाहिजेत, असें समजून स्त्रियांनीं त्या गुणांचें होईल तितकें प्रोत्साहन केलें. सर्व कालीं, पलटणी लोकांस

---

* या गोष्टीच्या संबंधानें बुद्ध धर्माच्या प्रसाराचा इतिहासही ध्यानांत आणण्यासारखा आहे. विशेषतः **किसा गोतमी** व **सुजाता** यांच्या कथा व **अम्बा पाली** या नांवाच्या वेश्येला **गौतमानें** पावन करून बुद्ध धर्मांत घेतली, या कथा बोधप्रद असून फार मनोरंजक आहेत.

† हा ख्रिस्ती शकाच्या नवव्या शतकांत होऊन गेला.

‡ हा ख्रिस्ती शकाच्या पांचव्या शतकांत झाला,

अवश्य लागणारे धैर्यादि सद्गुण हे स्त्रियांनीं आपणांस वाखाणावें, अशी पुरुषांच्याठायीं उत्पन्न होणारी जी उत्कट इच्छा, त्या इच्छेचीं फलें होत. एवढेंच नव्हे. तर याचा आणखी पुढें असा परिणाम होतो कीं, शौर्य, वीर्य, बल इत्यादि उदात्त गुण ज्यांच्या अंगीं आहेत, त्यांस स्त्रिया वाखाणूं लागल्या व त्यांवर स्त्रियांनीं आपली पूर्ण मेहर नजर दाखविली ह्मणजे पुरुषांनींही त्यांची वाखाणणी करावी व त्यांस बहुमान द्यावा, असा प्रकार घडत असतो. नीतितत्त्वाचे उत्पादक हे जे दोन प्रकार, त्यांच्या संयोगापासून वीरकालांतील जें मुख्य तत्त्व (Chivalry) तें उत्पन्न झालें.* या तत्त्वाचें मुख्य लक्षण ह्मटलें ह्मणजे, युद्धकर्मास लागणारे शौर्यवीर्यादि अत्यंत उदात्त असे जे गुण, त्या गुणांबरोबरच सुशीलता, उदारता, आत्मनिग्रह इत्यादि अगदीं भिन्न जातीचे गुण उत्पन्न करणें. अर्थात् जीं मनुष्यें युद्धपराङ्मुख व आपलें रक्षण करण्याविषयीं असमर्थ होतीं, त्यांच्या हिताचे संबंधानें हे सत्वगुण युद्धपटु माणसांच्या अंगीं असणें अवश्य होतें. त्या गुणां-

---

* आपल्या इकडे **रामायण, महाभारत** वगैरे काव्यांतून व पुराण कथांमधून ज्या कालाचें वर्णन आढळतें त्या कालास ‘ वीरकाल ’ (Chivalrous times) असें ह्मणतां येईल. या कालाचें मुख्य दर्शक किंवा लक्षण ह्मटलें ह्मणजे, **स्वयंवर**! सुंदर अशा राजकन्यांनीं **पार्थासारखे** किंवा **रामचंद्रासारखे** जे प्रतापशाली धनुर्धर वीर, त्यांचा पराक्रम अवलोकन करून व त्यांच्या धैर्यशौर्यादि उदात्त गुणांवर मोहून त्यांच्या गळ्यांत माळ घालावी, व तीही प्रसिद्धपणें—ह्मणजे, अनेक राजकुमारांचा व अनेक वीरांचा फार मोठा समुदाय जेथें जमला आहे, एकमेकांचा पराक्रम पहाण्याविषयीं जे उत्सुक होऊन गेले आहेत. जिच्याकडे सर्वांचे डोळे लागून गेले आहेत, ‘ ही तरुणी आपणास माळ घालील काय ? ’ अशा उत्कंठेनें आपल्या पराक्रमाची परमावधि करण्याविषयीं ज्यांच्या अंतःकरणांत मोठी आतुरता उत्पन्न झाली आहे, अशा प्रसंगीं त्यांतील एखाद्या वीरानें बाकीच्या सर्व वीरांस जिंकून ठरलेला पण पूर्ण करून त्या नायिकेस वरावें व मग सर्व प्रेक्षकांनीं त्या उभयतांचा जयजयकार करावा. असा हा प्रकार ज्या कालीं घडत असे, त्या कालास इंग्रजींत ‘ वीर-काल ’ अशा अर्थाचें नांव आहे. **वाल्टर स्कॉट्** या नांवाचे जे प्रसिद्ध कादंबरीकार होऊन गेले त्यांनीं केलेल्या **टालिसमन्, आयव्हॅनो** वगैरे कादंबऱ्यांतून या वीरकालाचीं फार सुंदर चित्रें रेखलीं आहेत.

पैकींच विशेषतः स्त्रियांविषयीं पूज्यभाव व नम्रभाव असणें हा एक होता. आपलें रक्षण करण्याचें सामर्थ्य ज्यांच्या अंगीं नव्हतें, अशा पुरुषांत व स्त्रियांत मुख्य भेद हा होता कीं, त्यांस बलात्कारानें वश करून न घेतां जे केवळ आर्जव-शक्तीनें, सौम्य प्रकारानें, त्यांचीं अंतः-करणें वश करून घेण्याचा व त्यांची कृपा संपादन करण्याचा यत्न करीत त्यांस मोठमोठ्या देणग्या आपल्या राजीखुषीनें व केवळ मेहर नजर होऊन देण्याची शक्ति स्त्रियांच्या हातांत होती. नेहमीं असें आढळतें कीं, कोणची वहिवाट किंवा चाल, मूळ हेतुपासून बरीच सुटलेली असते. याच न्यायास अनुसरून वीरकालीं पडलेला हा प्रघात किंवा ही प्रवृत्ति, मूळच्या उद्देशास अथवा कल्पनेस पूर्णपणें अनुलक्षून नव्हती, हें जरी खरें आहे, तरी हेंही खरें कीं, मानव जातीच्या नीति-विषयक इतिहासांत हा वीरकालीन प्रघात, एका अत्यंत महत्त्वाच्या गोष्टीप्रमाणें मानिला पाहिजे. अत्यंत अव्यवस्थित छिन्नभिन्न झालेल्या समाजानें, त्या वेळच्या ज्या ओबडधोबड संस्था होत्या, व त्या वेळची जी एकंदर लोकस्थिति होती, त्यांच्या फार पुढें जाऊन, अशी ही नीतिप्रवर्तक कल्पना निर्माण केली व तीही एका जुटीनें व एका विचा-रानें प्रवृत्तींत आणण्याचा यत्न केला, हें एक ध्यानांत ठेवण्यासारखें उदाहरण होय. आणि यद्यपि या प्रघाताचा मुख्य उद्देश सिद्धीस गेला, असें ह्मणतां आलें नाहीं, तथापि हेंही खरें कीं, तो सर्वथा निष्फळ झाला, असेंही ह्मणतां येणार नाहीं. कारण, ज्या कालीं हा प्रघात रूढ झाला, त्याच्या पाठीमागील सर्व काळावर त्या प्रघाताचा ठसा फारच उत्तम तऱ्हेनें वठला गेला, असें दिसतें.

९. ही वीरकालीन कल्पना ह्मणजे, मानवजातीची नीतिसंबंधानें जी सुधारणा झाली तिजवर स्त्रियांच्या विचाराचा व उद्गाराचा जो परिणाम घडला, त्याची अगदीं सीमाच झाली. तेव्हां आतां यापुढें

जर स्त्रियांची ही परवशतेची स्थिति कायम राहणार असेल तर तो सरदार-बहादुरीचा काळ नाहींसा झाला व त्याजबरोबरच ती उदात्त कल्पनाही नाहींशी झाली, ही गोष्ट खरोखर फार शोचनीय मानली पाहिजे. कारण, त्या वशतेच्या स्थितींत माणसांची मनें नीतिभ्रष्ट करणाऱ्या ज्या गोष्टी त्यांचे परिणाम त्या कल्पनेमुळेंच व्हावे तितके बाधक झाले नाहींत. परंतु, माणसांच्या एकंदर स्थितींत पुष्कळ बदल झाल्याकारणानें वीरकालीं रूढ झालेली कल्पना बदलून, तिच्या ऐवजीं अगदीं भिन्न प्रकारची कल्पना बसविणें भाग पडलें. तो सरदार-बहादुरीचा व पराक्रमशालित्वाचा काळच असा कांहीं होता कीं, त्या वेळीं प्रत्येक वाईट बरी गोष्ट होणें ती एकाच व्यक्तीच्या पराक्रमावर अवलंबून असे. ह्मणजे, एखाद्या व्यक्तीच्याठायीं उदारता, सुशीलता, सदयता, इत्यादि सत्वगुण वास करीत असतील तर त्यांचा चांगला परिणाम पुष्कळांवर होई. आणि याच्या उलट तमोगुण असतील तर त्यांचे वाईट परिणाम पुष्कळ संख्येस भोगावे लागत. अशा समाजांत नीतितत्त्वांचा प्रसार व्हावा, ह्मणजे, मनुष्याच्या स्वभावांतील तमोगुणांचा भाग कमी होऊन, किंवा त्यांस सौम्यस्वरूप प्राप्त होऊन, सत्वगुणांचा उदय व्हावा एतद्विषयींचा यत्न, हेंच वीरकालाचें मुख्य लक्षण होतें. आधुनिक समाजांत हरएक गोष्टींत—फार काय--युद्धाच्या कामांतही, ह्मणजे पलटणी खात्यांत देखील, निर्णय ठरावयाचा तो एकाच व्यक्तीच्या प्रयत्नावर अवलंबून राहत नसून बहुसंख्येच्या, व संहत प्रयत्नाच्या अनुरोधानें ठरत असतो. प्राचीनकाळीं समाजाचा, लढाई करणें हाच मुख्य व्यवसाय होता. तो बदलून, व्यापार कारागिरी, कृषिकर्म वगैरे शांततेचे व्यवसाय समाजांत शिरले. अर्वाचीन समाजास ही जी नवी स्थिति, हें जें नवीन स्वरूप प्राप्त झालें आहे, त्यास उदारता, सदयता वगैरे गुणांची अपेक्षा प्राचीन समाजाहून कमी आहे

असें नाहीं. परंतु आधुनिक समाज पूर्वीप्रमाणें या गुणांवरच सर्वथा अवलंबून राहिलेला नाहीं. आधुनिक कालच्या नीतीचा पाया मुख्यत्वें-करून न्याय, दूरदृष्टि, परस्परांची सोय, व उपयुक्तता या गोष्टींवर रच-लेला आहे. प्रत्येकानें दुसऱ्याचे हक्क मानावे, ज्यानें त्यानें आपापल्या पुरती काळजी घ्यावी, आणि आपापलें हित साधावें, हेंच सार्वजनिक नीतीचें मुख्य तत्त्व आजकाल समजतात. पूर्वीच्या त्या सरदार-बहादुरी-च्या काळीं सर्व प्रकारचे गुन्हे, कायदेशीर शासनाचा अभाव असल्यामुळें यथेच्छपणानें घडत. मार्गाची गोष्ट करणें, गैर मार्गानें न जाणें अशा संबंधाचा निर्बंध, अथवा दुर्वृत्तपणा टाकून सद्वर्तन करण्याविषयीं उत्ते-जन त्या काळीं फारच थोड्यांस असे. जे थोडे लोक सन्मार्गास अनुसरत त्यांस तसें करण्यास स्तुति व पूज्यभाव हींच प्रवर्तक कारणें अथवा साधनें होत. परंतु नीतीचा पाया खरोखर शासनावर रचलेला असतो. ह्मणजे शासनाच्या भीतीमुळें माणसें नीतीनें चालत असतात. वाईट गोष्ट करण्यापासून माणसास पराङ्मुख करण्याच्या शक्तीवर नीति नेहमीं अवलंबून असते. समाजाची सुरक्षितता प्रत्येक व्यक्तीच्या केवळ सदसद्बुद्धीवर सोंपविल्यानें राहत नाहीं. चांगली गोष्ट करणें हेंच योग्य आहे, ह्मणून आपण सन्मार्गानें वर्तन करावें असें प्रत्येक व्यक्तीला वाटतच असेल, अशा समजुतीनें स्वस्थ बसल्यास लोकांचें रक्षण होणार नाहीं व समाजांत व्यवस्था राहणार नाहीं. कारण, चांगली गोष्ट, चांगली ह्मणूनच आपण केली पाहिजे हा हेतु थोड-क्याच माणसांच्या अंतःकरणांत बिंबलेला असतो. पुष्कळ माणसां-च्या मनावर या हेतूचा मुळींच कांहीं परिणाम किंवा संस्कार घडत नाहीं. आधुनिक समाजास सुधारणेच्या योगानें पूर्वीपेक्षां श्रेष्ठ प्रका-रची संघशक्ति प्राप्त झाली असल्यामुळें प्रपंचांतील व व्यवहारांतील हरएक कामीं घडणाऱ्या अपराधास शासन करण्याचें सामर्थ्य त्याचे

अंगीं आलें आहे. यामुळें, समाजांतील अनाथ व दुर्बल लोकांचें रक्षण कायद्यानें होत असून जुलूम करण्याच्या स्थितींत जे लोक असतात त्यांच्या केवळ सदयतेवर त्यांस अवलंबून रहावें लागत नाहीं व जीवयात्रा सुसह्य होते. त्या वीरकालच्या कल्पनेचें सौंदर्य व मनोहरत्व हीं नष्टप्राय झालीं नसून जशींच्या तशींच अद्यापही कायम आहेत, असें ह्मटलें तरी चालेल. परंतु दुर्बल मनुष्यांचे हक्क व मनुष्याच्या संसारांतील एकंदर सोई पूर्वींपेक्षां अधिक सुदृढ व अधिक निश्चित अशा पायावर अधिष्ठित झाल्या आहेत. किंवा, असें ह्मटलें पाहिजे कीं, या नियमास वैवाहिकसंबंध मात्र अपवादक आहे.

१०. सांप्रतकाळींही नीतिसंबंधानें पुरुषांवर स्त्रियांचें जें पूर्वकाळीं वजन होतें व जो एक प्रकारचा दाब होता तो कमी झाला आहे असें नाहीं. परंतु पूर्वींसारखा इतका उघड व निश्चित प्रकारचा नाहीं. हल्लीं ह्मटलें ह्मणजे, पुरुषांवर लोकमताचा जो साधारण दाब असतो त्या दाबांतच स्त्रियांचा दाब मिसळून गेल्यासारखा झाला आहे. भूतदयेच्या किंवा अनुकंपेच्या संसर्गानें, व स्त्रियांनीं आपणांस बरें ह्मणावें, त्यांचीं अंतःकरणें आपल्याकडे ओढलीं जावीं अशी जी पुरुषांची इच्छा असते तिच्या योगानें, अशा दोन्ही कारणांनीं, त्या वीरकालीन कल्पनेपैकीं जितका भाग अद्यापि कायम आहे, त्यास सजीव ठेवण्याच्या कामांत स्त्रियांच्या मनोभावांचा फार मोठा उपयोग होतो. पुरुषांच्याठायीं एक प्रकारचें पाणी किंवा तरतरी व उदारता या गुणांचा परिपोष अद्यापही स्त्रिया करीत आहेत व ती वीरकालीन कल्पनेची परंपरा बऱ्याच अंशानें चालवीत आहेत. या गुणांत किंवा या बाबतींत पुरुषांच्या पेक्षां स्त्रियांचें प्रमाण अधिक आहे. न्यायाच्या कामांत त्यांचें मान पुरुषांच्या पेक्षां कांहींसें कमी

आहे. ही झाली सार्वजनिक संबंधाची गोष्ट. आतां खाजगीच्या संबंधाचा विचार करितां, एकंदरींत स्त्रियांच्या सहवासानें पुरुषांच्या मनावर जे संस्कार घडत असतात त्यांवरून असें दिसतें कीं, सौम्य प्रकारच्या गुणांस उत्तेजन मिळतें व कठोरपणाचे, ह्मणजे दृढता, स्थिरता, व निष्ठुरता, इत्यादि प्रकारचे जे गुण त्यांस उत्तेजन न मिळून ते हतवीर्य होतात. संसारकृत्यांत सद्गुणाची परीक्षा होण्याचे जे मोठमोठे प्रसंग येतात त्यांत मुख्य प्रसंग ह्मटला ह्मणजे **स्वार्थ** व **सहनशीलता** या दोहोंचा जेव्हां लढा पडतो तो प्रसंग. अशा प्रसंगीं पुरुषांच्या मनावर स्त्रिया जे परिणाम घडवून आणतात त्यांचें स्वरूप मिश्र प्रकारचें असतें. स्त्रियांना प्रस्तुत जें धर्मसंबंधाचें किंवा नीतिसंबंधाचें शिक्षण मिळतें, त्या शिक्षणापासून त्यांच्या मनावर निश्चित अशा फारच थोड्या गोष्टी ठसलेल्या असतात. पुरुषांच्या ठायीं सद्गुणाचा उदय करण्यास एखादी गोष्ट बरीच कारणीभूत झाली तर ती त्या थोड्या गोष्टींपैकीं असली तर होते. स्त्रिया आपल्या पतींस किंवा आपल्या पुत्रांस असा एखादे वेळीं मनोनिग्रह करण्यास लावितात कीं, त्यांच्या प्रेरणेशिवाय त्यांनीं कधींही तो निग्रह केला नसता. असें कधीं कधीं घडतें, नाहीं असें नाहीं. तथापि स्त्रियांच्या प्रस्तुतच्या स्थितीचा व एकंदर शिक्षणाचा विचार केला असतां नीतीचीं ह्मणून जीं तत्त्वें त्यांच्या मनावर ठसलीं जातात, त्यांचा समावेश खरी नीति किंवा खरा धर्म यांत फारच थोड्या अंशानें होतो. शिवाय, तीं तत्त्वें मुख्यत्वें करून निषेधात्मकच असतात. अमुक अमुक कृत्यें आपण करूं नयेत, एवढेंच काय तें त्यांस शिकविलेलें असतें. परंतु, आपल्या विचारांस व उद्देशांस कोणती दिशा लावणें योग्य आहे एतद्विषयींचा सामान्य नियम जाणण्या पुरतें ज्ञान त्यांस झालेलें नसतें. संसारांतील साधारण वर्तनांत निःस्वार्थता ठेवणें,

ह्मणजे ज्या कामांमध्यें कुटुंबाच्या प्रत्यक्ष हिताचा किंवा कायद्याचा संबंध नसतो, अशा कामांत बुद्धिसामर्थ्य व शरीरसामर्थ्य खर्ची घालणें, या गुणास स्त्रियांच्याकडून उत्तेजन किंवा आश्रय क्वचित्च मिळतो, असें ह्मणणें मला भाग पडत आहे. आणि याबद्दल मला खरोखर दिलगिरी वाटते. पण वस्तुतः यांत स्त्रियांचा तरी काय दोष? त्या विषयांपासून किंवा व्यवसायांपासून होणाऱ्या फलाची कल्पना त्यांस होतच नाहीं. ज्यांत गुंतून गेल्यामुळें आपल्या कुटुंबाच्या पुरुषांपासून त्यांचा वियोग होतो, व कुटुंबाच्या सुखसमाधानास जे व्यवसाय बाधक होतात, अशा व्यवसायांत किंवा अशा विषयांत पुरुष मन घालूं लागले असतां त्यांत स्त्रिया मोडा घालतात, यांत त्या बिचाऱ्यांचा काय दोष आहे? कसेंही असो. एकंदरींत स्त्रियांचें वजन सार्वजनिक गुणाच्या उत्कर्षास वारंवार विघातक होतें, एवढी गोष्ट खरी.

११. सार्वजनिक कामांत जेव्हांपासून स्त्रियांच्या व्यवसायास अधिक अवकाश सांपडूं लागला; केवळ आपल्या कुटुंबाच्या अथवा गृह-व्यवस्थेच्या पुरताच आपल्या बुद्धीचा व्यय करावयाचा, हें शास्त्र सोडून देऊन सामाजिक हिताच्या गोष्टींतही आपलें मन घालावें असें वाटूं लागणाऱ्या स्त्रियांची संख्या जेव्हांपासून बरीच वाढूं लागली, तेव्हांपासून सामाजिक नीतीवरही त्यांची बरीच छाप बसूं लागली. अर्वाचीन युरोपियन उलाढालीं पैकीं अत्यंत महत्त्वाच्या अशा दोन बाबतींत स्त्रियांच्या हालचालींपासून बरेच मोठे परिणाम घडून आले आहेत. त्या दोन गोष्टी कोणत्या ह्मणाल तर—एक युद्धपराङ्मुखता, ह्मणजे लोकांस लढाईचा मनापासून तिटकारा वाटणें; व दुसरी, परोपकाराविषयीं व लोककल्याणाविषयीं आसक्ति. या दोन्हीही गोष्टी फारच उत्तम आहेत. नाहींत असें कोण ह्मणेल? परंतु दुर्दैवानें असें घडतें कीं, या सत्वशील वृत्तीस उत्तेजन देण्याच्या कामांत यद्यपि

स्त्रियांचें साहाय्य एकंदरींत महत्त्वाचें आहे, तथापि, विशेष उदाहरणावरून व या वृत्तीला जी दिशा त्या देतात तिच्यावरून पाहतां त्यांचें करणें प्रायः उपायकारक होत नसून उलटें अपायकारक मात्र होतें, असें आढळतें. विशेषेंकरून परोपकाराच्या व दानधर्माच्या कामांत हा प्रकार घडत असल्याचें दिसतें. धर्मप्रसार करणें व दानधर्म करणें हे दोन भाग मुख्यत्वेंकरून स्त्रियांनीं उचलले आहेत. स्वदेशांत राहून धर्मप्रसार करण्याचा यत्न करणें, ह्मणजे धर्मसंबंधानें अधिक द्वेषबुद्धि किंवा वैरभाव वाढविणें आहे, असें मी समजतों. परदेशांत धर्मप्रसार करण्याची खटपट करणें, ह्मणजे कांहीं तरी सांपडेल ती शिकार पकडणें व अंधळ्यासारखें वर्तन करणें यापेक्षां दुसरें कांहीं नाहीं. दुसऱ्या मनुष्यास कोणत्या तरी साधनांनीं मारून मुटकून आपल्या धर्मांत ओढूं पाहण्यापासून वारंवार जे भयंकर व घातक परिणाम होतात, ते, एक तर अशा धर्मप्रसारकांस समजत नाहींत, असें ह्मटलें पाहिजे; किंवा समजत असूनही बुद्धिपुरस्सर त्यांजकडे ते दुर्लक्ष करितात, असें ह्मटलें पाहिजे. वास्तविक पहातां, मुळचा चांगला हेतु तर सिद्ध होत नाहींच. परंतु, सर्व प्रकारें माणसाचा सत्यनाश होतो, असें मात्र या धर्मप्रसाराच्या खटपटींत घडून येतें. त्याचप्रमाणें धर्मादायाच्या संबंधानेंही विचार केला तरी तसाच प्रकार घडतो. धर्म घेणाऱ्या प्रत्यक्ष व्यक्तीवर घडणारे परिणाम व समाजाच्या एकंदर हिताच्या संबंधानें घडणारे परिणाम पाहूं जातां, दोहोंमध्यें अत्यंत विरोध मात्र दिसतो. हा प्रभाव स्त्रियांस ज्याप्रकारचें शिक्षण मिळतें त्याचा आहे. त्या शिक्षणानें त्यांच्या बुद्धीवर व्हावे तसे संस्कार घडत नाहींत व त्यांची विचारशक्ति वाढत नाहीं. तर फक्त त्यांच्या वृत्ति, त्यांचे मनोभाव किंवा त्यांचें अंतःकरण यांजवर प्रत्यक्ष घडणाऱ्या परिणामाकडे पहाण्याची मात्र संवय त्यांस लागते. परंतु,

व्यक्तिसमूहावर घडून येणारे दूरचे परिणाम ध्यानांत आणण्याची संवय त्यांस मुळींच लागत नाहीं. त्यांच्या सदय अंतःकरणास, त्यांच्या अनुकंपाबुद्धीस ज्या धर्मकृत्याचा किंवा परोपकाराचा प्रकार पसंत वाटतो, त्याचे अखेरचे परिणाम वाईट असतात, त्याचें पर्यवसान अपायकारक असतें, ही गोष्ट त्यांस कळत नाहीं. आणि कळली तरी ती कबूल करण्यास त्या नाखुश असतात. हा निव्वळ अल्पदृष्टीचा व वेडेपणाचा दानधर्माचा प्रकार दिवसानुदिवस फारच माजत चालला आहे, ही खरोखर दुःखाची गोष्ट आहे. आपली उपजीविका आपण करणें, आपल्या जिवाची काळजी आपण घेणें हें प्राणिमात्राचें मुख्य कर्तव्य आहे. हें कर्तव्य ज्याचें त्यानें करावयाचें. तें त्याच्याकरितां आपण करणें, त्याच्या कर्मानुसार त्याला वाईट फळें प्राप्त होऊन तीं त्यास भोगण्याचा प्रसंग आला असतां मध्यंतरीं आपण पडणें—अशा या वर्तनाचा एकंदर परिणाम चांगला होतो काय ? मुळींच नाहीं. स्वाभिमान-बुद्धि, स्वपराक्रम, आत्मनिग्रह, हे गुण प्रत्येक व्यक्तीच्या व त्याचप्रमाणें समाजाच्या उन्नतीस व उत्कर्षास अत्यंत अवश्य आहेत. परंतु या दानधर्माच्या प्रकारानें त्या गुणांचा मुख्य पायाच खचतो. त्या गुणांचा अगदीं बींमोडच होतो, असें ह्मटलें तरी चालेल. मनुष्याच्या ठायीं परोपकार-बुद्धि नसावी असें आमचें ह्मणणें नाहीं. अवश्य असावी. परंतु अपात्रीं दानामुळें त्या साधनसंपत्तीचा व्यर्थ नाश होतो. कारण, उपकार करण्यास जावें तों वस्तुतः अपकार होतो. चांगलें करण्यास ह्मणून जावें तों आपल्या हातून पर्यवसानीं वाईट अशी गोष्ट घडून येते, याचा विचार होत नाहीं. या धर्मादायाच्या बाबतींत विशेषेंकरून स्त्रियांनीं हजारों रुपये दिलेले असतात. आणि अशा या धर्मादायास स्त्रियांकडूनच फार प्रोत्साहन मिळतें. दानधर्माच्या कारखान्यांची व्यवस्था जर

प्रत्यक्ष स्त्रियांच्या हातांत असती, तर त्यांच्याकडून ही चूक झाली नसती. कारण, प्रत्यक्ष त्यांच्या समोर घडून येणाऱ्या गोष्टी त्यांच्या तेव्हांच ध्यानांत येतात. ज्या माणसांचा व त्यांचा निकट संबंध असतो, त्यांचीं मनें व त्यांचे हृद्गत विचार त्यांस तेव्हांच कळतात. फार काय—या गुणांत त्या पुरुषांस खचित मागें टाकतात असें आढळतें. तेव्हां, कधीं कधीं असें घडतें कीं, सार्वजनिक धर्मादायाच्या कामांची व्यवस्था ज्या स्त्रियांकडे सोंपविण्यांत येते, त्यांच्या ध्यानांत अपात्रीं दानापासून होणारे अनिष्ट व अनीतिकारक परिणाम तेव्हांच येतात. फार काय, पुरुषजातीय अर्थशास्त्रज्ञांनीं त्या विषयाच्या संबंधानें त्या स्त्रियांपासून धडेच शिकावे अशी त्यांची योग्यता असते. परंतु ज्या स्त्रिया आपला पैसा दानधर्मांत घालतात व त्यांपासून होणारे दुर्धर परिणाम मात्र कधींही ज्यांच्या नजरेस येत नाहींत, त्यांना ते परिणाम अगोदर कळण्याचा कितपत संभव आहे बरें? एकंदर सामान्य स्त्रियांची जी स्थिति आहे, त्या स्थितींतच जी स्त्री जन्मास आली व त्या स्थितींतच जी तृप्त आहे, तिला स्वातंत्र्याची, स्वावलंबनाची व स्वपराक्रमाची कशी बरें किंमत कळावी? कारण, ती आपण स्वतांच जर स्वतंत्र नाहीं, स्वातंत्र्य व स्वावलंबन ह्मणजे काय, हें जर तिला कोणी शिकविलेंच नाहीं, प्रत्येक वस्तु आपणांस दुसऱ्यापासून प्राप्त व्हावी असाच आपला अधिकार आहे, असाच आपला दैवयोग आहे, अशी जर तिची समजूत करून दिली आहे, तर जी जी गोष्ट आपल्या स्वतांस उचित व योग्य ती ती गोष्ट गरीब लोकांस कां उचित व योग्य नसावी? असें तिला वाटतें. आपल्याहून जे थोर व श्रेष्ठ त्यांच्यापासून प्राप्त होणाऱ्या गोष्टींवरून तिची ‘ चांगल्या ’ची कल्पना झालेली असते. परंतु भिकारी लोक व गरीब लोक स्वतंत्र व बंधमुक्त असतात, आपण

स्वतंत्र व बंधमुक्त नाहीं, ही गोष्ट ती विसरते. भिकाऱ्यांना व गरीबांना अन्नवस्त्र वगैरे जें जें लागेल तें तें जर आपण त्यांस पुरविलें, त्यांचें त्यांनीं मिळविलें नाहीं, तर आपलें आपण मिळविण्याचे त्यांस कधींच भाग पाडितां येणार नाहीं. प्रत्येकानें आपली काळजी आपणच घेतली पाहिजे. प्रत्येकाची काळजी त्याची त्यानें न घेतां ती दुसऱ्यांनीं घेणें हें अशक्य आहे. स्वसंरक्षणास कांहीं तरी हेतु अवश्य पाहिजे. ज्यास शरीरसामर्थ्य असेल त्यानें आपण आपल्याच पराक्रमावर होतां होईल तोंपर्यंत अवलंबून रहाण्यास शिकलें पाहिजे. असें शिक्षण देणें हीच खरी दया व हाच खरा धर्म.

१२. या गोष्टींवरून, स्त्रियांस सामाजिक व राजकीय संबंधानें स्वातंत्र्य प्राप्त होऊन त्यांस वरिष्ठ प्रकारचें शिक्षण जर मिळालें, त्यांचीं मनें जर विस्तृत व विशाल झालीं, त्यांच्या मताचा दाब किंवा पगडा ज्या ज्या विषयांत व संबंधांत दिसून येतो त्या त्या विष-याची व त्या त्या संबंधाची व्यावहारिक माहिती त्यांस करून दिली, तर लोकमत बनविण्याच्या कामांत स्त्रियांचा जो भाग असतो तो भाग त्या किती चांगल्या रीतीनें करतील हें दिसून येईल. विशेषेंकरून प्रत्येक स्त्रीचें आपआपल्या कुटुंबांत जें वजन असतें, किंवा जी सत्ता असते, तिच्या द्वारानें आपल्या कुटुंबांत . पुष्कळ सुधारणा तिला करतां येणार आहे.

१३. मी लोकांस असें ह्मणतांना ऐकिलें आहे कीं,ज्या वर्गांतले किंवा ज्या जातींतले पुरुष जात्या मोहास किंवा इतर दुर्गुणास सहज वश हो-ण्यसारखे असतात, अशा वर्गांतील पुरुषास त्याची बायको व त्याचीं मुलें प्रामाणिकपणानें व सद्वर्तनानें वागण्यास भाग पडतात. कारण, एक तर बायकोचा पुरुषावर थोडा बहुत कां होईना—परंतु एक प्रकारचा दाब असतो. दुसरें असें कीं, आपल्या बायकापोरांचें बरें व्हावें,

असें त्याला वाटत असतें. ही गोष्ट खरी असेल. 'असेल' कां— वारंवार घडत असल्याचें आढळतें. असे पुरुष बहुधा मनाचे दुष्ट नसून मनानें दुर्बळ मात्र असतात. परंतु हा जो उपकारक परिणाम आहे, तो स्त्रीपुरुषांच्या समतावस्थेंतही कायम रहाणारा आहे. एवढेंच नव्हे तर त्यास उलटी अधिक बळकटी आणणारा आहे. कारण, स्त्रीच्या वजनाचा हा जो हितावह गुण आहे, त्याला स्त्रीच्या दास्याचीच अपेक्षा आहे असें नाहीं. मी तर असें ह्मणतों कीं, उलट स्त्रीपुरुषांचे हक्क सारखे मानिले असतां कमी दर्जाच्या पुरुषांमध्यें आपल्या सत्तेंत असणाऱ्या माणसाविषयीं जी अवहेलना करण्याची बुद्धि नेहमीं आढळते ती कमी होणार आहे. बायकोचा दाब किंवा बायकोचें वजन पुरुषाच्या मनावर असतें. त्याचा उपयोग इतकाच होतो कीं, देशांतील साधारण लोकांचीं जीं बरीं वाईट मतें असतात त्यापेक्षां अधिक निकृष्ट प्रकारचीं मतें नवऱ्याच्या डोक्यांत शिरण्यास प्रतिबंध होतो. परंतु त्या मतांपेक्षां अधिक चांगलीं मतें, किंवा अधिक उदात्त विचार नवऱ्याच्या डोक्यांत न शिरण्यासही तोच दाब कारणीभूत होतो. प्रत्येक पुरुषाची बायको ह्मणजे एक प्रकारें सामान्यलोकमताची व रूढ असलेल्या आचाराविचारांची साहाय्यकारिणीच होते. बुद्धिमत्तेनें आपल्याहून कमी अशा स्त्रीशीं ज्या पुरुषाचा विवाहसंबंध होतो त्या पुरुषास अशी स्त्री ह्मणजे आपल्या गळ्यांत एक सततचें लोढणेंच अडकावून घेतल्यासारखें होतें. कारण, लोकमतानें जो आचार विहित मानलेला असतो तदनुसार त्यास वागावें लागतें. अमुक प्रकारानें वागणें अधिक श्रेयस्कर आहे व योग्य आहे, अमुक रीतीनें वागलें असतां आपल्यास उन्नतावस्था प्राप्त होणार आहे, इत्यादि विचार त्याला बायकोमुळें एकीकडे ठेवावे लागतात. यामुळें त्याची सर्व महत्वाकांक्षा व्यर्थ होते. आणि अशा प्रकारची शृंखला ज्याच्या हाता-

पायांत अडकलेली असते त्यास स्वैर गति कोठली? उत्तम गुण प्राप्त करून घेणें, उत्तम विचारानुसार वर्तन करणें, हें त्यास सर्वथा अशक्य होतें. त्याचें मत एकंदर लोकांच्या मताहून जर भिन्न असलें, ज्या सत्याचा प्रकाश इतर जनांच्या अंतःकरणावर पडलेला नसतो, त्या सत्याचा प्रकाश याच्या आत्म्यावर पडलेला असला; अथवा, ज्या गोष्टी सामान्य लोक नुसत्या मुखानें मान्य करितात परंतु तदनुसार वर्तन करीत नाहींत, अशा गोष्टी त्याच्या मनांत वारंवार घोळत राहून त्याला जर वाटूं लागलें कीं, आपण आपल्या विचारानुसार वर्तन केलेंच पाहिजे, असें करणें हें आपलें उघड कर्तव्य आहे—तरी त्याचा काय उपयोग? कारण, विवाहपाशानें तो बद्ध झाल्यामुळें अशा प्रकारच्या त्याच्या सर्व इच्छा व त्याचे सर्व विचार निष्फळ होतात. मनुष्याची सदिच्छाप्रेरित स्वैरगति जर तेणेंकरून सर्वथा कुंठित होते तर लग्न करून घेणें ह्मणजे खरोखर गळ्यांत एक लोढणें बांधून घेण्यासारखें नव्हे काय? सुदैवानें त्याच्यासारखीच एखाद्यास सामान्यस्त्रियांपेक्षां विशिष्ट बुद्धीची स्त्री मिळाली तर ती गोष्ट निराळी. परंतु साधारण प्रकार आह्मीं वर निर्दिष्ट केल्याप्रमाणेंच असतो.

१४. प्रथमतः एक तर पुरुषांस लोकमताविरुद्ध वागल्यामुळें कांहीं तरी गैरसोय ही आपली सोसावीच लागते; कसा तरी स्वार्थाला चट्टा हा बसतोच व कोणत्या प्रकारचें तरी नुकसान सोसणें त्याच्या कपाळी येतें. मग तें नुकसान, समाजांत त्याचें जें वजन असतें, किंवा जी मानमान्यता असते तिच्या संबंधाचें असो, किंवा द्रव्यसंबंधाचें असो. फार काय, कदाचित् प्रत्यक्ष त्याच्या निर्वाहाच्या साधनावरच गदा येण्याचा संभव असतो. अशा प्रकारें हें नुकसान किंवा हानि, पुरुष आपण स्वतः सोसण्यास कबूल असतो. परंतु आपल्या कुटुंबाच्या माणसांवर अशी हानि सोसण्याचा प्रसंग आणण्याचा त्यास मोठाच

विचार पडतो. कुटुंबाचीं माणसें ह्मणजे अर्थात् त्याची बायको व त्याच्या मुली. कारण, आपल्या मुलांच्या संबंधानें नेहेमीं त्यास अशी आशा असते कीं, माझ्या विचारांप्रमाणेंच माझ्या मुलांचे विचार होतील, व चांगल्या कामाकरितां मी स्वतां ज्या गैरसोई किंवा अडचणी सोशीन, त्या माझे मुलगेही सोसतील. परंतु मुलींची गोष्ट निराळी असते. त्यांस चांगलीं स्थळें मिळणें हें त्यांच्या वर्तनावर अवलंबून असतें. त्याची बायको—त्या बिचारीला या अडचणी, या नडी, या गैरसोई ज्या हेतूच्या सिद्ध्यर्थ सोसाव्या लागणार त्यांची कल्पनाही होत नाहीं. आणि कदाचित् त्या नडी ती सोसण्यास तयार झालीच तर केवळ नवऱ्याच्या जिवाक-रितां व तो ह्मणतो ह्मणून होते. याच्या पलीकडे तिचा पल्लाच जात नाहीं. त्याला जो उल्हास, जो आनंद, जी धन्यता व कृतार्थता वाटण्याचा संभव असतो, त्या पैकीं त्याच्या बायकोला सहस्रांश मिळण्याचा संभव नसतो. मात्र ज्या गोष्टींवर किंवा ज्या सुखावर पाणी सोडण्यास तो तयार असतो, त्या गोष्टी व तीं सुखें तिचें सर्वस्व होऊन राहिलेलीं असतात. अशा प्रकारचा परिणाम आपल्या स्त्रीस भोगण्यास लाव-ण्यापूर्वीं कितीही स्वसुखनिरपेक्ष व उदार मनाचा पुरुष असला तरी तो बराच घोटाळ्यांत पडेल व मागें पुढें करील यांत काय नवल? प्रत्यक्ष प्रपंचांतील सुखाला व सोईला हरताळ लागला नाहीं आणि जरी फक्त लौकिकाला बाध येत असला, तरी देखील त्याच्या जिवाला जो एक प्रकारचा घोर लागून राहतो व त्याच्या मनास जी अस्वस्थता प्राप्त होते, ती कांहीं सामान्य नसते. ज्याला मुलेंबाळें आहेत व बायको आहे त्याला नेहमीं लौकिक संभाळून वागावें लागतें.* या प्रबल

*इंग्रजींत लोकमताला किंवा लौकिकाला "मिसेस् ग्रंडी" असें रूपक करून नांव दिलें आहे मुळांतील वाक्याचें शब्दशः भाषांतर केलें असतां असें होतें: "ज्याला बायको व मुलें आहेत त्यानें 'मिसेस् ग्रंडी' या शत्रुतुल्य बाईला आपलीं माणसें ओलिस दिलेलीं आहेत असें समजावें." इंग्लिश ग्रंथकारांनीं व कवींनीं या मिसेस ग्रंडी बाईचें विनोदा-

लौकिकाविषयीं पुरुष जरी स्वतः उदासीन असला व त्याची विशेष पर्वा करीत नसला, तरी त्याच्या बायकोला लौकिक संभाळणें हें अत्यंत महत्त्वाचें वाटत असतें. पुरुष स्वतांः लोकमताला जुमानणार नाहीं. आपल्या विचारांप्रमाणें ज्यांचे विचार आहेत ते तरी आपणांवर प्रसन्न आहेत एवढेंच समाधान मानून तो स्वस्थ राहील. परंतु, ज्या स्त्रियांचा व त्याचा संबंध आहे त्यांचें समाधान करण्यास त्यास जागाच नसते. जेणेंकरून समाज प्रसन्न राहील, जेणेंकरून लौकिक साधेल अशाच रीतीनें प्रत्येक नवऱ्याची बायको प्रायः आपलें वर्तन ठेवीत असते. निदान अशा प्रकारची तिची नेहमीं प्रवृत्ति असते. या गोष्टीच्या आधारानें स्त्रियांची कधीं कधीं निंदा करण्यांत येते. व अशा प्रकारची ही प्रवृत्ति, स्त्रियांचा स्वभाव किती भितरा व बालिश असतो हें दाखविते, असाही कोणी तर्क लढवितात. परंतु हें ह्मणणें खरोखर फारच अन्यायाचें आहे. जे गर्भश्रीमंत असतात, ज्यांस निर्वाहाकरितां कष्ट करावे लागत नाहींत, अशा लोकांमध्यें स्त्रीचें समग्र आयुष्य ह्मणजे एक नित्य-यज्ञच असतो. तिनें आपलें सर्वस्व समाजरूपी राक्षसास वाहिलेलें असतें. समाजाच्या दाबामुळें तिला आपल्या एकंदर नैसर्गिक प्रवृत्ति सतत दाबून ठेवाव्या लागतात. आणि समाजानें ठरविलेल्या धर्मानुसार चालण्यांत जी स्वातंत्र्याची आहुती तिला द्यावी लागते त्या सगळ्याची फलश्रुति काय तर लौकिक! लोकांत अब्रू राहणें व मानमान्यता राखणें! तिची अब्रू किंवा लौकिक व तिच्या नवऱ्याचा लौकिक यांचा अर्थात् समवाय-संबंध असतो. एक दुसऱ्यापासून निराळा करितांच येत नाहीं. तेव्हां, अशा प्रका-

---

त्मक वर्णन केलेलें कोठें कोठें आढळतें. त्यांत बहुधा ही बाई मोठी खट्याळ असून विलक्षण लहरी आहे; तिला प्रसन्न ठेवणें फारच कठीण आहे; ती मोठी बालिष्ट व जुलमी आहे; अशा अभिप्रायाचे उद्गार असतात.

रचा, प्राप्त करून घेण्यास व संभाळण्यास मोठा कठिण असा जो हा लौकिक, त्याची भरपूर किंमत देऊनही कांहीं एक विशेष किंवा वाजवी कारण नसतां (निदान तिच्या तरी तें ध्यानांत येत नाहीं) तो जर नष्ट होत असला, तर त्या बिचारीनें काय करावें? लौकिक संपादन करण्याच्या कामांत तिनें आपलें सर्व आयुष्य खर्च केलेलें असतें. आणखी, तिचा नवरा त्याच लौकिकाकरितां आपली लहर, आपला नुसता छंद, आपला निवळ विक्षिप्तपणा जर सोडून देत नाहीं, तर तिनें काय करावें? कारण, जग तर नवऱ्याच्या हटवादीपणास नुसता विक्षिप्तपणाच समजणार! त्याचें ह्मणणें किंवा करणें जगास मान्य नसतें. अशा स्थितींत त्याचे विचारास व वर्तनास त्याच्या बायकोप्रमाणेंच जगानें याहीपेक्षां वाईट ह्मटलें नाहीं तरी मूर्खपणाचा शिक्का दिलाच असें समजावें! कांहीं पुरुष फारच चांगले व खऱ्या अंतःकरणाचे असतात. अशा प्रकारच्या साधुवृत्तीच्या पुरुषांस वर सांगितलेल्या प्रकारामुळें फारच जाच सोसावा लागतो. तो कसा तें सांगतों. स्वतंत्र विचार करणाऱ्या व सुधारणा करणाऱ्या लोकांमध्यें विशेष मानमान्यता किंवा प्रतिष्ठा होण्यासारखें बुद्धि-सामर्थ्य जरी अशा पुरुषांच्या अंगीं नसलें, तरी त्यांचीं जीं कांहीं मतें झालेलीं असतात, तीं त्यांच्या स्वानुभवावरून व त्यांच्या मनाची खातरी होऊन झालेलीं असतात. यामुळें, आपल्या मतानुसार वर्तन करणें हें आपलें कर्तव्य कर्म आहे, असें ते समजतात. एवढेंच नव्हे तर आपलीं जीं काय मतें असतील तीं उघड बोलून दाखवून त्या मतांच्या मंडनार्थ व प्रसारार्थ जें कांहीं करावें लागेल, त्यांत आपला काळ, आपले श्रम व संपत्ति समर्पण करण्यास आपण बांधले गेलों आहों, असें ते मानतात. त्यांतून आणखी जर अशा पुरुषांची सामाजिक स्थिति यदाकदाचित् अशी असली कीं, ज्यांस लोक विशेष प्रतिष्ठित

किंवा संभावित समजतात, अशा माणसांचा समागम व परिचय करून घेण्याबद्दलचा त्यांचा हेतु निष्फळ होण्याचा प्रसंग असेल, तर अशा पुरुषांची अवस्था दया येण्यासारखी असते. कारण प्रतिष्ठित किंवा सभ्य गणलेल्या समाजांत त्यांचा प्रवेश व्हावयाचा, तो त्या पुरुषांविषयीं त्या समाजाची जी काय कल्पना असेल त्यावर अवलंबून असतो. आणि त्या पुरुषांचे आचारविचार वस्तुतः कितीही निर्मळ व निर्दोष असले तरी, ज्यांच्या हातांत समाजाचें सुकाणूं असतें व जे समाजाचे पुढारी असतात, त्यांस जर त्या पुरुषांचीं मतें व त्यांचें वर्तन नापसंत असेल तर त्या पुरुषांस समाजबाह्य रहाण्याचाच प्रसंग येतो. पुष्कळ बायकांची अशी एक चमत्कारिक समजुत असते (कीं, ही समजूत दहा गोष्टी घेतल्या तर त्यांपैकीं नऊ गोष्टींत अगदीं चुकीची असते) आपल्या शेजारीं पाजारीं जे मोठे व सभ्य ह्मणून मानलेले लोक असतात, ज्या लोकांशीं आपल्या दर्जापैकीं व आपल्या ओळखीचीं इतर माणसें मिळून मिसळून वागतात, त्याच लोकांत जर आपल्या नवऱ्याचीं धर्मविषयक मतें समजांत रूढ असलेल्या मतांहून भिन्न नसतीं, किंवा आपला नवरा राजकारणसंबंधानें सुधारक अशा नूतन पक्षामध्यें मिसळणारा आहे असा जर त्याचा लौकिक नसता, तर आपल्यालाही बरोबरीच्या नात्यानें मिळून मिसळून वागण्यास कांहीं एक अडचण पडली नसती! **जॉर्ज**ला (तिच्या नवऱ्याचें नांव) अमुक एक काम किंवा हुद्दा मिळत नाहीं, किंवा **क्यारोलीन**ला (तिच्या मुलीचें नांव) चांगलें स्थळ मिळत नाहीं; आपल्या दर्जाच्या इतर माणसांस जे मानमरातब मिळतात, त्यांचें जसें आदरातिथ्य होतें, त्या मानपानांस व आदरातिथ्यास इतर लोकांप्रमाणें आपणही सारखेच पात्र आहों असें असून ते आपणांस व आपल्या नवऱ्यास मिळत नाहींत. तात्पर्य,

सर्व विघ्नांचें कारण आपल्या नवऱ्याचीं मतें, असें तिला वाटत असतें! प्रत्येक घरामध्यें असा हा प्रकार जारीनें चालू असतां, बायकोनें कदाचित् आपले उद्गार बाहेर काढून दाखविले नाहींत तरी ते आंतल्याआंत धुमसत असतात! एकंदरींत साधारण लोकांची सभ्यता व योग्यता आज काल पाहूं जातां फारच कमी प्रतीची आढळते, यांत कांहीं नवल आहे काय?

१५. अनेक कामांत स्त्रिया अनाधिकारी ठरल्यामुळें स्त्रियांच्या शिक्षणांत व पुरुषांच्या शिक्षणांत व त्यांच्या वर्तनांत जो भेद उत्पन्न होतो, त्यापासून दुसरा एक फारच अपकारक परिणाम होतो त्याचाही विचार केला पाहिजे. विवाहित स्थितीची, किंवा वैवाहिक संबंधाची उत्तम कल्पना आहे ती अशी आहे कीं, विवाहपाशानें बद्ध झालेल्या स्त्रीपुरुषांच्या नैसर्गिक प्रवृत्ति, त्यांची अभिरुचि व त्यांचे विचार यांचें ऐक्य पाहिजे, भेद उपयोगाचा नाहीं. स्त्रियांच्या व पुरुषांच्या प्रस्तुत शिक्षणांत जो भेद दृष्टीस पडतो, तो अशा प्रकारच्या ऐक्यास अत्यंत प्रतिकूल आहे. परस्परांपासून अत्यंत भिन्न अशा माणसांचा अत्यंत निकट संबंध व स्नेह घडून येईल असें समजणें निवळ भ्रांति होय. विषमता किंवा विसदृशता प्रथम दर्शनीं आकर्षक होण्याचा संभव आहे. परंतु, दोन व्यक्तींचीं अंतःकरणें परस्परांस संलग्न करून ठेवण्याची जी शक्ति आहे, ती सादृश्याच्या ठिकाणीं आहे. दोन व्यक्तींमध्यें ज्या प्रमाणानें सारखेपणा अधिक असेल त्या प्रमाणानें परस्परांचे जीवांस सुख देण्याविषयीं त्या अधिक समर्थ होतात. जोंपर्यंत स्त्रियांत व पुरुषांत फार मोठा भेद राहील, तोंपर्यंत त्या भिन्नतेमुळें उत्पन्न होणारी जन्मभर बोकांडीं बसणारी जी कर्मकटकट ती टाळण्याकरितां स्वार्थपटु पुरुषांस, 'हम् करे सो कायदा' या न्यायास अनुसरून सर्व सत्ता आपल्याच हातांत ठेवण्याची गरज

भासते. कारण, तसें केल्याशिवाय प्रत्येक गोष्टीचा निकाल त्यांच्या मर्जीप्रमाणें व्हावा कसा? नेहेमीं लठ्ठालठ्ठी चालू रहाणार. ही ह्मणणार असें करावें, तो ह्मणणार तसें करावें! माणसें जर परस्परांपासून अगदीं भिन्न असलीं तर त्यांस खरोखर एकमेकांविषयीं अगत्य कसें वाटावें! पुष्कळ प्रसंगीं स्वकर्तव्याच्या संबंधानें मोठमोठ्या महत्वाच्या बाबतींत विवाहित माणसांत खराखरा मतभेद पडत असतो. आणि असा प्रकार जेथें घडतो, त्या ठिकाणच्या विवाहकल्पित ऐक्यांत कांहीं खरेपणा असतो काय? आणि हा प्रकार विरळा असतो, किंवा क्वचित् आढळतो, अशीही गोष्ट नाहीं. बहुधा घरोघर असतो ह्मटलें तरी चालेल. विशेषेंकरून ज्या घरच्या स्त्रींत कांहीं राम ह्मणून आहे, तिच्या घरांत हा प्रकार असावयाचाच. ख्रिस्तीधर्मांत **रोमन् कॉथलिक** ह्मणून एक जुना पंथ आहे. हा पंथ ज्या देशांत चालू आहे त्या देशांत आह्मीं वर सांगितलेली गोष्ट सर्वसाधारण असते. त्या देशांत नवराबायकोंत धर्मसंबंधानें हटकून मतभेद असावयाचाच. कारण, तिला मुख्य पाठिंबा धर्मोपदेशकाचा असतो. आणि धर्मोपदेशक सांगेल तें प्रमाण, अशी तिची समजूत लहानपणापासूनच करून दिलेली असते, किंवा तिच्या एकंदर शिक्षणामुळें ती तशी बनलेली असते. धर्माधिकारी सांगतील तो मार्ग खरा. उपासकांनीं मुकाट्यानें त्यांजवर श्रद्धा ठेऊन चालावें, त्यांच्याशीं वाद करूं नये. अशा प्रकारें आपला धर्माधिकार अप्रतिहतरीतीनें चालविण्याची संवय धर्मोपदेशकांस पडलेली असते. हें त्यांचें खूळ व बंड मोडून टाकण्याकरितां **प्रॉटेस्टन्ट** पंथाचे ग्रंथकर्ते, धर्मसंबंधानें व्यक्तिमात्रास विचार-स्वातंत्र्य पाहिजे अशा मताचें प्रतिपादन करून स्त्रियांच्या मनावर पाद्र्यांचा (धर्मोपदेशकांचा) जो पगडा असतो तो दूर करण्याकरितां, किंवा जें साम्राज्य असतें तें ढासळून टाकण्याकरितां, लेखरूप

शस्त्रांनीं नेहमीं युद्ध करीत असतात. त्यांतला मुख्य उद्देश, हें धर्मोपदेशकांचें साम्राज्य वाईट आहे, त्याचा नाश केला पाहिजे, असाच केवळ नसतो. तर, हे धर्मोपदेशक अज्ञान स्त्रियांस अनुकूळ करून घेऊन नवऱ्या विरुद्ध बंड उत्पन्न करितात, व नवऱ्याच्या अधिकाराशीं प्रतिस्पर्धा करणारा असा आपला अधिकार स्थापित करूं पाहतात, त्या असह्य अधिकाराचा पाडाव करावा एवढाच हेतु असतो.* **इंग्लंडांत** एखाद्या धर्मवेड्या बाईनें धर्माविषयीं उदासीन असणाऱ्या पुरुषाशीं लग्न केलें ह्मणजे वर निर्दिष्ट केलेल्या प्रकारचा मतभेद दृष्टीस पडतो. परंतु अशा प्रकारें उभयतांमध्यें लढा पडण्याचा प्रसंग टाळण्यास एक मोठी युक्ति करितात. ती कोणची—तर स्त्रीच्या बुद्धीस जितकी जडता येईल तितकी आणण्याचा प्रयत्न करितात! यामुळें असें होतें कीं, मागें सांगितलेली बाई **मिसेस ग्रंडी** (लोकप्रवृत्त किंवा लोकमत) हिचें चक्र जसें फिरेल तसें प्रत्येक स्त्रीचें मत फिरत असतें—तिला स्वतंत्र विचार किंवा स्वतंत्र मत ह्मणून कांहीं नाहीं—किंवा नवरा

---

* आमच्या इकडे या गोष्टी किती पण लागू पडतात? हा मजकूर वाचीत असतांना बहुश्रुत व आमच्या इकडील सुधारणेचा आधुनिक इतिहास ज्यांस थोडा बहुत तरी अवगत आहे अशा वाचकांच्या डोळ्यापुढें किती उदाहरणें उभीं राहतील! आमच्या इकडील भट, पुराणिक, जोशीबोवा, देवरुषी, वगैरे मंडळींचें आमच्या बायकांवर केवढें वजन असतें? फार काय, ते वारंवार असें देखील ह्मणून दाखवितात कीं, या कलियुगांत व भ्रष्ट काळांत धर्मबुद्धि कांहीं राहिली असेल तर बायकांतच! त्या बिचाऱ्या आहेत ह्मणून त्यांच्या कारणानें दान, धर्म, व्रतवैकल्यें, आचारविचार कांहीं चालून पुरुषांस मुक्ति मिळण्याचा डगीच दूरचा तरी संभव! त्याचप्रमाणें स्त्रीशिक्षण, विधवांचा पुनरुद्वाह, केशवपन, बालविवाहनिषेध, इत्यादि मोठमोठ्या विषयांच्या संबंधानें सुधारकपक्षीय स्त्रीपुरुषांमध्यें कसा मतभेद होऊन लढा पडतो, हें प्रस्तुतस्थळीं ध्यानीं आणण्यासारखें आहे. त्याचप्रमाणें, आमच्या इकडील गुर्जर मंडळींत होऊन गेलेला खऱ्या कळवळ्याचा, खऱ्या शौर्याचा, सुधारक, कैलासवासी **करसनदास मूळजी** यानें वल्लभ संप्रदायी स्वामीमहाराजांचे डोलारे कोर्टासमोर ओढून आणून धर्माच्या नांवावर होणारीं कृष्णकारस्थानें जगाच्या नजरेस कशीं पाडिलीं याचेंही स्मरण प्रस्तुतस्थळीं झाल्याशिवाय रहात नाहीं.

जीं मतें पसंत करण्यास सांगेल तींच मतें तिनें पसंत करावीं—अशाच प्रकारचें शिक्षण तिला मिळतें. आतां अशी कल्पना करूं कीं, धर्म संबंधानें, अथवा इतर महत्त्वाच्या विषयाच्या संबंधानें, नवऱ्याचा व तिचा मतभेद नसून केवळ रुचिभिन्नता आहे तर तीही त्या उभतांच्या दांपत्यसुखास विघातक होणारी आहे. स्त्रीपुरुषांमध्यें मूळचे किंवा प्रकृतिसिद्ध भेद कसेही असोत. ते शिक्षणभेदानें अधिक वाढविल्यापासून पुरुषांच्या विषयवासना कदाचित् वाढतील. परंतु खऱ्या वैवाहिक सुखाची वृद्धि त्यापासून खास होणार नाहीं. विवाहित स्त्रीपुरुषें सुशिक्षित, सभ्य व सुशील असल्यास फार झालें तर एकमेकांच्या आवडीनिवडीच्या आड एकमेक येणार नाहींत. तिला वाटेल तशी ती वागेल, याला वाटेल तसा हा वागेल! तिचा मार्ग निराळा याचा मार्ग निराळा! अशा रीतीनें परस्पर परस्परांस विरोध करणार नाहींत. परंतु, लग्न करावयाचें तें अशाच समजुतीनें काय? विवाहपाशानें माणसें बद्ध होण्यास सिद्ध होतात, त्यांनीं उभयतांनीं भिन्न मार्गांनीं वागावें, एकमेकांनीं एकमेकांच्या आवडीनिवडीच्या आड व वर्तनाच्या आड येऊं नये, एवढ्याच आशेवर होत असतात काय? तिच्या मनाचा ओढा एकीकडे व याच्या मनाचा ओढा दुसरीकडे, अशा या प्रवृत्तिभेदामुळें व रुचिवैचित्र्यामुळें त्यांच्या इच्छाही अर्थात् भिन्न होतील. आणि असें झालें ह्मणजे, उघडच गृहव्यवस्थेच्या संबंधानें जे जे प्रश्न उत्पन्न होतील त्या त्या प्रश्नांचा समाधानकारक निकाल लागण्यास मारामार पडणार. आतां केवळ ममत्वामुळें, किंवा स्वकर्तव्य जाणून, असा लढा पडण्याचे प्रसंगीं तिनें आत्मनिग्रह केला तर ती गोष्ट निराळी. परंतु सामान्यतः असें घडत असतें कीं, ज्यामाणसांचा परिचय तिला करावासा वाटेल तीं माणसें त्याला नकोशीं असतात. याला हवींशीं वाटतात तीं तिला नकोशीं असतात. त्या दोघांपैकीं प्रत्येकाला आपल्या आवडीनिवडी-

प्रमाणें ज्या माणसांच्या आवडीनिवडी असतील त्या माणसांशींच सहवास करावा असें वाटत असतें. यामुळें, एकाला जीं माणसें प्रिय असतील त्याविषयीं दुसरा उदासीन असणार, किंबहुना त्यास खरोखर तीं माणसें अप्रियही वाटतील. असें असून उभयतांच्याही स्नेहांतलीं अशीं कांहीं तरी माणसें असणारच! पंधरावा लुई राजा होऊन गेला, त्या वेळीं स्त्रीपुरुषांचा राहण्याचा प्रकार जसा होता तसा हल्लीं नाहीं. ह्मणजे, विवाहित माणसें एकाच घरांत निरनिराळ्या भागांत रहात नाहींत, किंवा त्यांस भेटण्याकरितां येणाऱ्या माणसांच्या निरनिराळ्या यादीही होत नाहींत.* आपल्या मुलांस शिक्षण द्यावयाचें किंवा वळण लावावयाचें तें कोणत्या प्रकारचें असावें या संबंधानें उभयतांचीं मतें भिन्न पडणार. त्यांच्या इच्छा निरनिराळ्या असणार. आपल्या आवडीनिवडीप्रमाणें व आचारविचाराप्रमाणेंच आपल्या मुलांचेही असावे, किंवा व्हावे, असें दोघांपैकीं प्रत्ये-

---

* फ्रान्सदेशांतील राजा पंधरावा लुई हा सन १७१० त जन्मला व सन १७७४ सालीं मरण पावला. ह्मणजे सुमारें दीडशें वर्षांपूर्वीं फ्रान्सदेशांत व त्याचप्रमाणें युरोपांतील इतर देशांत बंगाली लोकांच्या स्त्रियांप्रमाणें किंवा मुसलमानांच्या जनानखान्यांतील स्त्रीयांप्रमाणें युरोपियन स्त्रियांचीही स्थिति होती, असें दिसतें. निदान हल्लीं आह्मां महाराष्ट्रीयांच्या स्त्रियांप्रमाणें तरी खास होती, असें अनुमान निघतें. पुरुषांची बैठक निराळी, स्त्रियांची बैठक निराळी. पुरुषांस भेटण्यास येणारी माणसें बहुधा पुरुष जातीय असावयाचीं, व स्त्रियांस भेटण्यास येणारीं स्त्रीजातीय असावयाचीं. प्रायः यांनीं त्यांच्याशीं बोलण्याचें व त्यांनीं यांच्याशीं बोलण्याचें कारण नाहीं! असा हा प्रकार स्त्रियांच्या अशिक्षित स्थितींत इंग्लंड, फ्रान्स, स्पेन, पोर्तुगाल वगैरे यूरोपखंडांतील देशांतही दीडशें किंवा दोनशें वर्षांपूर्वीं होता, असें मानण्यास आधार दिसतो. आणि हें जर खरें असेल तर आमच्या लोकांनीं स्त्रियांच्या सुधारणेविषयीं उदासीन न राहतां इर्षा बाळगावी, असें अनुमान निघत नाहीं काय? इतर बाबतींत पाश्चिमात्यांनीं जशी सुधारणा केली तशी स्त्रियांच्या स्थितींतही केली. आणि सुधारणा किती हळू हळू होत असते ही गोष्ट ध्यानांत ठेविली असतां १५०–२०० वर्षांचा काल ह्मणजे थोडाच ह्मणण्यास हरकत नाहीं.

कास वाटणार. अशा स्थितींत फार झालें तर दोघांत तडजोड होऊन प्रत्येकाची अर्धी इच्छा तृप्त होणार. व प्रत्येकजण कसें तरी समाधान करून घेणार. बहुधा बायकोलाच हार जावें लागतें व मुकाट्या आपला पक्ष सोडून द्यावा लागतो. त्यामुळें तिच्या मनाला कधीं कधीं अत्यंत दुःख होतें. आणि तिच्या नवऱ्याचे जे हेतु व विचार असतात त्यांच्या विरुद्ध वर्तणूक, बुद्धिपूर्वक ह्मणा किंवा सहज ह्मणा, तिजकडून घडत असते.

१६. स्त्रियांच्या व पुरुषांच्या मनोवृत्तींत व अभिरुचींत भेद आढळतो हा केवळ शिक्षणभेदामुळें उत्पन्न झालेला असतो. आणि कोणत्याही काल्पनिक स्थितींत हें रुचिवैचित्र्य व हा मनोवृत्तीमधील भेद असणार नाहीं असें मानणें अत्यंत मूर्खपणाचें होणार आहे. परंतु, शिक्षणभेदामुळें हे भेद अधिक वाढतात आणि ते सर्वथा अपरिहार्य होऊन राहतात, हें ह्मणणें अयोग्य होईल असें मात्र वाटत नाहीं. हल्लींची शिक्षणपद्धति जोंपर्यंत आहे अशीच कायम राहील, तोंपर्यंत पुरुष व स्त्रिया यांचे हेतु अथवा आवडानिवडी यांची सांगड कधींच जमून येणार नाहीं. संसारांत उभयतांचा एक विचार, एखादी गोष्ट करावयाची तर दोघांचीही अनुकूलता, व न करावयाची तर दोघांचीही प्रतिकूलता हेंच वास्तविक ह्मटलें तर खऱ्या सख्याचें लक्षण होय. पण या आशेची नुसती कल्पनाही करणें दोघांस सोडून द्यावें लागतें. आतां एखाद्या पुरुषाला अशा प्रकारचें सख्य प्राप्त करून घ्यावयाचें असेल तर तसेंही होऊं शकेल. एखादी मठ्ठ, रेमीडोकी बायको जिला आवड नाहीं, नावड नाहीं, जिला स्वतःचा ह्मणून कांहीं विचार नाहीं, हें कर, तयारी, तें नको, हें कर, ह्मटलें तरीही बापडीची तयारीच ! अशा प्रकारची एखादी बायको केली ह्मणजे झालें ! पण कधीं कधीं हाही अदमास चुकण्याचा संभव असतो. एखादी स्त्री अशी मठ्ठ व मळमळीत असली ह्मणून ती

नेहमीं हुकुमांत राहीलच असा भरंवसा नसतो. बरें, कदाचित् राहिलीच, तर हा का खऱ्या लग्नाचा अर्थ ? तें आपलें कांहीं तरी! घरांत एखादी मोलकरीण ठेवली किंवा एखादी राख बाळगली तिच्या इतकीच सरासरी तिची योग्यता! आतां याच्या उलट पहा. ह्मणजे, उभयतांही समजूतदार व शहाणीं असलीं उभयतांही प्रेमपाशांनीं बद्ध झालेलीं असलीं, प्रथमपासूनच परस्परांच्या विचारांत व अभिरुचींत फारसा भेद नसला, कांहीं गोष्टी करण्यामध्यें उभयतांसही सारखाच आनंद घडून येण्याजोगे प्रसंग वारंवार येत असले, ह्मणजे ज्या गोष्टी प्रथम एकालाच आवडत होत्या त्याच गोष्टी एकाच्या सहवासानें दुसऱ्यालाही प्रिय होऊन प्रत्येकाच्या अंतस्थ गुणांचा विकास होतो आणि त्यांचे स्वभाव व त्यांच्या अभिरुचि एकच बनून जातात. हें जें घडतें तें अंशतः प्रत्येकाच्या स्वभावांत सहजगत्या फरक पडत गेल्याच्या योगानें घडतें. परंतु विशेषेंकरून दोघांचाही स्वभाव खरोखरी उदात्त बनून प्रत्येकाच्या अभिरुचीची व इतर गुणांची भर पडल्यामुळें घडत असतें. असा हा प्रकार रात्रंदिवस ज्यांना एकमेकांचा सहवास आहे अशा दोन मित्रांमध्यें अनेक प्रसंगीं आढळून येतो. हल्लीं स्त्रीपुरुषांस जें निरनिराळें शिक्षण व वळण मिळतें त्याच्या योगानें उत्तम जोडपें जुळवून आणणें जर सर्वथा अशक्य होऊन राहिलें नसतें तर विवाहित स्त्रीपुरुषांमध्येंही असा प्रकार बराच दृष्टीस पडता. हा शिक्षणभेद जर नाहींसा करून टाकला, ह्मणजे प्रस्तुत शिक्षणपद्धतींत बदल केला तर माणसामध्यें कितीही स्वाभाविक रुचिवैचित्र्य असलें तरी संसारांत जे मुख्य अर्थ साधावयाचे असतात, त्या संबंधानें उभयतांचें एकमत होण्याचा विशेष संभव आहे. आणि अशा तऱ्हेचे जे मोठमोठे अर्थ साधावयाचे असतात, त्या संबंधानें उभयतांचे सारखेच

परिश्रम सुरू असले; एकमेकांना एकमेक साहाय्य करीत असले; व एकमेकांना एकमेक प्रोत्साहन देत असले ह्मणजे बारीक सारीक व क्षुल्लक गोष्टींत जरी रुचिवैचित्र्य असलें तरी त्या कांहीं मोठ्या महत्वाच्या गोष्टी नाहींत असें समजून त्यांकडे ते बिलकूल लक्षच देणार नाहींत. हाच खऱ्या व चिरकालीन स्नेहाचा भक्कम पाया होय. आणि याच स्नेहाच्या योगानें प्रत्येकाला नेहमीं असें वाटत असतें कीं, दुसऱ्यापासून सुख प्राप्त करून घेण्यापेक्षां दुसऱ्याला सुख देणें यांतच कायतें सुख आहे.

१७. येथपर्यंत नवराबायको सारख्या स्वभावाचीं व सारख्या गुणांचीं नसल्यामुळें वैवाहिक सुखास कशी न्यूनता येते याचा विचार केला. परंतु, पुरुषांपेक्षां स्त्रिया बुद्धिमत्त्वादि गुणांत कमी असल्या तर याचा परिणाम फारच वाईट होत असतो. त्यांच्यामध्यें सारखे सारखे गुण नसले तरी चिंता नाहीं. कारण, एकांत जर कांहीं चांगले गुण असले तर दुसऱ्यांत दुसरे कांहीं चांगले गुण असतात. आणि असें असणें उभयतांच्याही फायद्याचें आहे. तेणेंकरून उभयतांची सुधारणा होत असते. एकमेकांत जे चांगले गुण असतात ते संपादन करण्याची उभयतांसही इच्छा उत्पन्न होऊन ते प्राप्त करून घेण्याविषयीं त्यांचे प्रयत्न नेहमीं चालू राहतात. आणि अशा प्रकारचे भिन्न भिन्न गुण असले ह्मणजे, त्यांच्या आवडीनिवडीमध्यें भेद न राहतां कालेंकरून त्या एक होतात. या गुणभेदामुळेंच एकमेक एकमेकांना अधिक प्रिय होण्याचा कदाचित् अधिक संभव असतो. परंतु, मानसिक शक्तीनें व शिक्षणानें जेव्हां एक दुसऱ्यापेक्षां कमी असतो व दुसऱ्याच्या साहाय्यानें त्याच्या बरोबरीला येण्याचा झटून यत्न करीत नाहीं, तेव्हां त्यां उभयतांपैकीं जो श्रेष्ठ असतो त्याच्या बुद्धीचा विकास होण्याला हा दोघांचा संबंध

सर्वस्वी बाधक होतो. म्हणजे, त्याची दिवसानुदिवस सुधारणा व्हावयाची ती न होतां नेहमीं पिछेहाटच होत असते. आणि, हा प्रकार विशेषेंकरून जीं नवराबायको साधारण बऱ्याच सुखासमाधानानें नांदत असतात त्यांमध्यें ज्यांचें नेहमीं खडाष्टकच असतें त्यांच्यापेक्षांही अधिक आढळून येतो. जें माणूस बुद्धीनें श्रेष्ठ असतें, त्या मनुष्यानें आपल्यापेक्षां कमी बुद्धीच्या माणसाचा सहवास केला व त्या एकट्याचाच सहवास व निकट संबंध रात्रंदिवस त्यानें ठेविला, तर त्याचें प्रायश्चित्त त्यास भोगावें लागतेंच लागतें! ज्या सहवासापासून मनुष्याची मानसिक उन्नति होत नाहीं, तो सहवास उलट त्याच्या अवनतीस कारणीभूत होत असतो. आणि ज्या मानानें तो सहवास दृढ होत जातो व तो संबंध निकट होत जातो, त्या मानानें त्या मनुष्यास अधिकाधिक नीचावस्था प्राप्त होत जाते. एखादा पुरुष खरोखर मोठा बुद्धिमान् असला तरी, त्याच्या नित्यसहवासांतील मनुष्यें जर बुद्धिमत्तेनें त्याच्यापेक्षां कमी असलीं तर बहुधा त्याच्या बुद्धीला क्षीणता प्राप्त होत जाते.* या कारणास्तव, नवऱ्यापेक्षां बुद्धिसा-

* सरकारी अधिकाराच्या संबंधानें आमच्या विश्वविद्यालयांतलि ज्या उपपदधारी तरुण मंडळीस कुग्रामवास करावा लागतो, त्यांस, निबंधकारांनीं दर्शविलेल्या या गोष्टीचा चांगला अनुभव येण्याचा संभव असतो. हे सरकारी अधिकारी शहाणपणाच्या व ज्ञानाच्या संबंधानें इतर सर्व लोकांपेक्षां सहजच श्रेष्ठ गणिले जातात. ‘निरस्तपादपे देशे परंडोऽपि द्रुमायते’ म्हणून जो एक न्याय संस्कृतांत सांगितला आहे तशी गत त्यांची होते. अशा मनुष्यास, मूळच्या भाषेंत “King of his company” म्हणजे आपल्या मंडळींतला ‘राजा’ असें म्हटलें आहे तें अगदीं बरोबर आहे. कचेरींत पहावें तों बहुधा लंगोट्यांशीं गांठ! घरीं दारीं शिपाई किंवा चाकर, फार झालें तर कचेरींतले फरडे कारकून, गांवांतील पाटील कुळकर्णी, एखाद दुसरा मारवाडी किंवा गुजराथी हिंगजिरें विकणारा वाणी, प्राचीन काळच्या तात्यापंतोजी पेक्षां ज्याची गति फार पुढें गेली नाहीं, असा शाळामास्तर, अशा सारख्या माणसांशीं रावसाहेबांचा नित्यसंबंध! मग त्यांच्या ज्ञानाच्या उत्कर्षास व त्यांच्या विचाराच्या उन्नतीस काय तोटा? पाठशाळा सुटल्यानंतर व ‘रुपेरी बेडी’ चा लाभ होऊन बराच कालपर्यंत तिचा परिचय

मर्थ्यानें जी स्त्री कमी असते तिच्या नित्यसहवासाचा अपायकारक परिणाम तिच्या नवऱ्यावर घडल्यावांचून रहात नाहीं. एकीकडून पहावें तों आपणच काय ते शहाणे, असें त्यास निरंतर भासत असतें. दुसरीकडून पहावें तों असा परिणाम होतो कीं, त्याच्यापेक्षां अधिक क्षुद्र, संकुचित व मर्यादित अशा बुद्धीच्या माणसाचे विचारांचा पगडा हळूहळू त्याच्या मनावर बसूं लागतो. येथपर्यंत ज्या अनिष्ट परिणामांचा निर्देश मीं केला, त्यांहूनही हा परिणाम वाईट समजला पाहिजे. कारण, तो दिवसानुदिवस जारीनें वाढत चालला आहे. पूर्वीपेक्षां हल्लीं संसाराची व्यवस्था फार निराळी होत चालली आहे. नित्यव्यवहारांत स्त्रीपुरुषांचा सहवास व समागम पूर्वीपेक्षां सांप्रत अधिक निकट होत चालला आहे. प्रस्तुतकालीं पुरुषांचा संबंध पुरुषांशीं कमी असून आपल्या कुटुंबाशींच अधिक असतो. पूर्वींच्याकाळीं पुरुषांचे बहुतेक व्यवसाय व करमणुकीचे प्रकार पुरुषमंडळींतच असत, व पुरुषांचीच संगति त्यांस अधिक असे. त्यांना आपल्या बायकांचा सहवास फारच थोडा असे. जसजसें सुधारणेचें पाऊल पुढें पडत गेलें तसतसे करमणुकीचे प्रकार व मार्ग बदलत गेले. पूर्वींच्याकाळीं बहुतेक पुरुष ज्या असभ्य व निंद्य प्रकारानें आपली करमणूक करून घेत व विश्रांतीचा काल घालवीत तो प्रकार प्रस्तुतच्या लोकमतास असंमत असल्यामुळें पुरुषांस आपल्या कुटुंबाशिवाय इतर विनोदस्थान व करमणुकीचें साधन राहिलें नाहीं. शिवाय, पतिपत्नींच्या अन्योन्यकर्तव्यसंबंधाची जी आधुनिक कल्पना, ती कल्पनाही पुर्वींच्या कल्पनेपेक्षां बरीच उदात्त असल्यामुळें आजकाल पुरुषाला खरें सुख प्राप्त करून घ्यावें अशी इच्छा असेल, व खरी करमणूक करून घेणें असेल, तर, आपलें

झाल्यावर या गृहस्थाची स्थिति, ज्यास शहरच्या अनेक ज्ञान-वर्धक संस्थांचा व संस्कारांचा फायदा मिळाला आहे, अशा मनुष्याच्या अवलोकनांत आली असतां त्यास ती खरोखर शोचनीय वाटली, तर त्यांत कांहीं आश्चर्य आहे काय ?

घर व आपल्या घरचीं माणसें यांजवरच त्यास विशेष अवलंबून राहावें लागतें. त्याचप्रमाणें, एकंदरीनें यद्यपि बरीच निराशेची स्थिति असली तरी, स्त्रियांच्या शिक्षणांत हळूहळू जी सुधारणा होत चालली आहे, तिजमुळें पुरुषांच्या आवडीनिवडी व पुरुषांचे विचार कांहीं अल्प अंशानें तरी स्त्रियांस कळूं लागून आपल्या नवऱ्याच्या खऱ्या सहचरी होण्यास त्या पात्र होत चालल्या आहेत.* असो.

---

* मिलसाहेबांनीं ही जी आपल्या काळच्या लोकस्थितीची व पूर्वींच्या काळच्या लोकस्थितीची तुलना केली आहे तशी, कांहीं अंशानें आपल्या इकडील लोकस्थितीची-ही करितां येईल. कुटुंब ह्मणजे जी आपल्याकडे कांहीं काळापूर्वींची कल्पना होती व जिच्यांत आईबाप, भाऊ, चुलते, चुलत भाऊ, व त्यांच्या बायका, इत्यादि आप्तसंबंधीं माणसांचा समावेश होत असे, ती कल्पना हळू हळू बदलत जाऊन कुटुंब ह्मणजे फक्त एक पुरुष, त्याची बायको व त्याचीं मुलें, असा अधिक संकुचित अर्थ समजण्यांत येऊं लागला आहे. आमच्या पूर्वींच्या करमणुकी ह्मणजे नाचतमाशे पहाणें, शृंगाररसानें ओतप्रोत भरलेल्या बीभत्स लावण्या ऐकणें, अशा प्रकारच्या होत्या. हे करमणुकीचे प्रकार हळू हळू नष्टप्राय होत चालले आहेत. निदान आमच्यापैकीं वरिष्ठ व सभ्य मानिलेल्या विद्यासंपन्न वर्गांतील पुरुषांस तरी हे करमणुकीचे प्रकार दिवसानुदिवस आवडत नाहींत, असें दिसतें. आतां त्यांच्या ऐवजीं कार्ड, बिझीक व 'सपीति' इत्यादि करमणुकींचें प्राबल्य होत चाललें आहे, हें आमच्या ध्यानांत नाहीं असें नाहीं! उच्च वर्गांतील स्त्रियांच्या संबंधानें पहातां साधारण लिहितां वाचतां येणें, वर्तमान पत्रांतून येणाऱ्या कांहीं कांहीं विषयांची माहिती स्वतां किंवा पुरुषांकडून करून घेणें, वगैरे थोडथोडी सुधारणा स्त्रियांत होत चालली आहे, ही गोष्ट नाकबूल कोण करणार आहे? अशा आणखीही कांहीं गोष्टी प्रस्तुत स्थळीं वाचकांनीं ध्यानांत आणण्यासारख्या आहेत.

प्रस्तुत संबंधानें सनातन धर्माभिमानी जगन्मान्य विदुषी मिसेस् आनी बेझंट हिच्या 'Ancient Ideals' (प्राचीन संस्था) नांवाच्या व्याख्यानांत "*Woman-hood*" (स्त्रिया) या विषयावर एक फार सुंदर व्याख्यान आहे. तें वाचकांनीं मुद्दाम वाचून पहावें. त्यांत खाली दिलेलें वाक्य महत्वाचें आहे तें आमच्या हिंदुस्थानांतील स्त्रियांच्या स्थितीस उद्देशून लिहिलें आहेः—Shut up into a narrow, lonely, unthinking life, left often superstitious rather than enlightened in their faith, they fail to influence men, for the man puts aside the opinion of women, generally thinking that it is not

एकंदरींत पहातां परिणाम असा घडतो कीं, प्रस्तुत रूढ असलेल्या प्रकारामुळें पुरुषाला ज्या मनुष्यापासून कांहींच ज्ञान प्राप्त होत नाहीं, अशा माणसाच्या सहवासांत कसें तरी समाधान मानून रहावें लागतें, व दुसऱ्यापासून आपली मानसिक उन्नति व्हावी अशी जी त्याची उत्कट इच्छा असते ती त्यास कशी बशी तृप्त करून घेणें भाग पडतें. पुरुषाच्या बरोबरीचें शिक्षण स्त्रीस नसल्यामुळें, व आपल्या बायकोच्या सहवासाशिवाय त्याला तर गत्यन्तर नाहीं, अशी चमत्कारिक स्थिति कालवशात् त्यास प्राप्त झाल्यामुळें एक नवेंच विघ्न उपस्थित झालें आहे. ज्यांच्या कल्पना व विचार आपल्याप्रमाणेंच उदात्त असन बुद्धि सामर्थ्यानें जे आपल्या बरोबरीचे आहेत, अशा मित्रांच्या समागमाचा त्याग करणें त्या बिचाऱ्याच्या कपाळीं येतें. आणि त्या समागमाच्या ऐवजीं अशा एका मित्राचा समागम किंवा सहवास त्यास प्राप्त होतो कीं, ज्यापासून त्याच्या मनाची उन्नति होत नाहीं, त्याच्या विचाराची गति कुंठित होते व मोठमोठे उद्योग हातीं घेण्यास त्यास जसें उत्तेजन मिळावें तसें मिळत नाहीं. आणि याप्रमाणें अनुभवही येतो. प्रायः असें आढळतें कीं, मोठे होतकरू व मोठी उमेद बाळगणारे तरुण गृहस्थ लग्न *केल्याबरोबर सर्व प्रकारें मानसिक उन्नतीला मुकतात.

---

worthy of consideration because of their lack of education". (पहा पृष्ठें १२७, १२८.)

यांतील सारांश एवढाच आहे कीं, स्त्रिया अज्ञान असल्यामुळें पुरुष त्यांच्या मतास कांहींच मान देत नाहींत.

* प्रसिद्ध सुधारक कै० **करसनदास मुळजी** यांनीं आपल्या "**इंग्लंडांतील प्रवास**" नामक ग्रंथांत इंग्रेज लोकांच्या लग्नसंबंधाची माहिती देत असतां असें लिहिलें आहे:—

"नंतर नवरा खिन्न होऊन आपल्या अविवाहित मित्रांना शेवटचा सलाम करितो. कारण, त्या दिवसापासून अविवाहित मित्रांस आपल्या घरीं बोलावणें करणें त्यास सोडून द्यावें लागतें."

आमच्या निबंधकारांनीं पुढें जो मजकूर लिहिला आहे, तो समजण्यास हें वर दिलेलें वाक्य उपयोगीं पडेल असें समजून आम्हीं त्याचा उतारा येथें दिला आहे.

त्यांची सर्व सुधारणा जेथल्या तेथेंच थबकते. त्यांचें पाऊल पुढें पडत नाहीं. आणि त्यामुळें अर्थात् त्याची पीछेहाट होते. बायकोनें जर नवऱ्याला पुढें ढकलला नाहीं, ह्मणजे त्याला पुढें ढकलण्या पुरती अक्कल जर तिच्यांत नसली, तर या राजश्रींना ती नेहमीं मागेंच खेंचित राहते. ज्या गोष्टींचें अगत्य, किंवा ज्या गोष्टीविषयींची आस्था तिला वाटत नाहीं, त्या विषयींची आस्था यालाही वाटत नाहींशी होते. ज्या कामांत ती मन घालीत नाहीं त्या कामांत हाही मन घालीत नाहीं. पूर्वीचे (ह्मणजे अर्थात् लग्न करण्याच्या पूर्वींचे) जे त्याचे मोठमोठे विचार असतात, ते चटसारे त्यास गुंडाळून ठेवावे लागतात. फार काय, त्या विचारांस जी त्याची मित्र मंडळी अनुकूल होती त्या मंडळीच्या सहवासाची त्यास इच्छाही होत नाहीं. अखेर त्यांचा सहवास त्यास अनिष्ट व दुःसह वाटूं लागून तो त्यांस मुद्दाम टाळूं लागतो. कारण, त्या मंडळींत तो गेला असतां आपली दुरवस्था, अथवा अधःपात त्याच्या ध्यानांत येऊन त्यास मोठी लाज वाटते. त्याच्या मनाच्या, त्याचप्रमाणें त्याच्या अंतःकरणाच्या सर्व उदात्त शक्ति लुप्तप्राय होतात. ह्मणजे, त्यांची व्यवसायप्रवृत्ति नष्टप्राय होते. हा जो त्याच्यांत बदल होतो तो, कुटुंबपाशापासून उत्पन्न होणाऱ्या नूतन व केवळ स्वार्थसाधक हेतूंस अनुलक्षूनच असतो. शेवटीं परिणाम असा होतो कीं, थोडक्याच वर्षांनीं बहुजनसमाजाचे जसे क्षुद्र विचार असतात, सामान्य मनुष्यें जशीं केवळ उदरंभर असतात, द्रव्यसंपादन करून होतां होईल तेवढी चैन मारून घ्यावी, यापलीकडे जशी त्यांची कल्पना जात नाहीं, त्यांतलाच हाही एक बनून राहतो. याच्यांत आणखी त्यांच्यांत कांहींच फरक रहात नाहीं.

१८. ज्यांचीं मनें सुसंस्कृत झालेलीं आहेत, ज्यांचे उद्देश व ज्यांचीं मतें एक आहेत, ज्यांच्यामध्यें उत्तम प्रकारची समता वास करीत

आहे; ह्मणजे, उभयतांही ग्राहकशक्तीनें व इतर मानसिक गुणांनीं सारखे असून शिवाय एकाचें एका गुणांत वर्चस्व असलें तर दुसऱ्याचें दुसऱ्या गुणांत असावें; अशा रीतीनें प्रत्येक दुसऱ्याच्या गुणांवर मोहित होऊन दोघेंही आनंद पावत आहेत; कांहीं वेळ एकानें मार्गदर्शक व्हावें, तर कांहीं वेळ दुसऱ्यानें व्हावें, अशा रीतीनें उभयतांही सुधारणेचा अथवा मानसिक उन्नतीचा मार्ग आक्रमण करित आहेत, व तेणेंकरून * परस्परांस सुख प्राप्ति होत

---

* प्रस्तुत स्थळीं उत्तर रामचरितांतील सीतादेवीस उद्देशून श्रीरामचंद्र व कुश यांच्या उक्तिः—

' अद्वैतं सुखदुःखयोरनुगुणं सर्वास्ववस्थासु य-
' द्विश्रामो हृदयस्य यत्र जरसा यस्मिन्नहार्योरसः
' कालेनावरणात्ययात्परिणते यत्स्नेहसारे स्थितं
' भद्रं प्रेम सुमानुषस्य कथमप्येकं हि तत् प्राप्यते ' (पहा अंक १)

क्व तावानानन्दो निरतिशयविश्रम्भबहुलः
क्व तेऽन्योन्यं यत्नाः क्व च नु गहनाः कौतुकरसाः
सुखे वा दुःखे वा क्व नु खलु तदैक्यं हृदययोः
\+ + + + + + + + + +

प्रकृत्यैव प्रिया सीता रामस्याऽसीन्महात्मनः
प्रियभावः स तु तया स्वगुणैरेव वर्धितः ।

तथैव रामः सीतायाः प्राणेभ्योऽपि प्रियोऽभवत्
हृदयं त्वेव जानाति प्रीतियोगं परस्परम् । (पहा अंक ६)

व रघुवंशांतील इंदुमतीस उद्देशून अजराजाची उक्तिः—

' गृहिणी सचिवो मिथः सखा
' प्रियशिष्या ललिते कलाविधौ '

या दोन उक्तींचें स्मरण झाल्यावरून त्या दिल्या आहेत. आणखीही अशा प्रकारच्या दांपत्यसंबंधाच्या अत्यन्त उदात्त कल्पना आमच्या प्राचीन काव्यग्रंथांतून बऱ्याच सांपडतील. त्या शोधून आमच्या निबंधकारांनीं वर दिलेली वैवाहिक संबंधाची जी उदात्त कल्पना, तिजशीं ताडून पहाण्याविषयीं आमच्या रसिक वाचकांस आह्मी शिफारस करितों.

आहे; अशा स्त्री पुरुषांचा विवाहसंबंध घडून येणें ह्मणजे काय, त्याचें वर्णन करण्याचा मी प्रयत्नच करित नाहीं. कारण, अशा विवाहसंबंधाची कल्पना ज्यांस करितां येईल, त्यांस त्या वर्णनाची गरजच नाहीं. आणि ज्यांना त्याची कल्पना करितां येणार नाहीं, त्यांना तें वर्णन आकाशांत भराऱ्या मारणाऱ्या सुधारकाच्या स्वप्नाप्रमाणें भासेल! परंतु मी अगदीं खात्रीनें सांगतों कीं, विवाहसंबंधाची जी अत्यन्त उदात्त कल्पना ती हीच. जीं मतें, ज्या रूढि, ज्या संस्था या कल्पनेविरुद्ध असतील, ज्यांचा झोंक याहून अन्य दिशेकडे असेल अशा सर्व रूढि, अशीं सर्व मतें, आणि अशा सर्व संस्था, कोणत्याही स्वरूपानें किंवा वेषानें पुढें येवोत, तीं सर्व मनुष्याच्या आद्य व वन्य स्थितीचीं अवशिष्ट चिन्हें आहेत, असें समजलें पाहिजे. सामाजिक संबंधापैकीं अत्यंत महत्वाचा जो हा वैवाहिक संबंध, त्याचें नियमन समतेच्या तत्वानें जेव्हां होईल, आणि जेव्हां प्रत्येक मनुष्यप्राणी अधिकारानें व विद्येनें आपली बरोबरी करणाऱ्या माणसाशीं अत्यंत ममतेनें व सानुकंपबुद्धीनें वागण्याला शिकेल, तेव्हांच मानवजातीच्या नैतिक सुधारणेस खरोखर आरंभ झाला, असें ह्मणतां येईल.

१९. येथपर्यंत, माणसें लिंगभेदानें कांहीं अधिकारांस अपात्र ठरतात व परवशतेस पात्र होतात, ही समजूत दूर झाली असतां, जगास जे फायदे होतील त्याचें निरूपण झालें. येथपर्यंत ज्या फायद्याच्या गोष्टी सांगितल्या त्यांत सारभूत अशा या दोनच गोष्टी आहेत. त्या कोणत्या तर विचारांचा व प्रवर्तक शक्तींचा जो सांठा त्यांत भर पडणें ही एक. आणि स्त्रीपुरुषांचा जो परस्परसंबंध त्यांत सुधारणा होणें, ही दुसरी. परंतु, सर्वांत महत्त्वाचा फायदा सांगावयाचा राहिला. तो हा कीं, मानव जातीपैकीं निम्या भागाचें दास्यविमोचन होऊन त्याच्या सुखांत मोठीच भर पडणार आहे. हा

फायदा ह्मणजे सामान्य नव्हे. दुसऱ्याच्या इच्छेप्रमाणें चालणें आणि आपल्या इच्छेप्रमाणें चालणें, अशा दोन प्रकारच्या स्थितींत फारच अंतर आहे. मनुष्यमात्राला पहिल्या प्रथम अन्न व वस्त्र या दोन गोष्टी अत्यंत अवश्यकतेच्या आहेत हें खरें. तथापि, या दोन गरजा भागल्या ह्मणजे त्या नंतर पहिली गरज ह्मटली तर स्वातंत्र्याची. जोंपर्यंत माणसें बेबंद असतात, तोंपर्यंत त्यांना अनियंत्रितस्वातंत्र्यांत, ह्मणजे, ज्या स्वातंत्र्यांत कोणत्याही प्रकारची आडकाठी नाहीं अशा स्वातंत्र्यांत, रहाण्याची इच्छा असते. परंतु कर्तव्यकर्म ह्मणजे काय, व सद्सद्विवेक–शक्तीची किती योग्यता आहे, हें जों जों मनुष्यांना कळूं लागतें तों तों त्या स्वातंत्र्याचा उपभोग घेत असतांना आपलें वर्तन या वरील दोन तत्त्वांस अनुसरून ठेवण्याविषयीं त्यांची प्रवृत्ति अधिकाधिक होत जाते. असें जरी असलें तरी, स्वातंत्र्याची इच्छा त्यांचीं कमी होते असें नाहीं. त्याचप्रमाणें, कर्तव्य व विचार-शक्ति या दोन मार्गदर्शक तत्त्वांच्या ऐवजीं दुसऱ्याची इच्छा हाच आपला कायदा असें धरून चालण्यास मनुष्यें कधींच राजी होत नसतात. उलट ज्या लोकांत विचारशक्ति विशेष वाढलेली असते, व ज्या लोकांत सामाजिककर्तव्याची कल्पना फार बलवत्तर असते, अशाच लोकांचा व्यक्ति-स्वातंत्र्याविषयीं विशेष कटाक्ष असतो. आणखी त्यांचें असें ह्मणणें असतें कीं, प्रत्येक व्यक्तीला स्वकर्तव्याच्या संबंधानें जें कांहीं वाटेल, व त्याच्या सद्सद्बुद्धीला जे कायदे व सामाजिक निर्बंध पसंत पडतील तदनुसार वागण्याची त्याला पूर्ण मुभा असली पाहिजे.

२०. व्यक्तिस्वातंत्र्य मनुष्याच्या सुखाला किती अवश्य आहे, हें ज्याला समजण्याची इच्छा असेल, त्यानें आपल्या सुखाच्या संबंधानें स्वातंत्र्याची किंमत आपण किती समजतों, या गोष्टीचा विचार अवश्य केला पाहिजे. कोणताही मनुष्य आपल्या स्वतःबद्दल विचार

करीत असला, व तोच मनुष्य दुसऱ्या लोकांविषयीं विचार करीत असला, तर या दोन प्रकारच्या विचारांत नेहेमीं पुष्कळ अंतर आढळतें. आह्मांस आमच्या इच्छेप्रमाणें वागण्यास स्वातंत्र्य नाहीं, आमच्या कामाची व्यवस्था आमच्या इच्छेनुसार होत नाहीं, अशी दुसऱ्यांची कुरकुर एखाद्या परक्या मनुष्यानें ऐकिली असतां तो त्यांस विचारतो, "कायहो बोवा, तुमचीं दुःखें व अडचणी आहेत तरी कोणकोणत्या? तुमचें खरोखर काय नुकसान झालें आहे? आणि तुह्मी आपल्या कामाची अव्यवस्था झाली आहे असें ह्मणतां ती कोणत्या बाबतींत?" आणि या प्रश्नाला त्याला योग्य व समर्पक वाटेल असें उत्तर मिळालें नाहीं, ह्मणजे तो त्यांच्या कुरकुरीकडे दुर्लक्ष करतो. मग तो ह्मणतो. 'या लोकांच्या तक्रारी विनाकारण व केवळ काल्पनिक आहेत. हे लोक असे आहेत कीं, त्यांच्याशीं कोणी कसाही न्यायानें व योग्य प्रकारानें वागला तरी त्यांचा संतोष ह्मणून व्हावयाचा नाहीं.' परंतु तोच मनुष्य आपल्या संबंधानें विचार करूं लागला असतां त्याचें पहाणें अगदीं निराळ्या दृष्टीचें असतें. ह्मणजे, प्रत्यक्ष जेव्हां त्याच्यावर प्रसंग येतो, त्या वेळेस, त्याचा कारभार पहाण्यास जर दुसऱ्या कोणाची योजना केली असली, व त्याचा कारभार कितीही जरी चोख व निर्दोष असला, तरी त्याला त्यापासून समाधान होत नाहीं. कारण, निर्णायक अधिकार त्याच्या हातांत नसणें, हेंच एक त्याला सर्वांत मोठें दुःख वाटत असतें. आपल्या कारभाराची अव्यवस्था होत आहे कीं काय, या प्रश्नांत तो मुळींच शिरत नाहीं. ही गोष्ट व्यक्तिमात्राची झाली. परंतु राष्ट्राचाही प्रकार तोच असतो. आपल्या स्वातंत्र्यावर पाणी सोडून आपल्याकरितां दुसरा जर कोणी आपला कारभार मोठ्या कुशळपणानें व नेकीनें करण्यास सिद्ध असेल, तर या

गोष्टीला कोणत्या स्वतंत्र देशांतील मनुष्य राजी होईल बरें? ज्या कारभारांत आपला मुळींच संबंध नाहीं, असा कारभार परके लोक उत्तम प्रकारानें चालवितील असें जरी त्यास वाटलें, तरी त्याच्या असेंही मनांत येईल कीं, सार्वजनिक कामें—मग तीं वेडीं वांकडीं कां होईनात—ज्यांचीं त्यांनीं चालविण्यांत एक प्रकारची नीति–संबंधाची जबाबदारी ज्याची त्याजवर राहून जो कांहीं एक चांगला परिणाम होत असतो, त्याचाही विचार अवश्य केला पाहिजे. तात्पर्य या मुद्याच्या संबंधानें जें कांहीं पुरुषांना वाटत असतें, तेंच स्त्रियांसही वाटतें, याविषयीं त्यांनीं खात्री बाळगावी. प्रसिद्ध **ग्रीक** इतिहासकार **हिरॉडोटस्** याच्या काळापासून तों आज कालपर्यंत, स्वराज्यापासून, अथवा अनियंत्रित शासन-पद्धतिपासून मनुष्याच्या मनावर घडणारे जे उदात्त संस्कार, मनुष्याच्या मानसिक शक्तींना प्राप्त होणारी जी तरतरी, मनुष्याच्या मनोविकारांना व बुद्धीला विषयभूत होणारे जे मोठ मोठे व उदात्त हेतु, स्वसुख-निरपेक्ष अशी सार्वजनिक हिताविषयींची आतुरता, व त्याजपासून उत्पन्न होणाऱ्या स्वकर्तव्यविषयक शांत व गंभीर अशा कल्पना, नीतिसंबंधानें, अध्यात्मसंबंधानें व सामाजिकसंबंधानें व्यक्तिमात्राच्या अंगीं प्रायः येणारी किंवा प्राप्त होणारी उदात्तता, वगैरे गोष्टी जशा पुरुषांच्या संबंधानें खऱ्या आहेत, तशा स्त्रियांच्या संबंधानेंही खऱ्या आहेत. या वर सांगितलेल्या गोष्टी व्यक्तिसुखाला अवश्य नाहींत काय? बालदशा सुटून यौवनदशा प्राप्त होण्याच्या प्रसंगीं, आपणावर प्रीति करणाऱ्या वडील माणसांच्या दाबांतून मुक्त होऊन पुरुषत्वाची जी प्रौढदशा, त्या दशेंत प्राप्त होणाऱ्या ज्या जबाबदाऱ्या, त्या अंगावर येत आहेत अशा प्रसंगीं, प्रत्येक पुरुषाला काय वाटत असतें, या गोष्टीचा ज्याचा त्यानेंच विचार करावा. अशी कल्पना करूं कीं, एखाद्याच्या डोक्यावर मोठा बोजा दिला

आहे, किंवा त्याला दोऱ्यांनीं जखडून टाकिलें आहे. अशा स्थितींत यद्यपि त्यास कांहीं विशेष शारीरिक दुःख होत नसलें, तथापि त्याची स्वैर गति कुंठित झाली असल्यामुळें त्यास चैन पडणार नाहीं हें उघड आहे. त्या स्थितींतून जर तो दैवयोगानें सुटला तर त्याला जें कांहीं वाटेल, त्याप्रमाणेंच स्वातंत्र्य प्राप्त झालेल्या प्रत्येक पुरुषास वाटत नाहीं काय? भार-मुक्त झाल्यावर त्यास विशेष हुशारी वाटून आपणांस जणूं पूर्वीं-पेक्षां दुप्पट ताकद आली आहे असें त्यास होत नाहीं काय? अशा स्थितीची इच्छा स्त्रियांस नसेल, असें पुरुष समजतात कीं काय? परंतु, हाच तर मोठा चमत्कार आहे कीं, ज्याचा त्याला आपल्या स्वतांचा मात्र अभिमान मोठ्या महत्वाचा वाटतो. त्यास जी कांहीं महती वाटते ती स्वतःच्या संबंधा पुरतीच. दुसऱ्याच्या संबंधाची गोष्ट असली ह्मणजे मग त्याला स्वाभिमान ह्मणजे काय तो कळतच नाहीं! मनुष्याच्या ठिकाणीं स्वाभाविक जे मनोविकार आहेत, त्यांपैकीं स्वाभिमानाचा अथवा स्वातंत्र्येच्छेचा आपल्या वर्तनावर फार मोठा परिणाम घडतो, असें जर कोणीं सांगूं लागला, तर तो त्याचें ह्मणणें ऐकत देखील नाहीं. याचें कारण कदाचित् असें असेल कीं, प्रत्येक पुरुषास आपल्या स्वतांच्या वर्तनावर स्वाभिमानापेक्षां इतर मनोविकारांचाच पगडा अधिक आहे, असें मानण्यांतच भूषण वाटत असतें. आणि स्वाभिमान व मानहानि या मनोविकारांचें आपल्यावर किती प्राबल्य असतें, ही गोष्ट बहुधा त्याच्या ध्यानांत येतच नाहीं. परंतु, आपण अशी पक्की खात्री बाळगावी कीं, या मनोवृत्तीचा पगडा स्त्रियांच्या मनावर थोडा असतो असें नाहीं. स्वाभिमानाची जी अत्यंत नैसर्गिक व सहज प्रवृत्ति ती दाबून ठेवण्याविषयींच त्यांना शिक्षण मिळालेलें असतें. तथापि, त्यांचें जें अंतस्थ स्वरूप तें तसेंच कायम राहून त्यांस निराळें

बाह्यस्वरूप प्राप्त होतें. ज्या मनुष्यांत तरतरी व धमक असते त्याला जर स्वातंत्र्य नसेल तर त्याचा प्रयत्न नेहमीं आपलें वर्चस्व दुसऱ्यावर व्हावें एतद्विषयीं असतो. आपली आपल्यावर सत्ता चालविण्यास मिळत नाहीं अशी स्थिति जर त्यास प्राप्त झाली तर दुसऱ्यास आपल्या कह्यांत ठेवण्याचा प्रयत्न मनुष्य करीत असतें. कोणत्याही मनुष्यप्राण्याच्या स्वातंत्र्याचा अपहार करून त्यास परावलंबी करून ठेवणें, ह्मणजे दुसऱ्याच्या इच्छेप्रमाणेंच वागण्यास त्यास भाग पाडणें होय. ज्या ठिकाणीं स्वातंत्र्याची आशा नाहीं, परंतु दुसऱ्यावर वर्चस्व ठेवण्याची आशा आहे, त्या ठिकाणीं दुसऱ्यावर वर्चस्व राखणें किंवा दुसऱ्यावर सत्ता चालविणें, एतद्विषयींच मनुष्याच्या मनांत फार प्रबल इच्छा उत्पन्न होते. ज्यांचीं कामें त्यांस करूं न देतां त्यांत दुसरे ढवळाढवळ करूं लागले तर तीं माणसें त्यांच्यांत कांहीं राम असल्यास त्या गोष्टीचा प्रतिकार करितात, व उलट दुसऱ्याच्या कामांत तीं आपला हात शिरकावून आपले हेतु सिद्ध करून घेतात. आणि या कारणामुळेंच स्त्रियांना नट्टापट्टा करावासा वाटतो. शरीरसौंदर्य व वस्त्रालंकार यांची विलक्षण हाव त्यांस सुटते. आणि त्यापासून द्रव्यनाश, अनीति वगैरे अपाय संसारांत उत्पन्न होतात. स्वातंत्र्याची इच्छा व अधिकाराची इच्छा (ह्मणजे अर्थात् दुसऱ्यावर आपली सत्ता असावी, आपणांस वाटेल तसें दुसऱ्यांस वागवितां यावें एतद्विषयीं इच्छा) या दोन इच्छांमध्यें निरंतर विरोधभाव असतो. या दोघांचें नेहमीं वांकडें असतें. ज्या ठिकाणीं स्वातंत्र्य मुळींच नसतें त्या ठिकाणीं सत्तेचा अभिलाष फार उत्पन्न होतो. बऱ्या वाईटाचा विचार एकीकडे ठेवून दुसऱ्यावर आपला पगडा जेणेंकरून बसेल अशी कांहीं तरी युक्ति काढण्याची इच्छा प्रबल होते. दुसऱ्यावर सत्ता चालविण्याची (ह्मणजे दुसऱ्यास परतंत्र करण्याची) इच्छा, ही

मनुष्य जातीस खरोखर हीनत्व आणणारी व नीतिभ्रष्ट करणारी आहे. प्रत्येक व्यक्तीचें सत्तेशिवाय चालतें, अशी स्थिति जेव्हां येईल तेव्हांच ही दुष्ट प्रवृत्ति नष्ट होईल. आणि सत्तेशिवाय चालतें असें केव्हां होईल, तर आपापल्या कामांत प्रत्येक व्यक्तीला पूर्ण स्वातंत्र्य असणें, एकानें दुसऱ्याच्या आड कधींही न येणें, हें तत्त्व जेव्हां स्थापित होईल तेव्हां.

२१. आपापल्या मानसिक शक्तींचा ओघ पाहिजे त्या विषयाकडे लावितां येण्याची मुभा असणें, ही गोष्ट व्यक्तिसुखास साधनीभूत होत असते. त्याचप्रमाणें, त्या मानसिक शक्तींची स्वैरगति निरुद्ध झाली, ज्याला ज्या कामाची हौस तें काम करूं देण्याचा त्याला प्रतिबंध केला, तर ही गोष्ट त्याच्या खऱ्या सुखाच्या आड येते. कारण, मनुष्यमात्रास स्वाभिमान अथवा स्वप्रतिष्ठा स्वभावतःच चिकटलेली आहे. अर्थात् स्वाभिमानानें स्त्रियांसही सोडलें नाहीं. व्याधि, दारिद्र्य व पापकर्म हीं नेहेमीं मनुष्याच्या सुखाला विघातक होतातच. परंतु, या तिन्हींचाही जरी अभाव असला तरी, ह्मणजे आरोग्य आहे, संपत्ति आहे, पुण्यांश आहे, वर्तन शुद्ध आहे, तथापि आपल्या प्रखर अशा मानसिक शक्तींच्या व्यापारास योग्य स्थळ नाहीं, तर यासारखी मनुष्याच्या सुखाला मोठी विघातक दुसरी गोष्ट नाहीं. ज्या स्त्रियांच्या मागें कुटुंबाचा व्याप असतो, (तोही जोंपर्यंत कायम असतो तोंपर्यंत) त्यांच्या मानसिक शक्तींना तो व्याप पुरा होतो. दुसऱ्या व्यापाची गरज लागत नाहीं. परंतु ज्या स्त्रियांचीं मुलें मृत्यूनें हिरावून नेलीं असतील, अथवा त्यांजपासून दूर कोठें जाऊन पडलीं असतील, किंवा त्यांचीं लग्नें होऊन तीं स्वतंत्र बिऱ्हाड करून राहिलीं असतील, अशा स्त्रियांनीं काय करावें? त्यांना कांहीं तरी व्याप पाहिजे कीं नको? ज्या पुरुषांचें सर्व आयुष्य उद्योगधंद्यांत गेलें असे पुरुष, जो

थोडा द्रव्यसंचय त्यांनीं केला असेल त्याजवर अवशिष्ट राहिलेलें आयुष्य खुशाल आनंदानें विश्रांतींत घालवूं, अशा आशेनें उद्योग धंदा सोडून देतात. परंतु पुढें थोडक्याच काळांत, जुन्या व्यवसायांच्या ऐवजीं कांहीं नवीन व उत्साहजनक असे व्यवसाय करण्याचें सामर्थ्य त्यांचें अंगीं नसल्यामुळें त्यांचें तें निरुद्योगी आयुष्य त्यांस कंटाळवाणें होऊन त्यांचे ठायीं निरुत्साह व उदासीनता उत्पन्न होतात व ते अकालींच निजधामास जातात. अशीं शेंकडों उदाहरणें आढळतात. असें आहे तरी, बिचाऱ्या भाविक व सर्वथा योग्य अशा पुष्कळ स्त्रियांची स्थिति अगदीं पुरुषांप्रमाणेंच असतां त्यांचा मात्र कोणी विचार करीत नाहीं. समाजाच्या ऋणांतून जरी त्या मुक्त झाल्या, संसार केला, मुलाबाळांची रात्रंदिवस काळजी वाहिली, पोरींना नवरे मिळाले, सुना घरीं आल्या, व्यवस्था पहाण्याला जोंपर्यंत घर होतें तोंपर्यंत घरची व्यवस्था त्यांनीं पाहिली, शेवटीं जो एकच व्याप त्यांच्यामागें होता, जो एकच व्यवसाय त्या शिकल्या होत्या, तोही सुटला. मग त्यांनीं काय करावें? काम करण्याची धमक किंवा कुवत तर अद्याप अंगांत कायम आहे. पण उद्योग नाहीं. अशी त्यांची स्थिति होते. कदाचित् तिच्या एखाद्या लेंकीनें किंवा सुनेनें आपल्या नवीन थाटलेल्या संसाराची व्यवस्था पाहाण्याकरितां तिची नेमणूक केलीच तर तिचें मोठें नशीब! स्त्रियांचें सामाजिक कर्तव्य ह्मणून जगानें जो व्याप त्या बिचाऱ्यांच्या मागें लावून दिलेला असतो, तो पतकरून ज्यांनीं आपलें कर्तव्य इमानें इतबारें बजाविलें, त्यांच्या वृद्धदशेंत त्यांची अशी अवस्था व्हावी हें त्यांचें दुर्भाग्यच नव्हे काय? अशा स्त्रियांना व ज्या स्त्रियांच्या मागें विवाह न झाल्यामुळें, संसाराचा पाश लागला नाहीं, अथवा विवाह होऊन ज्यांस अपत्य झालें नाहीं, किंवा ज्यांचे पति मृत होऊन ज्यांनीं नवीन संबंध केला नाहीं—त्यांपैकीं पुष्कळ स्त्रिया योग्य व्यवसायाच्या

अभावामुळें व त्यांच्या प्रवर्तक शक्तींचा विकास न होऊं दिल्यामुळें आपापल्या ठिकाणीं रात्रंदिवस झुरत असतात व आपलें कंटाळवाणें आयुष्य कसें तरी लोटीत असतात—अशा स्त्रियांचें मुख्य कर्तव्य म्हटलें म्हणजे बहुधा दानधर्म करणें व हरि हरि करीत बसणें! अशा स्त्रियांचा धर्म म्हणजे व्रत वैकल्यें करणें. प्रवृत्तिमार्गापेक्षां प्रायः निवृत्तिमार्गाचाच भाग त्यांत अधिक असतो.* प्रवृत्तिमार्गा-पैकीं कदाचित् दान करणें एवढाच प्रकार धरितां येईल. दानध-र्माच्या कामांत स्त्रिया जात्या फारच दक्ष असतात, हें खरें. परंतु धर्मकृत्यांची व्यवस्था योग्य प्रकारें करितां यावी, दानसंबंधानें युक्ता-युक्त व पात्रापात्र विचार करण्याचें सामर्थ्य यावें, दानाच्या योगानें

---

* प्रस्तुत स्थळीं आमच्या इकडील गतभर्तृकांची आठवण वाचकांस झाल्याशिवाय रहाणार नाहीं. आमच्या इकडील स्त्रियांपैकीं सौभाग्यवती असल्यास बहुधा वृद्धपणीं त्यांच्या मागें व्रतवैकल्यांचा लकडा लागलेला असतो. विधवा असल्यास तरुण व वृद्ध अशा दोन्ही अवस्थेंतील स्त्रिया या व्रतवैकल्याच्या सपाट्यांत सांपडतात. एकदा बिचा-रीचा पति मृत झाला कीं, 'हें करूं नको, तें करूं नको, हें खाऊं नको, तें नेसूं नको, इथे बसूं नको, तिथे जाऊं नको' असा नको नकोचाच धर्म तिच्या मागें लागतो. त्यामुळें कित्येकांना आपला जीवही नको नकोसा होत असेल! विधवा स्त्रियांचीं दुःखें वर्णन करण्याचें एक तर हें स्थळ नाहीं. आणि दुसरें आजपर्यंत रा. सा. कट्टी यांच्या-सारख्या सदय अंतःकरणाच्या व कट्या लेखणी बहाद्दरांनीं या कामीं आपली लेखणी झिज-विली परंतु आमच्या कठोर हृदयांच्या व मठ्ठ झालेल्या लोकांच्या बुद्धिमंदिरांत त्यांच्या शब्दांचा प्रवेश होईल तेव्हांना! आमच्याकडे असे एकेक 'महामहोपाध्याय' आहेत कीं त्यांना 'स्त्रियांचें मुंडन पाहून दुःख होत नाहीं,' 'स्त्रियांना मुख्य अलंकार काय ते केश आहेत' असें वाटत नाहीं, तर उलट असें वाटतें कीं, स्त्रियांचें मुंडन जर न केलें तर 'यथेच्छ विहार करणाऱ्या लोकांना' लागलींच 'मोकळीक' देण्यासारखें होईल! (पहा केसरी ता. १७ डिसेंबर १८८९). केवळ शब्दपांडित्यांत व मीमांसेच्या पोकळ 'घटपटादि खटपटींत व शुष्क वादांत ज्यांचें आयुष्य गेलें व जुन्या समजुतीचीं पुटेंचीं पुटें बसून ज्यांचीं हृदयें व ज्यांच्या बुद्धि नूतन संस्काराला सर्वथा अस्पृश्य व अपात्र झालीं आहेत, अशा लोकांशीं वाद करण्याचें सोडून द्यावें, यांतच अधिक शहाणपणा आहे, असें बऱ्याच समंजस लोकांस वाटूं लागलें आहे.

विपरीत परिणाम अथवा अपाय होऊं नये, असा हेतु असेल तर, एखाद्या चतुर कारभाऱ्यास जें शिक्षण, जी अनेक प्रकारची सिद्धता, जें ज्ञान व विचारशक्ति वगैरे गुण लागतात, त्याच गुणांची अपेक्षा धर्मकृत्यांची व्यवस्था पहाणाऱ्या स्त्रियांसही असते. धर्मकृत्यांची व्यवस्था ज्यास उत्तम प्रकारें करितां येते, त्याच्या अंगीं राज्यकारभारास लागणारे बहुतेक गुण आहेतच, असें समजावें. या व दुसऱ्या अनेक संबंधानें (विशेषेंकरून बालकांच्या शिक्षणसंबंधानें) स्त्रियांच्या मागें जीं कर्तव्यें लावून दिलीं आहेत, तीं कर्तव्यें त्यांजकडून योग्य रीतीनें होत नाहींत. याचें कारण जीं कामें करण्याविषयीं त्यांस प्रतिबंध आहे (आणि या प्रतिबंधामुळें समाजाचें खरोखर फार मोठें नुकसान होत आहे) तीं कामें करण्याचें सामर्थ्य अंगीं आणणाऱ्या शिक्षणाचा पूर्ण अभाव. ह्मणजे, तीं त्यांस चांगलीं करितां येतील, अशा प्रकारचें शिक्षण नसणें. प्रस्तुत ठिकाणीं एका गोष्टीचा उल्लेख केल्याशिवाय मला रहावत नाहीं. काय चमत्कार! स्त्रिया अमुक कामास अनधिकारी किंवा अपात्र आहेत, असें प्रतिपादन करणारे लोक, प्रतिष्ठितपणानें व सरळ मार्गानें वाद करण्याचें सोडून देऊन, जी गोष्ट त्यांस आवडत नाहीं तिची नुसती टर उडविण्याचा व नुसता उपहास करण्याचा मार्ग स्वीकारितात! स्त्रियांची कर्तृत्वशक्ति व त्यांचा पोक्त उपदेश यांचा राजकारणांत कधीं कधीं फार उपयोग होण्याचा संभव आहे, अशी एखाद्यानें सूचना केल्याबरोबर, ही थट्टेखोर व विनोद-प्रिय मंडळी कोटिक्रम कसा करितात तो पहा! ते ह्मणतात:—
"वा! खाशी युक्ति! वीस वर्षांच्या आंतील वयाच्या, कोंवळ्या, लुसलुशित अविवाहित पोरी, अथवा बावीस किंवा तेवीस वर्षांच्या विवाहित तरुणी, आपल्या घरांतील दिवाणखान्यांतून उचलाव्या आणखी पार्लमेन्ट गृहांत किंवा कारभारी मंडळांत अचानक नेऊन सोडाव्या!

मग राज्याचा बंदोबस्त काय विचारतां! *" पण ही उपहास करणारी मंडळी एक गोष्ट सर्वथा विसरतात. ती ही कीं, पार्लमेन्टसभेंत आपल्या तर्फे प्रतिनिधि ह्मणून, किंवा मोठ्या जबाबदारीचीं राज्यकारभाराचीं कामें करण्यास ह्मणून, जे पुरुष निवडले जातात, ते तरी इतक्या अल्पवयाचे निवडले जातात काय? ही गोष्ट, ज्यांस थोडा तरी सारासार विचार आहे, त्यांस देखील कळेल कीं, अशीं जबाबदारीचीं व विश्वासाचीं कामें जर स्त्रियांवर सोंपविलींच तर विवाहाच्या मागें किंवा विवाहित स्थितीच्या मागें असणारे जे पाश, त्यांपासून ज्या स्त्रिया मुक्त आहेत, किंवा ज्यांस आपल्या बुद्धिसामर्थ्याचा उपयोग सार्वजनिक कामांत करण्याची इच्छा आहे (हल्लींही लग्न करून संसार थाटण्यापेक्षां

---

* आमचे इकडेही अनेक 'काळ,' 'वैभव' इत्यादि पत्रांचा अवतार प्रस्तुतसारख्या विषयाचा यथेच्छ उपहास करण्या करितांच होय. पांचवी राष्ट्रीय सभा झाली त्या वेळीं पुरुषांप्रमाणें कांहीं स्त्रियाही प्रतिनिधि ह्मणून आल्या होत्या. मुंबईस सभेच्या बैठकी होण्यापूर्वी व त्यानंतर वर्तमान पत्रांत यासंबंधानें जे कांहीं लेख आले त्यांपैकीं प्रस्तुत स्थळीं प्रतिष्ठित व लोकमान्य अशा दोन पत्रांतील उताऱ्यांचा संग्रह आमच्या वाचकांकरितां येथें करणें इष्ट दिसतें.

केसरी—२४ डिसेंबर १८८९ —

" शिकंदराबादेच्या लोकांनीं रा. निंबकराव कानरान यांच्या पत्नीस आपल्या तर्फे मुखत्यार निवडून पाठविलें आहे. तसेंच मद्रासेकडील एक स्त्री डेलिगेट येणार आहे. आणखी कांहीं स्त्रिया राष्ट्रीय सभेचें सभास्थान अलंकृत करणार कीं नाहीं तें कळत नाहीं. वास्तविकपणें हा अपूर्व प्रकार पाहून लोकांचें मत कसें काय बनतें हें सांगतां येत नाहीं. पण स्त्रीशिक्षणाचा प्रसार चालू ठेवावयाचा, इतकेंच नाहीं तर तो वाढवायाचा असेल, स्त्रियांना दिवसानुदिवस त्यांच्या योग्यतेप्रमाणें कामें व अधिकार हीं द्यावयाचीं असतील तर अशा प्रकारचे प्रसंग येणारच. हा प्रकार केवळ अपूर्व मानून तेवढ्याकरितांच नाक मुरडणें ठीक होणार नाहीं. पंडिता रमाबाई सारख्या स्त्रिया असल्या सभेंत आल्या तर त्या सभेला एक प्रकारची विशेष शोभा खचित येईल. आतां डेलिगेट होऊन येणाऱ्या स्त्रियांस डेलिगेटांत जागा मिळते किंवा नाहीं,—वास्तविक पहातां त्यांना जागा कां मिळू

जीं कांहीं प्रतिष्ठेचीं कामें करण्याविषयीं समाजानें त्यांस मोकळीक दिली आहे तींच त्या पतकरितात) अशाच स्त्रियांवर सोंपविलीं जातील. जीं कामें आपण करावीं अशीं त्यांस इच्छा होईल तीं करण्याविषयीं आपले ठिकाणीं पात्रता यावी या हेतूनें ज्यांनीं आपल्या तारुण्याचा ऐन बहर अभ्यास करण्यांत घालविला आहे; अथवा विशेषेंकरून, आपल्या कुटुंबांत राहून ज्यांनीं व्यवहारज्ञान व शासनदक्षता संपादन केली आहे, अशा चाळीस किंवा पन्नास वर्षांच्या गतभर्तृका, किंवा सभर्तृका स्त्रिया, योग्य अभ्यासानें, पार्लमेंट सभेंत बसण्यास किंवा जबाब-

---

नंय हें आह्मांस सांगतां येत नाहीं. आणि मिळाल्यास त्या तेथें मौनव्रत स्वीकारतात अगर आपले विचार इतर सदस्यांना कळवितात, इत्यादि गोष्टी जाणण्याविषयीं लोक आतुर होतील."

राष्ट्रसभेंत सात आठ स्त्रिया प्रतिनिधि ह्मणून आल्या होत्या. ह्या वेळीं 'सामाजिक परिषद' किंवा समाजसुधारकांची सभा भरली होती त्या वेळीं गतभर्तृकांच्या असंमत केशवपनसंबंधाचा प्रश्न निघाला असतां **पंडिता रमाबाईनीं व मिसेस गांगोली** बी. ए. अशा दोन स्त्रियांनीं भाषणें केलीं तीं ऐकण्याविषयीं जमलेला समाज अत्यन्त आतुर होता व तीं भाषणेंही फार श्रवणीय झालीं, एवढ्या गोष्टी येथें नमूद करून ठेवणें इष्ट दिसतें.

सुधारक ६ जानेवारी १८९०:—

"तारीख २७ रोजीं **कायदे कौन्सिल सुधारणा** या मसुद्याचा विचार झाला. पुढें आणिलेल्या मसुद्यांत ६ कलमें होतीं. * * * त्यांतील तिसऱ्या कलमांत 'पुरुष" या ठिकाणीं 'मनुष्यें" असा शब्द घालावा अशी मिसेस गांगोली यांनीं सूचना केली होती ती बरोबर आहे असें आह्मांस वाटतें. कायदे करणाऱ्या मंडळ्यांमध्यें स्त्रिया बसूं लागण्यास जरी अजून अनंत अवकाश आहे तथापि कायदे करितांना कोणत्याही सद्गुणी व समंजस मनुष्यास तेथें जाण्यास जाणून बुजून हरकती ठेवणें, आह्मांस समंजस दिसत नाहीं. चांगला परिणाम व्हावा अशी इच्छा जागृत ठेवणें असेल तर स्त्रियांना पुरुषाबरोबर लढाई करण्यास जागा ठेवणें हें उचित नाहीं. विदुषी **रमाबाईसारख्या** अनुभवी स्त्रिया बाहेर ठेवून विद्यालयांतून बाहेर पडलेल्या बालकांस कायदे करण्याकरितां आंत घेणें, हें 'जुक्तीस' जमत नाहीं."

दारीचीं राजकारणाचीं कामें करण्यास पात्र व अधिकारी होणार नाहींत काय? **यूरोप** खंडांतील बहुतेक सर्व देशांतून खासगी कामांत व राजकीय कामांत हुशार, अनुभवी व व्यवहारदक्ष अशा स्त्रियांची सल्लामसलत व साहाय्य यांचा अनेक प्रसंगीं आपणास उपयोग झाला आहे, असें मोठमोठ्या लोकांनीं, कबूल केल्याचीं व त्यांच्या गुणांचें ग्रहण केल्याचीं उदाहरणें पुष्कळ आहेत. सार्वजनिक कामांत किंवा राजकीय कारभारांत अशा कांहीं महत्त्वाच्या बाबी आहेत कीं त्यांत स्त्रियांची बरोबरी करणारे पुरुष क्वचितच सांपडतील. या बाबींत खर्चाच्या संबंधाची काटकसर ही एक बाब होय. प्रस्तुत स्थळीं समाजाला स्त्रियांच्या बुद्धिसामर्थ्याची अपेक्षा आहे कीं काय, या गोष्टीचा आपण विचार करीत नाहीं. तर, आपलें आयुष्य व्यर्थ जात आहे, आपलें जीवित निष्फळ होत आहे, असें वाटून स्त्रियांनीं उदासीन व हताश होऊन बसणें, हें योग्य आहे काय? एवढ्याच गोष्टीचा आपणास विचार कर्तव्य आहे. कांहीं स्त्रियांस विवाह करून संसार करणें हा जो एकच व्यवसाय समाजानें विहित मानिला, तो कधींच प्राप्त झाला नाहीं.* कांहीं स्त्रियांस एक वेळ तो प्राप्त झाला होता परंतु पुढें नाहींसा झाला, अशा हजारों स्त्रिया, आपल्या ठिकाणीं व्यवहारदक्षता असूनही विवाहाशिवाय अन्य व्यवसाय करण्याचा प्रतिबंध समाजानें केल्यामुळें निरुत्साह व निराश होत्सात्या आपलें जन्म व्यर्थ असें समजून आयुष्याचे दिवस लोटीत असतात, या गोष्टीचा विचार आपले मनांत येऊं नये काय? मनुष्यप्राण्याच्या सुखाला अत्यंत महत्वाची व आवश्यक अशी जर कांहीं एक गोष्ट असेल तर ती ही आहे कीं, ज्याचा त्याला आपला व्यवसाय करण्याचा पूर्ण उल्हास वाटणें.—या गोष्टीची उणीव असल्यामुळें, ह्मणजे ज्याला जो धंदा नेहमीं करावा लागतो तो करण्या-

* आमच्या प्रमाणें यूरोपियन् लोकांत प्रत्येक मुलीचें लग्न झालेंच पाहिजे असा प्रकार नाहीं, ही गोष्ट येथें वाचकांनीं ध्यानांत ठेवावी.

विषयीं त्यास उत्साह नसल्यामुळें, जीवितसाफल्यास अवश्य अशा इतर सर्व गोष्टी जरी त्यांना अनुकूल आहेत असें दिसतें, तरी वर सांगितलेल्या एका गोष्टीच्या उणीवीमुळें पुष्कळ माणसांचे जन्म फुकट गेल्यासारखे होतात. बाह्य उपाधि आपल्या स्वाधीन करून घेण्याचें चातुर्य समाजाच्या ठिकाणीं अद्यापि आलें नाहीं, या कारणानें मनुष्यांचे जन्म निष्फळ व्हावे, ही गोष्ट सांप्रत अपरिहार्य आहे. हें जरी खरें असलें तरी समाजानें निदान आपण होऊन तरी मनुष्यांचे जन्म निष्फळ करण्यास प्रवृत्त होऊं नये, इतकेंच माझें ह्मणणें आहे. आई-बापांच्या अदूरदर्शित्वामुळें, किंवा तरुण माणसांस जगाचा अनुभव नसल्यामुळें, आवडता व्यवसाय प्राप्त होण्यास अवश्य अशा अवांतर गोष्टींच्या प्रतिकूलतेमुळें व नावडता असा व्यवसाय प्राप्त करून देणाऱ्या गोष्टींच्या अनुकूलतेमुळें वगैरे कारणांनीं शेंकडों माणसांस एकादा धंदा आपल्या इच्छे विरुद्ध व कसाबसा तरी करण्यांत आपलें आयुष्य घालवावें लागतें. जे धंदे त्यांनीं मोठ्या खुषीनें, सुखासमाधानानें व चांगल्या प्रकारें केले असते, असे दुसरे पुष्कळ धंदे करण्याची त्यांस समाजानें आपलेकडून पूर्ण मोकळीक दिली असूनही असा परिणाम पुरुषांच्या संबंधानें होतो. मग प्रत्यक्ष कायद्यानें, व कायद्याच्याच बरोबरीच्या ज्या लोकरूढि, त्या रूढींनीं, ज्या स्त्रियांचा व्यवसायमार्ग संकुचित करून टाकिला, त्या स्त्रियांवर केवढा जुलूम होतो, याचा विचार आपणांस अवश्य केला पाहिजे. ज्ञानविहीन समाजांत, वर्ण, जाति, आणि धर्म व परवश झालेल्या देशांत राष्ट्रजनता (nationality), ह्मणजे त्या देशांत जन्म प्राप्त होणें, या गोष्टींचा परिणाम जसा कांहीं पुरुषांस बाधक होतो, तसाच लिंगभेद एकंदर स्त्रीवर्गास बाधक होतो, हें ध्यानांत आणिलें पाहिजे. बहुतेक सर्व प्रतिष्ठेचीं कामें करण्याची स्त्रियांस एकदम बंदी! जीं कामें

दुसऱ्यांस (पुरुषवर्गापैकीं खालच्या वर्गास) करितां येत नाहींत किंवा जीं कामें आपणांस उचित नाहींत असें त्यांस वाटत असेल, तेवढीं कामें मात्र करण्याची पूर्ण मुभा पुरुषांनीं स्त्रियांस दिली आहे. आपलें आयुष्य व्यर्थ गेलें* असें वाटून किती स्त्रिया दुःखाग्नीनें पोळल्या जातात, याची कल्पना थोड्याच लोकांस असेल! कारण, वर सांगितलेल्या गोष्टीमुळें उत्पन्न होणाऱ्या ज्या यातना किंवा दुःखें ज्यांस सोसावीं लागतात त्यांची कोणास दयाच येत नाहीं. जों जों स्त्रियांस अधिकाधिक शिक्षण मिळत जाईल, जों जों त्यांचीं मनें अधिक ज्ञानसंपन्न व सुसंस्कृत होत जातील, तों तों त्यांच्या विचारांत आणि बुद्धिसामर्थ्यांत व समाजानें त्यांच्या व्यवसाय–प्रवृत्तीला जेवढा अवकाश ठेविला आहे, त्यांतील विसंगतपणा अधिक होऊन व ती फूट जास्त जास्त वाढत जाऊन आह्मीं वर निर्दिष्ट केलेला अपायकारक प्रकारही जोरावत जाणार, हें उघड दिसत आहे.

२२. मानवी जातीपैकीं अर्धा भाग अनधिकारी व अपात्र ठरविण्यांत आल्यामुळें त्या अपात्रतेच्या योगानें त्या भागास जो अप्रत्यक्ष अपाय घडत आहे व जी इजा पोंचत आहे ती अशीः—एक तर अत्यन्त उत्साहजनक व उन्नतिप्रद अशा प्रकारच्या व्यक्तिसुखाचें वाटोळें होत आहे. दुसरें, त्या सुखाच्या ऐवजीं खिन्नता, निरुत्साह व जीवाचा अत्यन्त तिरस्कार उत्पन्न होऊन त्याचा कंटाळा यावा व

* प्रस्तुत ठिकाणीं प्रसिद्ध संगीताचार्य कै० रा. अण्णा किर्लोसकर यांनीं केलेलें एक गोड व हृदयद्रावक पद्य आहे त्याची आठवण झाल्याशिवाय राहत नाहीं ह्मणून त्याचा संग्रह 'परवशतेच्या,' वाचकाकरितां येथें करण्याची परवानगी मागतों. तें पद्य येणें प्रमाणेंः—

व्यर्थ आह्मी अबला ॥ खचित बाई ॥ व्यर्थ ॥ धृ० ॥
वागविली नर पशुसम आह्मां ॥ मान नसे कसला ॥ ख० ॥ १ ॥
स्वातंत्र्याचा लेश नसे कधीं ॥ बंदिवास ठरला ॥ ख० ॥ २ ॥
नर नारी सम शास्त्र ह्मणे परी ॥ अनुभव नच आला ॥ ख० ॥ ३ ॥

असमाधान प्राप्त व्हावें, असा परिणाम घडत आहे. अशा रीतीनें आपल्या समोर उघड उघड घडणाऱ्या या अनर्थांचा विचार केला ह्मणजे खरोखर असें वाटतें कीं, या आधींच दोषप्रचुर व कष्टमय अशा इहलोकच्या वसतींत उपलब्ध होणाऱ्या ज्या अनंत अडचणी त्यांशीं झुंज घेण्याच्या कामांत मनुष्यास जे जे धडे शिकले पाहिजेत त्यांत एक फारच महत्वाचा आहे. सृष्टि आपण होऊन जे अपाय, ज्या अडचणी व जीं संकटें मनुष्यप्राण्यावर आणिते, त्यांत एकानें आपल्या मत्सरबुद्धीनें व दुराग्रहानें दुसऱ्यास विनाकारण प्रतिबंधांत ठेवून त्या संकटांत आणखी भर घालूं नये. त्यांना जी भीति वाटत असते ती पोकळ असते. ज्या दुष्परिणामांची निष्कारण भीति त्यांना वाटत असते, ते परिणाम तर घडत नाहींतच. पण उलट भलतेच व त्यांच्या कल्पनासृष्टींत घोळत असलेल्यापेक्षांही अधिक वाईट परिणाम घडून येत असतात. आपल्या कर्मापासून किंवा वर्तनापासून प्रत्यक्ष घडणारा वाईट परिणाम ज्याचा त्यास सोसावा लागणें, हें ठीकच आहे. परंतु याशिवाय इतर रीतीनें मनुष्याचें वर्तन–स्वातंत्र्य नियंत्रित करण्याच्या हरएक प्रकारानें मानवी सुखाचा मुख्य झराच वाळून जातो. आणि मानवजातीपैकीं प्रत्येक व्यक्तीला आपलें आयुष्य किंवा आपला जीव ज्या ज्या कारणामुळें इतका प्रिय व मूल्यवान वाटत असतो, त्यास सर्व प्रकारें कमीपणा येऊन व्यक्तिसुखाला जबर धक्का बसतो. तो इतका कीं लोकांस त्याची कल्पना देखील होणें अशक्य आहे.

समाप्त.

उपसंहार.

देवि **परवशते**! तुझा माझा आज वियोग घडणार ह्मणून मला वाईटही वाटत आहे व चांगलेंही वाटत आहे! **मृच्छकटिक** नाटकांतील **शकारास** जशी **वसंतसेना** तशी तूं मला हवीशी पण वाटतेस आणखी नकोशी पण वाटतेस! अथवा, शापविमूढ झालेल्या पांचव्या अंकांतील **दुष्यंतास** जशी **शकुंतला** घ्यावीशीही वाटेना व टाकावीशीही वाटेना, तशाच प्रकारची कांहीं चमत्कारिक स्थिति तुझ्यासंबंधानें सांप्रत माझ्या मनाचीही झाली आहे. देवि! तुझें उदात्त व मोहक स्वरूप प्रथमच माझ्या दृष्टीस पडल्यास आज फार वर्षें, ह्मणजे जवळ जवळ वीस वर्षें झालीं! तेव्हां मी नुकताच कोठें वरिष्ठ विद्यामंदिरांत प्रवेश केला होता, त्या दिवसापासून तुला आपलीशी करावी, अशी मनांत उत्कट इच्छा होती. परंतु तूं पडलीस परजातीय! तुझें जन्म स्वातंत्र्यप्रिय व पराक्रमशाली **इंग्रेजांच्या** सर्वैश्वर्यसंपन्न देशांत झालेलें! तेव्हां मज गरीब ब्राह्मणाला तूं कशाची वश होतेस! असें मनांत येऊन पुष्कळ दिवस तुला आपलीशी करण्याचा माझा यत्न शिथिल पडला. परंतु कांहीं केल्यानें तुझा नाद सुटेना. राहून राहून पुनः मन तुजकडे ओढे. शेवटीं तुजवर जबरदस्तीनें **महाराष्ट्र** पोषाख चढवून कशी बशी तरी पण तुला आपल्या गोतांत आणून सोडावयाची, असा निश्चय करून कंबर तर बांधिली! परंतु देवि! या कृत्यांत तूं किती आडकाठ्या आणिल्यास! किती आढेवेढे घेतलेस व किती तरी माझे हाल हाल केलेस! रागानें व संतापानें तुझें पुनः नांव घ्यावयाचें नाहीं, असें ह्मणून तुला कांहीं दिवस मी अगदीं विसरून गेलों. तथापि पुनः येऊन तुझ्या विनवण्या केल्या आणि तुझ्या

पायां पडून व अनेक प्रकारें तुझें आर्जव करून शेवटीं तुला मराठीण तर बनविली! परंतु मूळची तूं पडलीस परदेशची! त्यांतून संपन्न भाषेंतली! यामुळें तुझें उदात्त व तेजःपुंज स्वरूप माझ्या गरीब गण-गोतांतल्या माणसांस जितकें स्वकीय व प्रिय भासावें तितकें भासत नाहीं, या गोष्टीस माझा तरी काय इलाज! देवि! तूं मनानें फार खोल, गंभीर व मानी असून गांवढ्यांतल्या एखाद्या **सटवाई**प्रमाणें सामान्य जनाच्या नवसास सहज पावणारी नाहींस! तूं संपन्न देशांतील असून तुझ्या अंगावर अलंकार पाहिले तर फारच थोडे! तूं जात्या स्त्री असल्या-मुळें स्त्रियांच्या व परवशजनाच्या संकटाला धांवण्या शिवाय दुसरा कोण-ताही व्यवसाय तुला सुचत नाहीं, यांत काय आश्चर्य! असो. आज बहुत वर्षें तुझ्या कठिण आराधनेंत व सेवेंत जो बरा वाईट काळ मीं घालविला व कशी बशी तुला प्रसन्न करून घेतली, ती तूं माझ्या स्वदेशबांधवांना व भगिनींना परदेशस्थ असूनही स्वजनाप्रमाणें कल्याणप्रद हो, एवढेंच तुजपाशीं मागणें मागून मी आतां अंशतः आनंदानें व अंशतः कष्टानें तुझा निरोप घेतों!

पुणें. १८९०

भाषान्तरकार.

पुरवणी.

[मि. जॉन् मोर्ले यांचा अभिप्राय].

(1) The little book on the *Subjection of Women* though not a capital performance like the *Logic* was the capital illustration of the modes of reasoning about human character set forth in his *Logic* applied to the case in which the old metaphysical notion of innate and indelible differences is still nearly as strong as ever it was, and in which its moral and social consequences are so inexpressibly disastrous, so superlatively powerful in keeping the ordinary level of the aims and achievements of life low and meagre. The accurate and unanswerable reasoning, no less than the noble elevation of this great argument ; the sagacity of a hundred of its maxims on individual conduct and character, no less than the combined rationality and beauty of its aspirations for the improvement of collective social life, make this piece probabely the best illustration of all the best and richest qualities of its author's mind, and it is fortunate that a subject of such incomparable importance should have been first effectively presented for discussion in so worthy and pregnant a form.

It is interesting to know definitely from the Autobiography, what is implied in the opening of the book itself, that a zealous belief in the advantages of abolishing the legal and social inequalities of women was not due to the accident of personal intimacy with one or two more women of exceptional distinction of character. What has been ignorantly supposed in our own day to be a crotchet of Mr. Mill's was the common doctrine of the younger

proselytes of the Benthamite school, and Bentham himself was wholly with them (Autobiography p. **105** and 244); as, of course, were other thinkers of an earlier date, Condorcet, for instance. In this as in other subjects Mr. Mill did not go beyond his modest definition of his own originality the application of old ideas in new forms and connections (p. 119) or the originality which every thoughtful mind gives to its own mode of conceiving and expressing truths which are common property (p. 254). Or shall we say that he had an originality of a more genuine kind which made him first diligently acquire what in an excellent phrase he calls *plenary possession* of truths, and then transfuse them with a sympathetic and contagious enthusiasm?

It is often complained that the book on Women has the radical imperfection of not speaking plainly on the question of the limitations proper to divorce. The present writer once ventured to ask Mr. Mill why he had left this important point undiscussed. Mr. Mill replied that it seemed to him impossible to settle the expediency of more liberal conditions of divorce, first, without hearing much more fully than we could possibly do at present the ideas held by women in the matter; second, until the experiment of marriage with entire equality between man and wife had been tried! People who are in a hurry to get rid of their partners may find this very halting kind of work, and a man who wants to take a new wife before sunset, may well be irritated by a philosopher who tells him that the question may possibly be capable of useful discussion towards the middle of the next century. But Mr. Mill's argument is full of force and praiseworthy patience'!

John Morley.

[मि. फ्रेडरिक् हारिसन् यांचा अभिप्राय.]

(2) Mr. Frederic Harrison in the Nineteenth Century says :—

"I turn now to the last of his completed works, the Subjection of Women (1869) in many ways the most eloquent of his works, the most characteristic and perhaps that which has had the most direct and immediate effect. Like the Liberty, it was written many years before it was published and was to a great degree a joint production. His biographer, Prof. Bain, very justly calls it—'the most sustained exposition of Mill's life-long theme, the abuses of power.' And Mr. John Morley calls it 'the best illustration of all the best and richest qualities of its author's mind.' It is fortunate, he adds, that a subject of such incomparable importance should have been first effectively presented for discussion in so worthy and pregnant a form.

The form is, indeed, pregnant and in every sense worthy of a scheme which touches us all home, and reaches so far and wide. It is one of those very rare examples of a short treatise on a weighty topic, packed with accumulated thought and fused with ardent conviction. In four short chapters it condenses a scheme of social ethics. It is in its passionate logic the most notable result of this ripest, loftiest, most inspiring part of his life. And its practical effect on legislation, manners and opinion has no doubt been greater than any thing which Mill gave to his generation. The law has already been amended on many points which draw down his indignation and satire. A great number of the disabilities of women arising from prejudice, habit or torpor have been

practically removed. At least there remains no legal or moral bar to the aspiring women except in one or two exceptional cases. Literature, art, medicine, science, law, the Universities, athletics, sport, political agitation, the public service, are now practically open to women.

---

(3) From Mr. Grant Allan's novel "The Woman Who Did."

"The future is to the free. We have transcended Serfdom. Women shall henceforth be the equals of men, not by levelling down, but by levelling up; not by fettering the man, but by elevating, emancipating, unshackling the woman."

* * *

—"It is hard to be a free soul in an enslaved community. No unit can wholly sever itself from unsocial organism of which it is a corpuscle."

* * *

"Sooner or later, I am sure, if you begin by educating women, you must end by emancipating them."

* * *

"It is the emancipation, not the mere education that most appeals to me."

---

(4) From Tennyson. (The Princess).

"For woman is not undeveloped man,
"But diverse: could we make her as the man,
"Sweet Love were slain: his dearest bond is this,
"Not like to like, but like in difference.

" Yet in the long years liker must they grow :
" The man be more of woman, she of man ;
" He gain in sweetness and moral height,
" Nor lose the wrestling thews that throw the world;
" She mental breath, nor fail in childward care,
" Nor lose the child-like in the larger mind ;
" Till at the last she set herself to man,
" Like perfect music unto noble words ;
" And so these twain upon the skirts of Time,
" Sit side by side, full-summ'd in all their powers,
" Dispensing harvest, sowing the To-be,
" Self-reverent each and reverencing each,
" Distinct in individualities,
" But like each other ev'n as those who love :
" Then comes the statelier Eden back to men :
" Then reign the world's great bridals, chaste and calm :
" Then springs the crowning race of human kind.
" May these things be ! "

" At last

" She rose upon a wind of prophecy
" Dilating on the future ; 'every where
" Two heads in council, two beside the hearth,
" Two in the tangled business of the world
" Two in the liberal offices of life,
" Two plummets dropped for one to sound the abyss
" Of science, and the secrets of the mind :

"Musician, painter, sculptor, critic, more:
"And everywhere the broad and bounteous Earth
"Should bear a double growth of those rare souls,
"Poets, whose thoughts enrich the blood of the world."

***

"The Woman's cause is Man's: they rise or sink
"Together, dwarf'd or god-like, bound or free:
"For she that out of Lethe scales with man
"The shining steps of Nature, shares with man
"His nights, his days, moves with him to one goal,
"Stays all the fair young planet in her hands—
"If she be small, slight-natured, miserable,
"How shall men grow?"

---

(5) *Annie* Besant on "*Womanhood*" (See "*Ancient Ideals*," p. p. 111, 112).

"Husband and wife are not thought of as two, but they are thought of as one. Husband and wife are not thought of as separate, they are thought of as united. Husband and wife are not thought of as capable of division, they are but two halves, constituting an entire, a single whole. Just as in the Deva and Devi one Divine life is manifested, so in the husband and wife the perfect type of humanity is shown forth. There is no idea of possible antagonism. There is no idea of possible

rivalry. Man and Woman, husband and wife, are two halves of the complete Man, of the complete Human Life-that perfect Union, that true Unity, gave the Hindu Ideal of Marriage."

---

(6) भर्तृभ्रातृपितृज्ञातिश्वश्रूश्वशुरदेवरैः
बन्धुभिश्च स्त्रियःपूज्याः—

याज्ञवल्क्यः

(7) सर्वाश्रमानुपादाय स्वाश्रमेण कलत्रवान् ।
व्यसनार्णवमत्येति जलयानैर्यथार्णवम् ॥
यामाहुरात्मनोह्यर्धं श्रेयस्कामस्य मानिनि ! ।
यस्यां स्वधुरमध्यस्य पुमांश्चरति विज्वरः ॥
यामाश्रित्येंद्रियारातीन्दुर्जयानितराश्रमैः ।
वयं जयेम हेलाभिर्दस्यून्दुर्गपतिर्यथा ॥
न वयं प्रभवस्तांत्वामनुकर्तुं गृहेश्वरि ! ।
अप्यायुषा वा कार्त्स्न्येन ये चान्ये गुणगृध्नवः ॥

श्रीमद्भागवत. ३-१४.